# "यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या ज्ञानगंगोत्री या नियतकालिकाच्या सन २००० ते २०१२ या काळातील अंकांचे विश्लेषण"

## टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.

तात्त्विक व सामाजिक शास्त्रे विद्याशाखातर्गंत ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विषयातील विद्यावाचस्पती (पीएच्.डी) पदवीसाठी सादर केलेला शोधप्रबंध


संशोधक

मनोहर बाबुराव केदार

मार्गदर्शक

डॉ. मधुकर एन. शेवाळे

ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विभाग


ऑगस्ट २०१६

# संशोधकाचे प्रमाणपत्र

मी, प्रतिज्ञापूर्वक नमूद करतो की, **“यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या ज्ञानगंगोत्री या नियतकालिकाच्या सन २००० ते २०१२ या काळातील अंकांचे विश्लेषण”** हा शोध प्रबंध मी स्वत: पूर्ण केलेला आहे. तो इतर कोणत्याही विद्यापीठातील पदवी करिता अगर परीक्षेकरिता सादर केलेला नाही.

संशोधक

**(श्री. मनोहर बाबुराव केदार)**

ठिकाण:- नाशिक

दिनांक:- १३/०८/२०१६

# मार्गदर्शकाचे प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, **“यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या ज्ञानगंगोत्री या नियतकालिकाच्या सन २००० ते २०१२ या काळातील अंकांचे विश्लेषण”** हा शोधप्रबंध विद्यावाचस्पती (पीएच्. डी) पदवीकरिता ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विभाग, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे- ३७ येथे सादर करण्यात आला आहे. हा शोध प्रबंध श्री. मनोहर बाबुराव केदार यांनी, माझ्या पर्यवेक्षण व मार्गदर्शनाखाली पूर्ण केलेले संशोधन कार्य आहे. माझ्या माहिती व विश्वासानुसार संबंधित संशोधन कार्य हे त्यांनी इतर कोणत्याही विद्यापीठाच्या पदवीकरिता किंवा परीक्षेकरिता वापरले नाही.

मार्गदर्शक

**(डॉ. मधुकर एन. शेवाळे)**

ठिकाण:- नाशिक

दिनांक:- १३/०८/२०१६

# ऋणनिर्देश

"यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या ज्ञानगंगोत्री या नियतकालिकाच्या सन २००० ते २०१२ या काळातील अंकांचे विश्लेषण" या विषयाच्या संशोधन कार्यासाठी मार्गदर्शक, विविध विद्यापीठांचे व महाविद्यालयांचे ग्रंथपाल, ग्रंथालय व माहितीशास्त्रातील तज्ञ व्यक्ती, विविध संघटना, संस्थाचे पदाधिकारी यांनी साहाय्य केले. संशोधनाला आवश्यक असणारी मौलिक माहिती कमीत- कमी वेळात उपलब्ध करून दिली, त्यामुळेच हे संशोधन कार्य पूर्ण होवू शकले. त्यांच्याब-ल कृतज्ञता व्यक्त करणे हे सदर संशोधक आपले कर्तव्य समजतो.

विद्यावाचस्पती पदवीच्या संशोधन कार्यात प्रस्तुत विषयाचा सखोल अभ्यास करतांना माझे मार्गदर्शक डॉ. मधुकर एन. शेवाळे (ग्रंथपाल व प्रमुख, ग्रंथालय आणि माहितीस्त्रोत केंद्र यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक) यांचे बहूमोल मार्गदर्शन मिळाले. संशोधन करतांना त्यात अनेकवेळा अडचणी आल्या. मात्र त्यांनी वेळ काळाचे बंधन न पाळता सदैव तत्परतेने मार्गदर्शन केल्याने त्या दूर करता आल्या. त्यामुळे मी त्यांचा अत्यंत ऋणी आहे.

प्रस्तुत संशोधनाची संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचा तसेच ग्रंथालय व माहितीशास्त्र विभागाचा मी अत्यंत ऋणी आहे. टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या ग्रंथपाल डॉ. सौ. धनिष्ठा खंदारे, पुणे विद्यापीठाच्या जयकर ग्रंथालयाचे ग्रंथपाल डॉ. राजेंद्र कुंभार, औरंगाबाद विद्यापीठाचे ग्रंथपाल डॉ. धर्मराज वीर, अमरावती विद्यापीठाचे ग्रंथपाल डॉ. मोहन खेरडे, पुणे विद्यापीठाच्या जयकर ग्रंथालयातील डॉ. बी. एम. पानगे, के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयातील ग्रंथपाल डॉ. प्रकाश बोडके, एच. पी. टी महाविद्यालयातील ग्रंथालय व माहितीशास्त्र विभागाचे प्रा. जयंत नंदागवळी, एम. ई. टी. अभियांत्रिकी महाविद्यालयाचे ग्रंथपाल डॉ. संभाजी पाटील, व्हि. एन. नाईक महाविद्यालय नाशिकचे ग्रंथपाल प्रा. शरद आव्हाड, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, चांदवड चे ग्रंथपाल प्रा. संतोष ठाकरे, म. वि. प्र. संचलित के. बी. टी. अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या ग्रंथपाल प्रा. वर्षा जुन्नरे आणि बी. वाय. के. महाविद्यालयाचे डॉ. चंद्रकांत चौधरी यांचेही वेळोवेळी बहुमूल्य मार्गदर्शन मिळाले. त्यांचाही मी आभारी आहे.

एस. एन. जे. बी. संचलित स्व. सौ. कांताबाई भवरलालजी जैन अभियांत्रिकी महाविद्यालय, चांदवडचे माझे सहकारी संगणक विभागप्रमुख डॉ. महेश संघवी, ईलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड टेलिकम्युनिकेशन विभागप्रमुख डॉ. विशाल वानखेडे, कार्यालयीन अधिक्षक श्री. श्रीपाद बुरकुले, एम.बी.ए. विभागप्रमुख प्रा. उमेश कासार, प्रा. पंकज कापसे, यांचेही या संशोधन कार्यात वेळोवेळी सहकार्य लाभले, त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. तसेच एस. एन. जे. बी. अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या ग्रंथालयातील माझे सहकारी सौ. सुनिता चव्हाण, श्री. योगेश शेळके, श्री. संदिप गुजराथी, श्री. विजय ठोके, श्री. सागर वाघ, सोमनाथ शिंदे आणि भुषण कोकांदे यांचेही वेळोवळी सहकार्य मिळाले, त्याब- ल त्यांचाही मी आभारी आहे.

सदर संशोधन कार्यासाठी माझी पत्नी प्रा. सौ. निता केदार हिने प्रत्यक्ष सहभाग घेवून प्रोत्साहन दिले, तसेच माझी आई यमुनाबाई केदार, चि. यश यांनीही वेळोवेळी बहुमोल वेळ देवून सहकार्य केले. यामुळे मी या सर्वांचा ऋणी आहे.

या संशोधन कार्यासाठी ज्यांनी- ज्यांनी प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष मदत केली, निरपेक्ष भावनेने सहकार्य केले त्या सर्व ज्ञात अज्ञात व्यक्तींचा मी ऋणी आहे.

**मनोहर बाबुराव केदार**

संशोधक

# अनुक्रमणिका


| प्रकरण | तपशील | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| | मुखपृष्ठ<br>संशोधकाचे प्रतिज्ञापत्र<br>मार्गदर्शकाचे प्रमाणपत्र | |
| | ऋणनिर्देश | i – ii |
| | अनुक्रमणिका | iii - vi |
| | सारणींची यादी | vii - viii |
| | आलेखांची यादी | ix |
| | | |
| **प्रकरण १.** | **संशोधनाची रुपरेषा** | **१ - २३** |
| | १.१ प्रस्तावना | १ |
| | १.२ संशोधन विषय | ३ |
| | १.३ संशोधनाचे महत्त्व | ४ |
| | १.४ संशोधन समस्या | ४ |
| | १.५ संशोधनाची उद्दिष्टे | ५ |
| | १.६ संशोधनाची गृहीतके | ५ |
| | १.७ संशोधनाची व्याप्ती व मर्यादा | ५ |
| | १.८ संशोधन पध्दती | ६ |
| | १.९ तथ्य संकलन | १५ |
| | १.९.१ प्राथमिक तथ्य | १६ |
| | १.९.२ द्वितीयक तथ्य | १८ |
| | १.१० संशोधनाची कार्यपध्दती | १८ |
| | १.११ संशोधनासंबंधी सारांश | १९ |
| | सारांश | |

| | | |
|---|---|---|
| **प्रकरण २.** | **संशोधन पूर्वाभ्यास व वाचन साहित्य शोध** | **२४ - ८४** |
| | २.१ प्रस्तावना | २४ |
| | २.२ संबधित साहित्याच्या समालोचनाची उद्दिष्टे | २५ |
| | २.३ संबंधित साहित्याचे समिक्षण | २६ |
| | २.४ संबंधित संशोधनाचे समिक्षण | २७ |
| | २.५ पीएच्. डी. शोधप्रबंध | २७ |
| | २.६ एम. फिल. चे लघू शोधप्रबंध | ३२ |
| | २.७ एम.लिब. चे संशोधन प्रकल्प | ४२ |
| | २.८ संदर्भ साहित्याचा आढावा | ४८ |
| | २.९ नियतकालिकातील लेखांचा आढावा | ५४ |
| | सारांश | |
| | | |
| **प्रकरण ३.** | **आशय विश्लेषण** | **८५ - १०६** |
| | ३.१ प्रस्तावना | ८५ |
| | ३.२ आशय विश्लेषणाचा विकास | ८६ |
| | ३.३ आशय विश्लेषण पध्दती अर्थ व व्याख्या | ८७ |
| | ३.४ आशय विश्लेषणाची वैशिष्ट्ये | ८९ |
| | ३.५ आशय विश्लेषणाचे उद्देश | ९० |
| | ३.६ आशय विश्लेषणाचे प्रकार | ९१ |
| | ३.६.१ संकल्पनात्मक विश्लेषण | ९१ |
| | ३.६.२ संबंध विश्लेषण | ९२ |
| | ३.७ आशय विश्लेषणाचे एकक | ९४ |
| | ३.८ आशय विश्लेषणाचे वर्ग | ९५ |
| | ३.९ आशय विश्लेषणाच्या पायऱ्या | ९७ |
| | ३.१० आशय विश्लेषणाचे फायदे | ९९ |
| | ३.११ आशय विश्लेषणाच्या मर्यादा | १०१ |
| | ३.१२ आशय विश्लेषणाची प्रक्रिया | १०२ |
| | ३.१३ आशय विश्लेषणाचे ग्रंथालयात उपयोजन | १०२ |
| | ३.१४ विद्वत्त्व नियतकालिकांच्या संदर्भात आशय विश्लेषणाचे महत्व | १०३ |

| | | |
|---|---|---|
| | ३.१५ आशय विश्लेषणातील नवीन प्रवाह | १०४ |
| | सारांश | |
| | | |
| **प्रकरण ४.** | **मुक्त विद्यापीठ व ज्ञानगंगोत्री नियतकालिकाचा परिचय** | **१०७- १२८** |
| | ४.१ प्रस्तावना | १०७ |
| | ४.२ दूरशिक्षणाची संकल्पना | १०७ |
| | ४.३ दूरशिक्षणाचे वैशिष्ट्ये | १०९ |
| | ४.४ भारतातील दूरशिक्षणाचा इतिहास | १११ |
| | ४.५ भारतातील मुक्त विद्यापीठे | ११२ |
| | ४.६ भारतातील मुक्त विद्यापीठांद्वारे राबविले जाणारे अभ्यासक्रम | ११३ |
| | ४.७ यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ | ११८ |
| | ४.८ यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाची उद्दिष्टे | १२० |
| | ४.९ यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाची वैशिष्टे | १२० |
| | ४.१० मुक्त विद्यापीठाची विभागीय केंद्र | १२१ |
| | ४.११ यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाद्वारे राबविले जाणारे विद्याशाखानिहाय शिक्षणक्रम | १२२ |
| | ४.१२ मानव्यविद्या व सामाजिक शास्त्रे विद्याशाखा | १२२ |
| | ४.१३ ज्ञानगंगोत्री या नियतकालिकाचा परिचय | १२४ |
| | ४.१४ ज्ञानगंगोत्री नियतकालिकाचे उद्दिष्टे | १२६ |
| | सारांश | |
| | | |
| **प्रकरण ५.** | **माहितीचे संकलन, विश्लेषण आणि अर्थनिर्वचन** | **१२९- २१५** |
| | ५.१ प्रस्तावना | १२९ |
| | ५.२ माहितीचे संकलन, विश्लेषण व अर्थनिर्वचन | १३० |
| | ५.३ ज्ञानगंगोत्री या नियतकालिकाची पार्श्वभूमी | १३२ |
| | ५.४ ज्ञानगंगोत्री या नियतकालिकाचे महत्व | १३४ |
| | ५.५ ज्ञानगंगोत्री नियतकालिकाचे आशय विश्लेषण | १३५ |
| | ५.६ संपादक व संपादक मंडळाच्या मुलाखतीमधुन आलेल्या माहितीचे संकलन, विश्लेषण आणि अर्थनिर्वचव | २१० |
| | सारांश | |

| | | |
|---|---|---|
| **प्रकरण ६.** | **निष्कर्ष आणि शिफारशी** | **२१६- २३४** |
| | ६.१ प्रस्तावना | २१६ |
| | ६.२ संशोधनाचे निष्कर्ष | २१६ |
| | ६.३ उद्दिष्टांची पुर्तता | २२३ |
| | ६.४ गृहीतकांची पडताळणी | २२७ |
| | ६.५ संशोधनाच्या शिफारशी | २२९ |
| | ६.६ भविष्य वेध | २३४ |
| | समारोप | |
| | | |
| | **संदर्भ सूची**<br><br>**परिशिष्टे** | **२३५- २४६** |

# सारणींची यादी


| सारणी क्रं. | सारणीचे नाव | पृष्ठ क्रं. |
|---|---|---|
| ४.१ | भारतातील मुक्त विद्यापीठांची यादी | ११२ |
| ४.२ | भारतातील मुक्त विद्यापीठांद्वारे राबविले जाणारे अभ्यासक्रम | ११४ |
| ५.१ | ज्ञानगंगोत्री नियतकालिकाचा प्रकाशन कालावधी | १३५ |
| ५.२ | संपादकाचे नाव आणि कार्यकाळ | १४१ |
| ५.३ | कार्यकारी संपादकाचे नाव आणि कार्यकाळ | १४३ |
| ५.४ | संपादक मंडळातील सदस्यांचे विश्लेषण | १४६ |
| ५.५ | संपादकीय प्रस्तावनेचे अंकनिहाय वर्गीकरण | १४९ |
| ५.६ | संपादकीय प्रस्तावनेचे विषयवार विश्लेषण | १५१ |
| ५.७ | अजून ताजा वास जुन्याला या सदरातील लेख | १५३ |
| ५.८ | अंकनिहाय वेबसाईटचे विश्लेषण | १५६ |
| ५.९ | ग्रंथपरिचय या सदरातील लेखांचे विषयवार वर्गीकरण | १५८ |
| ५.१० | ग्रंथपरीचय या सदरातील भाषेनिहाय ग्रंथाचे विश्लेषण | १६१ |
| ५.११ | ग्रंथपरिचय सदरात ग्रंथपरिचय करुन देणा-या लेखकांचे विश्लेषण | १६२ |
| ५.१२ | सार सदरातील लेखांचे अंकनिहाय विश्लेषण | १६५ |
| ५.१३ | ज्ञानगंगोत्री नियतकालिकाच्या पृष्ठांचे वर्षनिहाय विश्लेषण | १६७ |
| ५.१४ | ज्ञानगंगोत्री नियतकालिकाच्या पृष्ठांचे अंकनिहाय विश्लेषण | १६९ |
| ५.१५ | ज्ञानगंगोत्री नियतकालिकातील अकांचे संख्यानिहाय पृष्ठांचे विश्लेषण | १७२ |
| ५.१६ | लेखांचे पृष्ठनिहाय विश्लेषण (Length of the Articles) | १७३ |
| ५.१७ | एकत्रित प्रकाशित झालेले अंक | १७५ |
| ५.१८ | लेखकांचे उत्तरदायित्व दर्शविणारा तक्ता (Authorship Pattern) | १७६ |
| ५.१९ | लेखकांनी लिहिलेल्या लेखांच्या उतरत्या क्रमवारीनुसार विश्लेषण (Author Rank List) | १७८ |

| | | |
|---|---|---|
| ५.२० | संपादक व लेखकांनी लिहिलेल्या लेखांचे प्रमाण | १८३ |
| ५.२१ | लेखकांचे लिंगभेदानूसार विश्लेषण | १८४ |
| ५.२२ | लेखकांचे पदनामनिहाय विश्लेषण | १८५ |
| ५.२३ | लेखकांचे जिल्हानिहाय विश्लेषण | १८८ |
| ५.२४ | प्रकाशित लेखांचे वर्षनिहाय विश्लेषण | १९० |
| ५.२५ | अंकनिहाय लेखांचे विश्लेषण | १९२ |
| ५.२६ | ज्ञानगंगोत्री नियतकालिकातील लेखांचे विषयवार विश्लेषण | १९५ |
| ५.२७ | लेखांचे प्रकारानुसार विश्लेषण | १९७ |
| ५.२८ | उल्लेखीत प्रलेखांचे प्रकारानुसार विश्लेषण | १९९ |
| ५.२९ | उध्दरणाचे कालपरत्वे विश्लेषण | २०१ |
| ५.३० | ज्ञानगंगोत्री या नियतकालिकात प्रकाशित झालेले विशेषांक | २०३ |
| ५.३१ | ग्रंथालय व ग्रंथालय सेवा यांच्या संगणकीकरणाचे व्यवस्थापन या विशेषांकांतील लेख | २०४ |
| ५.३२ | मराठी ग्रंथसूचिकार शंकर गणेश दाते जन्मशताब्दी विशेषांकातील लेख | २०५ |
| ५.३३ | मराठी ग्रंथमुद्रणकला द्विशताब्दी विशेषांकांतील लेख | २०६ |
| ६.१ | लेखांचे प्रकारानुसार विश्लेषण | २२७ |
| ६.२ | लेखकांचे लिंगभेदनिहाय विश्लेषण | २२८ |

## आलेखांची यादी


| आलेख क्रं. | आलेखाचे नाव | पृष्ठ क्रं. |
|---|---|---|
| ५.१ | संपादकाचे नाव आणि कार्यकाळ | १४१ |
| ५.२ | कार्यकारी संपादकाचे नाव आणि कार्यकाळ | १४४ |
| ५.३ | संपादक मंडळातील सदस्यांचे विश्लेषण | १४७ |
| ५.४ | संपादकीय प्रस्तावनेचे विषयवार विश्लेषण | १५२ |
| ५.५ | ग्रंथपरिचय सदरातील ग्रंथांचे विषयवार वर्गीकरण | १५९ |
| ५.६ | ग्रंथपरिचय सदरात भाषेनिहाय प्रसिध्द झालेल्या ग्रंथांचे विश्लेषण | १६१ |
| ५.७ | ग्रंथपरिचय सदरात ग्रंथपरिचय करुन देणाऱ्या लेखकांचे प्रमाण | १६४ |
| ५.८ | ज्ञानगंगोत्री नियतकालिकाच्या पृष्ठांचे वर्षनिहाय विश्लेषण | १६८ |
| ५.९ | ज्ञानगंगोत्री नियतकालिकांचे पृष्ठसंख्या विश्लेषण | १७२ |
| ५.१० | लेखांचे पृष्ठनिहाय विश्लेषण | १७४ |
| ५.११ | लेखकांचे उत्तरदायित्व दर्शविणारा आलेख | १७७ |
| ५.१२ | संपादक व लेखकांनी लिहिलेल्या लेखांचे प्रमाण | १८३ |
| ५.१३ | लेखकांचे लिंगभेदानुसार विश्लेषण | १८४ |
| ५.१४ | लेखकांचे पदनामनिहाय विश्लेषण | १८६ |
| ५.१५ | लेखकांचे जिल्हानिहाय विश्लेषण दर्शविणारा आलेख | १८९ |
| ५.१६ | प्रकाशित लेखांचे वर्षनिहाय विश्लेषण | १९१ |
| ५.१७ | ज्ञानगंगोत्री नियतकालिकातील लेखांचे विषयवार विश्लेषण | १९६ |
| ५.१८ | लेखांचे प्रकारानुसार विश्लेषण दर्शविणारा आलेख | १९८ |
| ५.१९ | उल्लेखित प्रलेखांचे प्रकारानुसार विश्लेषण | २०० |
| ५.२० | उध्दरणाचे कालपरत्वे विश्लेषण | २०२ |

# प्रकरण पहिले

# संशोधनाची रुपरेषा

## १.१. प्रस्तावनाः-

२१ व्या शतकात माहिती तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणात वापर होवू लागला. माहिती तंत्रज्ञानाच्या वापरामुळे माहितीच्या निर्मितीमध्ये प्रचंड वाढ झाली. दैनंदिन जीवनात विविध स्वरूपात अनेक मार्गांनी ज्ञान, माहिती प्राप्त होवू लागली. ज्ञानाचा, माहितीचा विस्फोट झाला असे म्हणण्याइतपत माहितीची निर्मिती होत आहे. ही माहिती लिखित व डिजीटल स्वरूपात उपलब्ध होवू लागली. लिखित साधनांमध्ये ग्रंथ, नियतकालिके, वृत्तपत्रे, तर डिजीटल स्वरूपात जसे इंटरनेट, ई-रिसोर्सेस यासारख्या साधनांतून मोठ्या प्रमाणात माहिती उपलब्ध होवू लागली. या प्रचंड माहितीच्या साठ्यामधून उपभोक्त्यांना उपयुक्त असणारी माहिती कमीत- कमी वेळात उपलब्ध करून देणे ही एक मोठी समस्या निर्माण झाली. कोणत्याही क्षेत्रात समस्या निर्माण झाली की संशोधनाला सुरवात होते. (**जोशी आणि खोत, २०११**)

आधुनिक ग्रंथालयात उपभोक्त्यांच्या मागणीला अनुसरून वेगवेगळ्या तंत्राचा उपयोग सातत्यपूर्ण करणे ग्रंथपालांना भाग पडते. कारण ज्ञान व माहिती साधनांच्या प्रकाशनात झालेली अमर्याद वाढ, त्याचे विस्कळीत असलेले स्वरूप व सातत्यपूर्ण संशोधनवृत्ती या पार्श्वभूमीवर ग्रंथसंग्रहाच्या विकासाबरोबरच नियतकालिकांच्या व्यवस्थापनाच्या दृष्टिकोनातून  दर्जेदार वाचनसाहित्य, संबंधित विषयालाधरून उपभोक्त्यांच्या मागणीला अनुसरून तसेच वेळेची बचत करून त्याचे नियोजन करणे असे प्रवाह ग्रंथालये समृध्द करण्यात मोलाची भूमिका पार पाडीत असतात. नियतकालिकात असणाऱ्या प्रचंड ज्ञानसाठ्यातील माहिती वाचकांच्या गरजेप्रमाणे प्रसारित करणे, त्याचप्रमाणे  नियतकालिकांच्या बांधीव खंडातून माहितीचा भूतलक्ष्यी शोध घेणे (Retrospective search) ही महत्वाची कार्ये ग्रंथालयांकडून पर्यायाने ग्रंथपालांकडून अपेक्षित असते. परंतु त्याकरिता ग्रंथपालाची अभ्यासूवृत्ती अतिशय संवेदनशील असावी लागते. त्याकरिता ग्रंथपालांनी वेगवेगळी तंत्रे आत्मसात करणे व त्यातून

उपभोक्त्यांच्या विशेषत: संशोधन कार्याच्या अंगाने त्यांच्या वाचन अभिरूचीच्या गरजा पूर्ण करणे याकरिता महाविद्यालयीन ग्रंथपालांना सदैव तत्पर असणे गरजेचे असते. (**बाहेती आणि डगवार, २००८**)

कोणत्याही विषयाला ज्ञानाचा दर्जा प्राप्त होण्यासाठी त्या विषयात सातत्याने संशोधन होणे आवश्यक असते. ग्रंथालय आणि माहितीशास्त्र हा विषय गेल्या शतकात सामाजिकशास्त्रांची एक स्वतंत्र व महत्वपूर्ण शाखा म्हणून विकासित झाली आहे. या विषयात संशोधनाच्या आधारे सातत्याने सुधारणा व विकास घडत आहे. संशोधनाद्वारे ज्ञानवृध्दी घडते आणि तंत्रज्ञानात प्रगती साधली जाते. विद्वत्तापूर्ण प्रकाशनाला संशोधनाचा आधार असतो. थोडक्यात ज्ञानाच्या प्रत्येक क्षेत्रात संशोधनाशिवाय प्रगती होत नाही. संशोधन ही सतत चालणारी प्रक्रिया आहे. या प्रक्रियेद्वारे नवीन ज्ञान प्राप्त करून घेण्यासाठी प्रयत्न केले जातात. (**राऊत आणि कापडे, २०१३**)

ग्रंथालयशास्त्रामध्ये संशोधन वृत्ती जोपासण्याचे व ती वाढीस लावण्याचे काम ग्रंथपालांनी अग्रक्रमाने केले पाहीजे. याकरिता ग्रंथपालांनी संशोधनाचे महत्व समजून घेणे आवश्यक आहे. ग्रंथपालाने हा विषय समजून घेतल्यास तो ग्रंथालयांमध्ये येणाऱ्या उपभोक्त्यांना संशोधनात उपयुक्त ठरू शकेल. कोणत्याही विषयाचा विकास हा त्या विषयातील अभ्यास आणि संशोधनावर अवलंबून असतो. ग्रंथपालाने स्वत: संशोधन केल्यास त्याला संशोधनातील अडचणी कळतात व त्यानुसार तो संशोधकांना मदत करू शकतो. म्हणजेच संशोधनास मदत करणारा स्वत: संशोधक असल्यास ती मदत अर्थपूर्ण होते.

माहिती तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे वाचन साहित्यामध्ये सातत्याने वाढ होताना दिसून येत आहे. हे वाचन साहित्य विविध स्वरूपात प्रकाशित होत आहे. यामध्ये ग्रंथ, नियतकालिक, वृत्तपत्र, पेटंट, प्रबंध, मानके, विशेषांक, इंटरनेट, ई-जर्नल्स, ई-बुक्स, ऑनलाईन डेटाबेस इत्यादी. या सर्व वाचन साहित्यामध्ये कोणत्या प्रकारची माहिती प्रकाशित होते?, तिचे स्वरूप काय असते? याचा अभ्यास महत्वाचा असतो. नियतकालिकांच्या संदर्भातही प्रकाशनांची संख्या मोठ्या प्रमाणावर झाली आहे. एका विषयाचे असंख्य नियतकालिके प्रकाशित होत आहे. या नियतकालीकाच्या माध्यमातून उपयुक्त व

अद्यायावत माहिती वाचकांना उपलब्ध होत असते. नियतकालिकांमध्ये येणारी माहिती अधिक उपयुक्त कशी होईल हे अभ्यासण्यासाठी प्रस्तुत संशोधकाने हा विषय निवडला आहे. (**चंद्रात्रे, २०११**)

## १.२. संशोधन विषयः-

माहिती तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे वाचनसाहित्य मोठ्या प्रमाणात प्रकाशित होवू लागले. त्याचबरोबर वाचन साहित्याच्या स्वरूपात देखील बदल होवू लागले. यामध्ये ग्रंथ, नियतकालिक, वृत्तपत्र, पेटंट, प्रबंध, मानके, विशेषांक, इंटरनेट, ई-जर्नल्स, ई-बुक्स, ऑनलाईन डेटाबेस यांचा समावेश होतो. या वाचन साहित्यामध्ये वाचकांना उपयुक्त व अद्यायावत माहिती देण्याचे काम नियतकालिकांच्या माध्यमातून प्रभावीपणे होवू लागले. नियतकालिकांच्या माध्यमातुन अद्यायावत व उपयुक्त माहिती वेळेत उपलब्ध करून दिली जाते, म्हणून सद्य:स्थितीत नियतकालिकांचा उपयोग मोठ्या प्रमाणात होवू लागला.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी ज्ञानगंगोत्री हे नियतकालिक सुरू केले. ज्ञानगंगोत्री हे मराठी भाषेतील ग्रंथालय व माहितीशास्त्रातील अद्यायावत व परिपूर्ण माहिती देणारे उपयुक्त नियतकालिक आहे. ग्रंथालय व माहितीशास्त्र हा अभ्यासक्रम मराठी भाषेतून शिकणाऱ्या विद्यार्थ्याबरोबरच मराठी भाषेतील ग्रंथालयशास्त्रातील व्यावसायिक, वाचक व संशोधकांना देखील हे नियतकालिक उपयुक्त ठरले आहे.

“यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या ज्ञानगंगोत्री या नियतकालिकाच्या सन २००० ते २०१२ या काळातील अंकांचे विश्लेषण” करण्याच्या हेतूने सदर संशोधन विषय संशोधकाने निश्चित करून त्या अनुषंगाने संशोधन कार्य पूर्ण केले आहे.

## १.३. संशोधनाचे महत्वः-

आशय विश्लेषणाच्या माध्यमातून साहित्यातील माहितीचे गुणात्मक, संख्यात्मक आणि वस्तुनिष्ठ स्वरूपात विश्लेषण करणे शक्य होते. या विश्लेषणाद्वारे माहितीची उपयुक्तता जाणून घेण्यासाठी उपयोग होतो. प्रस्तुत नियतकालिकाची उपयुक्तता वाढविण्याच्या दृष्टिकोनातून नियतकालिकाचे गुणात्मक, संख्यात्मक आणि वस्तुनिष्ठ स्वरूपात विश्लेषण होणे गरजेचे आहे. जेणे करून नियतकालिकाची उपयुक्तता आणि गुणवत्ता वाढून वाचकांच्या अधिकाधिक गरजांची पूर्तता होवू शकेल. तसेच मराठी भाषेतील उपभोक्त्यांसाठी दर्जेदार वाचन साहित्य उपलब्ध करून देता येईल. ज्ञानगंगोत्री या नियतकालिकाचे यापूर्वी आशय विश्लेषण झालेले नसल्याने अशा प्रकारच्या अभ्यासाची आवश्यकता आहे.

## १.४. संशोधन समस्याः-

कोणत्याही संशोधनाची सुरवात ही त्या संशोधन समस्येपासून होते. संशोधन समस्येचे स्वरूप स्पष्ट असेल तर संशोधन कार्य योग्य दिशेने चालते. ज्ञानगंगोत्री हे नियतकालिक ग्रंथालय आणि माहितीशास्त्र या विषयात मराठी भाषेतून माहिती प्रसारणाचे महत्वपूर्ण कार्य करत आहे. हे कार्य यापुढेही अविरतपणे सुरू राहावे, यासाठी या नियतकालिकाचे नियमितपणे विश्लेषण आणि मूल्यमापन होणे आवश्यक आहे. त्यामुळे नियतकालिकाचे वाचनिय मूल्ये आणि संशोधन मूल्य वाढीस लागेल. मराठी भाषेतून ग्रंथालय आणि माहितीशास्त्र या विषयाचा अभ्यास करणाऱ्या उपभोक्त्यांना आपल्या भाषेतून दर्जेदार वाचनसाहित्य उपलब्ध होईल, मराठी भाषेतून लिखाण करणाऱ्या लेखकांना लेखनासाठी व्यासपीठ उपलब्ध होईल, वाचक आणि संशोधकांना दर्जेदार संदर्भ साहित्य म्हणून ज्ञानगंगोत्री हे नियतकालिक उपयुक्त ठरेल.

## १.५. संशोधनाची उद्दिष्ट्ये:-

१. ज्ञानगंगोत्री या नियतकालिकातून प्रसिध्द होणाऱ्या ग्रंथालय आणि माहितीशास्त्रातील वर्तमान घडामोडी (Current Subject) संदर्भात कितपत आशय वितरित होतो याचे विश्लेषण करणे.

२. ज्ञानगंगोत्री या नियतकालिकातून प्रकाशित झालेल्या लेखांचे संकल्पनात्मक (Conceptual Study based) आणि संशोधनात्मक (Research Study based) विश्लेषण करणे.

३. ज्ञानगंगोत्री या नियतकालिकामध्ये देण्यात आलेल्या संदर्भांचा (Citations) विश्लेषणात्मक अभ्यास करणे.

४. माहिती व तंत्रज्ञानाच्या युगामध्ये ज्ञानगंगोत्री या नियतकालिकापुढील आव्हानांचा अभ्यास करणे.

५. ज्ञानगंगोत्री हे नियतकालिक अधिक उपयुक्त आणि दर्जेदार होण्यासाठी निष्कर्षांच्या आधारे शिफारशी सूचविणे.

## १.६. संशोधनाची गृहीतके:-

१. ज्ञानगंगोत्री या नियतकालिकामध्ये प्रचलित विषयासंबंधी (Current Trends) नियमितपणे लेख प्रसिध्द होतात.

२. ज्ञानगंगोत्री नियतकालिकामध्ये पुरूष लेखकांनी लिहीलेल्या लेखांचे प्रमाण अधिक आहे.

## १.७. संशोधनाची व्याप्ती व मर्यादा:-

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातर्फे प्रकाशित होणाऱ्या ज्ञानगंगोत्री या नियतकालिकाच्या प्रारंभापासून म्हणजेच सन जून २००० ते डिसेंबर २०१२ या १३ वर्षात प्रसिध्द झालेल्या सर्व अंकांचा अभ्यास केला आहे.

सदर अभ्यास करतांना असे आढळून आले की, प्रथम अंक जून २००० मध्ये प्रकाशित झाला असल्याकारणाने १३ वर्षातील अंकांचा संच पूर्ण करण्यासाठी मे २०१३ पर्यंतच्या अंकांचा समावेश सदर अभ्यासामध्ये केला आाहे.

## १.८. संशोधन पध्दती:-

जिज्ञासा अथवा ज्ञान संपादन करणे व त्या ज्ञानाच्या आधारे नवीन प्रयोग करणे ही माणसाची एक मूलभूत प्रवृत्ती आहे. त्यासाठी तो आपल्या ज्ञानेंद्रियांचा उपयोग करीत असतो. भोवतालच्या जीवनाचे अवलोकन करतो व त्यापासून विविध प्रकारचे अनुभव घेतो. प्रत्येक घटनेची चिकित्सा करून त्याची उत्तरे आपल्या बुद्धिने शोधून काढतो व मिळविलेल्या ज्ञानाचा आपल्या जीवनात उपयोग करतो. परंतु केवळ ज्ञान किंवा तथ्ये प्राप्त करून घेणे म्हणजे शास्त्र नव्हे, तर ज्ञान अथवा तथ्ये कोणत्यातरी पध्दतीने व्यवस्थित रूपाने संग्रहीत करावी लागतात. संग्रहीत केलेल्या तथ्यांत कोणतातरी क्रम असतो आणि हा क्रम कार्यकारणभावावर आधारलेला असतो. कार्यकारणभावामुळे या तथ्यांचा अर्थ, त्यांचा परस्पर संबंध आणि विद्यमान वैज्ञानिक ज्ञानाशी त्यांचा संबंध निश्चित केला जातो.

**संशोधनाच्या व्याख्या**

अनेक शास्त्रज्ञांनी संशोधनाच्या विविध व्याख्या केल्या, त्यापैकी काही खालील प्रमाणे

**तापकीर यांच्यामते** जिज्ञासूवृत्तीने एखाद्या प्रश्नाची सत्यन्वेषी भूमिकेवरून चिकित्सा करून अंतिम अथवा निर्णायक उत्तर शोधण्याची अथवा तथ्य निर्णय करण्याची जी प्रक्रिया असते तिला संशोधन असे म्हणता येईल. **(तापकीर, २००३)**

**वेबस्टरच्या शब्दाकोषानुसार** संशोधन म्हणजे तथ्ये वा तत्त्वे शोधण्यासाठी करण्यात येणारी चिकित्सा किंवा परीक्षण, किंवा एखादी गोष्ट शोधून काढण्यासाठी सतत व पध्दतशीर केलेले प्रयत्न होय. (Research is a careful critical inquiry or examination in seeking facts or principles diligent investigation in order to a certain somethings. – **Webster's International Dictionary)**

**जे. डब्लू. बेस्ट यांच्यामते** संशोधन ही एक व्यवस्थित क्रिया होय की, ज्याद्वारे शोध घेतला जातो आणि संघटित ज्ञानाच्या अंगाचा विकास केला जातो.

(Research is more systematic activity directed towards discovery and the development of an organized body of knowledge. - **Best, 1963**)

वैज्ञानिक ज्ञानाची ही दोन आवश्यक तत्वे जर सामाजिक तथ्यांच्या संबंधित संशोधनात असतील आणि वैज्ञानिक पध्दतीच्या आधारे हे संशोधन करण्यात आले असेल तर त्यास सामाजिक संशोधन

म्हटले जाते. या दृष्टिकोणातून कोणत्याही सामाजिक समस्या सोडविण्याकरिता कोणत्याही गृहीतकृत्याचे परीक्षण करणे, नवीन घटनांचा शोध घेणे, विशिष्ट घटनांमधील नवीन संबध शोधण्याच्या उद्देशाने कोणत्यातरी योग्य पध्दतीचा उपयोग करणे हा सामाजिक संशोधनाचा अर्थ आहे.

सामाजिक संशोधन ही एक अशी क्रमबध्द व वैज्ञानिक अध्ययन पध्दती आहे की ज्याच्या आधारावर सामाजिक घटनांच्या संबंधामध्ये नवीन ज्ञानाची प्राप्ती केली जाते, विद्यमान ज्ञानास विस्तृत केले जाते आणि वेग-वेगळ्या घटनांमधील परस्पर संबंधाची आणि विद्यमान सिध्दांताची पूर्नपरीक्षण केली जाते. सामाजिक घटना किंवा विद्यमान सिध्दांताच्या संबधांत नविन ज्ञानाची प्राप्ती करण्यासाठी उपयोगात आणली जाणारी  वैज्ञानिक पध्दती म्हणजे सामाजिक संशोधन होय.

थोडक्यात सामाजिक संशोधन वैज्ञानिक नियमानुसार अशा मानवी क्रियांकडे संकेत करते की, ज्याद्वारे सामाजिक जीवनाच्या संबधांत आपल्या ज्ञानाची वृध्दी होणे शक्य होते. अनेक घटना आणि त्यांच्या कारणांच्या संबधांत आपणास वैज्ञानिक बोध होतो. त्या घटना आणि त्यांच्या कारणांमध्ये आढळून येणा-या परस्पर संबधांच्या संदर्भात आपणास नव-नवीन माहिती प्राप्त होते. सामाजिक संशोधन ही ज्ञानप्राप्तीची अशी एक पध्दत आहे की,जी निरीक्षण, वर्गीकरण, प्रयोग आणि निष्कर्षाच्या सामान्य वैज्ञानिक पध्दतीवर आधारित असते आणि या पध्दतीद्वारे अज्ञात सामाजिक घटनांचा शोध घेतला जातो. त्याचप्रमाणे ज्ञात सामाजिक घटनांचे विवेचन आणि विश्लेषण देखील केले जाते. अशा प्रकारे सामाजिक संशोधन ही सामाजिक जीवनाच्या संबधांमध्ये सत्याचा शोध घेणारी एक वैज्ञानिक पध्दत आहे. **(आगलावे, २०१०)**

ग्रंथालय व माहितीशास्त्र हे एक सामाजिक शास्त्र म्हणून मानले जाते. इंडियन कौन्सिल ऑफ सोशल सायन्स रिसर्च या संस्थेने देखील त्याला सामाजिक शास्त्र म्हणून मान्यता दिली आहे. सदर संशोधन विषय हा देखील सामाजिक संशोधनात मोडतो. गोपाल यांच्यामते सामाजिक शास्त्रांमधील संशोधनाचे स्वरूप साधारण तीन प्रकारचे असते.

१. नव्या गोष्टींचा शोध किंवा ज्ञात गोष्टींमधील कार्यकारण संबंधांचा बोध.

२. उपलब्ध आणि ग्रंथित माहितीची संदर्भाप्रमाणे चिकित्सा आणि

३. तत्त्वचिंतन

## सामाजिक संशोधनाच्या व्याख्या-

संशोधनाचा अर्थ विविध तज्ज्ञांनी विविध व्याख्यांद्वारे स्पष्ट केला आहे. त्यापैकी काही व्याख्या संशोधनाचे स्वरूप स्पष्ट करतात, तर काही संशोधनाची प्रक्रिया स्पष्ट करतात.

### सी. ए. मोझर यांच्यामते

समाजिक घटना आणि समस्या याबाबत नवीन ज्ञान प्राप्त व्हावे म्हणून केलेल्या क्रमबध्द अभ्यासपूर्ण विश्लेषणाला सामाजिक संशोधन असे म्हणतात.

(Systematized investigation to gain of new knowledge about social phenomena and problems we call social research. - **C. A. Moser**)

### पॉलिन यंग यांच्यामते

सामाजिक संशोधन एक वैज्ञानिक योजना असून तिचा उद्देश तार्किक आणि क्रमबध्द पध्दतीद्वारे नवीन तथ्यांचा शोध घेणे किंवा जुन्या तथ्यांचे पुनर्परीक्षण आणि त्यांच्यात आढळून येणारे अनुक्रम, अंत:सबंधी कार्यकारणभाव आणि त्यांना संचलित करणाऱ्या नियमांचे विश्लेषण करणे हा आहे.

(According to Pauline Young We may define social research as a scientific undertaking which, by means of logical and systematized methods, aims to discover new facts or verification of old facts and to analyze their sequences, interrelationships, casual explanation and the natural law which govern them. - **Pauline Young**)

### एस. स्लेसिंजर आणि एम, स्टिफेन्सन यांच्यामते

ज्ञानाच्या कक्षा विस्तारित करणे, त्याची अचूकता तपासणे आणि सिध्दांताच्या मांडणीसाठी किंवा कलेच्या व्यावहारीक उपयोगासाठी हे ज्ञान कितपत उपयोगी पडते हे पाहाण्यासाठी वैज्ञानिक पध्दती शोधून काढणे, त्यांचे विश्लेषण करणे आणि सामाजिक जिवनाच्या संकल्पना मांडण्याची व्यवस्थित पध्दत म्हणजे सामाजिक संशोधन होय. **(कऱ्हाडे, २०११)**

(Social research is a systematic method of exploring, analyzing and conceptualizing social life in order to extend, correct and verify knowledge, whether that knowledge aids in the construction of a theory or in the practice of an art. - **S. Slesinger and M. Stephenson**)

वरील व्याख्यांवरून स्पष्ट होते की, सामाजिक संशोधन ही सामाजिक संशोधनात नवीन तथ्ये उजेडात आणणे, जुन्या तथ्यांचे प्रमाण सिध्द करणे, तथ्यांचा अनुक्रम, परस्परसंबंध, त्यांच्यातील कार्यकारण भाव ठरविणे, त्यावरून शास्त्रशुध्द पध्दतीने नियम शोधून काढणे, त्या नियमांचे स्पष्टीकरण करणे इत्यादी कार्याचा समावेश होतो.

## संशोधनाचे प्रकार:-

संशोधनाचे प्रामुख्याने मूलभूत संशोधन आणि उपयोजित संशोधन असे दोन प्रकार पडतात.

## मूलभूत संशोधन:-

बिझनेस डिक्शनरी मध्ये म्हटल्यानुसार Investigation and analysis focused on a better or fuller understanding of a subject, phenomenon, or a basic law of nature instead of on a specific practical application of the result.

कोणत्याही ज्ञानशाखेत एखादे नवीन तत्त्व किंवा नवीन प्रणाली प्रस्थापित होते, त्याला मूलभूत संशोधन असे म्हणतात. मूलभुत संशोधनामध्ये एखादे विषयाबाबत वैज्ञानिक दृष्टिकोनातून संशोधन केले जाते. त्या संशोधनाद्वारे एखादा सिध्दांत मांडला जातो. या मूलभुत संशोधनामध्ये कोणत्याही समस्येवर उपाय न करता केवळ बौध्दिक जिज्ञासेपोटी, आपल्या ज्ञानात भर टाकण्यासाठी संशोधक आपल्या संशोधन कार्यात मग्न असतो.

मूलभुत संशोधनात केवळ स्थायी तत्त्वांची निर्मिती होत नाही तर त्यातून संशोधनाचे तंत्र किंवा संशोधन पध्दतीची निर्मिती होवू शकते. या संशोधनातून त्वरीत फायद्याची अपेक्षा नसून ते फक्त बौध्दिक जिज्ञासेपोटी केलेले संशोधन असते. समस्यांचे निराकरण करणे या पध्दतीला शक्य नसते.

## उपयोजित संशोधन:-

बिझनेस डिक्शनरी मध्ये म्हटल्यानुसार Investigation of the findings of pure or basic research, to determine if they could be used to develop new product or technologies. Also the research conducted to solve specific problems or to answer specifiv questions. In accounting

for research and development costs, the development cost may be carried forward but the basic and applied research costs are offen written off as incurred. **(www.businessdictionary.com)**

मूलभुत संशोधन हे त्वरीत फायद्यासाठी नसले तरी त्यातून सिध्द झालेल्या सिध्दांताच्या आधारे उपयुक्त वस्तु आणि सुविधा यांची निर्मिती करण्यासाठी किंवा वैज्ञानिक उपक्रम हाती घेण्यासाठी जे संशोधन केले जाते त्याला उपयोजित संशोधन म्हणतात. एखाद्या मूलभुत संशोधनाच्या आधारावर जे ज्ञान प्राप्त होते त्याचा मानवी कल्याााणासाठी विविध सोयी सुविधा निर्माण करून समाजाला भौतिक सुविधा प्राप्त करता येतात. मूलभुत संशोधनाद्वारे निसर्गातील रहस्यांचा उलगडा होतो तर उपयोजित संशोधनात त्या शोधांच्या आधारे विविध प्रकल्पांची उभारणी केली जाते. **(रिसवडकर, २००५)**

नैसर्गिक शास्त्रे आणि सामाजिक शास्त्रे या दोन्ही ज्ञानशाखांमध्ये मूलभूत संशोधन आणि उपयोजित संशोधनचा उपयोग होता. या दोन्ही शाखांमध्ये विविध संशोधन पध्दतीचा वापर संशोधनासाठी केला जातो. त्या संशोधन पध्दती पुढीलप्रमाणे.

**संशोधन पध्दती:-**

सर्वसामान्यपणे संशोधन पध्दतीचे तीन प्रकार पडतात. ते पुढील प्रमाणे

**१. ऐतिहासिक संशोधन पध्दती:-**

भूतकाळात घडून गेलेल्या घटनांचा शोध घेण्यासाठी केलेला विद्वत्त (Scholarly) प्रयत्न म्हणजे ऐतिहासिक संशोधन होय. ऐतिहासिक संशोधन ही एक महत्वपूर्ण संशोधन पध्दती आहे. ऐतिहासिक संशोधन पध्दती ही भूतकाळात घडून गेलेल्या घटनांच्या अर्थनिर्वाचनाद्वारे संबंधित घटनांचा वर्तमानातील अर्थ समजण्यासाठी आणि भविष्यवेध घेण्यासाठी उपयुक्त ठरते. भुतकाळात घडलेल्या घटनांच्या चिकित्सक विश्लेषणाद्वारे ऐतिहासिक संशोधन भविष्यवेध घेवू शकते. ऐतिहासिक संशोधन पध्दतीच्या साहाय्याने भूतकाळात घडून गेलेल्या घटनांचा वर्तमान परिस्थितीशी काही कार्यकारण संबंध आहे का याचा संशोधक या पध्दतीने शोध घेतो. वर्तमान परिस्थिती ही भूतकालिन परिस्थितीची परिणती आहे. या दोन्हीमधील कार्यकारण संबंध शोधण्याचे काम ऐतिहासिक संशोधन पध्दतीमध्ये केले जाते. **(कुंभार, २०१३)**

ऐतिहासिक संशोधन पध्दतीच्या साहाय्याने भूतकाळात घडून गेलेल्या घटनांचे कार्य, विकास, परिवर्तन यांचा शोध घेतला जातो. ऐतिहासिक संशोधनामुळे वर्तमानकालीन समस्या स्पष्ट होतात आणि इतिहासाला शास्त्रीय आधार प्राप्त होतो.

**२. प्रायोगिक संशोधन पध्दती:-** ग्रंथालय आणि माहितीशास्त्र हे सामाजिक शास्त्र असल्याने इतर शास्त्राप्रमाणे ग्रंथालय आणि माहितीशास्त्रात देखील प्रायोगिक संशोधन पध्दती वापरली जाते. प्रायोगिक संशोधन पध्दतीमध्ये कोणत्याही गोष्टीत घडून येणाऱ्या बदलाचे किंवा होणाऱ्या वाढीचे सुनियंत्रित निरीक्षण केले जाते. एखाद्या विशिष्ट घटकावर होणारा बदल विशिष्ट कारणामुळे घडून येतो का, याचा शोध घेणाऱ्या संशोधनाला प्रायोगिक संशोधन असे म्हणतात.
या संशोधन पध्दतीमध्ये काही घटक काळजीपुर्वक नियंत्रित करून प्रयोग केला तर कोणते निष्कर्ष येतात याचा शोध घेतला जातो

**३. वर्णनात्मक संशोधन पध्दती:-** वर्णनात्मक संशोधन पध्दतीत संख्यात्मक आणि गुणात्मक पध्दतीने वर्तमान स्थितीचे वर्णन केले जाते. वर्णनात्मक संशोधनात कोणत्याही घटनेच्या, समाजाच्या, सामाजिक संस्थेच्या किंवा एखाद्या उपक्रमाच्या सद्य:स्थितीचा सर्वंकष अभ्यास केला जातो. या अभ्यासातून सर्वांगिण प्रगतीचा आढावा घेवून विश्लेषणात्मक वर्णन करण्यात येते. अशा सर्व संशोधनास वर्णनात्मक संशोधन असे म्हणतात.

या अभ्यासात वर्तमानकालीन परिस्थितीच्या नोंदी, विश्लेषण व अर्थनिर्वचन करून परीस्थिती समजून घेणे हा वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा हेतू असतो

**मौले यांच्या व्याख्येनुसार** वर्णनात्मक संशोधन पध्दत हे एक स्थूल वर्गिकरण आहे. यामध्ये विशिष्ट तंत्रे, पध्दतींचा, प्रक्रियांचा समावेश होतो. अभ्यास वस्तूचा स्तर, दर्जा स्पष्ट करण हा सर्वांचा समान हेतू असतो.

Discriptive research is a broad classification comprising a variety of specific techniques and procedures , all similar from the standpoint of purpose that is to establish of the phenomenon under investigation. **(Moule, 1964)**

एखादी संस्था व त्यातील साधने, सुविधा, प्रक्रिया, सेवा, उपक्रम, घटना व समस्या इत्यादींच्या सद्यस्थितीचे वस्तुनिष्ठ, अचूक वर्णन करणाऱ्या संशोधनास वर्णनात्मक संशोधन म्हणतात. **(देशपांडे, २०१५)**

ग्रंथालयातील वाचनसाहीत्याचे स्वरूप, ग्रंथालयातील विविध सेवा व सुविधा, ग्रंथालय संगणकीकरणाचे उपयोजन, ग्रंथालयातून दिल्या जाणा-या संदर्भसेवा, प्रचलित जागृकता सेवा इत्यादींचे सद्यस्थितीचे वर्णन करणारे संशोधन वर्णनात्मक संशोधन असते. या पध्दतीच्या उपयोजनाद्वारे संशोधक एखादी सामाजिक घटना, कार्य, उपक्रम यांची सद्यस्थिती काय आहे याचा विश्लेषणात्मक अभ्यास करून त्यातील गुणदोषांची वस्तुनिष्ठपणे चिकित्सा करतो. या संशोधनात सत्य परिस्थितीचा चिकित्सापूर्ण शोध घेवून त्यातील गुणदोषांची चर्चा करून संशोधक परिस्थिती सुधारण्यासाठी मार्गदर्शक सूचना करू शकतो.

**वर्णनात्मक संशोधन पध्दतीचे प्रकारः-**

वर्णनात्मक संशोधन पध्दतीच प्रमुख चार प्रकार आहेत पुढीलप्रमाणे-

१. सहसंबध पध्दत

२. व्यक्ती अभ्यास पध्दत (Case Study)

३. तुलनात्मक कार्यकारण भाव

४. सर्वेक्षण पध्दत (Survey Method)

सदर संशोधनासाठी संशोधकाने वर्णनात्मक संशोधन पध्दतीच्या सर्वेक्षण पध्दतीचा वापर केला असल्याने त्याबाबत थोडक्यात माहिती दिली आहे.

**सर्वेक्षण पध्दत** (Survey Method)

वर्तमान अवस्था, सद्यस्थिती यांच्या अभ्यासाठी ही पध्दती वापरली जाते. प्रचलित पध्दत, दृष्टिकोन, वाटचाल, परिणाम यांचा अभ्यास या पध्दतीत केला जातो. वर्णनात्मक संशोधनामध्ये सर्वेक्षण ही उपयुक्त अभ्यास पध्दती आहे. संशोधनमध्ये समाजाच्या कोणत्याही विशिष्ट प्रश्नाविषयी चिकित्सक पाहाणी करणे, त्याचे निरीक्षण व परीक्षण करणे म्हणजे सर्वेक्षण होय. संशोधनामध्ये संशोधनासाठी आवश्यक असणारी माहिती आणि तथ्ये संकलन संशोधक स्वत: करत असतो. संशोधक जेव्हा माहितीचे संकलन स्वत: करतो याला प्रत्यक्ष माहितीचे संकलन किंवा primary source म्हणतात. यामध्ये प्रश्नावली, मुलाखत, निरीक्षण, अनुसूची आणि वैयक्तिक अभ्यास यांचा समावेश होतो.

**कर्लिंगर यांच्यामते** Survey research studies large and small populations or universes by selecting and studying samples chosen from the populations to discover the relative incidence, distribution and interrelations of sociological and psychological variables.

सर्वेक्षण पध्दतीत मिळालेल्या माहितीचे व्यवस्थित संघटन विश्लेषण आणि अर्थनिर्वचन केले जाते. वर्तमानाच्या मोठ्या घटकाकडून माहिती संकलित करणे हा या पध्दतीचा विशेष आहे. मात्र सर्व घटकांचा समावेश माहिती मिळविण्याच्या प्रक्रियेत न करता अभ्यास घटकातील सर्व स्तरातील माहिती नमुन्यात घेतली जाईल याची काळजी या पध्दतीत घेतली जाते. संशोधक ज्या कालावधीतील माहिती संकलित करणार तो कालावधी वर्तमानाचे वर्णन करण्यास पुरेसा असावा लागतो. समुहातील घटक, वस्तु किंवा घटकांचा स्वंतत्रपणे विचार न करता समुहाचा एकत्रपणे विचार केला जातो. त्यासाठी सांख्यिकीचा वापर केला जातो.

**सर्वेक्षण पध्दतीचे हेतूः-**

सर्वेक्षण पध्दतीचे हेतू पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१. चालू परिस्थितीबाबत किंवा वर्तमानाबाबत पुरावे गोळा करणे.

२. भविष्यकालीन योजनांचे किंवा पुढील पायऱ्यांचे निकष किंवा प्रमाणके निश्चित करणे. निश्चित केलेल्या माहितीच्या आधारे सद्यस्थितीची तुलना करणे.

३. ज्या स्थानावर किंवा दर्जावर वर्तमान परिस्थिती आहे त्याच्या आधारे पुढचा मार्ग निश्चित करणे. **(देशपांडे, २०१५)**

ग्रंथालय व माहितीशास्त्रात सर्वेक्षण तंत्राचा वापर प्रामुख्याने ग्रंथालयाद्वारे दिल्या जाणाऱ्या सेवा व ग्रंथालयांचा होत असलेला वापर यांची सद्यस्थिती जाणून घेण्यासाठी केला जातो. सदर संशोधनासाठी सर्वेक्षण पध्दतीचा वापर केलेला आहे.

**ॲनॅलिटिकल सर्वेक्षण पध्दती**

ॲनॅलिटिकल सर्वेक्षण पध्दतीमध्ये आशय विश्लेषण या तंत्राचा समावेश होतो.

**आशय विश्लेषणः-**

समाजशास्त्रीय संशोधनात आशय विश्लेषण हे एक नवीन अभ्यास तंत्र आहे. या तंत्राद्वारे गुणात्मक तथ्यांचे सांख्यिकीय व वस्तुनिष्ठ तथ्यांत रूपांतर करता येते. या तंत्राद्वारे आशय अथवा आंतरिक तथ्य यांचेही विश्लेषण केले जाते. व त्यानंतर निष्कष काढले जातात. विश्लेषण अभ्यासामध्ये आशय विश्लेषण किंवा दस्तऐवज विश्लेषण यांचा समावेश होतो. आशय विश्लेषणात भाषणे, कादंबरी, साप्ताहिके, नियतकालिक, अग्रलेख, रेडिओ कार्यक्रम, नाटक, टि.व्ही वरील कार्यक्रम यांचे विश्लेषण विशिष्ट निकषांच्या आधारे केले जाते. संप्रेषणाच्या दृष्टिने आशय विश्लेषण हा एक महत्वाचा विषय आहे. संशोधनामध्ये अभ्याससंबंधी तथ्ये गोळा करावी लागतात. तथ्यांशिवाय संशोधन शक्य नाही. तथ्य संकलनाच्या विविध पध्दतींचा वापर करून अभ्यास विषयांसंबधी माहिती संकलित केली जाते. परंतु ह्या माहितीचे स्वरूप असंघटित व विस्कळीत स्वरूपात असते. असंघटित माहितीचे

विश्लेषण करण्यासाठी संशोधनाच्या प्रक्रियेत ज्या अनेक तंत्रांचे आयोजन करण्यात येते त्यापैकी एक तंत्र म्हणजे आशय विश्लेषण होय.

आशय विश्लेषणाचे अनेक उद्देश दिसून येतात. माहिती प्रसारणाची जी अनेक माध्यमे किंवा साहित्य अस्तित्वात आहेत त्या साहित्याचे किंवा माध्यमांचे गुणात्मक विश्लेषण आणि संख्यात्मक विश्लेषण या तंत्रात करता येते. नियतकालिके, वृत्तपत्रे, दूरचित्रवाणीवरील कार्यक्रम हे साहित्य आशय विश्लेषणासाठी निवडण्यात येते. सदर संशोधनामध्ये संशोधकाने ज्ञानगंगोत्री या नियतकालिकाचे विश्लेषण करण्याकरिता आशय विश्लेषण हे तंत्र वापरले आहे. **(पाटील, २०१२)**

## १.९. तथ्य संकलन (Data Collection)

सामाजिक संशोधन कार्यात विविध घटक महत्वपूर्ण ठरतात. त्यामध्ये तथ्य हा घटक महत्वपूर्ण असतो. सामाजिक विषयात संशोधन करतांना संशोधक विविध शास्त्रीय पध्दतीचा आणि तंत्रांचा अवलंब करून निष्कर्ष आणि सिध्दांत ठरवितो. संशोधन करीत असतांना सत्याचा शोध घेण्याकारीता वास्तविक तथ्यांचे संकलन करणे अतिशय महत्वाचे असते. याशिवाय संशोधन करणे शक्य नाही. तथ्यांचे संकलन केल्यानंतर त्याचे योग्य आणि व्यवस्थित वर्गीकरण करून संशोधन विषयक संकल्पनांची निर्मिती केली जाते. कोणत्याही घटनेच्या संदर्भात वास्तविक तथ्ये संकलित करून, त्या तथ्यांच्या आधारावर नवीन सिध्दांत मांडले जातात. त्यामुळे तथ्य संकलनास संशोधनामध्ये विशेष महत्व आहे. कारण संशोधन हे तथ्य संकलनावरच अवलंबुन असते. जर चुकीचे तथ्य संकलित केले तर तथ्यांच्या आधारावर काढलेले निष्कर्ष देखील चुकीचे राहातील.

**व्याख्याः-** तथ्यांची व्याख्या करणे कठीण आहे. परंतु त्या अर्थाच्या स्वरूपात समजून घेणे आवश्यक आहे. तथ्यांची व्याख्या विविध तज्ज्ञांनी वेगवेगळ्या शब्दांत केली आहे.

**गुड आणि हॅट** यांच्या मतानुसारः-

तथ्य एक अनुभव सिध्द सत्यापनीय निरीक्षण आहे.

(Fact is an empirically verifiable observation.- Goode and Hatt)

**डॉ. बोधनकर** यांच्या मतानुसार:-

वास्तविक स्वरूपात घडून आलेल्या सर्वमान्य असणाऱ्या तसेच त्याची वास्तविकता सर्वमान्य मापन पध्दतीद्वारे पुन्हा पुन्हा पडताळता येवू शकणाऱ्या मूर्त आणि अमूर्त स्वरूपाच्या घटनेला तथ्य असे म्हणतात. **(बोधनकर, २०११)**

**तथ्यांचे प्रकार**

तथ्यांचे स्त्रोत आणि स्वरूप या आधारावर तथ्यांचे प्रमुख दोन प्रकार पडतात. ते पुढीलप्रमाणे.

**१.९.१ प्राथमिक तथ्य (Primary Data):-** प्राथमिक तथ्य म्हणजे जो संशोधन कर्ता स्वत: संशोधन करीत असतांना त्या विषयाशी संबंधित व्यक्तीकडून मुलाखत, माहिती व प्रश्नावलीच्या स्वरूपात किंवा प्रत्यक्ष निरीक्षणाद्वारे जी माहिती किंवा तथ्य जमा करतो त्याला प्राथमिक तथ्य असे म्हणतात. संशोधक हा स्वत: तथ्य संकलनाच्या तंत्राद्वारे तथ्यांचे संकलन करतो. प्राथमिक तथ्ये ही स्वत: संशोधनकर्त्याने एकत्रित केली असल्यामुळे ती अधिक वस्तुनिष्ठ आणि विश्वासार्ह असतात. व्यक्ती आणि निरीक्षण हे प्राथमिक तथ्यांचे दोन स्त्रोत आहे.

प्राथमिक स्त्रोतामध्ये संशोधनकर्ता स्वत: विविध ठिकाणांवरून माहिती संकलित करीत असतो. त्यासाठी प्रश्नावली, मुलाखत आणि निरीक्षण ही माहिती संकलनाची तंत्रे वापरली जातात. संशोधक प्राथमिक तथ्ये ही विशिष्ट हेतूने संकलित करत असतो. संशोधक स्वत: तथ्य संकलन करत असल्याने आवश्यक आणि उपयुक्त माहितीच संकलीत केली जाते. (**कायंदे- पाटील, २००५**)

प्राथमिक तथ्यामध्ये (Primary Data) तथ्य संकलनासाठी प्रश्नावली व मुलाखत या साधनाचा वापर केला जातो. मात्र सदर संशोधनासाठी मुलाखत या साधनामधील औपचारीक मुलाखत या साधनाचा तथ्य संकलनासाठी वापर केल्याने त्याबाबतचीच माहिती येथे दिली आहे.

## मुलाखत

**बोधनकर यांच्यामते** एखाद्या विषयासंबंधी उत्तरदात्या व्यक्तीची मते, विचार, भावना आणि कल्पना जाणून घेण्यासाठी प्रश्नकर्त्या व्यक्तीने पध्दतशीररित्या आयोजित केलेल्या संज्ञापनाला मुलाखत असे म्हणतात.

वरील व्याख्येवरून असे स्पष्ट होते की, मुलाखत ही एक सामाजिक प्रक्रिया आहे. सामाजिक संशोधनात मुलाखत हे तथ्य संकलनाचे अतिशय महत्वपूर्ण असे तंत्र आहे. संशोधक समस्येशी संबंधित उत्तरदात्यांकडून माहिती संकलित करण्यासाठी मुलाखत या तंत्राचा वापर करतो. संशोधन मुलाखत ही इतर मुलाखतींपेक्षा अधिक पध्दतशीर असते आणि ही मुलाखत संशोधन समस्येबाबत माहिती संकलनासाठीच आयोजित केली जाते. सर्वेक्षण आणि केसस्टडी अभ्यासामध्ये मुलाखत तंत्राचा मोठ्या प्रमाणात वापर केला जातो. बहूतांश प्रतिसादकांचे विचार, मते, दृष्टीकोन, हेतू, अंदाज इत्यादी माहिती करून घेण्यासाठी मुलाखत तंत्राचा वापर केला जातो. मुलाखतीद्वारे बहूतांशकरून गुणात्मक माहिती संकलित करता येते.

मुलाखतीचे प्रकारः- मुलाखतीचे दोन प्रकार पडतात. अ. औपचारीक, ब. अनौपचारीक. त्यापैकी सदर संशोधनासाठी औपचारीक मुलाखत या तंत्राचा वापर केला आहे.

**औपचारीक मुलाखत** (Formal Interview):- पूर्वनिर्धारित प्रश्नाच्या मदतीने घेतल्या जाणाऱ्या मुलाखतीला औपचारीक मुलाखत म्हणतात. या प्रकारच्या मुलाखती दरम्यान विचारल्या जाणा-या प्रश्नांची अनुसूची मुलाखत घेण्यापूर्वीच तयार केली जाते. मुलाखती दरम्यान कोणते प्रश्न विचारायचे, त्यांचा क्रम कोणता हे आधीच निश्चित केलेले असते. आगावू तयार केलेल्या अनुसूचीद्वारे प्रश्न विचारण्यात येतात आणि उत्तरदात्याची उत्तरे लिहून घेण्यात येतात.

सदर संशोधनामध्ये संशोधकाने औपचारीक मुलाखत या साधनाचा उपयोग केला. संशोधकाने संपादक व संपादक मंडाळाकडून ज्ञानगंगोत्री या नियतकालिकाबाबत प्रश्न विचारून त्यांच्याकडून माहिती प्राप्त केली. त्याआधारे माहितीचे विश्लेषण केले आहे.

**निरीक्षण**

सामाजिक संशोधनात तथ्य संकलनाच्या दृष्टिने निरीक्षणाला खुप महत्व आहे. संशोधनाचा प्रारंभच निरीक्षणापासून होतो. विशेषत: ग्रंथालय सर्वेक्षणामध्ये निरीक्षण या तंत्राचा अधिक वापर होतो. संशोधन समस्येसंबंधित, अचूक, परिपुर्ण आणि नि:पक्षपाती माहिती मिळविण्यासाठी निरीक्षण हे तंत्र अधिक उपयुक्त ठरू शकते. कारण निरीक्षणाद्वारे संशोधक स्वत: लक्ष्य समुहाच्या वर्णनाचे निरीक्षण करून माहिती मिळवू शकतो. अशा प्रकारे संशोधकाने स्वत: निरीक्षणाद्वारे संकलित केलेल्या माहितीच्या विश्लेषणाद्वारे विश्वासार्ह निष्कर्ष काढणे शक्य होते. ग्रंथालयीन संशोधनाच्या संदर्भात वाचकांच्या किंवा ग्रंथालय सेवकांच्या प्रत्यक्ष वर्तनाचा अभ्यास करण्यासाठी निरीक्षण तंत्र अधिक उपयुक्त ठरते.

**१.९.२ द्वितीयक तथ्य (Secondary data):-** प्राथमिक तथ्ये ही स्वत: संशोधनकर्ता संकलित करतो. परंतु द्वितीयक तथ्ये मात्र संशोधनकर्ता स्वत: संशोधन क्षेत्रात जावून संबंधित व्यक्तींकडून संकलित करीत नाही. द्वितीयक तथ्ये ही इतर व्यक्तींनी पूर्वीच गोळा केलेली असून ती लिखित स्वरूपात असते. संशोधनकर्ता ह्या तंथ्यांचा आपल्या संशोधनासाठी उपयोग करतो. द्वितीयक तथ्ये ही प्रकाशीत व अप्रकाशित प्रलेख, अहवाल, सांख्यिकी, हस्तलिखीते, पत्रे, दैंनदिनी इत्यादीपासून संशोधनकर्ता प्राप्त करतो. संशोधनकर्ता आपल्या संशोधन विषयक संबंधीत माहिती द्वितीयक स्त्रोताद्वारे जमा करतो.

## १.१० संशोधनाची कार्यपध्दती

सदर संशोधनासाठी संशोधकाने वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा वापर केला आहे. यामध्ये सर्वेक्षण, आशय विश्लेषण व निरीक्षण या तंत्राचा वापर केला आहे. आशय विश्लेषणामध्ये ज्ञानगंगोत्री या नियतकालिकाचे जून २००० ते मे २०१३ या कालावधीतील एकूण ४६ अंकांचे विश्लेषण केले आहे. त्याचबरोबर संपादक व संपादक मंडळाकडून औपचारीक मुलाखत या तंत्राचा वापर करून तथ्य केले आहे. गरजेनुसार निरीक्षण या तंत्राचा देखील तथ्य संकलनासाठी वापर केला आहे.

## १.११ संशोधनासंबंधी सारांश

"यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या ज्ञानगंगोत्री या नियतकालिकाच्या सन २००० ते २०१२ या काळातील अंकांचे विश्लेषण" हा विषय संशोधकाने संशोधनासाठी निवडला.

या संशोधनातील प्रकरणनिहाय संशोधन सारांश पुढीलप्रमाणे दिला आहे.

**प्रकरण : १ संशोधनाची रुपरेषा**

या प्रकरणाच्या सुरवातीला संबंधीत विषयाची प्रस्तावना दिली आहे. सदर विषयाकडे संशोधक कसा वळला याबाबतची माहिती या प्रकरणात दिली आहे. संशोधनाचे महत्व, संशोधन समस्येची निवड आणि संशोधनाचे व्यापक स्वरूपाची उद्दिष्टे दिली आहे. या संशोधनाची उद्दिष्टे ही ठोस निष्कर्षापर्यंत जाण्यासाठी उपयोगी ठरणारी आहे. संशोधनाची गृहीतके आणि संशोधनाची व्याप्ती या प्रकरणात विषद केली आहे. ज्ञानगंगोत्री नियतकालिकाचा सखोल अभ्यास करण्यासाठी उपयुक्त संशोधन पध्दती व कार्यपध्दती या प्रकरणात दिली आहे.

**प्रकरण : २ संशोधन पूर्वाभ्यास व वाचन साहित्य शोध**

संशोधनाला भक्कम आधार प्राप्त होण्यासाठी आशय विश्लेषणा संबंधित पूर्ववाचन साहीत्याचे अध्ययन केले आहे. त्यामध्ये पीएच. डी., एम. फिल. आणि एम. लिब. चे शोधप्रबंध, संशोधन प्रकल्प, आशय विश्लेषणासंबंधित लेखांचा अभ्यास केला आहे. सदर संशोधन समस्येच्या अनुषंगाने आशय विश्लेषणासंबंधीत संदर्भ ग्रंथ, नियतकालिकातील लेख, इंटरनेट वरील माहिती याबाबतचे संदर्भ सदर प्रकरणात दिले आहे.

**प्रकारण : ३ आशय विश्लेषण**

सदर प्रकरणामध्ये विषयाची प्रस्तावना दिली असून आशय विश्लेषणाचा इतिहास, आशय विश्लेषणाच्या विविध अभ्यासकांनी सांगितलेल्या व्याख्या, आशय विश्लेषणाची वैशिष्ट्ये यांची सविस्तर चर्चा करण्यात आली आहे. तसेच आशय विश्लेषणाच्या प्रकारांची माहिती देवून त्यांच्या

पायऱ्या स्पष्ट केल्या आहे. आशय विश्लेषणाचे ग्रंथालयात कसे उपयोजन केले जाते, तसेच विद्वत्त नियतकालिकांच्या संदर्भात आशय विश्लेषणाचे महत्व आणि आशय विश्लेषणातील नवीन प्रवाह याबाबतची माहिती या प्रकरणामध्ये दिली आहे.

**प्रकरण : ४ मुक्त विद्यापीठ व ज्ञानगंगोत्री नियतकालिकाचा परीचय**

सदर प्रकरणामध्ये संबंधित विषयाची प्रस्तावना दिली असून दूरशिक्षणाची संकल्पना, दूरशिक्षणाची विविध तत्त्ववेत्त्यांनी सांगितलेली गृहीत तत्वे, मुक्त विद्यापीठाची वैशिष्टे याबाबतची माहिती सांगितली आहे. तसेच भारतातील मुक्त विद्यापीठांचा इतिहास व महाराष्ट्रातील यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाची माहिती दिली आहे. ज्ञानगंगोत्री हे नियतकालिक सुरू करण्याची पार्श्वभूमी व उद्दिष्टे याबाबत सदर प्रकरणात आढावा घेतला आहे.

**प्रकरण : ५ माहितीचे संकलन, विश्लेषण आणि अर्थनिर्वचन**

या प्रकरणामध्ये संशोधकाने ज्ञानगंगोत्री या नियतकालिकाच्या अंकांचे आशय विश्लेषण केले आहे. प्रश्नावली, मुलाखत व निरीक्षण यांच्या आधारे केलेल्या माहितीचे संकलन आणि विश्लेषण सारणी व आलेखांच्या साहाय्याने दर्शविले आहे. संकलित माहितीचे संख्यात्मक व गुणात्मक विश्लेषण करून त्याखाली शास्त्रीय पध्दतीने अर्थनिर्वचन केले आहे.

**प्रकरण : ६ निष्कर्ष आणि शिफारशी**

सदर प्रकरणामध्ये संकलित केलेल्या माहितीच्या व तथ्यांच्या आधारे विश्लेषण केले आहे. या विश्लेषणाच्या आधारे संशोधकाने निष्कर्ष काढून त्यांचे वस्तुनिष्ठपणे मांडणी केली आहे. संशोधनासाठी मांडलेल्या उद्दिष्टांची व गृहीतकांची पडताळणी या प्रकरणात केली आहे. सदर संशोधन संबंधित उपभोक्त्यांना उपयुक्त होण्यासाठी निष्कर्षाच्या आधारे शिफारशी केल्या आहे. तसेच पुढील संशोधनासाठी भविष्यवेध मांडला आहे.

## संदर्भ सूची

सदर प्रकरणामध्ये संबंधित संशोधनाविषयी जे वाचन साहित्य अभ्यासले आहे, तसेच जेथे जेथे संशोधनासाठी तात्त्विक व सैध्दांतिक आधार घेतला आहे अशा संदर्भग्रंथ, नियतकालिकातील लेख, शोधप्रबंध, वेबसाईट यांचा उल्लेख संदर्भसुचीमध्ये केला आहे. तसेच संदर्भ सुची लिहिण्यासाठी APA (American Psychological Association) स्टाईल मॅन्युअलचा वापर केला आहे.

## परिशिष्टे

सदर प्रकरणामध्ये संशोधन कार्यासाठी संपादक व संपादक मंडाळाकरिता तयार केलेली मुलाखत अनुसूची, ज्ञागगंगोत्री नियतकालिकातील लेखांची विषयनिहाय यादी, सार सदरातील लेखांची यादी, वेब सदरातील वेबसाईटची यादी, ग्रंथपरिचय सदरात परिचय करून दिलेले ग्रंथ यादी जोडलेली आहे.

## सारांश

या प्रकरणामध्ये संशोधन विषयाच्या अनुषंगाने विषयाची प्रस्तावना दिली आहे. यामध्ये संबंधित संशोधन समस्या, विषय निवड, संशोधन विषयाचे महत्व याबाबत थोडक्यात माहिती दिली आहे. संशोधनामधून जे शोधून काढायचे आहे त्यादृष्टीने उद्दिष्टे प्रतिपादीत केले आहे. संशोधनाच्या निष्कर्षाप्रत जाण्यासाठी अनुभवातून समोर आलेली दोन गृहीतके उद्दिष्टांसाठी मांडली आहे. संशोधकाने प्रस्तुत संशोधनासाठी निश्चित केलेली संशोधनाची व्याप्ती व मर्यादा याबाबतची भूमिका स्पष्ट केली आहे. सदर संशोधनासाठी वापरण्यात आलेल्या वर्णनात्मक संशोधन पध्दतीची यात माहिती दिलेली आहे. तसेच माहिती संकलनाच्या पध्दती व तंत्राचा थोडक्यात परिचय देवून संशोधनाची कार्यपध्दतीची माहिती या प्रकरणात केली आहे. तसेच या प्रकरणात संशोधनाचा सारांश दिलेला आहे.

**संदर्भसूची-**


- आगलावे, प्रदीप. (२०१०). *सामाजिक संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्रे.* नागपूर, साईनाथ प्रकाशन.
- कऱ्हाडे, बी. एम., (२०११). *शास्त्रीय संशोधन पध्दती.* नागपूर, पिंपळापुरे अॅण्ड कं. पब्लिशर्स.
- कायंदे- पाटील, गंगाधर. (२००५). *संशोधन पध्दती.* नाशिक: चैतन्य पब्लिकेशन.
- कुंभार, राजेंद्र. (२०१३). *ग्रंथालय आणि माहितीशास्त्र संशोधन.* पुणे, युनिव्हर्सल प्रकाशन.
- चंद्रात्रे, गिरीष. (२०११). *अॅनल्स ऑफ लायब्ररी अँण्ड इन्फर्मेशन स्टडीज या नियतकालिकाचे आशय विश्लेषण.* अप्रकाशित एम. फिल. लघुशोध प्रबंध, नाशिक: यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ.
- जोशी, स्नेहल आणि खोत, नमिता. (२०११). साहित्यसूची: आशय विश्लेषण. *ज्ञानगंगोत्री,* १२(१-२), ४५-५३.
- तापकीर, मुकुंद, आणि साबळे, आर. जे. (२००३). *संशोधन पध्दती व प्रकल्प अहवाल.* पुणे, निराली प्रकाशन.
- देशपांडे, लीना. (२०१५). *सर्वेक्षण: एक संशोधन पध्दती.* नाशिक, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ. पृ. ५
- *Ibid*, p. 11
- पाटील, वा. भा., (२०१२). *संशोधन पध्दती.* जळगांव: प्रशांत पब्लिकेशन्स.
- बाहेती, सत्यनारायण आणि डगवार, शामकांत. (२००८). University News या नियतकालिकचे आशय-विश्लेषणात्मक अध्ययन. *ज्ञानगंगोत्री,* ८(४), ३६-५२.
- बोधनकर, सुधीर., अलोणी, विवेक., आणि कुळकर्णी, मृणाल. (२०११). *सामाजिक संशोधन पध्दती.* नागपुर, साईनाथ प्रकाशन.

- राऊत, दामोधर आणि कापडे, दिपक. (२०१३). योजना मराठी भाषेतील मासिकांचे आशय विश्लेषण: एक अभ्यास (कालावधी जानेवारी २००९-डिसेंबर २०१० ). *गोल्डन रिसर्च थॉटस्* ३(५), १-४. Retrieved June 15, 2014, from www.aygrt.isrj.net
- रिसवडकर, म.रा. (२००५). *माहिती संकलन विश्लेषण आणि सादरीकरण* (एम.लिब. शिक्षणक्रमातील अभ्यासपुस्तके, LIB 012 ग्रंथालय आणि माहितीशास्त्राची संशोधन पध्दती) नाशिक: यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ.
- Best, J. W. (1963). *Research in Education.* New Delhi: Printice Hall of India. Retrieved January 3, 2015, from http://www.bestugcnetguide.in
- Goode, W. J. and Hatt, Paul. (1981) *Methods in social research*. New Delhi, Mc Graw- Hill Internation Book Company. P. 8.
- Kerilinger, F. N., (1964). *Foundations of Behevioural Research.* New York: Richard and Winton. P. 430
- Pauline, Young. (1982. *Scientific Social Survey and Research*. New Delhi: Printice Hall of India Pvt. Ltd.
- Moser, C. A. (n.d.). *www.prezi.com*. Retrieved June 2014, from www.prezi.com: www.prezi.com
- Mouly, G. J. (1964). *The Science of Educational Research*. American Book Company
- Slesinger, D., and Stephenson, M.(1934) *Research Encyclopedia of Social Sciences*, New Your: Macmillan Co. Vol. XII. p.330
- http://www.businessdictionary.com.https://maharanaias.wordpress.com*/fact-value-and-objectivity/*.Retrieved August 25, 2014, from https://maharanaias. wordpress.com/fact-value-and-objectivity
- Webser Internationa Dictionary,W.I. (n.d.). *http://www.webster-dictionary.org/ definition/Research*. Retrieved January 15, 2015, from http://www.webster-dictionary.org /definition/Research

# प्रकरण दुसरे

# संशोधन पूर्वाभ्यास व वाचन साहित्य शोध

## २.१ प्रस्तावना

संशोधकाने निवडलेल्या विशिष्ट विषयाशी संबंधित यापूर्वी झालेल्या अभ्यासाचा विश्लेषणात्मक अहवाल तयार करणे. प्रस्तावित संशोधन विषयावर विद्वत्त वाचन साहित्यामध्ये चर्चिलेल्या संकल्पना, व्याख्या, पध्दती, प्रक्रिया, कार्ये, प्रचलित विचार तसेच तत्त्वे, सिध्दांत, सूत्रे इत्यादींचे समीक्षात्मक संश्लेषण म्हणजे वाचनसाहित्याचा आढावा होय. प्रस्तावित संशोधन विषयाशी संबंधित, विविध वाचनसाहित्यातील सिध्दांत, तत्त्वे, विचार निष्कर्ष शिफारशी इत्यादींची एकसूत्रपणे केलेली मांडणी वाचन साहित्याचा आढावा घेतांना केली जाते.

A Literature review is an assessment of a body of research that addresses a research question. (**http://guides.library.harvard.edu**).

संशोधन विषयाची संपूर्ण माहिती मिळविण्यासाठी संबंधित साहित्याचा पुर्वाभ्यास होणे आवश्यक असते. आपण ज्या विषयावरती संशोधन करीत आहोत त्याविषयी कोणते संशोधन झाले आहे. हे पाहिल्यामुळे आपल्या संशोधनाला योग्य दिशा मिळते. कोणत्याही संशोधनामध्ये पूर्वाभ्यासाला खुप महत्त्व असते. पूर्वाभ्यास म्हणजे प्रस्तावित संशोधन विषयावर पूर्वी काय संशोधन झाले आहे, त्यात काय लिहिले आहे ते आत्मसात करणे, त्याची नोंद घेणे होय.

वाचनसाहित्याचा आढावा हा संशोधनाच्या सर्वच पायऱ्यावर उपयुक्त ठरणारी कृती आहे. संशोधनाच्या सुरवातीला संशोधन समस्या फारच अस्पष्ट असते. तेव्हा त्या अस्पष्ट समस्येची तात्विक भूमिका समजून घेण्यासाठी वाचनसाहित्याचा शोध उपयुक्त ठरतो. वाचन साहित्य आढाव्याद्वारेच संशोधन समस्येबाबतचे तात्विक अधिष्ठान स्पष्ट करता येते. सदर प्रबंधाचा अभ्यास करतांना संशोधकाने या संशोधनाचा पूर्वाभ्यास शोधण्याचा प्रयत्न केला आहे. **(www.library.bcu.ac.uk)**

संशोधनाशी संबंधित इतर काही संशोधन झालेले आहेत किंवा नाही, याबाबत अभ्यास करण्यासाठी संशोधकाने संशोधन पूर्वाभ्यास व वाचन साहित्याचा शोध घेतला आहे. पुढे नमुद

केलेल्या ग्रंथालयांना संशोधकाने प्रत्यक्ष भेटी देवून संशोधन पूर्वाभ्यास व वाचनसाहित्याचा शोध घेतला आहे.

१. टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.

२. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.

३. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे जयकर ग्रंथालय, पुणे.

४. मुंबई विद्यापीठ ग्रंथालय, मुंबई.

५. एच. पी. टी. महाविद्यालयाचे ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विभाग, नाशिक.

६. सार्वजनिक वाचनालय, नाशिक.

७. http://www.ycmou.ac.in/

८. http://shodhganga.inflibnet.ac.in

९. इंटरनेटवरील संशोधन अभ्यासाविषयाच्या अनुशंगाने जे साहित्य उपलब्ध झाले त्याचा अभ्यास करण्यात आला आहे.

प्रस्तुत संशोधनाचा विषय हा ‘‘यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या ज्ञानगंगोत्री या नियतकालिकाच्या सन २००० ते २०१२ या काळातील अंकाचे विश्लेषण’’ असा असल्यामुळे आशय विश्लेषणासंबंधीत शोधप्रबंध, लघुशोध प्रबंध, एम. लिब.चे प्रकल्प, संदर्भग्रंथ, आणि नियतकालिकातील लेख या वाचन साहित्याचा शोध घेण्यात आला आहे.

## २.२ संबंधित साहित्याच्या समालोचनाची उद्दिष्टे

कोणत्याही संशोधनामध्ये साहित्याचे समालोचन अतिशय महत्वाचे असते. साहित्याच्या समालोचनाची उ‍ि-ष्टे पुढील प्रमाणे सांगितलेली आहे.

१. विशिष्ट विषयाशी संबंधित संशोधन समस्येचा पूर्व इतिहास जाणून घेणे.

२. प्रस्तुत संशोधन विषयावर पूर्वी काय संशोधन झाले आहे, आणि कोणत्या पैलूंवर संशोधन झालेले नाही हे स्पष्ट करणे व त्याद्वारे संशोधनात होणारी पुनरावृत्ती टाळणे.

३. संबंधित पूर्व संशोधनाच्या जमेच्या बाजू तसेच उणिवा दर्शविणे.

४. संदर्भसाहित्याचा अभ्यास करुन स्वत:च्या ज्ञानाची कक्षा वाढविणे.

५. संशोधन विषयासंबंधी गृहीतकृत्यांचा मांडणीब- ल निश्चित माहिती मिळविणे.

६. निवडलेल्या विषयासबंधी आवश्यक योग्य संशोधन पध्दती, तंत्र यांच्याबददल माहिती मिळविणे.

७. आधार सामग्री व निष्कर्ष याविषयी तुलनात्मक माहिती मिळविणे, समर्पक सांख्यिकीय तंत्र व त्यांचा उपयोग आणि निर्वाचन करण्यासाठी मार्गदर्शन करणे.

८. प्रस्तावित संशोधनासाठी पूर्वानुमान मांडणे.

९. मागील अभ्यासावरून सदर संशोधनाशी संबंध जोडून पुढील अभ्यासाठी मार्गदर्शन करणे.

१०. संशोधनातील त्रुटी शोधने. **(www.enotes.com)**

एक उत्कृष्ट वाचन साहित्याचा आढावा म्हणजे संशोधन विषयाचे बारकाईने विश्लेषण करून, त्या संशोधन विषयाबाबत पूर्व इतिहास लक्षात घेवून भविष्यातील संशोधनासाठी पाया तयार करणे होय. यामध्ये संशोधनातील पुनरावृत्ती टाळणे, भविष्यातील संशोधनासाठी मार्गदर्शन करणे या बाबींचा समावेश होतो.

## २.३ संबंधित साहित्याचे समीक्षण

संशोधकाने आपला संशोधन विषय निवडल्यानंतर त्याचा व्यवस्थितरित्या अभ्यास करुन समस्या विषय समजून घेतली पाहिजे. संशोधकाची समस्या निश्चित झाल्यानंतर त्याचे तत्त्वे, सिध्दांत, सूत्रे यांची व्यवस्थित मांडणी केली पाहिजे. समीक्षात्मक टिपण नोंदवितांना पूर्व संशोधक ज्या तत्त्वांचे, सिध्दांतांचे, विचारांचे समर्थन वा खंडन करत आहे ते सुरवातीला नोंदविले पाहिजे. तसेच संबंधित साहित्यामध्ये संशोधन पध्दती समस्ये संदर्भात शैक्षणिक, मानसशास्त्र, तत्वज्ञान, शैक्षणिक समाजशास्त्र अशा संबंधित विषयाचा अभ्यास होतो.

कोणतेही संशोधन करतांना त्या संशोधनाची पुनरावृत्ती होवू नये म्हणून पूर्ववाचन साहित्याचा सखोल अभ्यास केला पाहिजे. त्या संशोधन विषयावर यापूर्वी कोण-कोणते संशोधन झाले आहे याचा अभ्यास करुन आपल्या संशोधन विषयाची पुनरावृत्ती टाळली पाहिजे.

## २.४ संबंधित संशोधनाचे समिक्षण

संशोधकाने एकदा समस्या निश्चित केल्यानंतर ती समस्या स्पष्टपणे मांडण्यासाठी, तसेच त्या समस्येची उदिदष्टे निश्चित करण्यासाठी संशोधकाला त्या समस्येसंबंधित वाचन साहित्याचा सखोल अभ्यास करणे आवश्यक असते. म्हणूनच संबंधित साहित्याच्या अभ्यासाबरोबरच संबंधित संशोधनाचा अभ्यास देखील महत्वाचा असतो.

साहित्य समीक्षणाच्या बाबतीत डॉ. भितांडे यांनी आपले मत मांडले आहे. संशोधन समीक्षणामध्ये संबंधित विषयाची व्याप्ती व उदिदष्टे निश्चित केली जातात. तसेच विषयाच्या मर्यादा देखील निश्चित केल्या जातात. प्रस्तावित संशोधनासाठी कोणती संशोधन पध्दती, कोणते माहिती संकलन साधन वापरावे याबाबतचा निर्णय घेता येतो. प्रस्तावित संशोधन विषयावर पूर्वी कोणत्या पध्दतीचा अवलंब करुन संशोधन केले आहे हे माहित झाल्यामुळे प्रस्तावित संशोधनासाठी नवीन संशोधन पध्दतीचा अवलंब करण्याचा निर्णय घेता येतो. जे निष्कर्ष, सिध्दांत सिध्द झालेले आहेत त्यांचा संशोधन प्रक्रियेत आधार घेता येतो. लेखनाची पध्दती व अहवाल कसा लिहावा हे समजते.

थोडक्यात अनेक प्रकारचे वाचनसाहित्य अभ्यासल्यानंतर मिळणारी माहिती या संशोधन समीक्षण अहवालामध्ये मिळते. अशा प्रकारे संबंधित संशोधनाचा अभ्यास अनिवार्य असल्यामुळे संशोधकाने संशोधनाचा अभ्यास केला आहे. या संशोधन विषयावर यापूर्वी संशोधन झालेले नाही याची खात्री केली आहे.

## २.५ पीएच्. डी. चे शोध प्रंबध

1. Cherian, Annamma. (1986) यांनी A Content Analysis of the Selected Health and Hygiene, Nutrition and Family Planning Programmes of Pij Television and its impact on acquisition of knowledge by Rural People of the Selected Villages of Kheda District हा शोध प्रबंध The Maharaja Sayajirao University of Baroda, Baroda येथे सादर केला.

सदर संशोधनामधून ग्रामिण भागातील व्यक्ती आरोग्य विषयक कार्यक्रम आठवड्यातून किती वेळ पाहातात, आरोग्य विषयक स्वच्छता, पोषण आहार, कुटूंब नियोजन यासारखे निवडक कार्यक्रमांचे विश्लेषण करणे, टेलिव्हीजन कार्यक्रमामधून आरोग्य विषयक स्वच्छता, पोषण आहार,

कुटूंब नियोजन या कार्यक्रमाविषयी मिळालेल्या माहितीचे विश्लेषण करणे, ही माहिती मिळविणाऱ्या प्रतिसादकांच्या आर्थिक, सामाजिक स्तराचा अभ्यास करणे, सदर कार्यक्रमाविषयी लोकांच्या प्रतिक्रियांचा अभ्यास करणे या उद्दिष्टांना अनूसरून संशोधकाने अभ्यास केला.

सदर अभ्यासामधून निदर्शनास आले की, ग्रामिण महिला व पुरूष दूरदर्शनवरील आरोग्य विषयक कार्यक्रम पाहाण्यास उत्सूक असतात. महिलांपेक्षा पुरूषांचे आरोग्य विषयक कार्यक्रम पाहाण्याचे प्रमाण अधिक आहे, TV प्रामुख्याने मनोरंजन म्हणून पाहाण्याचे प्रमाण जास्त आढळून आले. पुरूषांपेक्षा महिलांमध्ये ज्ञानवृध्दी अधिक प्रमाणात होते. या अभ्यासातून आरोग्य विषयक माहितीचे सखोलपणे आशय विश्लेषण केलेले आहे. **(Cherian, 1986)**

2. Dhopte S. (2004). यांनी Content Analysis of Dissertation of the Amravati University (1993-2003) हा शोधप्रंबध अमरावती विद्यापीठास सादर केला.

सदर प्रंबधामध्ये १९९३-२०० ३ या कालावधीत अमरावती विद्यापीठास सादर झालेल्या सर्व विद्याशाखांमधील प्रबंधाचे आशय विश्लेषण केले आहे. सदर प्रंबध प्रत्यक्ष अभ्यासण्यास उपलब्ध होवू शकला नाही. **(धोपटे, २००४)**

3. Gala, Bhakti. (2013) यांनी Library and Information Science Blogs: A Content Analysis या विषयावर पीएच. डी. पदवीकरिता The Maharaja Sayajirao University of Baroda या विद्यापीठास शोध प्रबंध सादर केला.

सदर संशोधनामध्ये ग्रंथालय व माहितीशास्त्रातील blogs चे विषयवार वर्गीकरण करणे, blogs ची रँक लिस्ट तयार करणे, blogs मधील विषयांचा कल तपासणे, निवडक blogs वरील विषयांच्या चर्चा याबाबतचा अभ्यास या संशोधनातून केला आहे.

सदर संशोधनामध्ये ग्रंथालय व माहितीशास्त्र विषयातील ३४३ blogs मधील २५९३ घटकांचा अभ्यास केला आहे. या अभ्यासामध्ये असे दिसून आले की, ३४३ पैकी ५४ blogs हे विशिष्ट विषयांशी (Specific Subject) संबंधीत होते. या ५४ विषयाचे एकत्रिकरण करून त्यांचे ११ विषयांत मांडणी केली. यामध्ये ३०% ब्लॉग्ज हे प्रचलित माहिती तंत्रज्ञान व वाचन साहित्याचा विकास या विषयासंबंधित होते. ब्लॉग्जच्या रँक लिस्टमध्ये ग्रंथालयातील नैतिकता, ग्रंथालयशास्त्र व संशोधन, माहिती तंत्रज्ञान, ग्रंथालय व्यवस्थापन, माहिती तंत्रज्ञान व सेवा असा क्रम दिसून येतो. ग्रंथालयासाठी स्वंतत्र ब्लॉग तयार करून त्याद्वारे महत्वपूर्ण विषयावर चर्चा घडविणे, माहितीची

देवाण घेवाण करणे, प्रचलित विषयांचे लेख याबाबतची माहिती देण्यासाठी ब्लॉग्ज निश्चितच ग्रंथालयासाठी उपयुक्त आहे. **(Gala, 2013)**

4. Plathottam, George (2015) यांनी Press and Its Social Responsibility in Northeast India: A Content Analysis हा शोध प्रबंध North - Eastern Hill University, Shillong येथे सादर केला.

सदर संशोधनामध्ये वृत्तपत्रांची जबाबदारी आणि वृत्तपत्रांमधील आशयाचे विश्लेषण करणे, वेग-वेगळ्या माध्यमातून ईशान्य भारतातील वृत्तपत्रांचा कल जाणून घेणे, वृत्तपत्रांमधील सकारात्मक व नकारात्मक आशयाचे विश्लेषण करणे, सामाजिक विषय कितपत ठळकपणे मांडले जातात याचे विश्लेषण करणे, वृत्तपत्रांनी सामाजिक बांधिलकी जोपसणेसाठी मार्गदर्शन करणे या उद्दिष्टांना अनूसरून संशोधन केले.

सदर संशोधनासाठी २००३ ते २००५ या कालावधीत आसाम आणि गुवाहाटी या शहरात वितरित होणारे The Assam Tribune आणि The Shillong Times या दोन वृत्तपत्रांचा आशय विश्लेषणात्मक अभ्यास केला आहे. या संशोधनातून असे दिसून आले की, सदर संशोधनातून असे निदर्शनास आले की, या वृत्तपत्रामध्ये नकारात्मक बातम्यांचे प्रमाण ४८.०८% इतके आढळून आले तर सकारात्मक बातम्यांचे प्रमाण ३४.६९% इतके आढळून आले. सदर वृत्तपत्रातून सामाजिक बांधिलकी, शिक्षण, आरोग्य, सामाजिक विकास या विषयांवर लेखन केलेले आढळून आले. सदर संशोधनातून असेही लक्षात आले की, या वृत्तपत्रामधील सामाजिक जबाबदारी लक्षात घेवून आशयामध्ये बदल करून सकारात्मक आशयाचे प्रमाण वाढविले पाहीजे. तसेच ग्रामिण जनतेचे सामाजिक विषय प्राध्यान्याने मांडले जात नाही. त्यासाठी आवश्यक बदल सदर संशोधनात सूचविले आहे. (**Plathottam, 2015**)

5. Shavnam Kumari (2014) यांनी Content Analysis of Gender Perspective in CBSE extbooks of Hindi, English and Social Study of VIII Standard हा शोध प्रबंध University of Rajasthan, Jaipur येथे सादर केला.

सदर संशोधनामध्ये इयत्ता आठवीच्या सीबीएसई अभ्यासक्रमातील हिंदी, इंग्रजी आणि सामाजिकशास्त्र या विषयांमध्ये असलेल्या व्यावसायिक शिक्षणाचे प्रमाण अभ्यासणे, हिंदी, इंग्रजी आणि सामाजिकशास्त्र या विषयांचा आदर्श अभ्यासक्रम तयार करणे, हिंदी, इंग्रजी आणि सामाजिकशास्त्र या विषयांमध्ये व्यक्तीमत्व विकासासाठी असलेल्या घटकांचा अभ्यास करणे,

इयत्ता आठवीच्या सीबीएसई अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांचे स्त्री- पुरूष प्रमाण तपासणे, अभ्यासक्रमाबाबत शिक्षकांची मते जाणून घेण्याच्या दृष्टीने अभ्यास केला.

सदर अभ्यासातून असे लक्षात आले की, हिंदी विषयाचा अभ्यासक्रम तयार करण्यासाठी एकूण ४८ लेखक सहभागी होते. त्यामध्ये ७९.१६% (३८) पुरूष लेखक तर २०.८३% (१०) लेखक या महिला होत्या. इंग्रजी विषयाच्या अभ्यासक्रम विकासामध्ये २४ लेखकांपैकी ५४.१६% पुरूष लेखक होते तर ४५.८३% स्त्री लेखीकांचा सहभाग होता. या अभ्यासातून हिंदी, इंग्रजी आणि सामाजिकशास्त्र या विषयाच्या विकसनासाठीचे घटक व त्यातील आशयाचे विश्लेषण केले आहे. **(Shavnam Kumari, 2014)**

6. Shivendu, P. (2008). यांनी A Content Analysis of Environmental Education Textbook of Primary Stage in Schools of Rajasthan या विषयावर पीएच्.डी पदवीसाठी U. P. Rajarshi Tondon Open University येथे शोध प्रबंध सादर केला.

सदर प्रबंधामध्ये संशोधकाने उद्दिष्टांना अनुसरून पुढीलप्रमाणे निष्कर्ष काढले आहे. पर्यावरणशास्त्राचा अभ्यासक्रम तयार करण्यासाठी त्या विषयातील विषय तज्ज्ञांची समिती असून पाठ्यपुस्तक निर्मितीसाठी काही मार्गदर्शक तत्त्वे निश्चित केली आहे. मात्र त्यातील बहूतेक मार्गदर्शक तत्त्वे पाळली जात नाही. पाठयपुस्तकामध्ये तात्त्विक स्वरुपात (Therotical) माहिती दिलेली आहे. विषयाची मांडणी ही पध्दतशीर करणे आवश्यक आहे. मात्र त्याकडे जास्त लक्ष दिले जात नाही. प्रत्येक माहितीमध्ये उदाहरणे आणि आकृत्यांचा समावेश केला पाहिजे.

पाठ्यपुस्तके ही साधारण दर्जाची असून त्यामध्ये मोठ-मोठी प्रकरणे आणि तात्त्विक स्वरुपाची माहिती दिलेली आहेत. पध्दतशीरपणे विषयांची मांडणी हा पाठयपुस्तकांचा महत्वाचा गाभा असतो. मात्र त्यालाच महत्व दिलेले नाही असे लक्षात येते. सदर अभ्यासात संशोधकाच्या असेही लक्षात आले की, आकृत्या आणि नकाशे यांचा उपयोग अतिशय कमी प्रमाणात केलेला आहे. ५. ७५% शिक्षक हे NCERT ने नेमून दिलेल्या विषयाबाबत अनभिज्ञ आहेत. ६. ५६% शिक्षकांना हे NCERT चे उद्दिष्टे माहित नाहीत. ७.४०% शिक्षकांच्या मते आकृत्या आणि नकाशे यांच्या साह्याने आशयाचे परिपूर्ण ज्ञान देता येते, तर ४५% शिक्षकांची मते याबाबत नकारात्मक होते. **(Shivendu, 2008)**

7. Sivakumar, S. (2004) यांनी Crime Reporting in the Print Media in Tamilnadu: A Content Analysis हा शोध प्रबंध Anna Centre for Public Affairs University of Madras, Chennai या विद्यापीठास सादर केला.

सदर संशोधनामध्ये तामिळनाडूमधील इंग्लिश व तामिळ वृत्तपत्रातून गुन्हेगारी बातम्यांचा आशय विश्लेषणाद्वारे अभ्यास करणे, गुन्हेगारी बातम्यांच्या संदर्भात वाचकांच्या अभिप्रायांचे विश्लेषण करणे, गुन्हेगारी क्षेत्रातील बातमीदारांच्या दृष्टिकोनाचा विश्लेषण करणे या घटकांना अनुसरून अभ्यास केला आहे.

सदर संशोधनामध्ये संशोधकाने गुन्हेगारीचे नऊ प्रकारात विश्लेषण केले होते. या संशोधनात असे निदर्शनास आले की, इंग्लिश वृत्तपत्रापेक्षा तामिळ भाषेतील वृत्तपत्रांमधून गुन्हेगारी विषयीच्या बातम्यांचे प्रमाण अधिक दिसून आले. या संशोधनातून असेही दिसून आले की, ७०% वाचक गुन्हेगारी विषयक बातम्या वाचल्यानंतर त्यांच्या मनात भिती निर्माण होते. तर या प्रकारच्या बातम्या वाचल्यानंतर ९१% वाचक सतर्क होवून जागृक (awareness and took precautions) जागृक होतात. तर ८५% वाचक गुन्हेगारी विषयक बातम्या वाचण्यासाठी इच्छूक असतात. सदर संशोधनात आशय विश्लेषणाचा वापर करून गुन्हेगारी विषयक बातम्याचे विश्लेषण केले आहे. **(Sivakumar, 2004)**

8. Vasavada, Falguni. (2008) यांनी A Content Analysis of Print and Television Advertisements in Selected Brands in Post Liberalization Era: With Special Reference to Changes in the Competitive Environment हा शोधप्रंबध Sardar Patel University येथे सादर केला.

मुद्रित व दूरदर्शन वरील जाहिरातींचे उदात्तीकरणानंतरचे बदलते स्वरूप अभ्यासणे, जाहिरातींमधील आशयांचा तुलनात्मक अभ्यास करणे, जाहिरातींमधून दिल्या जाणाऱ्या संदेशांचा अभ्यास करणे या उद्दिष्टांना अनूसरून संशोधकाने अभ्यास केला.

सदर संशोधनामधून असे निदर्शनास आले की, उदात्तीकरणानंतर व्यवसाय क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात बदल घडून आले. व्यवसायातील मक्तेदारी व संरक्षण हे शब्द मागे पडून व्यवसायात गुणवत्ता, विपणन व प्रसिध्दीला महत्त्व प्राप्त झाल्याचे संशोधकाला आढळुन आले. सदर अभ्यासातून असेही लक्षात आले की, ग्राहकांना दूरदर्शन वरील जाहिरातीमूळे उत्पादनाचे

नवीन पर्याय, वस्तूचीं माहिती सहज उपलब्ध झाली. मुद्रित जाहिराती पेक्षा दूरदर्शन वरील जाहिरातींमुळे आशय पोहचविण्यात अमुलाग्र बदल दिसून आला. मुद्रित जाहिरातीपेक्षा दूरदर्शनवरिल जाहिरातीमधून आशय लवकर व परिणामकारकपणे पोहचल्याचे दिसून आले. मुद्रित आणि दूरदर्शन या दोन्ही प्रकारच्या जाहिरातीमधून Informative Information उपभोक्त्यांना प्राप्त होते. सदर शोधप्रबंध हा आशय विश्लेषण या तंत्राचे उपयोजन केलेले आहे. **(Vasavada, 2013)**

## २.६ एम. फिल. चे लघुशोध प्रबंध

१. अंबादे, अरुणा. (२००८). यांनी इन्फिलबनेटव्दारे आयोजित केलेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेमधील लेखांचे आशय विश्लेषण हा प्रबंध डॉ. किशोर काळे यांच्या मार्गदर्शनाखाली २००६-२००८ या कालावधीत राधा महाविदयालय, नागपूर या अभ्यास केंद्राद्वारे यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठास सादर केला आहे.

सदर प्रबंधामध्ये संशोधकाने इन्फिलबनेट या संस्थेने आयोजित केलेल्या आंतराष्ट्रीय परिषदेतील लेखकांच्या विषयाचे विश्लेषण करणे, एकाच विषयावरील अनेक लेखकांचे प्रलेख संशोधकाला / उपभोक्त्याला उपलब्ध होण्याकरिता सूची तयार करणे, विषयानुसार परिपुर्ण आशय विश्लेषण करणे, उपभोक्त्याला संशोधनात मदत होण्यासाठी आशायांचे संकलन करणे, परिषदेत सादर करण्यात आलेल्या शोध निबंधाचे विषय व त्यांचे उपविषय यांची क्रमवार मांडणी करुन त्याची विश्लेषणात्मक रचना करणे, कोणत्या विषयावर किती लेख प्रकाशित होत आहे याचे विश्लेषण करणे या अनुशंगाने सविस्तर अभ्यास केला आहे.

सदर संशोधनामध्ये असे निर्देशनास आले की, CALIBER VOLUME मधील सर्वात जास्त लेख हे २००६ मधील असून त्याची संख्या ८८(३४.७८%), २००५ मध्ये ८६ (३३.९९%), तर २००४ मध्ये ७९(३१.३२%) इतकी आहे. सदर संशोधनामध्ये लेखांच्या आशयानुसार विश्लेषण केले असता असे दिसून आले की, एकूण २४ भागांमध्ये विषयांचे विभाजन केले असून त्यात सर्वाधिक ३२ (१२.६५%) लेख हे डिजिटल ग्रंथालय या विषयावर तर इंटरनेट आणि वेब सर्व्हिसेस या विषयावर २८(११.०७%) आणि नॉलेज मॅनेजमेंट या विषयावर २०(०७.०९%) लेख प्रकाशित झालेले आहे. खंडानुसार विषय लेखांचे विश्लेषण केले असता असे लक्षात आले कि, खंड ३ (२००५) मधील मुख्य विषयांच्या लेखांची संख्या ही

सर्वाधिक ७२ इतकी आहे. यातील १४ लेख (१५.८३%) लेख डिजिटल ग्रंथालये या विषयावर आहे. खंड ४ मधील प्रकाशित लेखांची संख्या ७० इतकी असून त्यामध्ये सर्वाधिक १६(२२.८६%) लेख हे इंटरनेट आणि वेब सर्व्हिसेस या विषयावर आहेत. लेखांचे लेखकांनुसार वर्गीकरण केले असता असे लक्षात आले की, २५३ लेखांपैकी १०४(४१.४३%) लेख हे दोन लेखकांनी लिहिलेले आहेत तर एका लेखकाने लिहिलेल्या लेखांची संख्या ७८(३१.०७%) इतकी आहे. तीन लेखकांनी मिळून ५५(२१.९१%) लेख लिहिले आहे तर तीन पेक्षा अधिक लेखकांनी लिहिलेल्या लेखकांनी संख्या १४(५.५१%) इतकी आहे. **(अंबादे, २००८)**

२. काळे, अंजली. (२००९) यांनी समाज प्रबोधन पत्रिका या नियतकालिकातील लेखांचा आशय विश्लेषणात्मक अभ्यास, केला आहे.

या प्रबंधामध्ये संशोधकाने पुढीलप्रमाणे उद्दिष्टे निश्चित केली होती. यामध्ये समाज प्रबोधन पत्रिका या नियतकालिकातील माहितीचा आढावा घेणे, या नियतकालिकात प्रकाशित झालेल्या लेखांचा अभ्यास करणे, उल्लेखित लेखांचे विषयवार, कालानुरुप वर्गीकरण करणे, प्रकाशित होणाऱ्या लेखांची वर्षानुरुप सरासरी काढणे, लेखांच्या उल्लेखांचे प्रमाण तपासणे, भौगोलिक क्षेत्रानुसार लेखकांचा अभ्यास करणे.

या प्रबंधामधील उद्दिष्टांनुसार संशोधकाने पुढीलप्रमाणे निष्कर्ष काढले आहेत. यामध्ये अंकनिहाय लेखांचे वर्गीकरण करण्यात आले आहे. यामध्ये ४७३ लेख प्रकाशित झाले असून, यामध्ये सर्वात जास्त लेख अंक क्रं. १७५ (एप्रिल-जुन २००६) मध्ये आढळुन आले. प्रत्येक अंकामध्ये सरासरी ९२ लेख प्रकाशित झाले आहे. या नियतकालिकात एका लेखकाने लिहिलेल्या लेखांची संख्या ४३९ (९२.८१%) इतकी आहे. विविध लेख लिहिलेल्या लेखकांच्या पदांचा विचार करता ९५.४४% योगदान प्राध्यापकांचे आहे. सर्वात अधिक लेख सुहास पळशीकर (१६) यांचे आहे, तर माधव दातार यांनी ११ लेख लिहिले आहे. एकूण ४७३ लेखांपैकी ३६ लेख असे होते की, ज्याकरिता ६ ते १० संदर्भ वापरण्यात आले. त्याचे प्रमाण ७.६२% होते. तर त्यानंतर ३२ लेखांसाठी वेग-वेगळे १ ते ५ (६.७६%) संदर्भ वापरण्यात आले. **(काळे, २००८)**

३. चौगुले, प्रकाश. (२००७). यांनी इंडिया रिपोर्टर, जानेवारी १९९७ ते डिसेंबर २००६: आशय विश्लेषण हा प्रबंध एम.फिल. या पदवीसाठी डॉ. बी. एम. पानगे यांच्या मार्गदर्शनाखाली

२००६-२००७ मध्ये सार्वजनिक वाचनालय, नाशिक या केंद्राद्वारे यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठास सादर केला.

या प्रबंधामध्ये संशोधकाने पुढीलप्रमाणे उदिदष्टे निश्चित केली होती. त्यात ऑल इंडिया रिपोर्टर या नियतकालिकाची वैशिष्टे शोधणे, सर्वोच्च न्यायालयातील निर्णयांची वर्षानुसार विभागणी करणे, उच्च न्यायालयातील राज्य निहाय वर्गवारी करणे, या नियतकालिकात वारंवार आलेल्या निर्णयांची श्रेणीनुसार वर्गवारी करणे आणि या नियतकालिकातील लेखकांचे सांख्यिकीय विश्लेषण करणे.

सदर संशोधन प्रबंधामध्ये संशोधकाने पुढील प्रमाणे निष्कर्ष दिले आहे. फॅमिली लॉ या विषयावर सर्वात जास्त पुस्तकांचे परीक्षण दिलेले आहे. २००३ मध्ये सर्वात जास्त ८२ (१३.७३%) लेख प्रकाशीत झालेले आहे. सर्वात जास्त लेख १४६(८.७४%) कॉन्स्टिटयुशन लॉ या विषयावर प्रकाशीत झालेले आहेत. २००१ मध्ये सर्वात जास्त ३६ कायदयात सुधारणा झालेल्या आहेत तर २००२ मध्ये सर्वात जास्त २९ कायदे मंजुर करण्यात आले. सर्वोच्च न्यायालयात ३६% निर्णय एका वर्षात, १४% निर्णय दोन वर्षात, तर ११% निर्णय तीन वर्षात लागतात. सन २००६ मध्ये उच्च न्यायालयातील सर्वात जास्त १६११ (४१.९३%) अभियोग / दाव्यांची टिपणे देण्यात आली आहेत. ऑल इंडिया रिपोर्टर मध्ये देण्यात येणारे नामनिर्देश १००% प्रमाणित स्वरुपात आढळतात. सर्वोच्च न्यायालयातील अभियोगाची टिपणे १९९७ ते १९९९ या काळात दिलेली नाही. २००० पासून टिपणे देण्यास सुरुवात झाली असून सर्वात जास्त अभियोग टिपणे १६११ (४१.९३%) दिलेली आहेत. **(चौगुले, २००७)**

४. बोबडे, माधवी. (२००८) यांनी इफ्ला जर्नल: आशय विश्लेषण (२००२ ते २००७) हा प्रबंध एम. फिल. पदवीसाठी राधा महाविद्यालय, नागपूर या अभ्यास केंद्राद्वारे यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठास सादर केला आहे. त्यासाठी त्यांना डॉ. अपर्णा चौधरी यांनी मार्गदर्शन केले होते.

या संशोधनामध्ये त्यांनी २००२ ते २००७ या पाच वर्षातील इफ्ला जर्नलचा विषयावार अभ्यास करणे, या नियतकालिकातील लेखांची वर्गवारी करुन त्याचा अभ्यास करणे, लेखांचे प्रदेशानुसार वर्गीकरण करणे, लेखकांची लेखांच्या संख्येच्या क्रमानुसार मांडणी करणे, या नियतकालिकातील लेखांचे विषयानुसार वर्गीकरण करुन २००२ ते २००७ या कावधीतील

ग्रंथालय शास्त्रातील नवीन संशांधनाचे प्रवाह माहिती करुन घेणे, या नियतकालिकातील वेग-वेगळया सदराखाली प्रकाशित होणाऱ्या लेखांची वर्गवारी करणे याबाबतचा सविस्तर अभ्यास केला आहे.

वरिल अभ्यासातून असे निदर्शनास आले की, इफ्ला या नियतकालिकामध्ये २००२ मध्ये सर्वाधिक २४३(३२.०५%) लेख प्रकाशित झाले. २००२ ते २००७ या कालावधित संपादकीय सदरात एकूण २५ संपादकीय लेख प्रकाशित करण्यात आले. त्यामध्ये २००२ मध्ये ५, तर इतर कालावधित ४ संपादकीय लेख प्रकाशित करण्यात आले आहे. लेख विभागात ग्रंथालय आणि माहितीशास्त्राशी संबधीत १८२ लेख प्रकाशित करण्यात आले होते, तर २००२ मध्ये सर्वाधिक ४५ (४०.४४%) २००६ मध्ये २३(१२.६३%) लेख प्रकाशित झाले आहे. एकाच लेखकाने लिहिलेले लेख २०८(८४.५५%) आहे तर दोन लेखकांनी मिळून २७(१०.९७%) इतके प्रमाण होते. देशानुसार लेखकांच्या अभ्यासामध्ये संशोधकाच्या असे लक्षात आले की, सर्वाधिक लेख अमेरिकेतील लेखकांनी लिहीलेले ३०(१२.९१%), तर त्याखालोखाल दक्षिण आफ्रिका या देशाचे लेख प्रकाशित झालेले आहे. **(बोबडे, २००८)**

५. भाले, योगेश. (२००९) यांनी बुलेटीन ऑफ दि मराठवाडा मॅथेमॅटीकल सोसायटी या नियतकालिकाच्या उल्लेखांचे विश्लेषण आणि आशय विश्लेषण हा प्रबंध डॉ. दया दळवे यांच्या मार्गदर्शनाखाली २००७ ते २००९ या कालावधीमध्ये मराठा शिक्षण संस्था संचलित विवेकानंद कला, सरदार दलिपसिंग वाणिज्य व विज्ञान महाविदयालय, औरंगाबाद या केंद्राद्वारे यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विदयापीठास सादर केला.

या शोधप्रबंधात त्यांनी संबंधित जर्नलमधील लेखांमध्ये वापरण्यात येणाऱ्या संदर्भाचा अभ्यास करणे, सर्वाधिक साहित्य कोणत्या देशात प्रकाशित झाले हे तपासणे, वर्षवारीनुसार प्रकाशित झालेल्या लेखांचे प्रमाण तपासणे, लेखांमधील संदर्भासाठी कोणते नियतकालिक अधिक वापरले जाते ते तपासणे, संदर्भासाठी इंटरनेट आणि ग्रंथेत्तर साहित्याचा वापर किती प्रमाणात होतो याचा शोध घेणे या घटकांच्या आधारे अभ्यास केला.

या अभ्यासामधून संशोधकाने दिलेले निष्कर्ष असे, खंडानुसार लेख प्रकाशित होण्याचे प्रमाणाचा अभ्यास केला असता २००७ मध्ये सर्वाधिक २४(१५.००%) तर २००४ आणि २००५ मध्ये २०(१२.५०%) लेख प्रकाशित झाले होते, तर सर्वात कमी लेख २००८ मध्ये

१२(०७.०५%) इतके प्रमाण आढळुन आले. अंकानुसार लेख प्रकाशित होण्याचे प्रमाण तपासले असता असे निर्दशनास आले की, अंक क्र. ४ मध्ये १९(११.८७%), अंक क्र.३ मध्ये १८(११.२५%), तर अंक क्र. २ मध्ये १७(१०.६२%) इतके लेख आढळुन आले. नियतकालिकांमध्ये लेख लिहिण्याच्या लेखक दायीत्वाचा अभ्यास केला असता, संशोधकाच्या असे लक्षात आले की, एकाच लेखकाने लेख लिहिण्याचे प्रमाण ९८(६१.२५%), तर दोन लेख लिहिण्याचे प्रमाण ४९(३०.६२%) इतके आहे. सदर संशोधनामध्ये खंडानुसार उल्लेखांचे विश्लेषण अभ्यासले असता संशोधकाच्या असे लक्षात आले की, एकूण ६० लेखांमधून ८६०(५.३७%) उल्लेख आढळतात. त्यामध्ये खंड क्र. ५ मधील २० लेखांसाठी २१४(५३.३७%) तर खंड क्र. १ मधील १३ लेखांसाठी ३५(४.६%) उल्लेख आढळतात. विषयानुसार लेखांची सरासरी पाहिली असता असे लक्षात येते की, सर्वाधिक लेख हे गणित ४३(२६.८७%), त्याखालोखाल भूमिती २९(१८.१२%) या विषयामध्ये आहे. **(भाले, २००९)**

६. मुरकुटे, सुधीर. (२००८) यांनी योजना या नियतकालिकातील लेखांचे आशय विश्लेषण व लेखांचा निर्देश तयार करणे हा प्रबंध एम. फिल. या पदवीसाठी डॉ. बी. एम. पानगे यांच्या मार्गदर्शनाखाली २००६-२००८ या कालावधी मध्ये सार्वजनिक वाचनालय, नाशिक या केंद्राद्वारे यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठास सादर केला.

योजना या नियतकालिकातील लेखांचे आशय विश्लेषण करणे, आशय विश्लेषण व निर्देश निर्मितीचे नियोजन करणे, आशय विश्लेषण व निर्देश निर्मितीची तात्त्विक बाजू समजावून घेणे, या नियतकालिकातील लेखांचे निर्देश तयार करणे व निर्देश निर्मितीची पध्दत समजावून घेणे हे उद्दीष्ट समोर ठेवून अभ्यास केला.

ऑगस्ट २००० ते जुलै २००७ याकालावधीत एकूण ११९८ लेख प्रकाशित झालेले आहेत. सरासरी १७१ लेख प्रत्येक वर्षी प्रकाशित झालेले आहे. एकूण ११९८ लेखापैकी ७ वर्षाच्या कालावधित फक्त १५१ लेखात (१२.६०%) संदर्भ साधनांचा वापर केल्याचे आढळुन आले. सर्वात जास्त २००२ मध्ये १६३ लेखांपैकी ४० लेखात (२४.५४%) १८३ संदर्भांचा वापर केला आहे. ११९८ लेखांपैकी ३०९ (२५.७९%) लेख हे अनुवादीत लेख होते. एकूण

२४ लेखकांनी मिळून ३०९ लेख अनुवादीत केले आहे. त्यात नितीन सावंत यांनी ४५(१४.५६%), तर ग. ल. कर्वे यांनी ४४ (१४.२४%) लेख अनुवादीत केले आहे.

लेख लिहिण्यासाठी संदर्भसाधनांचा उपयोग करणाऱ्या लेखकांच्या व्यवसायाचा विचार करता ९०.७३% लेखक हे प्राध्यापक होते, तर ६.६२% लेखकांच्या व्यवसायाचा कोठेही उल्लेख नव्हता, २.६५% लेखक हे ग्रंथालय शास्त्राशी संबंधित क्षेत्रातील नव्हते.

या प्रबंधामध्ये संशोधकाने पुढीलप्रमाणे शिफारशी सूचविल्या आहेत. त्यात प्रत्येक लेखाचा सार देण्यात यावा, प्रत्येक लेखाचा, अनुवादकाचा व्यवसाय याबाबतची माहिती देण्यात यावी. लेखाच्या शेवटी संदर्भ देण्याची पध्दत एकसारखी असावी. योजना अंक इंटरनेटव्दारे उपलब्ध करुन दयावे. **(मुरकुटे, २००८)**

७. वाणी, विजया. (२००८) यांनी संशोधक या नियतकालिकाचे आशय विश्लेषण: एक अभ्यास हा प्रबंध डॉ. मधुकर शेवाळे यांच्या मार्गदर्शनाखाली २००६-२००८ या कालावधीत यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विदयापीठ, नाशिक येथे सादर केला.

या अभ्यासामध्ये संशोधक या नियतकालिकातील लेख, विविध सदरे यांची उपयुक्तता अभ्यासणे, या नियतकालिकातील आशयाचे विविध अंगाने विश्लेषण करणे, या नियतकालिकात प्रकाशित होणाऱ्या ग्रंथ परीक्षणाचा आढावा घेणे, लेखांच्या ग्रंथ परीक्षणाचा आढावा घेणे, आणि लेखांच्या शेवटी देण्यात आलेल्या संदर्भाचे विश्लेषण करणे या घटकांचा अभ्यास केला आहे.

वरील घटकांच्या अनुशंगाने अभ्यास केला असता, संशोधकाच्या असे लक्षात आले कि, हे नियतकालिक इतिहास संशोधनाला वाहिलेले आहे. वरील कालावधित इतिहास संशोधनासंबंधित विविध विषयांवर एकूण २०६ लेख प्रसिध्द करण्यात आले असून, सर्वात जास्त लेख २००३ मध्ये ३१(१५.०४%) तर सर्वात कमी लेख २००२ मध्ये ९(१५.०४%) इतकी होते. सदर संशोधनात असेही निदर्शनास आले की, एका लेखकाने लिहिलेल्या लेखांची संख्या २१५(८५.६५%) असून दोन लेखकांनी लिहिलेल्या लेखांची संख्या ३६(१४.३५%) इतकी आहे. सदर कालावधित सर्वाधिक १५ लेख डॉ. आनंद कुंभार यांचे असून, त्या खालोखाल डॉ. अरुणचंद्र पाठक यांचे १२ लेख प्रकाशित झाले आहे. सदर नियतकालिकातिल लेखकांच्या शैक्षणिक पात्रतेचा विचार केला असता ५०% पेक्षा जास्त लेखक हे डॉक्टरेट व डि. लिट पदवी धारक आहे, तर २५% लेखक हे प्राध्यापक असल्याचे आढळुन आले. या नियतकालिकातील

१९२(८८.८८%) लेख हे मराठी भाषेत असून २४(११.२२%) लेख हे इंग्रजी भाषेतील आहे. तसेच या नियतकालिकातील १२४ लेख हे संदर्भयुक्त असून त्यातील संदर्भाची संख्या २३१४ इतकी आहे. तर प्रत्येक  लेखाला सरासरी १९ संदर्भ आहेत. या नियतकालिकातील वरील कालावधीत एकूण ४१ पुस्तकांचे परिक्षण केले असून त्यातील मराठी भाषेत ३५(८५.३६%), तर इंग्रजी भाषेत ६(१४.६३%) होती. वरील सर्व पुस्तके हे इतिहास संशोधन या विषयाशी संबंधीत होती. या नियतकालिकातील ७८ फोटो, ६ नकाशे, २ कठिण शब्दांचे कोश, ६ आकृत्या, ४ आराखडे, १५ तक्ते प्रसिध्द करण्यात आले आहे. **(वाणी, २००८)**

८. Howal, Vanita (2013) यांनी Content Analysis of ILA Bulletin and IASLIC Bulletin 2005 To 2007: A Comparative Study हा लघु शोधप्रबंध एस. के. सावनुर यांच्या मार्गदर्शनाखाली २०१२-२०१३ या कालावधीमध्ये सी. एच. एन. महाविद्यालय, उल्हासनगर या केंद्राद्वारे यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठास सादर करण्यात आला.

या प्रबंधामध्ये आशय विश्लेषणाचे वर्णन म्हणजे काय, माहिती पुरवितांना आशय विश्लेषणाचा काय उपयोग होतो, आशय विश्लेषणाची प्रक्रिया, आशय विश्लेषणाचे प्रकार, फायदे व तोटे, तसेच ILA आणि IASLIC या नियतकालिकांचा हेतू, उददीष्टे यांचा अभ्यास करण्यात आलेला  आहे. हे संशोधन करतांना संशोधकाला असे आढळून आले की, IASLIC  हे बातमीपत्र तीन महिन्यांनी प्रकाशित होत असते. या दोन्ही बातमीपत्रांचे पुढील प्रमाणे सात विभाग आहे. लेख, बातमी, सेमिनार, नोटीस, व्यावसायिक जाहिरात, ग्रंथपरीक्षण आणि पत्र. तर ILA बातमीपत्रामधून फक्त लेखच प्रकाशित होतात. संशोधकाच्या असेही निर्देशनात आले की, IASLIC बातमीपत्र हे ILA बातमी पत्रापेक्षा अधिक माहिती प्रकाशित करते. त्याचप्रमाणे २००५ ते २००७ या कालावधीमध्ये  IASLIC बातमीपत्रातून ८७ लेख प्रकाशित झाले तर ILA बातमीपत्रातुन फक्त ७१ लेख प्रकाशित झाले असे आढळून आले. २००५-२००७ या कालावधिमध्ये प्रकाशित झालेल्या १३४ लेखांपैकी ४५(३३.३३%) लेखांमध्ये Information and Communication Technolgoy (ICT) चा ग्रंथालय आणि माहितीशास्त्रामध्ये कशा प्रकारचा प्रभाव आहे हे आढळून आले. त्याचप्रमाणे २००५-२००७ या कालावधिमध्ये तालिकीकरण, संदर्भसेवा, ओपन सोर्स सॉप्टवेअर, ग्रंथालय व्यवस्थापन, Resource Sharing, आंतरग्रंथालयीन देवघेव, साठवण (Preservation), आणि Conservation, या विषयाच्या लेखांचे प्रमाण अधिक होते. या

नियतकालिकातील लेख लिहिणाऱ्यांमध्ये भारतीय लेखकांचे प्रमाण अधिक होते, फक्त ५ लेखक हे परदेशातील होते. ग्रंथालय आणि माहितीशास्त्रातील संशोधकांनी ह्या नियतकालिकात ILA बातमीपत्रांमध्ये ४१.३१% उल्लेख तर IASLIC बातमीपत्रामध्ये ४२.७२% उल्लेख केलेले आहे असे आढळुन आले. त्याचप्रमाणे ILA बातमीपत्रांमध्ये १२१ लेख उल्लेखन केलेले आहे तर IASLIC बातमीपत्रांमध्ये फक्त ७५ लेखांचे उल्लेखन केले होते. वरील घटकांच्या अनुषंगाने सविस्तर माहिती देवून निष्कर्ष काढले आहेत. **(Howal, 2013)**

९. Joshi, Pradeep. (2008) यांनी Content Analysis of E-Journal of Postgraduate Medicine During 1997-2007 हा प्रबंध डॉ. सत्यप्रकाश निकोसे यांच्या मार्गदर्शनाखाली २००७-२००८ या कालावधीमध्ये सरदार पटेल महाविद्यालय, नागपूर या केंद्राद्वारे यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठास सादर केला आहे.

या प्रबंधामध्ये संशोधकाने पुढील उदिदष्टे निश्चित केली होती. पदव्युत्तर औषधशास्त्रामधील लेखकांची लेख लिहीण्याची पध्दती कोणती आहे, औषधशास्त्रामधील नियतकालिकामधून वेगवेगळया विषयांवरती वार्षिक विभागणी करणे, औषधशास्त्रामध्ये किती प्रमाणात लेख लिहिले आहे याचा शोध घेणे, औषधशास्त्रातील लेखांची देशानुसार विभागणी करणे, त्याचप्रमाणे लेखकांच्या लिंगानुसार म्हणजेच स्त्री किंवा पुरुष यांनी लिहिलेल्या लेखांची विभागणी करणे, औषधशास्त्रातील नियतकालिकांची विषयवार व्याप्ती किती प्रमाणात आहे याचा शोध घेणे ही उ-ि्दष्टे ठरविण्यात आली होती.

या प्रबंधामध्ये संशोधकाच्या असे लक्षात आले की, औषधशास्त्रातील पदव्युत्तर शिक्षणातील E-Journal of Postgraduate Medicine या नियतकालिकांमध्ये १९९७-२००७ या कालावधिमध्ये ९४१ लेख प्रकाशित झाले होते. २००५ या वर्षी सर्वात जास्त लेख १३९ (१५%) प्रकाशित झाले होते. तसेच या नियतकालिकामंध्ये दोन प्रकारची माहिती प्रकाशित होते. १) लिखित स्वरुपात २) संख्यात्मक माहिती अशा दोन प्रकारची आाहे. औषधशास्त्रातील विषयांचे शिर्षकानुसार, विषयानुसार आणि लेखांच्या प्रकारानुसार वर्गीकरण करण्यात आले आहे. या नियतकालिंकामध्ये २८६७ लेखकांनी लेख लिहिलेले असून २००३ या वर्षी सर्वात जास्त ४०० लेखकांनी लेख लिहिले आहे. या नियतकालिकामध्ये २८२४ पुरुष लेखक, ३१ संयुक्त लेखक आणि १२ महिला लेखकांनी लेख लिहिलेले आहे. त्याचप्रमाणे ६६६ भारतीय, यु.के.

६४, यु.एस.ए. ५७ आणि फिनलँड, हाँकाँक, आर्यलंड, नेपाल, न्युझीलंड,नायझेरिया, रोमानिया, दक्षिण कोरीया, स्विझरलँड इ. देशातील लेखकांनी प्रत्येकी एक लेख लिहिलेला आहे. तसेच संख्यात्मक विश्लेषणामध्ये असे आढळुन आले कि, ८२६ लेख हे १९९७-२००७ या कालावधिमधे प्रकाशित झाले होते, तर २००३ या वर्षामध्ये सर्वात जास्त म्हणजेच १०४ लेख प्रकाशित झाले होते असे आढळुन आले.

अभ्यासांती संशोधकाने असे सूचविले की औषधशास्त्रातील विद्यार्थी, संशोधक, प्राध्यापक यांनी इंटरनेटवर उपलब्ध असलेल्या मुक्त नियतकालिकांचा (free journals) आपल्या ज्ञानामध्ये भर पाडण्यासाठी जास्तीत जास्त उपयोग करावा, औषधशास्त्रातील महाविदयालयांच्या ग्रंथपाल आणि ग्रंथालयांना औषधशास्त्रातील प्रचलित माहितीची तात्काळ माहिती उपलब्ध करुन दयावी. केंद्रसरकार व राज्यसरकार यांनी खाजगी प्रकाशकांना औषधशास्त्रातील नियतकालिके जास्तीत जास्त प्रकाशित करण्यासाठी निधी उपलब्ध करुन दयावा. **(Joshi, 2008)**

१०. Latkar, Ravindra. (2009) यांनी Content Analysis of Indian Journal of Information Library & Society हा लघु शोधप्रबंध डॉ. बनकर यांच्या मार्गदर्शनाखाली जानेवारी २००८-२००९ या कालावधीमध्ये शासकीय आध्यापक महाविद्यालय, धारवानी या केंद्राद्वारे यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठास सादर केला.

या प्रबंधामध्ये संशोधकाने खंडानुसार लेखांचे विभाजन करणे, लेखकांचा हु-ा, लिंग, भौगोलिक क्षेत्र, आणि एक लेखक, एकापेक्षा जास्त लेखक यांच्यानुसार वर्गवारी करणे, विषयानुसार लेखकांचे वर्गीकरण करणे, एकाच लेखकाने जास्तीत जास्त किती लेख लिहिले हे तपासणे, जास्तीत जास्त किती लेख प्रकाशित होतात, त्याचप्रमाणे संख्यात्मक आणि गुणात्मक आशय विश्लेषण करणे हे उ-ि्टे संशोधन करण्यासाठी ठरविली होती.

या शोध प्रबंधामध्ये आशय विश्लेषणाबददल थोडक्यात माहिती दिली आहे, आशय विश्लेषणाची व्याख्या, आशय विश्लेषणाची संकल्पना, हेतू, आशय विश्लेषण हे एक संदर्भ साधन कसे आहे याची माहिती, आशय विश्लेषणाचे ग्रंथालय आणि माहितीशास्त्रामध्ये महत्त्व आशय विश्लेषणाचे प्रकार, प्रक्रिया, फायदे, पायऱ्या, मर्यादा यांचा अभ्यास करण्यात आलेला आहे.

संशोधकाने निवडलेल्या कालावधिमध्ये २६५ लेख प्रकाशित झालेले आहे. जास्तीत जास्त प्रत्येक खंडामध्ये २६.५०% लेख प्रकाशित झालेले आहे. २६५ लेखांचे लेखन ४०५ लेखकांनी केलेले आहे. या ४०५ लेखकांपैकी ३३१ पुरुष, तर ७४ महिला लेखिका होत्या असे निर्देशनात आले. एका पेक्षा  अधिक लेखकांनी मिळून लेखन केलेल्या लेखांचे प्रमाण हे इतर लेखकांपेक्षा जास्त आहे. १३.३३% लेखकांनी त्यांचा हु-ा काय आहे हे नमुद केलेले नाही. या नियतकालिकामध्ये लेखन करणाऱ्या लेखकांपैकी जास्तीत जास्त लेखन हे तामिळनाडू आणि आंध्रप्रदेश या राज्यातील होते. एकाच लेखकांनी जास्तीत जास्त लेखन करणाऱ्यापैकी LSRCV Ramesh हे होते. त्यांनी ३८ लेख लिहिलेले आहे. डी. राजलक्ष्मी आणि कुफिलकर सी. आर. या दोन महाराष्ट्रातील महिला लेखकांनी जास्त प्रमाणात एकत्र लेख लिहिलेले आहे.

या निष्कर्षाच्या आधारावर संशोधकाने पुढीलप्रमाणे शिफारशी केलेल्या आहे. एक खंडामध्ये जास्तीत जास्त लेखांचे प्रकाशन करावे, हे नियतकालिक जरी तिमाही असले तरी ते नियमित कालावधिमध्ये प्रकाशित होत नाही, त्यामुळे या नियतकालिकाचे नियमित वेळेत नियतकालिक प्रकाशित करावे. प्रत्येक लेखकाचा हुद्दा नियतकालिकामध्ये समाविष्ट करावा, देशातील प्रत्येक भागामधून लेखकांना लेख लिहिण्यास प्रोत्साहन देणे व ते लेख प्रकाशित केले जावे. जास्तीत जास्त महिला लेखकांची संख्या वाढविण्यावर भर देणे, लेखकांनी एकत्र व स्वतंत्रपणे लेख जेवढे लिहिले असतील त्यांची माहिती देणे, प्रत्येक लेख हा कमीत कमी तीन पाने असावा आणि २० पानांपेक्षा जास्त नसावा, कारण तो लेख मोठा होण्याची शक्यता असते, ज्या लेखांना संदर्भ दिलेले नसतील त्यांचे प्रकाशन करण्याचे टाळावे व जास्तीत जास्त संदर्भ असणाऱ्या लेखांना प्रोत्साहन दिले पाहिजे.  प्रत्येक खंडाला ग्रंथ परीक्षण देण्यात यावे. (**Latkar, 2009**)

## २.७ एम. लिब. चे संशोधन प्रकल्प

१. आभाळे, जनाबाई. (२०१२) यांनी साहित्यिक रंगनाथ पठारे यांच्या वाङमयाचे आशय विश्लेषण हा प्रकल्प प्रा. बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली सादर केला.

या अभ्यासातून साहित्यीक रंगनाथ पठारे यांचे साहित्य हे अनुभवावर जास्त आधारित आहे हे स्पष्ट होते. तसेच साहित्यिक रंगनाथ पठारे यांनी कादंबरी, कथा, समीक्षा या तीन विभागामध्ये लेखन केलेले आहे. साहित्यिक रंगनाथ पठारे यांच्या साहित्यात असे आढळुन आले की, आपली वाङ्मयीन परंपरा आणि संस्कृती काय आहे, आपली मराठी भाषा, साहित्य, त्यांच्या आस्तित्वाचा प्रश्न, लोकशाही, स्वातंत्र्य, साहित्य संमेलन अशा अनेक विषयांवर त्यांनी मार्मिक भाष्य केलेले निदर्शनास आले. साहित्यिक रंगनाथ पठारे यांचे साहित्य हे ग्रामीण भागाबरोबरच शहरी भागाशी पण मनातील ठाव घेणारे असे आढळुन आले. **(आभाळे, २०११)**

२. गोणे, इंदू (२००६) यांनी माहिती महामार्ग विविधा नियतकालिकातील लेखांचे आशय विश्लेषण हा प्रकल्प प्रा. डोंगरे, यांच्या मार्गदर्शनाखाली सादर केला.

माहिती महामार्ग विविधा या मासिकामधील लेख सामान्य वाचकासाठी उपयुक्त आहेत. त्यात संगणक विषयक संकल्पनांवर माहितीचे प्रमाण अधिक असते. तसेच या नियतकालिकात सॉफ्टवेअर, हार्डवेअरचे लेख जास्त प्रमाणात आलेले आहेत. माहिती महामार्ग विविधा या नियतकालिकातील लेखांचे तीन विभागात वर्गीकरण करण्यात आले, त्यात माहिती तंत्रज्ञान, सॉफ्टवेअर आणि हार्डवेअर हे तीन भाग आहे. त्यापैकी सर्वात जास्त लेख हे माहिती तंत्रज्ञान या विभागावर प्रकाशित करण्यात आलेले आहे असे आढळुन आले. **(गोणे, २००६)**

३. जाधव, दत्तात्रेय (२०११) यांनी शिक्षण संक्रमण या मासिकाचा आशय विश्लेषणात्मक अभ्यास हा प्रकल्प डॉ. माने एस. व्ही. यांच्या मार्गदर्शनाखाली रामकृष्ण परमहंस महाविदयालय, उस्मानाबाद या अभ्यास केंद्राद्वारे यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठास सादर केला.

त्यांच्या अभ्यासातून आलेले निष्कर्ष असे, एकूण १५ विषयांपैकी शैक्षणिक विषयावरती ७(४६.६४%) लेख, तर पर्यावरण आणि मनोरंजन विषयावरती ३(६.६८%) लेख आढळुन आले. सदर मासिकांचा अभ्यास करतांना असे आढळुन आले की, जयश्री अत्रे यांनी सर्वाधिक ८(२.७५%) लेख लिहिले असून, व्ही. डी. प्रधान यांनी ७(२.४१%) लेख लिहिले आहे. तर लीला पाटील, प्रमोद जोग आणि सुलभा विधाते यांनी प्रत्येकी ५(१.७२%) लेख लिहिले आहे.

शिक्षण संक्रमण या मासिकातील रँक लिस्टचा अभ्यास केला असता असे निदर्शनास आले कि, शैक्षणिक विषयावर सर्वाधिक २२८(५२.१६%) लेख प्रकाशित झाले असून पर्यावरण या विषयावर ३८(८.३६%) लेख प्रकाशित झाले आहे. **(जाधव, २०११)**

४. थेटे, संतोष. (२०१०) यांनी साधना या नियतकालिकाचे आशय विश्लेषण हा प्रकल्प डॉ. शेवाळे मधुकर यांच्या मार्गदर्शनाखाली सादर केला.

संशोधकाच्या असे लक्षात आले की, या नियतकालिकामध्ये राजकीय, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक व विद्यार्थ्यांना प्रेरणा देणारे चरित्र, समाज व त्याचे घटक अशा सर्वच विषयांचा समावेश केलेला आढळुन आला. या नियतकालिकामध्ये एकूण २७ विषयांवर लेख प्रकाशित होतात, त्या २७ विषयांपैकी सर्वात जास्त लेख हे राजकीय विषयांशी संबंधित असून त्याचे प्रमाण ६६(१६.७०%) इतके असून, क्रीडाविश्व या विषयावर ०१(०.२%) इतकेच लेख प्रकाशित झाल्याचे आढळुन आले. **(थेटे, २०१०)**

५. दळवी, विघ्नेश. (२०१२) यांनी भारतातील ग्रंथालय आणि माहितीशास्त्रावरील मुक्त स्त्रोत नियतकालिकांचा अभ्यास व ॲनल्स ऑफ लायब्ररी आणि इन्फर्मेशन स्टडीज या नियतकालिकाचे आशय विश्लेषण हा प्रकल्प डॉ. द. ना. फडके यांच्या मार्गदर्शनाखाली सन २०११ ते २०१२ मध्ये बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय, ठाणे या अभ्यास केंद्राद्वारे यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विदयापीठास सादर केला.

या अभ्यासातून संशोधकाच्या असे लक्षात आले की, २०१० मधील खंड क्र. ४४ मध्ये ३५(१२.३६%) लेख प्रकाशित झाले आहे. लेखकांच्या उत्तरदायित्वानुसार अभ्यासातुन असे लक्षात आले की, एका लेखकाने लिहिलेल्या लेखांची संख्या ९३(३२.८६%), दोन लेखकांनी मिळून लेख लिहिण्याचे प्रमाण १२८(४५.२२%), तीन लेखकांनी मिळून लेख लिहिण्याचे प्रमाण ५४(१९.०८%) इतके आहे, तर तीन पेक्षा अधिक लेखकांनी मिळून लेख लिहिण्याचे प्रमाण ८(२.८२%) इतके आहे. भौगोलिक स्तरानुसार नियतकालिकाचे विश्लेषण केले असता असे लक्षात आले कि, सर्वाधिक लेख भारतातून २५८(९१.१६%)प्रकाशित झाले असून, त्या खालोखाल नायजेरीया ७(२.४७%), बांग्लादेश ५(१.७६%) लेख प्रकाशित झाले आहे. **(दळवी, २०१२)**

६. परब, संपदा. (२०१२) यांनी आरती या नियतकालिकाचे आशय विश्लेषण हा प्रकल्प डॉ. जी. ए. बुवा यांच्या मार्गदर्शनाखाली २०११-२०१२ या कालावधीत सादर केला.

आरती हे नियतकालिक मराठी साहित्य या विषयाशी निगडीत आहे. या नियतकालिकामध्ये कथा, कादंबरी, कविता या साहित्यास प्रामुख्याने प्राधान्य देण्यात आले आहे. प्रस्तुत कालावधिमध्ये एकूण ४०६ लेख प्रकाशित करण्यात आले. या मध्ये एकूण १५ विषयांवरती या नियतकालिकात विविध लेख प्रकाशित होतात, त्यापैकी ललित या विषयावर सर्वात जास्त लेख २०४(५०.२४%) प्रकाशित झालेले आढळून आले. तर सर्वात कमी स्मृती, भाषणे, वैचारिक या विषयावर प्रत्यकी १(०.२४%) इतकेच लेख प्रकाशित झालेले आढळुन आले. **(परब, २०१२)**

७. पावरा, एकलव्य (२०११) यांनी आंदोलन शास्वत विकासासाठी या नियतकालिकाचे आशय विश्लेषण हा प्रकल्प सादर केला.

या अभ्यासातून त्यांना संपादकीय, टिपण्णी, चर्चा, आस्वाद, व्यक्ती परिचय, वृत्तांत लेख, आघाडी, प्रतिसाद, जगभर खुला मंच, विशेष वेध, नवनिर्माण, परिपेक्ष्य, समाजचित्र, माध्यम, पुढील दिशा, शिक्षण वेध इ. घटकांचा अभ्यास केलेला आहे. त्याचप्रमाणे नियतकालिकामध्ये प्रकाशित झालेल्या लेखांची १८ घटकांमध्ये सूची तयार करण्यात आली आहे. या सूचीमध्ये सर्वात जास्त लेख हे टिपण्णी (१५२) या सदरामध्ये होते, तर सर्वात कमी ६ लेख माध्यम या सदरामध्ये प्रकाशित झालेले आढळुन आले. **(पावरा, २०११)**

८. पाटील, पुनम (२००९) यांनी जीवन शिक्षण नियतकालिकाचे आशय विश्लेषणात्मक अध्ययन हा प्रकल्प प्रा. मधुवंती भागवत यांच्या मार्गदर्शनाखाली कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, नवी मुंबई या केंद्राद्वारे यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विदयापीठास सादर केला.

त्यांनी जीवन शिक्षण या नियतकालिकाचा आशय विश्लेषणात्मक अभ्यास करणे, शैक्षणिकदृष्टया या नियतकालिकाची उपयुक्तता तपासणे, उपभोक्त्यांना त्यांच्या कार्यामध्ये अद्ययावत राहण्याच्या दृष्टीने उपयुक्तता तपासणे या घटकांचा अभ्यास केला.

त्यांच्या अभ्यासातून पुढील प्रमाणे निष्कर्ष मिळाले. या नियतकालिकामध्ये एकूण १० सदरे असून २००३ ते २००८ या कालावधीतील सदरामधील लेखांचा विचार केला असता आढळुन आले की, लेख या सदरामध्ये एकूण ७५५ लेखांपैकी ४४२ (५८.५४%) लेख प्रकाशित झाले

आहे, तर मनोगत या सदरामध्ये ५७(७.५४%) लेख प्रकाशित झाले आहे. आशयानुसार लेखांचे विश्लेषण तपासले असता संशोधकाच्या असे लक्षात आले की, या नियतकालिकामध्ये १३१(२९.६३%) लेख हे वर्णनात्मक आहे तर ११५(२३.०१%) लेख हे मार्गदर्शनात्मक स्वरुपाचे आहे. चरित्रात्मक लेखांचे प्रमाण सर्वात कमी ९(२.३%) इतके आहे. लेखकांच्या उत्तरदायित्वानुसार अभ्यास केला असता संशोधकाच्या असे लक्षात आले कि, एका लेखकाने लिहिलेले लेख ४१९(९७.२१%) इतके तर दोन लेखकांनी लिहिलेल्या लेखांचे प्रमाण १२(२.७८%) इतके आहे. **(पाटील, २००९)**

९. पाटील, सीमा (२०१०) यांनी युनिव्हरसीटी न्यूज या नियतकालिकाचे आशय विश्लेषण हा प्रकल्प प्रा. बी. आर. ठोके यांच्या मार्गदर्शनाखाली यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विदयापीठास सादर केला.

त्यांच्या अभ्यासात या नियतकालिकाचा ऐतिहासिक आढावा घेणे, या नियतकालिकातील प्रकाशित लेखांचे वर्षनिहाय विश्लेषण करणे, सदर नियतकालिकातील लेखांचे विषयवार विश्लेषण करणे, या नियतकालिकातील शैक्षणिक विषयावर प्रकाशित झालेल्या लेखांचा आढावा घेणे या घटकांचा समावेश केला होता.

सदर संशोधनात संशोधकाच्या असे लक्षात आले की, जानेवारी २००६ ते डिसेबंर २०१०या पाच वर्षाच्या कालावधित एकूण ८२२ लेख प्रकाशित झाले असून, त्यात २००९ मध्ये सर्वाधिक १९७(२३.९७%)लेख प्रकाशित झाले, तर २०१० मध्ये १८९ (२२.९९%) लेख प्रकाशित झाले आहे. सर्वात कमी २००७ आणि २००८ मध्ये प्रत्येकी १४४ (१७.५२ %) लेख प्रकाशित झाले आहे. लेखकांच्या उत्तरदायित्वानुसार विश्लेषण केले असता, असे लक्षात आले की, एकूण ५३९ लेखकांनी या नियतकालिकात लेख लिहिलेले असून त्यापैकी एका लेखकाने लिहिलेले २७५(५१%) लेख असून दोन लेखकांनी लिहिलेल्या लेखांची संख्या २२३(४१.४७%) इतकी आहे. विषयवार लेखांच्या सूचीचा अभ्यास केला असता, संशोधकाच्या असे लक्षात आले की, एकूण ८२२ लेखांपैकी २०१(२५.५४%) लेख हे उच्च शिक्षणावरती आहेत, तर शैक्षणिक पॉलिसी या विषयावर १३४(१६.३०%) लेख प्रकाशित झाले आहे. तर सर्वात कमी लेख विधि व कायदा या विषयावर मात्र ०३(०.३६%) लेख प्रकाशित झाले आले आहे. सदर संशोधनामध्ये लेखकांच्या प्रादेशीकतेनुसार विश्लेषण केले असता, संशोधकाच्या असे

लक्षात आले की, सर्वाधिक १४८ लेख दिल्ली, ३९ लेख मुबंई आणि तामिळनाडू मधील ३५ लेखकांनी लिहिलेले आहे. **(पाटील, २०१०)**

१०. पोरे, मेघा. (२०१२) यांनी लोकराज्य नियतकालिकाचा आशय विश्लेषणात्मक अभ्यास हा प्रकल्प प्रा. मंजिरी कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली रत्नागिरी जिल्हा ग्रंथालय संघ संचलित स्व. र. श. पारखी ग्रंथालय आणि माहितीशास्त्र अभ्यासकेंद्राद्वारे यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठास सादर केला होता.

त्यांनी या नियतकालिकातील समाविष्ट सदरांचा अभ्यास केला असता असे लक्षात आले की, संशोधकाने उल्लेख केलेल्या ७७६ लेखांपैकी सप्रेम नमस्कार या सदरातील लेखांची संख्या ४४(५.६७%) इतकी आहे, संपादकीय या सदरामध्ये लेखांची संख्या २५ असून त्याचे प्रमाण ३.२२% आहे. पाणिदार या सदरामध्ये फक्त ४(००.५२%) लेख आहे. सप्रेम नमस्कार या सदराचे विश्लेषण केले असता, असे लक्षात येते की, २००७ मध्ये ११(२५%) लेख प्रसिध्द करण्यात आले. तर २००८ मध्ये १० (२२०.७%) लेख प्रकाशित करण्यात आले. या नियतकालिकांच्या विशेषांकांचे वर्षनिहाय विश्लेषणावरुन असे लक्षात आले की, संशोधकाने उल्लेख केलेल्या विशेषांकापैकी २००७ आणि २००८ या दोन वर्षात विशेषांक प्रकाशित करण्यात आलेले नाही. २००९ मध्ये एकूण ४(३०.७७%) विशेषांक प्रकाशित करण्यात आले आहे तर २०१० मध्ये (७.६९%) विशेषांक प्रकाशित झालेले आहे. **(पोरे, २०१२)**

११. बनप, मैथिली (२०११) यांनी बळीराजा नियतकालिकाचा आशय विश्लेषणात्मक अभ्यास हा प्रकल्प प्रा. घरडे यांच्या मार्गदर्शनाखाली रत्नागिरी जिल्हा ग्रंथालय संघ संचलित, स्व. र. श. पारखी ग्रंथालय आणि माहितीशास्त्र पदवी व पदव्युत्तर अभ्यासकेंद्र, रत्नागिरी या अभ्यासकेंद्राद्वारे यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठास सादर केला.

या अभ्यासातून बळीराजा मासिकाचे संपादकीय, फलोत्पादन, किफायतशीर लागवड, परीक्षा पध्दती, पिकांची सुधारित लागवड, पिकांवरील आळया, सुधारित तंत्रज्ञानाने पिकांची लागवड इ. महत्त्वांच्या विषयावर माहितीपूर्ण लेख या घटकावर प्रकाश टाकला आहे. कृषी विषयक वाचन संस्कृती रुजवावी या हेतूने या नियतकालिकामध्ये विविध लेख प्रकाशित होतात. तसेच केवळ शेती हाच विषय या नियतकालिकात नसून, ग्रामीण ग्रंथालय, राष्ट्रीयकृत बँकांचे मार्जिनसह शेतकऱ्यांच्या महत्त्वाच्या विषयांचाही या मासिकांमध्ये समावेश केला जातो

बळीराजा हा अंक शेतकरी, विद्यार्थी व पालक यांनी सहज उपलब्ध व्हावा यासाठी या अंकाच्या वार्षिक वर्गणीमध्ये सवलत दिली जाते. तसेच बळीराजा हे नियतकालिक मूलभूत कृषीतंत्राचा पाया समजला जावा एवढा महत्वाचा आहे, कारण यातून शेती क्षेत्रातील विविध घडामोडी, आधुनिक बदल यावर ठळक निष्कर्ष दिले आहे. **(बनप, २०११)**

१२. भामरे, वैशाली (२००९) यांनी भारतीय इतिहास आणि संस्कृती या नियतकालिकाचे आशय विश्लेषण हा प्रकल्प प्रा. एन. बी. कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली सादर केला.

या अभ्यासात त्यांच्या असे लक्षात आले की, भारतीय इतिहास आणि संस्कृती या नियतकालिकात इतर नियतकालिकाप्रमाणे नियमित सदरे नसून संपादकीय, ऐतिहासिक लेख, सांस्कृतिक लेख, चरित्रात्मक लेख, ग्रंथपरीक्षणे, परिषद/अधिवेशन वृत्तांत, वार्षिक अहवाल यासारखी नवीन सदरे आढळून येतात. ऐतिहासिक लेख व सांस्कृतिक लेख या दोन सदरांमधील लेखांची संख्या सर्वाधिक आहे व ते प्रमाण अनुक्रमे ५१.८८% व १२.१३% इतके आहे. या नियतकालिकातील लेखांच्या लेखकांची वैशिष्टये जाणून घेतल्यानंतर असे आढळून आले की, स्त्री लेखकांपेक्षा पुरुष लेखकांची संख्या जास्त आहे असे निर्देशनास आले. त्याचप्रमाणे लेखांच्या शेवटी दिलेल्या उध्दरणांचा संख्यात्मक आढावा घेतल्यावर असे आढळून आले की, उध्दरणाची संख्या सरासरी ५३ इतकी आहे. **(भामरे, २००९)**

१३. राशिवाडे, बाळू (२०१२) यांनी ऋग्वेद या नियतकालिकाचे आशय विश्लेषण हा प्रकल्प प्रा. सौ. सी. जी. कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली श्रीराम वाचन मंदीर, सावंतवाडी या अभ्यास केंद्राद्वारे यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठास सादर केला.

त्यांनी या नियतकालिकाची ऐतिहासिक पार्श्वभूमी जाणून घेणे, विविध सदरांचा आढावा घेणे, आशय विश्लेषणावर आधारित नियतकालिकेतील साहित्य प्रकाराचा प्राधान्यक्रम निश्चित करणे, या नियतकालिकातील लेखांची विषयवार सूची तयार करणे ही उद्दीष्टे निश्तित केली होती.

वरील उ-ि ष्टांना अनुसरुन अभ्यास केला असता पुढील प्रमाणे निष्कर्ष प्राप्त झाले. या नियतकालिकामध्ये सर्वात जास्त लेखन ३६४ (३५.२७ %) ललित वाङ्मय या विषयावर आहे, सर्वात कमी लेख शासन निर्णय (३१.३%) या सदरावर देण्यात आले आहे. या नियतकालिकामध्ये शासन निर्णय या सदरामध्ये शासनाची शैक्षणिक क्षेत्राशी निगडीत परिपत्रके प्रसिध्द करण्यात आली आहे. त्याचे प्रमाण ३१(३%) इतके आहे. **(राशिवाडे, २०१२)**

## २.८ संदर्भ साहित्याचा आढावा

१. Kothari, C. R., (2013) यांनी Research Methodology: Methods and Techniques हा ग्रंथ लिहिला. हा ग्रंथ एकूण पंधरा भागांमध्ये विभागला आहे.

या ग्रंथामध्ये आशय विश्लेषणाचा थोडक्यात इतिहास, व्याख्या आणि कार्यपध्दती याबाबतची महत्वपूर्ण माहिती दिलेली आहे. संशोधनामध्ये आशय विश्लेषणाचे महत्व आणि स्वरूप याविषयीची माहिती दिलेली आहे. **(Kothari, 2013)**

२. Krippendorff, Klaus (2013) यांनी Content Analysis: An Introduction to its Methodology या गंथात तीन विभागांमध्ये १४ प्रकरणांचा समावेश आहे.

पहिल्या विभागामध्ये संकल्पनात्मक आशय विश्लेषण याबाबत माहिती दिलेली आहे. यात आशय विश्लेषणाचा इतिहास, आशय विश्लेषणाचा इतिहास आणि विकास, आशय विश्लेषणाचे सामान्यिकरण, आशय विश्लेषणाचे गुणात्मक महत्व याबाबतची माहिती दिलेली आहे.

दुसऱ्या विभागामध्ये Components of Content Analysis हा घटक असून यात आशय विश्लेषणाचे घटक, आशय विश्लेषणाचे गुणात्मक व संख्यात्मक आशय विश्लेषण, Design Preparatory of Content Analysis, Designs Exceeding Content Analysis, Unitizing, Sampling, Recording, Coding, Data Language हया घटकाविषयी माहिती आढळुन येते. तर तिसऱ्या घटकात Analytical / Reprentational Techniques Computer Aids, Reliability, Validity या घटकांची माहिती दिली आहे.

हा ग्रंथ एकूण ४४० पानांचा असून आशय विश्लेषण या विषयात रुची असणाऱ्या वाचकांसाठी तो अतिशय उपयुक्त असा ग्रंथ आहे. **(Krippendorff, 2013)**

३. Kumar, Ranjit (2011 ) यांनी Researh Methodology: A step by step guide for beginners हा ग्रंथ लिहिला. हा ग्रंथ एकूण आठ भागां मध्ये विभागला आहे.

या ग्रंथामध्ये गुणात्मक विश्लेषणाबाबतची माहिती दिलेली आहे. गुणात्मक विश्लेषणामध्ये माहितीची प्रक्रिया कशी होते याबाबतची माहिती आढळुन येते. तसेच आशय विश्लेषणाचे घटक, आशय विश्लेषणाची प्रक्रिया, आशय विश्लेषणाचे संशोधनात्मक महत्व या विषयी या ग्रंथात माहिती दिलेली आहे. **(Kumar, 2011 )**

४. Neuendorf, Kimberly (2002) यांनी The Content Analysis Guidebook हा ग्रंथ एकूण ५ घटकांमध्ये विभागला आहे.

पहिल्या घटकामध्ये आशय विश्लेषण म्हणजे काय, आशय विश्लेषणाचे महत्त्व, आशय विश्लेषण हे तंत्र वापरण्यास कसे सोपे आहे, आशय विश्लेषणाचे प्रकार याबाबतची प्रश्नांच्या आधारावर माहिती दिली आहे. तसेच आशय विश्लेषण हे तंत्र सर्व विषयांमध्ये कमी अधिक वापरणे कसे उपयुक्त आहे. याबाबतची माहिती दिली आहे. दुसऱ्या विभागात आशय विश्लेषणाचा इतिहास, आशय विश्लेषणाची उपलब्धी आणि आशय विश्लेषणाचा विकास कशा प्रकारे झाला याबाबतची माहिती दिली आहे. तसेच आशय विश्लेषणाच्या व्याख्या देवून पायऱ्या स्पष्ट केल्या आहे. आशयाची नोंदणी करण्यासाठी चले आणि चिन्हे कशी निश्चित करावीत याबाबत मार्गदर्शन या ग्रंथात केले आहे.

हा ग्रंथ एकूण ३०० पानांचा असून आशय विश्लेषणाचा अभ्यास करणाऱ्या उपभोक्त्यांसाठी अतिशय उपयुक्त आहे. **(Neuendorf, 2002)**

५. Schreier, Margrit (2012) यांनी Qualitative Content Analysis in Practice हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथात एकूण १२ प्रकरणे दिली आहे.

पहिल्या प्रकरणामध्ये गुणवत्तापुर्ण आशय विश्लेषणाचे वैशिष्टे, आशय विश्लेषणाच्या पायऱ्या, गुणवत्तापुर्ण आशय विश्लेषणाचा सामाजिक शास्त्रात वापर, आशय विश्लेषणाचा विकास, या घटकांचा अभ्यास केला आहे. तर दुसऱ्या प्रकरणामध्ये गुणवत्तापूर्ण आशय विश्लेषण संशोधनासाठी उपयुक्त पध्दती, कशी आहे, तसेच हि पध्दती अतिशय लवचिक असल्याने गुणवत्तापूर्ण संशोधनात कशी उपयुक्त आहे हे सांगितले आहे.

गुणवत्तापूर्ण संशोधनात कोडींग फ्रेम म्हणजे काय, Coding Frame Structure चा वापर कसा करावा याबाबत माहिती दिली आहे. तसेच आशय विश्लेषणाचे स्तर श्रेणी याबाबत या प्रकरणात माहिती दिली आहे.

इतर प्रकरणांमध्ये कोडींग फ्रेमची रचना, वापरण्याची पध्दती, कोडींग युनिटची घटक या बाबतची माहिती दिली आहे. विश्लेषणातून प्राप्त झालेल्या माहितीचे मांडणी करण्याची पध्दती सांगितलेली आहे. तसेच आशय विश्लेषणामध्ये वापरले जाणारे सॉफ्टवेअरची उपयुक्त माहिती या ग्रंथात दिलेली आहे.

हा ग्रंथ गुणवत्तापूर्ण आशय विश्लेषण या विषयासाठी अतिशय उपयुक्त असा ग्रंथ आहे. हा ग्रंथ २७२ पानांचा असून या ग्रंथाची रचना देखील पध्दतशीर केलेली आहे. Qualitative Content Analysis चा उपयोग प्रत्यक्ष व्यवहारात कसा करावा यासाठी या विषयाच्या उपभोक्त्यांना अतिशय महत्वपूर्ण ग्रंथ आहे. **(Schrieiser, 2012)**

६. Weber, Robert (1990) यांनी Basic Content Analysis हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथात एकूण ४ प्रकरणे दिली आहेत.

या ग्रंथामध्ये प्रस्तावना या विभागामध्ये आशय विश्लेषण या विषयावर झालेले काही अभ्यास, आशय विश्लेषणाचे प्रकार, फायदे, अडचणी आणि महत्वपूर्ण घटकांबाबतची माहिती दिली आहे. दुसऱ्या विभागामध्ये आशयाचे क्लासिफिकेशन आणि इंटरप्रिटेशन याबाबतची सविस्तर माहिती दिली आहे.

तर या ग्रंथाच्या तिसऱ्या घटकामध्ये आशय विश्लेषणाच्या तंत्राबाबत माहिती दिली आहे. यात वाचनसाहित्याची निवड आणि नमुना पध्दत, Text Encoding, Key Word in Context, Measurement Models या वरती विस्तृत माहिती दिलेली आहे. तर या ग्रंथाच्या चौथ्या भागात Measurement Indication, Representation, Concluding remarks आणि Suggetions याबाबतची माहिती पध्दतशीरपणे दिली आहे.

हा ग्रंथ एकूण ९५ पृष्ठांचा असून आशय विश्लेषण या विषयासाठी महत्त्वपूर्ण संदर्भग्रंथ आहे. (**Weber, 1990)**

७. आगलावे, प्रदीप (२०१०) यांनी लिहिलेल्या सामाजिक संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्रे या ग्रंथात एकूण ३१ प्रकरणे, असून प्रकरण २१ मध्ये आशय विश्लेषण या बाबतची माहिती दिलेली आहे.

या घटकामध्ये आशय विश्लेषणाचा इतिहास, आशय विश्लेषणाचा अर्थ, व्याख्या आणि आशय विश्लेषणाचे वैशिष्टे या घटकांची माहिती दिलेली आहे. तसेच आशय विश्लेषण तंत्राची उि-ष्टे याबाबतची माहिती मिळते. शब्द, वाक्य आणि परिच्छेद, पात्रे, भाग, स्थान आणि काळाचे मापन हया आशय विश्लेषणाच्या एककाचा उल्लेख यात आढळतो.

आशय विश्लेषणाच्या विविध पायऱ्या जसे, विषयाशी संबंधित तथ्यांची निवड, अध्ययन, एककाची निवड, आशयांचे वर्गांचे विभाजन, वर्गांचे परीक्षण, पध्दतीचा योग्य उपयोग, अध्ययनाची रुपरेषा तयार करणे, आणि आशयाच्या एककाचे मापण करणे यांचा सविस्तर अभ्यास

केलेला आहे. तसेच या भागामध्ये आशय विश्लेषण तंत्राचे महत्त्व आणि या तंत्रात येणाऱ्या अडचणी याबाबत देखील अभ्यास या ग्रंथात केलेला आढळतो. हा ग्रंथ ५८२ पानांचा असून आशय विश्लेषणाबाबत अतिशय उपयुक्त माहिती या ग्रंथात दिलेली आहे. **(आगलावे, २०१०)**

८. कऱ्हाडे, बी. एम. (२०११) यांनी समाजशास्त्रीय संशोधन पध्दती हा ग्रंथ लिहिला. हा ग्रंथ एकुण २९ प्रकरणांचा असून यामध्ये शास्त्रीय संशोधन पध्दती, परंपरांगत संशोधन पध्दती, सामाजिक संशोधन पध्दती, सामाजिक संशोधनातील समस्या सूत्रण, गृहीतके, संशोधन आराखडा, संशोधनाच्या विविध पध्दती याबाबत स्वंतत्र घटकांमध्ये माहिती दिली आहे.

शास्त्रीय संशोधन पध्दती या ग्रंथात इतर घटकांबरोबरच आशय विश्लेषण या विषयाची सविस्तर माहिती दिलेली आहे. यामध्ये आशय विश्लेषण म्हणजे काय, आशय विश्लेषणाचा इतिहास, आशय विश्लेषणाच्या व्याख्या, आशय विश्लेषणाची वैशिष्ट्ये आणि पाय-या घटकांची माहिती दिलेली आहे. तसेच आशय विश्लेषणाची प्रक्रिया, आशय विश्लेषणाची वस्तुनिष्ठता, आशय विश्लेषणातील नवीन प्रवाह आणि आशय विश्लेषणाच्या गुण- दोषांची चर्चा या घटकात केलेली आहे.

हा ग्रंथ संशोधनासंबधीत माहितीसाठी उपयुक्त आहे, तसाच आशय विश्लेषणाबाबतही महत्वपूर्ण माहिती या ग्रंथातून प्राप्त होते. **(कऱ्हाडे, २०११)**

९. कायंदे- पाटील, गंगाधर (२००५) यांनी संशोधन पध्दती हा ग्रंथ लिहिला. हा ग्रंथ एकूण ८ भागांमध्ये विभागला आहे. हा ग्रंथ एकूण ९ भागांमध्ये विभागला असून पहिल्या भागामध्ये संशोधनातील मूलभूत बाबीबद्दल विवेचन दिले आहे. यामध्ये शास्त्र आणि संशोधन, सामाजिक संशोधन,संशोधकाचे गुण यांचा समावेश केला आहे.

दूसऱ्या भागामध्ये संशोधन पध्दतीचे मूलभूत घटक याबाबतची माहिती दिली आहे. यात संशोधन आराखडा, संशोधन समस्या, संशोधनातील संकल्पना तथ्य आणि सिध्दांत आणि गृहीतके यांची माहिती दिली आहे. तीसऱ्या भागामध्ये तथ्य आणि माहितीचे संकलन या घटकांचा समावेश केला आहे. भाग चारमध्ये संशोधनातील तंत्रे या घटकाचा समावेश केला आहे.  या घटकामध्ये नमुना निवड, प्रक्षेपण, मापन या घटकांबरोबरच आशय विश्लेषण या तंत्राची माहिती दिली आहे.

आशय विश्लेषण या घटकामध्ये आशय विश्लेषणाचा इतिहास, वैशिष्ट्ये, आशय विश्लेषणाचे घटक, आशय विश्लेषणाच्या पायऱ्या, आशय विश्लेषणाचे महत्व आणि प्रक्रिया या घटकांचा ऊहापोह करण्यात आला आहे. **(कायंदे-पाटील, २००५)**

१०. कुंभार, राजेंद्र (2013) यांनी ग्रंथालय आणि माहितीशास्त्र संशोधन हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथात त्यांनी एकूण १७ प्रकरणे दिलेली आहेत.

ग्रंथालय आणि माहितीशास्त्र संशोधन या ग्रंथामध्ये प्रकरण १० वे मध्ये आशय विश्लेषण ह्या तंत्राची माहिती लेखकाने दिली आहे. यात आशय विश्लेषण म्हणजे काय? हे स्पष्ट करुन आशय विश्लेषणाच्या व्याख्या दिल्या आहेत. तसेच आशय विश्लेषणाच्या विविध पायऱ्या, जसे समस्या निर्धारण, पूर्वानुमान मांडणे, विश्लेषणाचे एकक ठरविणे, नमुना निवड, चल आणि चिन्हे निश्चित करणे याबाबतची माहिती दिली आहे.

तसेच यात वारंवारिता, विचारांची दिशा, तीव्रता, आशयाचे आकारमान या वैशिष्टयांची देखील थोडक्यात माहिती दिली आहे. आशय विश्लेषणाचे फायदे आणि आशय विश्लेषणात येणाऱ्या अडचणींची थोडक्यात चर्चा केलेली आहे. ग्रंथालय आणि माहितीशास्त्र हा विषय मराठी माध्यमातून अभ्यासणा-या संशोधकासाठी हा ग्रंथ अतिशय उपयुक्त आहे. **(कुंभार, २०१३)**

११. घाटोळे, रा. (२०१०) यांनी समाजशास्त्रीय संशोधन - तत्त्वे व पध्दती हा ग्रंथ लिहिला. हा ग्रंथ एकूण २४ घटकांचा असून यामध्ये शाास्त्र आणि संशोधन, संशोधन व सर्वेक्षण, संशोधन समस्येचे सूत्रीकरण, मुलाखत, प्रश्नावली, अनुसूची, नमुना निवडीचे तंत्र, मापनविषयक समस्या, अनुमापन तंत्रे, समाजमिती, प्रक्षेपण तंत्रे, संशोधन अहवाल सिध्दांत आणि संशोधन या घटकांचा सखोल अभ्यास केलेला आहे.

या ग्रंथात आशय विश्लेषणाचे तंत्र हा स्वंतत्र घटकाचा समावेश केलेला असून या घटकात आशय विश्लेषणाचे स्वरुप व अर्थ, आशय विश्लेषणाच्या व्याख्या, आशय विश्लेषणाचे एकक कोणते याची माहिती दिली आहे. तथ्यांची निवड, एककाची निवड, श्रेणी विभाजन, श्रेणींचे परीक्षण, अध्ययनाची रूपरेषा, एककाचे मापन या आशय विश्लेषणाच्या पायऱ्यांची थोडक्यात माहिती दिली आहे. तसेच आशय विश्लेषणाचे महत्व व आशय विश्लेषणाच्या मर्यादा या विषयी माहिती या ग्रंथात दिलेली आहे. **(घाटोळे, २०१०)**

१२. पाटील, वा. भा. (२०१२) यांनी संशोधन पध्दती हा ग्रंथ लिहिला. हा ग्रंथ एकूण ३६ भागांमध्ये विभागला आहे. संशोधनाचे प्रकार, शास्त्रीय संशोधन, सामाजिक संशोधन आणि संशोधन, सर्वेक्षण पध्दती, नमुना पध्दती यांचा सखोल अभ्यास केला आहे.

या ग्रंथाच्या २७ व्या भागामध्ये आशय विश्लेषण हा स्वंतत्र घटक केलेला आहे. यामध्ये आशय विश्लेषणाचा अर्थ, व्याख्या, आशय विश्लेषणाचे स्वरूप, वैशिष्टे, आशय विश्लेषणाचे घटक, आशय विश्लेषणाच्या पायऱ्या, आशय विश्लेषणाच्या पूर्व अटी, विश्लेषण प्रक्रियेतील अटी, टप्पे, सिध्दांत निर्मिती, सामान्यीकरण, तथ्यांचे संकेतीकरण, तथ्यांचे सांख्यिकी विश्लेषण, आशय विश्लेषणाच्या मर्यादा, आशय विश्लेषणाचे गुणात्मक महत्व या घटकांची विस्तृत माहिती या ग्रंथात आढळते. **(पाटील, २०१२)**

१३. बोधनकर, सुधीर., अलोणी, विवेक आणि कुळकर्णी, मृणाली (२०११) यांनी सामाजिक संशोधन पध्दती हा ग्रंथ लिहिला असून त्यामध्ये एकूण २८ घटकांचा समावेश केलेला आहे. यामध्ये वैज्ञानिक पध्दती आणि संशोधन, सामाजिक संशोधन, सामाजिक संशोधनातील वस्तुनिष्ठतेची समस्या, संशोधन प्रक्रिया, संशोधन आराखडा, संशोधन अहवाल या घटकांचा उहापोह केला आहे. तसेच आशय विश्लेषण तंत्र या विषयावर स्वंतत्र घटकात परिपूर्ण माहिती दिली आहे.

या ग्रंथामध्ये मध्ये आशय विश्लेषणाचा अर्थ आणि स्वरुप, सामाजिक संशोधनात त्याचा वापर कसा केला जातो, आशय विश्लेषण पध्दतीची प्रमुख वैशिष्टे, आशय विश्लेषण तंत्राची उद्दिष्टे, आशय विश्लेषणाचे एकक, आशय विश्लेषणाची प्रक्रिया, आशय विश्लेषणाचे महत्व व उपयुक्तता आणि आशय विश्लेषण तंत्राच्या मर्यादा या घटकांची सविस्तर आणि परीपूर्ण माहिती दिलेली आहे. **(बोधनकर, अलोणी आणि कुळकर्णी, २०११)**

१४. रिसवडकर, म. रा. (२०१२) यांनी संशोधन: व्याख्या आणि पध्दती हा ग्रंथ यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या एम. लिब. शिक्षणक्रमासाठी लिहिला.

या ग्रंथात आशय विश्लेषणाचा अर्थ उदाहरणासह स्पष्ट केला आहे. आशय विश्लेषणाचा उद्देश, ग्रंथालय आणि माहितीशास्त्रात आशय विश्लेषणाचा वापर कसा प्रभावीपणे करता येईल याबाबतची माहिती उदाहरणासहीत समजावून दिली आहे. ग्रंथालय आणि माहितीशास्त्रात कोणत्या

कामांमध्ये आशय विश्लेषण उपयुक्त ठरते याबाबत उपयुक्त माहिती या घटकातून प्राप्त होते. **(रिसवडकर, २०१२)**

## २.९ नियतकालिकातील लेखांचा आढावा

१. Awojobi, E. A. and Adeokun, O. (2012) यांनी Content Analysis of Agricultural Issues Reported in Two Nigerian Daily Newspapers या लेखामध्ये नायजेरीयामध्ये प्रकाशित होणाऱ्या पंच (Punch) व गार्डियन (Gardian) या दैनिकामध्ये कृषी विषयक बातम्या किती प्रमाणात माहितीचे प्रसारण होते या बाबतचा अभ्यास आशय विश्लेषण हे तंत्र वापरून केला आहे.

या संशोधनासाठी २००७ ते २०१० या वर्षातील दररोजच्या दैनिकांमध्ये नमुना म्हणून निवड करण्यात आली. यात संशोधकाच्या निदर्शनात आले कि, अनुक्रमे ७०%, ७८.८%, ६६.३%, ६०% दैनिकामध्ये कोणत्याही प्रकारची कृषी विषयक माहिती २००७ ते २०१०या कालावधीमध्ये देण्यात आलेली नाही. बहुतेकरुन १ ते २ बातम्या दर दिवसाला प्रातिनिधिक स्वरुपात दिलेल्या आढळुन आल्या. दैनिकाच्या मुख्य रकान्यामध्ये अनुक्रमे २७.४३%, १०.७७%, ३५.८९% आणि २७.५२% अनुक्रमे २००७, २००८, २००९ आणि २०१० या वर्षामध्ये बातमी छापून आलेल्या होत्या असे आढळुन आले आहे. लेखकाच्या मते या नियतकालिकाद्वारे शेतीविषयक माहितीचे प्रसारण वाढवीण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करणे आवश्यक आहे. तसेच शेतीविषयक नावीन माहिती गरजुंपर्यंत पोहचविण्यासाठी या नियतकालिकांनी प्रयत्न केले पाहीजे. (**Awojobi, 2012**)

२. Blancher, Adam T., Bubltz, Walter C. आणि Soper, Barlow (2010) यांनी Content Analysis of the Journal of Counseling and development Volume 74 - 84 हा लेख लिहिला. या लेखामध्ये Journal of Counseling and Development या नियतकालिकाच्या ७४ (१९९६) ते ८४ (२००६) या अंकांचे आशय विश्लेषण केले आहे.

७४ ते ८४ या अंकामध्ये एकूण ६२७ लेख प्रकाशित झालेले असून त्यापैकी २०२(३२%) लेख हे Empirical आणि ४२५(६८%) हे Nonempirical होते. या

नियतकालिकातील नमुद केलेल्या कालावधीत ७४ आणि खंड ७५मध्ये सरासरी १७.७९% लेख प्रकाशित झाले आहे. यातील महत्वाची बाब म्हणजे अंक ७४ आणि ७५ हे द्वैमासिक (Bi-monthly) प्रकाशित झाले होते. तर अंक ७६ ते ८४ या अंकात १४.८७% लेख प्रकाशित झाले. हे अंक त्रैमासिक (Quarterly) प्रकाशित झाले आहे. ७४ आणि ७५ या द्वैमासिक अंकामध्ये सरासरी ५६२ पाने (Peges) होते तर ७६ ते ८४ या त्रैमासिक अंकामध्ये सरासरी ५१० पाने होती. या अभ्यासामध्ये लेखकांच्या असे लक्षात आले कि, ७६ ते ८४ या अंकामध्ये लेख प्रकाशित होण्याचे प्रमाण व सरासरी पानांची संख्या २४.०८ टक्कयांनी कमी झालेली होती.

या अंकाचे आशय विश्लेषण करतांना अभ्यासकाच्या लक्षात आले की, या अंकांमध्ये मागील घटकांचा अभ्यास करुन त्यात नव्याने बदल केलेले आहे. या अभ्यासामध्ये रेटींग सिस्टिमचा वापर केलेला असल्याने बहुतेक माहिती हि गृहीत धरलेली आहे. या नियतकालिकातील महत्त्वपूर्ण माहितीमुळे या क्षेत्रातील होणारे बदल, घटना, घडामोडी याबाबत माहिती मिळते. या नियतकालिकांमुळे वाचकांच्या गरजा पूर्ण उददीष्टे साध्य केले जाते. **(Blancher, 2010)**

३. Cardenas, Celia Mireles (2013) यांनी Libraries and Information Services and the Content Analysis Method in Scientific Literature Produced in the Areas of Librarianship and Information Sciences in Mexico हा लेख लिहिला. या लेखात मेक्सिको या देशातील ग्रंथालय आणि माहितीशास्त्रात आशय विश्लेषण पध्दती वापरुन पदव्युत्तर प्रबंध कसे लिहिले आहे याचा अभ्यास केला आहे.

त्यासाठी लेखकाने मेक्सीको या देशातील ग्रंथपालन शास्त्राचा अभ्यास केला. त्यातून लेखकाच्या असे लक्षात आले की , ६ ग्रंथपालन शाळा ह्या बॅचलर डिग्री ऑफ लायब्ररीयनशीपचा अभ्यासक्रम चालवितात त्यामधील तीन ग्रंथपालन शाळा ह्या ग्रंथपालन विषयाच्या गरजा भागवितात. जसे, विषयाचे नाव, उदिदष्टे, अभ्यासक्रम, शैक्षणिक दृष्टीकोन इ. हया लेखांमधून लेखकांना असे निदर्शनास आले की, सदरच्या अभ्यासाठी सैध्दांतिक अभ्यासक्रम वाढविण्याची आवश्यकता आहे. **(Cardenas, 2013)**

४. Chu, Hetaing (2006) यांनी Curricula of LIS Programs in the USA: A Content Analysis हा लेख लिहीला. या लेखात २७५७ अभ्यासक्रमांधील ४५ अमेरिकन लायब्ररी असोसीएशन

संलग्नित अभ्यासक्रमांचा सांख्यिकीय आणि गुणात्मक अभ्यास केला. ४५ लायब्ररी सायन्स कोर्सेस पैकी फक्त सात विषय हे इंटर्नशिप व प्रात्यक्षिक विषयाशी संबंधित आहेत.

या अभ्यासात २७५७ कोर्सेसपैकी १०% कोर्सेस हे नवीन व प्रचलित माहितीशी संबंधित आहे तर काही आधिचेच कोर्सेस हे थोडेफार बदल करुन नव्याने सादर केले आहे. ग्रंथालयशास्त्राच्या अभ्यासक्रमामध्ये इंटरनेट, वेब हे घटक महत्त्वाचे असून त्यामध्ये नवीन तंत्रज्ञानाशी संबंधित घटक हे अभ्यासक्रमाध्ये आवश्यक असल्याचे संशोधकाने म्हटले आहे. **(Chu, 2006)**

५. Chu, Heting (2015) यांनी Research Methods in Library and Information Science: A Content Analysis हा लेख लिहीला. यासाठी Journal of Documentation (JDoc), Journal of American Society for Information Science and Technology (JASIS & T) and Library and Information Science Research (LISR) तीन नियतकालिकांचा अभ्यास केला. त्यासाठी २००१ ते २०१० या कालावधीतील ग्रंथालय व माहितीशास्त्र या विषयातील तीन महत्वाच्या नियतकालिकामधील ११६२ संशोधनात्मक लेखांचे गुणात्मक आणि संख्यात्मक विश्लेषण केले आहे. या अभ्यासातून असेही लक्षात आले की ग्रंथालय व माहितीशास्त्र या विषयातील संशोधक हे प्रश्नावली, सर्वेक्षण, ऐतिहासिक संशोधन पध्दती यापेक्षाही आशय विश्लेषण या तंत्राचा संशोधनामध्ये अधिक वापर करत आहे. **(Chu, 2015)**

६. Davies, Karen (2012) यांनी Content Analysis of Research Articles in Information Systems (LIS) Journals हा लेख लिहिला. या लेखात लेखकाने माहिती उत्पत्ती व संग्रहन पध्दतीबाबत पुढील तीन रिसर्च नियतकालिकांचा अभ्यास केला त्यामध्ये Information Systems Research (ISR), Journal of the American Medical Informatics Association (JAMIA) आणि MIS Quarterly यांचा २००५ आणि २००७ या कालावधीचा अभ्यास केला आहे.

अभ्यासकाच्या मते ९०% लेख हे एकापेक्षा अधिक लेखकांनी लिहिलेले आहे. माहिती संग्रहणासाठी शीटचा वापर केला होता. या नियतकालिकांमध्ये बहुसंख्य लेख हे एका पेक्षा अधिक लेखकांनी मिळून लिहिलेले आहे. वरील तीनही नियतकालिके युएसए मध्ये प्रकाशित होतात आणि ८५% प्रथम लेखक उत्तर अमेरिकेतील आहे. या नियतकालिकांमध्ये २३७ लेखांचा समावेश आहे. त्यातील ५६ ISR मधील, ११६ JAMIA या नियतकालिकातील आहे. तसेच त्यांना असे

आढळुन आले की, वरील प्रकाशित झालेले लेख ८% MISQ मधील, ४% ISR तर JAMIA मध्ये एकही लेख एका लेखकाने लिहिलेला नाही. या नियतकालिकाच्या विश्लेषणासाठी गुणात्मक आणि संख्यात्मक विश्लेषण तंत्राचा वापर केला आहे. या अभ्यासात फक्त top तीन ISI Ranked Journals चा अभ्यास केलेला आहे. **(Davies, 2012)**

७. Feeney, Mary (2005) यांनी Who uses International News Papers? A Content Analysis of Dissertations and Theses या लेखामध्ये लेखकाने प्रबंधाच्या आशय विश्लेषणामध्ये कोणते वाचक हा न्यूज पेपर वाचतात, कोणत्या कालावधित हा न्यूज पेपर अधिक वापरतात, ह्या न्यूज पेपरचे वैशिष्टे कोणते, या न्यूजपेपर मधील आशयाचे संशोधनाच्या दृष्टीने किती वापर होतो याचा अभ्यास केला आहे.

या अभ्यासात असे दिसून आले की, पदवीधर विदयार्थी आणि संशोधक हे यु. एस. ए. आणि बाहेरील देशात प्रकाशित होणारे वर्तमानपत्रे याचा अधिक वापर करतात. लेखकाने सदर संशोधनासाठी रॅण्डम पध्दतीने ३२१ डॉक्युमेंटची सँम्पल म्हणुन निवड केली. त्यापैकी त्याविषयाशी संबंधित २६२ डॉक्युमेंट मिळून आली. या २६२ डॉक्युमेंटपैकी १७६(६७%) डॉक्युमेंट हे यु. एस. न्यूजपेपर मधील तर ६०(२३%) डॉक्युमेंट यु. एस. बाहेरील होते. २५(१०%) न्यूजपेपर हे यु. एस. आणि यु. एस. बाहेरील सोडून होते.

या अभ्यासाठी त्यांनी २००० ते २००८ आणि १९४९ ते १९९९, तर चढत्या क्रमाने १९०० ते १९४९, १८५० ते १८९९, १८०० ते १८४९, १७५० ते १७९९ आणि १७०० ते १७४९ च्या प्रबंधाचा वापर केला आहे. लेखकाने आपल्या लेखातून इंटरनॅशनल न्यूजपेपर हे ग्रंथालयाच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे असल्याचे म्हटले आहे. **(Feeney, 2005)**

८. Fiskin, R. आणि Nas, S. (2013) यांनी A Content Analysis of the International Jouranal on Marine Navigation and Safety of Sea Transportation from 2007 to 2012 या लेखात समुद्रातील माल वाहातुकीची सुरक्षितता या विषयावरती लेख प्रकाशित केला.

या अभ्यासासाठी २००७ ते २०१२ या या ६ वर्षाच्या कालावधिची निवड केली होती. या ६वर्षाच्या २४ अंकामधील ४०१ लेखांचे या लेखात आशय विश्लेषण केले आहे. संशोधकाच्या मते २०१२ मध्ये सर्वाधिक ७४ लेख लिहिले असून त्या खालोखाल २०११ मध्ये ६८ लेख लिहिले आहे. पोंलड देशातील लेखकांनी सर्वाधिक ८८.८१% लेख लिहिले आहे

तसेच एम मागोरामो यांनी सर्वाधिक ७ लेख लिहिले आहे. लेखकाच्या दायित्वानुसार अभ्यास केला असता असे आढळून आले की,१४८ (३६.९%) लेख हे एका लेखकाने लिहिले आहे तर २८.४% लेख हे दोन लेखकांनी मिळून लिहिले आहे. या अभ्यासात असेही लक्षात आले की हे नियतकालिक संशोधनात्मक अभ्यासासाठी हे संशोधकासाठी उपयुक्त आहे.तसेच या नियतकालीकात Safety and security in Sea Transportation या विषयांवर अधिक लेख प्रकाशित होत असतात. **(Fiskin, 2013)**

९. Fteimi Nora आणि Lehner, Franz (2015) यांनी Main Research Topic in Knowledge Management: A Content Analysis of ECKM Publication हा लेख लिहीला. या नियतकालिकामध्ये Knowledge Management या विषयावर संकल्पनात्मक, संशोधनात्मक, मूळ विषयावर लेख प्रकाशित केले जातात. या लेखाचा मूळ उद्देश हा European Conference on Knowledge Management या प्रोसिंडिंग मधील ७५५ लेखांचे आशय विश्लेषण या तंत्राद्वारे अभ्यास केला आहे. या नियतकालिकात माहितीचे व्यवस्थापन, माहिती प्रोसेस, माहितीचे नावीन प्रवाह, माहिती व्यवस्थापनातील तंत्रे या विषयावर लेख आढळुन येतात. **(Fteimi, 2015)**

१०. Haneefa, Mohamed K. and Nellikka, Shyma (2010) यांनी Content Anaysis of Online English Newspapers in India हा लेख प्रकाशित केला. या अभ्यासासाठी भारतात प्रकाशित होणारे १२ ऑनलाईलन दैनिकांची निवड केली होती. या १२ ऑनलाईलन दैनिकांच्या आशय आणि आराखड्यावरून या लेखात वेबसाईटचे विश्लेषण केले आहे.

संशोधकाच्या असे लक्षात आले की, त्यामध्ये जवळपास सर्वच वृत्तपत्रांचे आराखडा सारखाच असतो, मात्र बातम्यांचे टायटल वेग-वेगळ्या प्रकारचे असतात. या वर्तमानपत्रांची माहिती जमा करण्यासाठी Check List चा वापर करण्यात आला आहे. तसेच Microsoft Excel हे आशय विश्लेषणाचे महत्त्वाचे साधन मानले आहे. या संशोधनामध्ये असे आढळुन आले की, इंग्रजी वर्तमानपत्रांचे आशय आणि डिझाईन हे सर्वांचेच काही प्रमाणात एकसारखे आहे. वाचकांबरोबर जोडून राहण्यासाठी वर्तमानपत्रांनी Blog, RSS आणि Facebook यासारख्या साधनांचा वापर केलेला आहे. **(Haneefa, 2010)**

११. Haneefa, Mohamed and Jasna, K, (2014) यांनी Web 2.0 Applications in Online Newspapers: A Content Analysis हा लेख लिहीला. या लेखामध्ये ऑनलाईन इंग्लिश

न्युजपेपरर्सचे आशय विश्लेषण आणि वेब 2.0 वापर याविषयी अभ्यास केला आहे. तसेच ऑनलाईन इंग्लिश न्युजपेपरर्स वेब 2.0 चे स्थान ओळख याबाबतचा अभ्यास केला आहे.

ऑनलाईन इंग्लिश न्युजपेपरर्समुळे वर्तमानपत्र वाचण्याच्या संख्येमध्ये वाढ झालेली दिसून येते. ऑनलाईन इंग्लिश न्युजपेपरर्समुळे विविध प्रकारचे आशय वाचकांना उपलब्ध झाले आहे. ऑनलाईन इंग्लिश न्युजपेपरर्सच्या वाचनामध्ये वेब 2.0 वापरामुळे अमुलाग्र फरक दिसून आला. वेब 2.0 वापरामुळे फेसबुक, व्टिटर, व्हाटसअॅप या साधनांमुळे वर्तमान वाचकांच्या संख्येत वाढ झालेली दिसून आली. फेसबुक, व्टिटर, व्हाटसअॅप, चॅट यासाधनांद्वारे वर्तमानपत्राच्या वाचकांना नवीन माहिती उपलब्ध करुन दिली जाते. वेब 2.0, फेसबुक, व्टिटर, व्हाटसअॅप, चॅट यासाधनांद्वारे (Interactive) वाचक सतत नवीन माहितीशी जोडलेले असतात. आवश्यक तेथे त्या माहितीबद्दल चर्चा घडवून आणली जाते, त्यामुळे ऑनलाईन इंग्लिश न्युजपेपरर्समुळे वाचकांसाठी उपयुक्त प्लॅटफॉर्म तयार झाला आहे. (**Haneefa, 2014)**

१२. Hsieh, Hsiu-Fang and Shannon Sarah (2006) यांनी Three Approaches to Quantitative Content Analysis हा लेख लिहिला. या लेखामध्ये गुणात्मक आशय विश्लेषणाबाबत माहिती दिलेली आहे. सदर लेखात आशय विश्लेषणाचा अर्थ, त्याचे घटक याबाबत सविस्तर माहिती दिलेली आहे. तसेच आशय विश्लेषणाचा इतिहास आणि विकास याबाबत माहिती दिलेली आहे.

आशय विश्लेषणाच्या महत्वाच्या तीन घटकांबाबत या लेखात सविस्तर चर्चा केली असून त्यात पारंपारिक आशय विश्लेषण, नियंत्रित विश्लेषण (directed) आणि सारांशात्मक (summative) यांचा समावेश आहे. या तीनही घटकांमुळे कोणत्याही विषयाचे गुणवत्तापूर्ण आशयाचे विश्लेषण करणे सहज सुलभ होते. गुणवत्तापूर्ण आशय विश्लेषण हे संशोधनासाठीचे एक उपयुक्त व महत्त्वपूर्ण असे तंत्र आहे असे या लेखात नमूद केले आहे. **(Hsieh, 2006)**

१३. Jimenez, R. A., Libre, U. and Bogota, S. (2012) यांनी The Social Representations and Transitional Justice: A Qualitative Content Analysis of the Colombian Press या लेखामध्ये सामाजिक प्रतिनिधित्व आणि Transitional Justice या विषयावरती कोलंबिया प्रेस मध्ये प्रकाशित होणाऱ्या लेखाविषयी संशोधन केलेले आहे. या संशोधनासाठी सामाजिक प्रतिनिधित्व नियम Social Representations Theory (SRT) चा वापर करण्यात आला आहे. त्यामध्ये Multi-

Metrological Approach Association Qualitative आणि संख्यात्मक तंत्र ज्याने आशय विश्लेषण आणि उत्पत्ती (Discover) विश्लेषणाचे निरीक्षण केले आहे. (**Jimenez, 2012**)

१४. Kannappanavar, B. U., Jayprakash आणि Bachalapur, M. (2011) यांनी Content Analysis of Engineering College Library Websites या लेखात कर्नाटकमधील तुमकुर जिल्हयातील अभियांत्रिकी महाविद्यालयातील ग्रंथालयात दिल्या जाणाऱ्या सेवा साधनांचा, ग्रंथालय कर्मचारी आणि त्यांची माहिती यांचा अभ्यास आशय विश्लेषण या तंत्राच्या साहाय्याने केला आहे. ग्रंथालयातून दिल्या जाणाऱ्या सुविधा, ती ग्रंथालये कोणते e-jounals किंवा e-books चा वापर करतात या घटकांचा अभ्यास करुन विश्लेषण केले आहे.

या लेखात तूमकूर जिल्हातील अभियांत्रिकी महाविद्यालयांची महत्वपुर्ण माहिती दिलेली आहे. वेबसाईट माहिती प्रसारणाचे प्रभावी माध्यम असून त्याद्वारे उपभोक्त्यांना ग्रंथालयातून दिल्या जाणाऱ्या सेवांबाबतची माहिती वेबसाईट वरून मिळण्यास मदत होते. वेबसाईट हे ग्रंथालयाबाबत माहिती देण्याचे मुख्य साधन असून त्याकडे ग्रंथलयांचे दुर्लक्ष झालेले आढळून येते. **(Kannappanwar, 2011)**

१५. Kirankumar., M. and Kumbar, Somashekara, Y. L. (2010) यांनी Content Analysis of Indian Institute of Technology Library Websites हा ग्रंथ लिहिला. या लेखामध्ये भारतातील आय. आय. टी. ग्रंथालयांच्या वेबसाईटचे आशय विश्लेषण केले आहे.

यामध्ये वेबसाईटवर कोणते आशय असतात आणि त्याचे वैशिष्टये काय, आय. आय. टी. वेबसाईटची सद्यस्थिती काय, वेबसाईटमधील सुरवातीची माहिती आणि आत्ताची माहिती यातील फरक माहिती करुन घेणे आणि वेबसाईटवर ग्रंथालय सेवा, ई-रिसोर्सेस आणि इतर कोणती माहिती असते हे जाणून घेण्याचा प्रयत्न केला आहे. या अभ्यासामध्ये लेखकाच्या असे लक्षात आले की, ग्रंथालयाची माहिती, ग्रंथालयाचे सभासदत्व, ग्रंथसंग्रह, कर्मचारी याबाबतची माहिती प्रामुख्याने वेबसाईटवर दिली आहे. ग्रंथालयांच्या वैशिष्टांमध्ये १५ पैकी १० वेबसाईटवर ओपॅक, ०८ वेबसाईटवर सभासदांची माहिती दिली आहे. Ask a Librarian हे पोर्टल ३०% ग्रंथालय वेबसाईटवर आहे. ई-जर्नल्सच्या लिंक्स ४६.६६% वेबसाईटवर दिलेल्या आहेत. तसेच आय. आय. टी. वेबसाईटमध्ये पूर्वीपेक्षा खूपच बदल झालेले आढळुन आले. **(Kirankumar, 2010)**

१६. Kondracki, N. L., Wellman, Nancy S. आणि Amundson Daniel R. (2002) यांनी Content Analysis: Review of Methods and their Applications in Nutrition Education या लेखामध्ये आशय विश्लेषण ही एक सांख्यिकीय आणि गुणवत्ता विश्लेषणासाठी अतिशय उपयुक्त अशी पध्दती आहे असे दर्शविले आहे. त्यांनी या लेखामध्ये आशय विश्लेषणाच्या पध्दती, फायदे, तोटे, आणि उपलब्ध Nitrition Education संशोधनात होणारा त्याचा वापर याबाबत उपयुक्त माहिती दिली आहे. **(Kondracki, 2002)**

१७. Lin, Chi- Shiou and Jeng, Wei (2015) यांनी Using Content Analysis in LIS Research: Experiences with Coading Schemes Construction and Reliability Measures हा लेख लिहीला. या लेखामध्ये आशय विश्लेषण या तंत्राचे ग्रंथालय व माहितीशास्त्र विषयाच्या संशोधनामध्ये असलेले महत्व अधोरेखित केले आहे. या लेखामध्ये coding scheme, Relibility वापराब- ल माहिती दिलेली आहे. आशय विश्लेषण या संशोधन तंत्राद्वारे ग्रंथालय व माहितीशास्त्र या विषयात नावीन्यपुर्ण अनुभव मिळतो. **(Lin, 2015)**

१८. Lokhande, Rahul S. (2005) यांनी Contetn Analysis of Open Access LIS Journal 'ALIS' 2002 to 2011 या लेखामध्ये ग्रंथालय आणि माहितीशास्त्र या विषयातील ओपन ॲक्सेस जर्नल मधील ॲनल्स ऑफ लायब्ररी ॲण्ड इन्र्फमेशन स्टडिज या नियतकालिकात प्रकाशित होणाऱ्या लेखांचे आशय विश्लेषण केले आहे. या संशोधनासाठी त्यांनी २००२-२०११ या कालावधिमध्ये प्रकाशित झालेल्या २८३ लेखांची निवड केली होती.

या लेखातून संशोधकाने ग्रंथालय आणि माहितीशास्त्रातील ALIS या नियतकालिकात लेख, लेखक आणि ग्रंथालयशास्त्रातील विविध विषयावर आलेल्या लेखांचे विश्लेषण केले आहे. त्यांच्या अभ्यासातून निदर्शनास आले की, २०१० मध्ये सर्वाधिक १५.१९% तर २०११ मध्ये १२.७२% लेख प्रकाशित झाले, दोन लेखकांनी लिहीलेल्या लेखांचे प्रमाण सर्वाधिक १२६ इतके आहे. डॉ. बी. के. सेन यांनी सर्वाधिक २१ लेख लिहिले आहे. या नियतकालिकामध्ये बिब्लियोमेट्रीक, सायंटोमेट्रीक आणि ग्रंथालयशास्त्र या विषयावर महत्वपुर्ण लेख आहेत. या अभ्यासातून स्पष्टपणे जाणवते की, हे नियतकालिकातील माहिती तंत्रज्ञानामूळे प्रभावीपणे माहितीचे संप्रेषण होते. **(Lokhande, 2005)**

१९. Lokhande, Rahul. (2015) यांनी Open Access LIS Journal The Electronic Journal of Knowledge Management (2005-2009): A Content Analysis हा लेख लिहिला. या लेखामध्ये ग्रंथालय व माहितीशास्त्रातील ओपन ॲक्सेस जर्नल्सचे नवीन प्रवाह, लेखक आणि या नियतकालिकात समाविष्ट असलेल्या विषयांचे आशय विश्लेषण केले आहे.

माहिती विश्लेषणासाठी संख्यात्मक आशय विश्लेषण या तंत्राचा वापर केला आहे. या लेखामध्ये २००५ ते २००९ या कालावधीतील १६७ लेखांचे विश्लेषण केले आहे. लेखकाच्या दायीत्वामध्ये दोन लेखकांनी मिळून लिहिलेल्या लेखांची संख्या अधिक दिसून आली. शैक्षणिक संस्थामधील लेखकांनी लिहिलेल्या लेखकांची  लक्षणीय आहे. तर भौगोलिक प्रदेशानुसार यु.के. मधील लेखकांचे लेख लिहिण्याचे प्रमाण सर्वाधिक आढळुन आले. यामध्ये ४५ देशामधील लेखकांनी लेख लिहिलेले आढळुन आले. या नियतकालिकाचे विषयानुसार विश्लेषणामध्ये सर्वाधिक Knowledge Management या विषयातील लेख आढळून आले. या अभ्यासातून स्पष्टपणे दिसून आले की, The Electronic Journal of Knowledge Management हे नियतकालिक विद्वत्त माहिती संप्रेषनासाठी उपयुक्त असे नियतकालिक आहे. **(Lokhande, 2015)**

२०. Mane, Manisha and Panage, B. M. (2015), यांनी Content Analysis of University Library Portal: A detail study of Jaykar Library Portal, Savitribai Phule University of Pune हा लेख लिहीला. या लेखामध्ये संशोधकाने वेब पोर्टलद्वारे ग्रंथालयातून दिल्या जाणाऱ्या सेवा व परिणामकता याबाबतचा अभ्यास केला आहे.

या लेखामध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या जयकर ग्रंथालयातून पोर्टलचा वापर करुन दिल्या जाणाऱ्या सेवांचे मुल्यमापन केले आहे. त्यामध्ये पोर्टलचे सकारात्मक आणि कमकुवत बाबींची चर्चा केली आहे. तसेच जयकर ग्रंथालयाच्या पोर्टलच्या आशयाचे विश्लेषण केले आहे. या संशोधनाचा महत्वपुर्ण उद्देश म्हणजे ग्रंथालयाच्या पोर्टलची विद्यार्थ्यांच्या दृष्टिने उपयुक्तता याबाबींचा अभ्यास केला आहे.

जयकर ग्रंथालयाचे पोर्टल हे उपभोक्त्यांच्या वापरसाठी अतिशय सोपे असल्याचे आढळून आले. या पोर्टलद्वारे विविध डेटाबेसच्या लिंक्स उपलब्ध करून दिलेल्या आहे तसेच या पोर्टलद्वारे अनेक ई-रिसोर्सेस, ई- जर्नल्स, ई- क्लास नोट, शैक्षणिक व्हिडीओ उपलब्ध करून दिले आहे.

नविन तंत्रज्ञानांचा ग्रंथालयासाठी कशा उपयुक्त आणि प्रभावी ठरतात याबाबतचा अभ्यास या लेखामधून केलेला आहे. **(Mane, 2015),**

२१. Naik, P. W., Burande, M. R., Ramtake, M. N. and Dhok (2012) यांनी Content Analysis an Effective Way to Foster the Research Work या लेखामध्ये ॲनिमल न्युट्रिशन या विषयावरील प्रबंधाचे आशय विश्लेषण करुन MAFSU, नागपूर या विद्यापीठास सादर केला आहे. त्यासाठी २००७ मधील प्रबंधाचा अभ्यास केला आहे. लेखकाने या लेखात आशय विश्लेषण तंत्रामुळे माहितीची प्रभावीपणे उपभोक्त्यांना पुरविली जाते याची चर्चा केलेली आहे.

या अभ्यासात संशोधकाच्या असे निर्दशनात आले की, एकूण ५६ प्रबधांना १४ मार्गदर्शकांनी मार्गदर्शन केले आहे. त्यामध्ये डॉ. व्ही. एच. कळबांडे यांचा सर्वात मोठा वाटा असून त्यांनी १२ विदयार्थ्यांना मार्गदर्शन केले आहे. तसेच ४८.२१% संशोधन हे पोल्ट्री या विषयावर केली आहे. तसेच ५६ पैकी ३६ थिसिस मध्ये १ ते १० आणि १५ थिसिस मध्ये ११ ते २० आलेख आहे तर उरलेल्या ५ थिसिसमध्ये एक ही आलेखाचा वापर केला नाही. २७ थिसिसमध्ये एकही फोटोग्राफ नाहीत. संशोधकाने फक्त विद्यापीठीय ग्रंथालयामध्ये उपलब्ध असलेल्या थिसिसचे संशोधन केले आहे. (**Naik, 2012**)

२२. Naseer, Mirza M., and Mahmood, Khalid (2009) यांनी LIS Research in Pakistan: An Analysis of Pakistan Library and Information Science Journal 1988-2007 हा लेख लिहिला. या लेखामध्ये पाकिस्तानमधील ग्रंथालय व माहिती शास्त्रामधील Pakistan Library & Information Science या नियतकालीकाचे आशय विश्लेषण केले आहे. हया संशोधनासाठी त्यांनी ८ तक्त्यांमध्ये विषयांची विभागणी केली. या अभ्यासात पंजाब विद्यापिठामधील विविध विषयांच्या मासिकांची यादी करण्यात आली. त्यामध्ये ११ विषयामध्ये घटकांची विभागणी केली होती. त्यामध्ये २३६ लेखांपैकी (९३) ३९.४% Industry, Profession and Education या विषयावरती लेख प्रकाशित झाले होते, तर भौगोलिकदृष्टया लेखकांचा अभ्यास केला असता त्यांच्या लक्षात आले की, आशिया खंडातील ६९.९%, तर उत्तर अमेरिका खंडातील ५.१% प्रमाण आहे. ६६.९% लेखक हे पाकिस्तान १५८ तर ४.२% लेखक अमेरिका देशातील होते.

त्यांच्या असेही लक्षात आले की, १९९८-२००२ या काळात हे नियतकलिक विलंबाने प्रकाशित होत होते, तर दोन अंक एकत्र प्रकाशित करण्यात आले होते. मात्र मागील पाच वर्षापासून

यात बदल होवून अंक नियमित प्रकाशित होत आहे. पुरूष लेखकांनी लिहीलेल्या लेखांचे प्रमाण ६१.००% तर महिला लेखिकांचे प्रमाण ३२.२% इतके होते. ६१.००% लेख हे वर्णनात्मक स्वरूपाचे होते तर १७.८% लेख ऐतिहासिक स्वरूपाचे होते. **(Naseer, 2009)**

२३. Noa, Aharony (2010) यांनी Library and Information Science research areas: A Content Analysis of Article from the top 10 Journals 2007-2008 या लेखामध्ये ग्रंथालय शास्त्रातील १० नियतकालिकांची निवड करुन त्यांचा अभ्यास केला आहे.

संशोधकांनी फक्त पारंपरिक घटकांचा अभ्यास न करता विज्ञान, तंत्रज्ञान, विधी, वैद्यकीय या घटकांचा देखील समावेश केला आहे. या नियतकालिकांची निवड करण्याचे कारण या नियतकालिकांमधुन माहिती परिणामकारक प्रसारित होते. (Scholarly Communication) व नवीन कल्पनांना वेग देते. या लेखामध्ये लेखकांच्या दायीत्वाचा सांख्यिकीय पध्दतीने विश्लेषण केले आहे. लेखकांच्या दायित्वाचे प्रमाण अभ्यासले असता असे लक्षात आले की, एका लेखकाने ३५९(२८.७२%)लेख लिहिले आहे तर दोन लेखकांनी ४४७(३५.७६%) लेख लिहिलेले आहे. उत्तर अमेरिकेतील ४७०(३७.६०%) लेखकांनी लेख लिहिलेले आहे तर युरोप ४६२(३६.९६%), आशिया २५९(२०.७२%), ऑस्ट्रेलिया २९(२.३२%), दक्षिण अमेरिका २३(१.८४%), लेखकांच्या प्रादेशिक विभागानुसार लेख लिहिण्याचे प्रमाण आढळून आले.

ग्रंथालयशास्त्राशी संबंधित लेखकांचे प्रमाण २२५(२७.०८%) तर तंत्रज्ञान ११६(९.२८%), Computer Science ११० (८.०८%) तर सर्वात कमी विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील लेखकांचे प्रमाण १३(१.०४%) इतके झाले आहेत. एक लेखकाने लिहिलेला लेख आणि अनेक लेखकांनी लिहिलेले लेख यात जास्त तफावत नाही. **(Noa, २०१०)**

२४. Patil, Namita (2012) यांनी E-Journal Ariadhane: A Content Analysis या लेखामध्ये Ariadhne या नियतकालिकाचे आशय विश्लेषण केले आहे. Ariadhne हे एक वेब मॅगझीन असून यामध्ये विविध आंतरशाखीय विषयांचा समावेश आहे.

या अभ्यासामध्ये लेखकाने लिखित पेपर आणि ई-पेपर च्या माहितीचे प्रसारण कसे होते, आपल्या विषयात घडणाऱ्या घडामोडी, नवीन होणारे संशोधन याबाबतची माहिती उपभोक्त्यांना देणे, उपभोक्त्यांना आवश्यक असणारी माहिती ई-जर्नल्सद्वारे चटकन मिळते का? याबाबतचा

अभ्यास या लेखात केला आहे. या अभ्यासामध्ये लेखकाने Ariadhne या नियतकालिकातील लेखांची वर्षानुसार विभागणी करणे, विषयानुसार लेखांची विभागणी करणे, प्रमुख लेखकांचे दायित्व तपासणे आणि नियतकालिकात प्रसिध्द होणाऱ्या घटना, बातम्या आणि Reveiews ची वर्षानुसार विभागणी केली आहे.

या अभ्यासानुसार Publishing Trend हा पूर्णता लेखकांवर आणि संशोधनाच्या गुणवत्तेवर अवलंबून असतो. या लेखातील ६२.५०% लेख हे एका लेखकांनी लिहिलेले आहेत तर बहुतेक सहभागी लेखक हे ग्रंथपाल आहेत. **(Patil, 2012)**

२५. Patil, Namita आणि Lihitkar, Shalini (2013) यांनी Content Analysis of Library Harold 2008-2011 हा लेख लिहिला. या लेखात लेखिकेने लायब्ररी हेरॉल्ड या नियतकालिकाच्या चार खंडाचे (खंड ४६ ते ४९) आशय विश्लेषण केले आहे. या अभ्यासाठी एकूण १६ अंकांचा अभ्यास केला आहे.

Library Harold हे पीर रिव्ह्युव जर्नल आहे. या अभ्यासामध्ये लेखकाचे प्रकार, राज्य, संस्था यांचे योगदान, ग्रंथ परीक्षण आणि पुढे येणाऱ्या घटनांचा अभ्यास केला आहे. या कालावधित एकूण ११२ लेख प्रकाशित झाले. त्यापैकी सर्वाधिक ४०(३५.७१%) लेख २००९ मध्ये प्रकाशित झाले. एकूण ११२ लेखांपैकी ६२(५५.३५%) लेख हे एका लेखकाने लिहिले आहे तर ३२(२८.५%) लेख हे दोन लेखकाने मिळून लिहिलेले आहे.

लेखकांच्या भौगोलिक अभ्यासावरुन असे लक्षात आले की, ११२ लेखांपैकी ३०(२६.७८%) लेख दिल्ली मधील लेखकांनी लिहिलेले आहे. या नियतकालकातील लेख लिहिणाऱ्याच्या योगदानाचा अभ्यास केला असता असे दिसून आले की, सर्वाधिक लेख हे प्राध्यापकांनी लिहिलेले आहे. लायब्ररी हेरॉल्ड या नियतकालीकाने ५० वर्ष पूर्ण केले असून या नियतकालिकातील लेखांचा दर्जा सातत्यपूर्ण वाढतांना दिसून येतो. हे नियतकालिकातून ग्रंथालय आणि माहितीशास्त्रातील उपयुक्त माहितीची प्रभावीपणे देवाण-घेवाण होत आहे. **(Patil, 2013)**

२६. Pratapure, Sujata आणि Khaparde, Vaishali (2014) यांनी Content Analysis of Information Technology in Boimedicne या लेखात लेखकांनी आशय विश्लेषण हे एक प्रभावी असे संशोधन तंत्र असल्याचे स्पष्ट केले आहे.

या नियतकालिकात २००७ ते २०१२ या कालावधीत एकूण ५९९ लेख प्रकाशित झाले असून बायोइंजिनिअरींग विषयात १४१(२३.५३%) लेख प्रकाशित झाले आहे, तर कम्प्युटींग आणि प्रोसेसिंग या विषयाचे १११(१८.५४%) लेख प्रकाशित झाले आहे. सर्वात कमी लेख पॉवर एनर्जी या विषयाचे ८(१.३४%) लेख प्रकाशित झाले आहे. तर या नियतकालिकात एकूण १४४२ लेखकांनी लेख लिहीले आहे. लेखकांच्या दायित्वानुसार एका लेखकाने लिहिलेल्या लेखांचे प्रमाण सर्वात कमी ८(०.५५%) इतके, दोन लेखकांनी मिळून लिहिलेले लेखकांचे प्रमाण १०८(७.४८%) तर तीन पेक्षा अधिक लेखकांनी लेख लिहिण्याचे प्रमाण सर्वाधिक १११३(७७.१९%) इतके होते. देशानुसार लेखकांचे प्रमाण तपासले असता असे लक्षात आले की, यु. एस. ए. मधील लेखकांचे प्रमाण ३८०(१५.९५%) इतके आहे. **(Pratapure, 2014)**

२७. Sampath, Kumar., Prithviraj., Naik, A. S. and Reddy R. (2009) यांनी Content Analysis of Indian Institute of Management Library Websites: An Analytical Study हा लेख लिहिला. या लेखामध्ये बंगलोर, अहमदाबाद, लखनौ, कोझीफोड, कलकत्ता, आणि इंदोर येथील इंडियन इन्स्टीट्युट ऑफ मॅनेजमेंट लायब्ररी या वेबसाईटचा आशय विश्लेषणात्मक अभ्यास केला आहे.

त्यांनी आय. आय. एम. च्या वेबसाईटवर ग्रंथालयाची माहिती दिलेली आहे. आय. आय. एम. अहमदाबाद आणि आय. आय.एम. लखनौ या वेबसाईटवर संस्थेची आणि वेबमास्टरची माहिती उपलब्ध आहे. तर आय. आय.एम. कोलकत्ताच्या वेबसाईटवर हीट काऊंटर सुविधा उपलब्ध आहे. आय. आय.एम. अहमदाबाद या संस्थेच्या वेबसाईटवर ग्रंथालय समितीबाबत माहिती दिलेली आहे. सर्व संस्थाच्या वेबसाईटवर ग्रंथालयातील ग्रंथ, नियतकालिके, संदर्भसाहित्य, प्रबंध, रिपोर्टस, शासकीय प्रकाशने प्रिंट जर्नल्स, सध्या चालू असलेले प्रोजेक्टस् आणि भविष्यातील योजना याबाबतची माहिती दिलेली आहे. फक्त आय. आय. एम. अहमदबाद आणि आय. आय. एम., कोलकत्ता यांनी आपल्या वेबसाईटवर मोनोग्राफ टाकलेले आहे. तर आय. आय. एम. कोलकत्ता आणि आय. आय., एम. बंगलोर यांनी वार्षिक अहवाल वेबसाईटवर उपलब्ध करुन दिला आहे. या लेखातून वेबसाईटच्या आशयाचे तुलनात्मक विश्लेषण करून सहा आय.आय.एम. संस्थांच्या ग्रंथालयांचे अध्ययन केले आहे. **(Sampathkumar, 2009)**

२८. Savitha, K. S. and Kenchakaller, P. (2016) यांनी An Engineering College Library Websites of Mysore: A Content Analysis हा लेख लिहीला. त्यासाठी त्यांनी म्हैसुर शहरातील नऊ अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या वेबसाईटचे आशय विश्लेषण तंत्राच्या आधारे अभ्यास केला.

या लेखामध्ये संशोधकाने अभियांत्रिकी महाविद्यायलयांच्या वेबसाईटवर उपलब्ध असलेले आशय जाणून घेणे, ग्रंथालयांच्या वेबसाईटवर उपलब्ध असलेले वाचन साहित्य व सेवा यांची माहिती घेणे, ग्रंथालयांद्वारे दिल्या जाणाऱ्या सेवांचा अभ्यास करणे, वेबसाईटवर उपलब्ध असलेले ई- रिसोर्सेस याबाबतचा अभ्यास केलेला आहे.

सदर संशोधनातून संशोधकाच्या असे लक्षात आले की, १००% अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या वेबसाईटवर प्राथमिक स्वरूपाची माहिती उपलब्ध आहे. सर्व ग्रथालयांचे देवघेव विभागांचे संगणकीकरण केलेले आहे. ई- रिर्सोसेसच्या लिंक वेबसाईटवर टाकलेल्या आहेत. थोडक्यात ग्रंथालयांच्या वेबसाईटद्वारे ग्रंथालयांचे वाचन साहित्य, सेवा आणि सुविधा यांची माहिती वेबसाईटवर उपलब्ध करून दिल्या आहेत. सदर अभ्यासातून लक्षात येते की, अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या वाटचालीत पारंपारीक शिक्षणाबरोबरच आधुनिक सेवा, सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी वेबसाईट अतिशय उपयुक्त ठरतात. **(Savitha, 2016)**

२९. Swapna, V. S. and Francis, A. T. (2014) यांनी Management of Library Websites of Agricultural Universities in South India: A Content Analysis हा लेख लिहीला. सदर अभ्यासात सहा कृषीविद्यापीठांच्या ग्रंथालयांच्या वेबसाईटचा अभ्यास केला आहे.

सदर लेखामध्ये दक्षिण भारतातील कृषीविद्यापीठातील ग्रंथालयांच्या वेबसाईटची सद्यस्थिती जाणून घेणे, कृषीविद्यापीठातील ग्रंथालयांच्या वेबसाईटद्वारे दिल्या जाणाऱ्या सेवा, सुविधा आणि वाचनसाहित्य यांचा अभ्यास केला आहे, तसेच ग्रंथालय वेबसाईटच्या गुणवत्ता सुधारण्यासाठी उपाययोजना सुचविणे याबाबतचा अभ्यास केला आहे.

या अभ्यासामधुन संशोधकाच्या असे लक्षात आले की, १००% वेबसाईटवर ग्रंथालयाबाबत माहिती दिली होती. कृषीविद्यापीठांच्या ग्रंथालयांच्या वेबसाईटवर ग्रंथालयाबाबतची सविस्तर माहिती दिली आहे. ग्रंथालयांच्या वेबसाईट नियमित अपडेट होत नाही. थोडक्यात वेबसाईटद्वारे विविध सेवा देण्याचा प्रयत्न केला जातो. वेबसाईटवर विविध सेवा, सुविधा उपभोक्त्यांना उपलब्ध करून दिल्या जातात. या लेखात दक्षिण भारतातील कृषीविद्यापीठातील

ग्रंथालयांच्या वेबसाईटच्या सकारात्मक आणि कुमकुवत गोष्टींबाबत चर्चा केली आहे. याद्वारे ग्रंथालयांसाठी चांगल्या प्रकारे वेबसाईट तयार करण्यास मदत होईल. **(Swapna, 2014)**

३०. Tigga, Usha, Lihitkar, Shalini आणि Rajyalakshmi, (2005) यांनी Content Analysis of DESIDOC Bulletin of Information Technology (1997-2002) हा लेख लिहिला. या लेखामध्ये संशोधकाने १९९७-२००२ या कालावधितील एकूण ३३ अंकांचा अभ्यास केला आहे.

या अभ्यासात संशोधकाच्यामते ४०% अंक हे विशेष अंक म्हणून प्रकाशित झाले, त्यातील बहूतेक अंकाचा दर्जा हा उत्तम होता. तर सर्व अंक हे ग्रंथालय आणि माहीतीशास्त्र तज्ज्ञांनी संग्रहीत (edited) केलेले असल्याने लेखांचा पर्यायाने नियतकालीकाचा दर्जा उंचावलेला आहे. विशेष अंकामध्ये असलेले विषयांचा भर हा वर्तमान घटना- घडामोडींवर तसेच नवीन तंत्रज्ञान, बिब्लियोग्राफिक डेटाबेस आणि साहित्यसंग्रह विकास या विषयांवर आढळुन येतो. DESIDOC Bulletin of Information Technology या नियतकालिकात माहिती तंत्रज्ञानासह इतर विषयांना अधिक महत्व दिलेले आहे. DBIT हे ग्रंथालय व माहितीशास्त्र व्यावसायिक, ग्रंथपाल, माहिती तंत्रज्ञ, माहिती शास्त्रज्ञ आणि संशोधक यांच्यासाठी अतिशय उपयुक्त असे नियतकालिक आहे. या नियतकालिकामध्ये राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील चर्चासत्र, परीषदा यांची माहीती दिलेली आहे. **(Tigga, 2005)**

३१. Vijaykumar, M., Kannappanavar, B. U. आणि Mestri, Mamta (2008) यांनी Content Analysis of Indian Institute of Technology Libraries Web Portals: A Study हा लेख लिहिला. या लेखामध्ये देशातील IIT's च्या पोर्टलचे आशय विश्लेषण केले आहे. Indian Institute of Technology ही भारतातील अभियांत्रिकी व संशोधन क्षेत्रात उच्च शिक्षण देणारी नामांकित संस्था आहे. या लेखात अभ्यासकाने भारतातील IIT's च्या ग्रंथालयांद्वारे दिल्या जाणाऱ्या सेवा, ग्रंथालयांचे पोर्टल, वेबसाईटचे डिजाईन, ग्रंथालयातील रिसोर्सेस या बाबींचे विश्लेषण करून इतर IIT's संस्थांना माहितीची देवाण घेवाण करता येईल का याचा अभ्यास या लेखात केलेला आहे.

ग्रंथालय वेब पोर्टल्स मध्ये ग्रंथालयाच्या वेब आणि ग्रंथालय कर्मचाऱ्यांबाबत माहिती दिलेली आहे. तसेच ग्रंथालयाचा आराखडा आणि सभासदांबाबत ७१.४२% माहिती वेब पोर्टल्स

मध्ये देण्यात आलेली आहे, तर २८.७५% माहिती ही सभासदांची ग्रंथालय वेब पोर्टल्समध्ये २८.७५% तांत्रिक कामासाठी तर १४.२८% ग्रंथबांधणी, डिजिटल लायब्ररी, व्हिडिओ लायब्ररी याबाबतची माहिती दिलेली आहे.

ग्रंथसंग्रह, दृक-श्राव्य साधने, सीडीज, ग्रंथालयात येणारे नवीन ग्रंथ याबाबतची माहिती आहे. या वेब पोर्टल्स मध्ये ८५.७१% माहिती ही ग्रंथालयाने खरेदी केलेल्या ई-जर्नल्स बाबत आहे. तर केवळ १४.२८% माहिती ई-थिसिस आणि Dissertion बाबत आहे. या अभ्यासातून लक्षात येते की, सर्व IIT's चे पोर्टलस् वेग-वेगळ्या प्रकारे तयार केलेले आहे. या लेखामुळे देशातील IIT's च्या ग्रंथालयाची परीपूर्ण माहिती दिलेली आहे. IIT's ग्रंथालयाचे शैक्षणिक नेटवर्क तयार करून त्यांचे उपयोगिता वाढविण्यासाठी आशय विश्लेषण उपयुक्त ठरणार आहे. **(Vijaykumar, 2008)**

३२. Walia, Paramjet Kaur and Kaur, Manpreet (2012) यांनी Content Analysis of Journal Literature Published From UK and USA हा लेख लिहिला. या अभ्यासाचा उद्देश संशोधनात्मक लेखांचे प्रमाण तपासणे, सद्यस्थितीत नवीन विषयांचे प्रवाह तपासणे हा होता. तसेच माहिती तंत्रज्ञानाचा ग्रंथालयांवर होणारा परीणाम अभ्यासण्याचा हेतू संशोधकाचा होता. या लेखामध्ये २००८ मध्ये प्रकाशित झालेल्या सहा नियतकालिकातील १६५ लेखांचे आशय विश्लेषण केले आहे.

या अभ्यासात UK मधील Journal of Documentation, Journal of Librarianship and Information Science (JOLIS), Library and Information Science Research (LISR) तर USA मधील Library Resources and Technical Services (LRTS), Library Trends (LT), The Library Quarterly (LQ) या नियतकालिकांचा तौलनिक अभ्यास केलेला आहे. यामध्ये लेखिकेला असे जाणविले की, १६५ लेखांपैकी ९३(५६.६३%) लेख हे संशोधन विषयावर आधारित (Research Based) आहे. सदर अभ्यासामुळे ग्रंथालय आणि माहितीशास्त्र या विषयामध्ये कोणत्या विषयावर यापूर्वी संशोधन झाले आहे, आणि कोणत्या विषयावर संशोधन चालू आहे या बाबतची माहिती या लेखात दिलेली आहे. **(Walia, 2012)**

३३. Weare, Christopher आणि Ling Wan-Ying (2002) यांनी Content Analysis of the World Wide Web: Opportunities and Challenges हा लेख लिहिला. या लेखामध्ये पध्दतशीर (Systematic) आणि संख्यात्मक (Quantitative) आशय विश्लेषण या तंत्राचा वापर करून World Wide Web चा अभ्यास केलेला आहे.

आशय विश्लेषणाच्या पध्दतीमध्ये कसा-कसा बदल होत गेला त्याबाबतची सविस्तर माहिती या लेखात दिलेली आहे. आशय विश्लेषणामध्ये World Wide Web हे महत्वपूर्ण माध्यम असुन त्याचा जास्तीत जास्त वापर होणे आवश्यक असते. आशय विश्लेषण हे तंत्र वापरून वेबसाईटचा वापर, विकास, नमुना या घटकांचा अभ्यास या लेखात केला आहे. तसेच आशय विश्लेषण या तंत्राचा वापर केल्याने वेबसाईटच्या संशोधनात गुणवत्ता व वैधता प्राप्त होते. **(Weare, 2002)**

३४. White, Marilyn and Marsh, E. E. (2006) यांनी Content Analysis: A Fexible Methodology हा लेख लिहिला. या लेखात त्यांनी आशय विश्लेषण पध्दतीबाबत माहिती दिली असून ही पध्दत ग्रंथालय आणि माहितीशास्त्रातील संशोधकाचे ध्येय आणि उदिदष्ट पूर्ण करण्यासाठी कशी महत्वाची आहे याबाबत माहीती दिली आहे. आशय विश्लेषण या तंत्रामध्ये विषयाचे गुणात्मक, सांख्यिकीय आणि काही वेळा एकत्रित प्रकारे विश्लेषण करुन माहितीची मांडणी करता येते.

या लेखात त्यांना असे आढळुन आले की, आशय विश्लेषण या तंत्रामध्ये माहितीचे पध्दतशीर विश्लेषण करुन तिची अर्थपूर्ण मांडणी करण्यासाठी उपयुक्त ठरते. या लेखात सांख्यिकीय आणि गुणात्मक विश्लेषण यामधील फरक सांगून या दोन्ही पध्दती ग्रंथालय आणि माहितीशास्त्र या विषयातील संशोधनासाठी कशा उपयुक्त आहे. याबाबतची माहिती दिलेली आहे. या लेखामध्ये संशोधकाने ग्रंथालयशास्त्रातील विषयाचे आशय विश्लेषण या तंत्रामध्ये संगणकाचा वापर करुन आशय परिणामकारक दर्शविता येतो या बाबत माहिती दिली आहे. **(White, 2006)**

३५. Yadav, Akhilesh and Bankar, Prerana (2016) यांनी Employment Opportunities in LIS Field in India: A Content Analysis of Position Advertised हा लेख लिहीला. या लेखामध्ये ग्रंथालय आणि माहितीशास्त्रातील जाहिरातीचे प्रवाह (Trends) शोधणे, नोकरी विषयक जाहिरातीचे प्रकार, कर्मचाऱ्यांचे प्रकार, नोकरीदात्यांचे प्रकार यांचा अभ्यास करणे, नोकरीसाठी

आवश्यक पात्रता, आवश्यक कौशल्य, नोकरीदात्यांची मागणी या घटकांचा अभ्यास या लेखात केला आहे

सदर लेखाच्या अभ्यासातून असे लक्षात आले की, विविध ग्रंथालयमध्ये मुलाखती वेळी शैक्षणिक पात्रता, उमेद्वाराच्या अंगी असलेली कौशल्य, इंग्रजी भाषेवर असलेले प्रभुत्व, ग्रंथालयशास्त्राशी संबंधीत नवीन कल्पना, माहिती तंत्रज्ञानाची ओळख, बोलण्याची शैली हे घटक महत्वाचे ठरतात. **(Yadav, 2016)**

३६. Yang, D., Richardson, J., French, B. amd Lehman, J. (2008) यांनी The Development of a Content Analysis Model for Assessing Student's Cognetive Learning in Asynchronous Online Discussions या लेखामध्ये कॉगनेटिव लर्निंग चा अभ्यास (Cognitive Learning) करीत असलेल्या विद्यार्थ्यांना asynchronous online discussions साठी गुणवत्तापुर्ण Model विकसित करण्यात आले आहे. यामध्ये गुणात्मक आणि संख्यात्मक अशी मिश्र स्वरुपाची पध्दती तथ्य विश्लेषण आणि त्याची मांडणी करण्यासाठी वापरली आहे. मुख्यत्वे करुन हे Model Sequential Exploratory (OWAL-quan) या पध्दतीने तयार करण्यात आले आहे. गुणात्मक तथ्य आणि पध्दतींसाठी तथ्य (Data) दोन Online Course मध्ये ८०० Online Posting आल्या. संख्यात्मक (Quantitative) तथ्यांमध्ये ८०३ Online Posting ज्या त्याच दोन Course वर पण दुसऱ्या विषयावर आणि वेगळया आठवडयामध्ये Posting आल्या तर संशोधनाअंती असे आढळुन आले की, आशय विश्लेषण Model तयार करतांना गुणात्मक तथ्य (Qualitative Data) मुख्य घटक आहे, असे आढळुन आले. (**Yang, 2008**)

३७. जोशी, स्नेहल आणि खोत, नमिता. (२०११) यांनी साहित्यसूची: आशय विश्लेषण या लेखामध्ये २००५ ते २००९ या कालावधितील साहित्यसूची या नियतकालिकाचे विश्लेषण केले आहे.

सदर अभ्यासासाठी साहित्यसूची या नियतकालिकाच्या प्रारंभापासून म्हणजेच १९८० ते २००९ पर्यंतच्या सर्व अंकांचा अभ्यास केला आहे. प्रस्तुत नियतकालिकातील सर्व लेखांचे सार काढून त्याची वर्णनात्मक सूची तयार केली आहे. १९८० ते २०१० या कालावधीतील ३६० प्रकाशित अंकांपैकी ३४५ अंक उपलब्ध झाले होते. या नियतकालिकातील लेखांचे वर्गीकरण

करतांना असे लक्षात आले की, सर्वाधिक लेख हे महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी या विषयातील आहे तर आकाशवाणीवरील भाषणे या विषयावरील लेख सर्वात कमी आहे. (**जोशी, २०११**)

३८. बापते, विशाल आणि गेडाम, स्वाती (२०१६) डेसिडॉक जर्नल ऑफ लायब्ररी ॲण्ड इन्फॉरमेशन टेक्नॉलॉजी या नियतकालिकाच्या सन २०१० ते २०१५ या कालावधीत पसिध्द झालेल्या संशोधनपर लेखांचे आशय विश्लेषण हा लेख लिहिला.

या लेखात सन २०१० ते २०१५ दरम्यान प्रसिध्द झालेल्या ३६ अंकातील ३४२ लेखांचा अभ्यास केला आहे. ग्रंथालय व माहितीशास्त्राच्या व्यावसायिकांना त्यांच्या क्षेत्रात होणाऱ्या घडामोडींची सखोल माहिती देण्यात हे नियतकालिक यशस्वी ठरले आहे. सदर लेखात विश्लेषण करतांना शोधनिबंधाचे संख्यात्मक मूल्य, लेखकांचे दायित्व, सातत्याने लिहिणारे लेखक, विषय निहाय भौगोलिक विश्लेषण, पृष्ठसंख्या विश्लेषण इत्यादी घटकांचा विचार केला आहे.

सदर अभ्यासातून संशोधकाच्या लक्षात आले की, विषयनिहाय अंक याचे सर्वसाधारण अंक यांचे गुणोत्तर प्रमाण ५०:५० असे आहे. या नियतकालिकातून नावीन्यपूर्ण विषयांवर अंक प्रकाशित करण्यात आले आहे. संपादक निहाय विश्लेषणातून लक्षात येते की, या नियतकालिकाचे जास्तीत-जास्त संपादक दिल्ली/नवी दिल्लीचे आढळुन आले. २०१२ मध्ये सर्वाधिक ६५ लेख प्रकाशित झाले आहे. लेखकनिहाय विश्लेषणामध्ये दोन लेखकांनी मिळुन (४६.९१%) लेख लिहिले आहे.

भौगोलिक क्षेत्राच्या दृष्टीने दिल्ली शोधनिबंधाच्या योगदानात अग्रेसर आहे. तर शोधनिबंधाची पृष्ठसंख्या ही ५ ते ९ (७४.५३%) इतकी आहे. बी. एम. गुप्ता यांनी सर्वाधिक १४ लेख लिहिले आहे. थोडक्यात या अभ्यासातून सदर नियतकालिकाचे सर्वांगिण विश्लेषण झालेले आढळून येते. **(बापते, २०१६)**

३९. बाहेती, सत्यनारायण आणि डगवार, श्यामकांत. (२००८). यांनी युनिव्हर्सिटी न्यूज या नियतकालिकांचे आशय विश्लेषणात्मक अध्ययन हा लेख लिहिला आहे.

या लेखामध्ये लेखकाने आशय विश्लेषणाच अर्थ, व्याख्या, आणि आशय विश्लेषणाचे उददेश स्पष्ट केले असून आशय विश्लेषणाचे एकक, महत्व व आशय विश्लेषणाचे उपयोग माहिती दिलेली आहे.

युनिर्व्हसिटी न्यूज या नियतकालिकाचे आशय विश्लेषणात लेखकाने युनिव्हर्सिटी न्यूज नियतकालिकाचा ऐतिहासिक आढावा, अभ्यासाचा उद्देश, संशोधन पध्दती व तंत्रे, युनिव्हर्सिटी न्यूज मधील सर्व आशयाचा आढावा, संपादकीय, बुक रिव्हू, कॅम्पस न्यूज या सर्व घटकांवरती आढावा घेतलेला आहे. युनिव्हर्सिटी न्यूज मधील समाविष्ट १० आशय घटकांपैकी सर्वात जास्त भर जाहिरातींवर दिला आहे तर लेख या सदरात सर्वाधिक लेख हे उच्च शिक्षणावर उपलब्ध दिसतात. ग्रंथालय आणि माहितीशास्त्रावरती १३ लेख प्रकाशित झालेले आहेत. प्रत्येक विद्यापीठाने दखल घ्यावे असे थेसीस ऑफ द मंथ या सदरामधून आपल्या विषयात आतापर्यंत किती व कोणत्या विषयावर काम झालेले आहे. याची महत्त्वपूर्ण माहिती युनिव्हर्सिटी न्यूज या नियतकालिकातून मिळते. (**बाहेती, २००८**)

४०. राऊत, दामोधर आणि कापडे, दिपक (२००८) यांनी योजना मराठी भाषेतील मासिकाचे आशय विश्लेषण: एक अभ्यास हा लेख लिहिला आहे.

आशय विश्लेषण हे निश्चित स्वरुपाची माहिती व प्रसार माध्यमांची अंतर्गत वैशिष्ट्ये यावर केंद्रित झालेले संशोधन आहे. या लेखामध्ये संशोधकाच्या निदर्शनास आले की, अर्थशास्त्र या विषयातील लेखांचे प्रमाण सर्वाधिक ३८.३१% आहे. तर एका लेखकाने लिहिलेल्या लेखांची संख्या ९२.४८% इतकी आहे.

एखाद्या पाठ्यपुस्तकातील किंवा अभ्यासक्रमात समाविष्ट असलेले विशिष्ट शब्द, संकल्पना, आशय वाक्यप्रचार, गुणवैशिष्ट्ये किंवा वाक्य यांचा शोध घेण्यासाठी व या अर्तभावाला वस्तुनिष्ठ पध्दतीने पात्र ठरविण्यासाठी या विश्लेषण पध्दतीचा वापर केला जातो. एखादे पुस्तक किंवा पुस्तकातील धडा, निबंध, मुलाखत, चर्चा, संभाषण, जाहीरात यांचा समावेश आशय विश्लेषणामध्ये केला जातो. लेखातून वाचकांच्या गरजांची पूर्तता होतांना आढळुन येते. (**राऊत, २००९**)

## सारांश

संशोधकाने सदर संशोधनासाठी महाराष्ट्रातील विविध विद्यापीठ ग्रंथालये, महाविद्यालयीन ग्रंथालये व वेबसाईटसला भेटी देवून संशोधन विषयाशी संबंधित संशोधन आणि वाचन साहीत्याचा आढावा घेतला आहे. त्याचबरोबर http://shodhganga.inflibnet.ac.in या वेबसाईट वरून संशोधन विषयाशी संबंधित पीएच्. डी. चे प्रबंधांचा अभ्यास केला. यंशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ ग्रंथालयातील एम. फिल. व एम. लिब. चे शोध प्रबंध यांचा उपयोग वाचन साहित्य आढावा घेताना केला. आशय विश्लेषणासंबंधित विविध ग्रंथ, नियतकालिकातील व इंटरनेट वरील लेख अभ्यासले. पुर्व वाचन साहीत्याच्या अभ्यासामध्ये आशय विश्लेषणच्या विविध घटकांच्या अनुषंगाने माहिती घेतली आहे. त्यानुसार उपलब्ध झालेली माहिती विविध मुद्याच्या आधारे सदर प्रकरणात देण्यात आली आहे. त्यामुळे प्रस्तुत संशोधन कार्यास निश्चित दिशा प्राप्त झाली आहे. या अभ्यासामुळे प्रस्तुत संशोधन हे नाविन्यपुर्ण वाटते.

# संदर्भसुची


- Awojob, E. and Adeokun O. (2012). Content Analysis of Agricultural Issues Reported in. *Library Philosophy and Practice (e-journal),* 1-6. doi:http://digitalcommons.unl.edu/cgi/viewcontent.cgi?article=1965&context=libphilprac

- Blancher, A. T. Buboltz, W., and Soper, Barlow. (2010). Content Analysis of the Journal of Counseling and Development Volumes 74 to 84. *Journal of Counseling& Development, 88*(2), 139-145. doi:http://connection.ebscohost.com/c/articles/49868450/content-analysis-journal-counseling-development -volumes-74-84

- Cardenas, C. M. (2013). Libraries and Information Services and the Content Analysis Method in Scientific Literature Produced in the Areas of Librarianship and Information Sciences in Mexico. *QQML*, 6-15. Retrieved December6,2013,from http://www.qqml.net/papers/September2013_Issue /239QQML_ Journal_2013_ Mireles Cardenas_3_305_312.pdf

- Cherian, Annamma. (1986). *A Content Analysis of the Selected Health and Hygiene, Nutrition and Family Planning Programmes of Pij Television and its impact on acquisition of knowledge by Rural People of the Selected Villages of Kheda District*. Unpublished Ph. D. Thesis. Baroda: The Maharaja Sayajirao University of Baroda.

- Chu, H. (2006). Curricula of LIS Programs in the USA: A Content Analysis. In D. S. C. Khoo (Ed.), *Proceedings of the Asia-Pacific Conference on Library & Information Education and Practice* (pp. 328-336). Singapore: School of Communication & Information, Nanyang Technological University. doi:http://citeseerx.ist.psu.edu/viewdoc/download?doi=10.1.1.89.1470&rep=rep1&type=pdf

- Chu, H. (2015). Research methods in library and information science: A content analysis. *Library & Information Science Research, 37*(1), 36-41. doi:10.1016/j.lisr.2014.09.003

- Devis, K. (2012). Content Analysis of Research Articles in Information Systems (LIS) Journals. *Library and Information Research, 36*(112), 16-28. Retrieved May 8, 2013, from http://www.lirgjournal.org.uk/lir/ojs/index.php/lir/article/viewFile/495/54

- Dhopte S. (2004). *Content Analysis of Dissertation of the Amravati University (1993-2003).* Unpublished Ph. D.Thesis, Amravati: Sant Gadge Baba Amravati University. Retrieved February 14, 2014, from http://sgbau.ac.in/SGB%20Amt%20Uni%20Website/libraryscience.html

- Feeney, M. (2005). Who Uses International Newspapers? A Content Analysis of Dissertations and Theses.1-9. Retrieved from http://www.ifla.org /files/assets /newspapers/SLC/2014_ifla_slc_feeney_who_uses_international_news papers.pdf

- Fiskin, R. and Nas S. (2013). A Content Analysis of the "International Journal on Marine Navigation and Safety of Sea Transportation" from 2007 to 2012. *International Journal on Marine Navigation and Safety of Sea Transportation, 7*(1), 145-149. doi:DOI: 10.12716/1001.07.01.19

- Fteimi, N. (2015). Main Research Topics in Knowledge Management: A Content Analysis of ECKM Publications. *The Electronic Journal of Knowledge Management, 14*(1), 5-17. Retrieved April 25, 2015, from www.ejkm.com/issue/download.html?idArticle=751

- Gala, Bhakti. (2013). *Library and Information Science Blogs: A Content Analysis.* Unpublished Ph. D. Thesis. Baroda: The Maharaja Sayajirao University. Retrieved December 16, 2015, from www.shodhganga. inflibenet.ac.in /handle/10603/38109

- Haneefa, M. Nellikka, Shyma. (2010). Content Analysis of Online English Newspapers in india. *DESIDOC Journal of Library & Information Technology*, *30*(4), 17-24. doi:http://publications.drdo.gov.in/ojs/index.php /djlit/article/view /292/252

- Haneefa, M. and Jasna K. (2014). Web 2.0 Applications in Online Newspapers: A Content Analysis. *Annals of Library and Information Studies, 61*(12), 307-319. Retrieved June 10, 2015, from http://nopr.niscair.res.in/handle/ 123456789/ 30338

- Howol, Vanita. (2012). *Content Analysis of ILA Bulletin and IASLIC Bulletin 2005-2007*: A Comparative Study. M. Phil Dissertation. Nashik: Yashwantrao Chavan Maharashtra Open University.

- Hsieh, Hsiu. F. and Shannon, S. E. (2005). Three Approches to Qualitative Content Analysis. *QUALITATIVE HEALTH RESEARCH, 15*(9), 1277-1288. doi:http://www.iisgcp.org/pdf/glssn/Supplemental_Reading_on_Coding_2.pdf

- Jimenez, R. (2012). Social Representations and Transitional Justice: A Qualitative Content Analysis of the Colombian Press. *International Journal of Interdisciplinary Social Sciences,6*(6),135-146.doi:http://iji.Cgpublisher.com/product/pub.88/prod.1485

- Joshi, Pradip. (2008). *Content Analysis of E-Journal 'Journal of Postgraduate Medicine' during 1997-2007*. Unpublished M. Phil Dissertation. Nashik: Yashwantrao Chavan Maharashtra Open University.

- Kannappanavar, B. U. and Jayaprakash. (2011). Content Analysis of Engineering College Library Websites. *Library Philosophy and Practice - Electronic Journal* , 1-8. doi:http://digitalcommons.unl.edu/libphilprac/673

- Kirankumar, G., Kumbar, M. and Somashekara. (2012). Content Analysis of Indian Institutes of Technology Library Websites. *University of Mysore* (pp. 484-492). Mysore: University of Mysore. doi:URI:http://eprints.uni-mysore.ac.in/id/eprint/15620

- Kondracki, N. L., Wellman, N. and Amundson, D. (2002). Content Analysis: Review of Methods and Their Applications in Nutrition Education. *Journal of Nutrition Education and Behavior, 34(*4), 224-230. Retrieved June 8, 2013, from http://www.sciencedirect.com/science/article/pii/S1499404606600973

- Kothari, C. R. (2013). *Research Methodology: Methods and Techniques.* New Delhi: New Age International Publishers.

- Krippendorff, Klaus. (2013). *Content Analysis: An Introduction to its Methodology.* New Delhi: Sage Publications.

- Kumar, Ranjit. (2011). *Research Methodology: a step- by- step guide for begineners.* New Delhi: Sage Publications.

- Latkar, Ravindra. (2009). *Content Analysis of Indian Journal of Infoamation Library and Society*. Unpublished M. Phil Dissertation. Nashik: Yashwantrao Chavan Maharashtra Open University.

- Lin, Chi- Shiou and Jeng Wei. (2014). Using Content Analysis in LIS Research: Experiences with Coding Schemes Constrction and Reliability Measures. *Qualitative and Quantitative Methods in Libraries*, *4*(1), 87-95. Retrieved December 5, 2015, from http://web.b.ebscohost.com

- Lokhande, R. (2015). Open Access LIS Jouranl "The Electronic Journal of Knowledge Management" (2005-2009): A Content Analysis. *Khandesh Librarya Association*, *5*(Special Issue), 17-21. Retrieved November 15, 2015

- Lokhande, R. S. (2013). Content Analysis of Open Access LIS Journal "ALIS" (2002-2011). *e-prints in Library and Information Science*, 6-20. doi:http://eprints.rclis.org/18283

- Mane, Manisha and Panage, B. M. (2015). Content Analysis of University Library Portal: A Detail Study of Jaykar Library Portal, Savitribai Phule University of PUne. *Academic Journal*, *7*(5), 109-116. doi:10.5897/IJLI2014.0532

- Naseer, Mirza M and Mahmood, M. M. (2009). LIS Research in Pakistan: An Analysis of Pakistan Library and. *Library Philosophy and Practice*, 1-10. doi:http://eprints.rclis.org/13803

- Naik, P. W. (2012). Content Analysis an Effective Way to Foster the Research Work. *PERL- A Journal of Library and Information Science*, *6*(4), 167-172. Retrieved June 8, 2013, from www.indianjournals.com/ijor.aspx?target= ijor:pjolis&volume=6&issue=4&article=00

- Neuendorf, K. A. (2002). *Content Analysis Guidebook*. New Delhi: Sage Publications.

- Noa, Aharony. (2011). Library and Information Science Research Areas: A Content Analysis of Articles from the top 10 Journals 2007–8. *Journal of Librarianship and Information Science*, *44*(1), 27-35. Retrieved June 5, 2013, from http://lis.sagepub.com/content/44/1/27.full.pdf+html

- Patil, N. and Lihitkar, S. (2013). Content Analysis of Library Herald 2008-2011. *RESEARCH FRONT*, *1*(1), 55-62. Retrieved December 6, 2013 , from http://www.researchfront.in/JAN-MAR%202013/9%20Analysis_of_Paper.pdf
- Patil, N. P. (2012). E-Journal Ariadne: Content Analysis. *Online International Interdisciplinary Research Journal,*, *2*(2), 262-270. Retrieved April 4, 2013, from http://www.oiirj.org/oiirj/mar2012/30.pdf
- Plathottam, George. (2015). *Press and Its Social Responsibility in Northeast India: A Content Analysis.* Unpunlished Ph. D. Thesis, Shillong: North - Eastern Hill University. Retrieved December 16, 2015, from www.shodhganga. inflibenet.ac.in /handle/10603/61314
- Pratapure, S. and Khaparde, V. (2014). Content Analysis of Information Technology in Biomedicine. *Journal of Library and Information Sciences, 2*(1), 39-48. doi:DOI: 10.15640/jlis
- Sampathkumar, B. T. and Reddy Raghavendra. (2009). Content Analysis of Indian Institute of Management Library Websites: An. In P. Pondicherry University (Ed.), *7th International CALIBER 2009* (pp. 194-201). Pondicherry:PondicherryUniversity,Puducherry,doi:http://www.inflibnet. ac.in /caliber2009/CaliberPDF/25.pdf
- Savitha, K. S., and Kenchakaller, P. (2016). An Engineering College Library Websites of Mysore: A Content Analysis. *Research Journal of Library Sciences*, *4*(3), 5-10. Retrieved April 9, 2016, from www.isca.in
- Schreier, M. (2012). *Qualitative Content Analysis in Practice.* New Delhi: Sage Publications.
- Shavnam, Kumari. (2014). *Content Analysis of Gender Perspective in CBSE extbooks of Hindi, English and Social Study of VIII Standard.* Unpublished Ph. D. Thesis. Jaipur: University of Rajasthan.
- Shivendu, P. (2013). *A Content Analysis of Enviornmental Education Textbook of Primary Stage in School of Rajasthan*. Unpublished Ph. D.Thesis. Allahabad: U. P. Rajarshi Tondon Open University. Retrieved February 14, 2014, from http://shodhganga.inflibnet.ac.in/handle/ 10603/9293

- Sivakumar, S. (2004) *Crime Reporting in the Print Media in Tamilnadu: A Content Analysis.* Unpublished Ph. D. Thesis. Chennai: Anna Centre for Public Affairs University of Madras. Retrieved December 16, 2014, from www.shodhganga. inflibenet.ac.in /handle/10603/80586

- Swapna, V. S. and Francis, A. T. (2014, Octomber). Management of Library Websites of Agricultural Universities in South India: A Content Analysis. *Library Progress, 34*(2), 87-95. doi:10.5958/2320-317x.2014.00001.4

- Tigga, U. P., Lihitkar, Shalini and Rajyalakshmi. (2005). Content Analysis of DESIDOC Bulletin of Infoamtation Technology (1997-2002). *DESIDOC Bulletin of Infoamtation Technology, 25*(4), 5-18.

- Vasavada, Falguni. (2008). *A Content Analysis of Print and Television Advertisements in Selected Brands in Post Liberalization Era: With Special Reference to Changes in the Competitive Environmen.t* Unpublished Ph. D. Thesis. Vallabh Vidyanagar: Sardar Patel University.

- Vijaykumar, M., Kannappanavar, B. U. and Mestri, Mamta. (2009). content analysis of Indian institutes of technology libraries web. *DESIDOC Journal of Library & Information Technology, 29*(1), 57-63. doi:http://publications. drdo.gov.in/ojs/index.php/djlit/article/view/231

- Walia, P., and Kaur, M. (2012). Content Analysis of Journal Literature published from UK and USA. (2012). *Library Philosophy and Practice (e-journal)*, 1-17. Retrieved from http://digitalcommons. unl.edu/cgi/viewcontent .cgi?article=2109&context=libphilprac

- Weare, C. and Lin, W. (2000). Content Analysis of the World Wide Web: Opportunities and Challenges. *Social Science Computer Review, 18*(3), 272-292. doi:content/18/3/272.abstract

- Weber, R. P. (1990). *Basic Content Analysis.* New Delhi: Sage Publications.

- White, M. D. and Marsh E. E. (2006). Content Analysis: A Flexible Methodology. *Library Trends, 55*(1), 22-45. Retrieved April 15, 2015, from https://www.ideals.illinois.edu

- Yang, D., Jennifer,C., Richardson and Lehman, J. (2011). The Development of a Content Analysis Model for Assessing Students Cognitive Learning in Asynchronous Onliene Discussions. *Educational Technology Research and Development,59*(1),43-70.doi:http://link.springer.com/article/10.1007%2Fs11 423-010-9166-1

- Yadav, Akhilesh and Bankar, Prerana. (2016). Employment Opportunities in LIS Field in India: A Content Analysis of Positions Advertised. *Annals of Library and Information Studies, 63*(3), 53-58. doi:http://hdl.handle.net/123456789/33889

- *http://guides.library.harvard.edu/literaturereview*. (n.d.). Retrieved May 10, 2015, from http://guides.library.harvard.edu/literaturereview

- http://www.ycmou.ac.in/

- http://shodhganga.inflibnet.ac.in

- (www.library.bcu.ac.uk)

- *http://www.enotes.com/homework-help/what-objectives-doing-literature-review-154051*. (n.d.). Retrieved April 15, 2015.

- आगलावे, प्रदीप. (२०१०). *सामाजिक संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्रे.* नागपूर, साईनाथ प्रकाशन.

- आभाळे, जनाबाई. (२०१२). *साहित्यिक रंगनाथ पठारे यांच्या वाङमयाचे आशय विश्लेषण.* अप्रकाशित एम. लिब. प्रकल्प. नाशिक: यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ.

- अंबादे, अरूणा. (२००८). *इन्फ्लिबनेटद्वारे आयोजित केलेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेमधील लेखांचे आशय विश्लेषण.* अप्रकाशित एम. फिल. लघुशोध प्रबंध, नाशिक: यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ.

- कायंदे- पाटील, गंगाधर. (२००५). *संशोधन पध्दती.* नाशिक: चैतन्य पब्लिकेशन.

- कुंभार, राजेंद्र. (२०१३). *ग्रंथालय आणि माहितीशास्त्र संशोधन.* पुणे, युनिव्हर्सल प्रकाशन.

- कऱ्हाडे, बी. एम. (२०११). *शास्त्रीय संशोधन पध्दती.* नागपूर, पिंपळापूरे ॲण्ड कं. पब्लिशर्स.
- काळे, अंजली. (२००८). *समाज प्रबोधन पत्रिका या नियतकालीकातील लेखांचा आशय विश्लेषणात्मक अभ्यास (१९९८-२००७).* अप्रकाशित एम. फिल. लघुशोध प्रबंध, नाशिक: यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ.
- गोणे, इंदू. (२००६). *माहिती महामार्ग विविधा नियतकालिकातील लेखांचे आशय विश्लेषण.* अप्रकाशित एम. लिब. प्रकल्प. नाशिक: यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ.
- घाटोळे, रा. ना. (२०१०). *समाजशास्त्रीय संशोधन: तत्त्वे व पध्दती.* नागपूर, श्री मंगेश प्रकाशन.
- चौगुले, प्रकाश. (२००८). *ऑल इंडिया रिपोर्टर जानेवारी १९९७ ते डिसेंबर २००६: आशय विश्लेषण.* अप्रकाशित एम. फिल. लघुशोध प्रबंध, नाशिक: नाशिक: यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ.
- थेटे, संतोष. (२०१०). *साधना या नियतकालिकाचे आशय विश्लेषण.* अप्रकाशित एम. लिब. प्रकल्प. नाशिक: यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ.
- जाधव, दत्तात्रेय. (२०११). *शिक्षण संक्रमण या मासिकाचा आशय विश्लेषणात्मक अभ्यास.* अप्रकाशित एम. लिब. प्रकल्प. नाशिक: यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ.
- जोशी, स्नेहल आणि खोत, नमिता. (२०११). साहित्यसूची: आशय विश्लेषण. *ज्ञानगंगोत्री,* १२(१-२), ४५-५३.
- दळवी, विघ्नेश. (२०१२). *भारतातील ग्रंथालय आणि माहितीशास्त्रावरील मुक्त स्त्रोत नियतकालिकांचा अभ्यास व ॲनल्स ऑफ लायब्ररी आणि इन्फर्मेशन स्टडीज या नियतकालिकाचे आशय विश्लेषण.* अप्रकाशित एम. लिब. प्रकल्प. नाशिक: यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ.

- बोबडे, माधवी. (२००८) *यांनी इफ्ला जर्नल: आशय विश्लेषण (२००२ ते २००७)* अप्रकाशित एम. लिब. प्रकल्प. नाशिक: यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ.
- पाटील, पुनम. (२००९) *जीवन शिक्षण नियतकालिकाचे आशय विश्लेषणात्मक अध्ययन.* अप्रकाशित एम. लिब. प्रकल्प. नाशिक: यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ.
- पाटील, वा. भा. (२०१२). *संशोधन पध्दती.* जळगांव, प्रशांत पब्लिकेशन्स.
- पाटील, सीमा. (२०१०). *युनिव्हर्सिटी न्यूज या नियतकालिकाचे आशय विश्लेषण.* अप्रकाशित एम. लिब. प्रकल्प. नाशिक: यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ.
- पावरा, एकलव्य. (२०११). *आंदोलन- शास्वत विकासासाठी या नियतकालिकाचे आशय विश्लेषण.* अप्रकाशित एम. लिब. प्रकल्प. नाशिक: यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ.
- पोरे, मेघा. (२०१२). *लोकराज्य नियतकालिकाचा आशय विश्लेषणात्मक अभ्यास.* अप्रकाशित एम. लिब. प्रकल्प. नाशिक: यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ.
- परब, संपदा. (२०१२). *आरती या नियतकालिकाचे आशय विश्लेषण.* अप्रकाशित एम. लिब. प्रकल्प. नाशिक: यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ.
- बनप, मैथिली. (२०११). *बळीराजा नियतकालिकाचा आशय विश्लेषणात्मक अभ्यास.* अप्रकाशित एम. लिब. प्रकल्प. नाशिक: यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ.
- बाहेती, सत्यनारायण आणि डगवार, शामकांत. (२००८). University News या नियतकालिकचे आशय-विश्लेषणात्मक अध्ययन. *ज्ञानगंगोत्री,* ८(४), ३६-५२.
- बापते, विशाल. (२०१६). डेसिडॉक जर्नल ऑफ लायब्ररी ॲण्ड इन्फॉरमेशन टेक्नॉलॉजी या नियतकालिकाच्या सन २०१० ते २०१५ या कालावधीत पसिध्द झालेल्या संशोधनपर लेखांचे आशय विश्लेषण. *ज्ञानगंगोत्री, १६*(३-४), ३-१८.
- बोधनकर, सुधीर., अलोणी, विवेक., आणि. कुळकर्णी, मृणाल. (२०११). *सामाजिक संशोधन पध्दती.* नागपूर, साईनाथ प्रकाशन.

- भामरे, वैशाली. (२००९). *भारतीय इतिहास आणि संस्कृती या नियतकालिकाचे आशय विश्लेषण.* अप्रकाशित एम. लिब. प्रकल्प. नाशिक: यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ.
- भाले, योगेश. (२००९). *बुलेटिन ऑफ दि मराठवाडा मॅथेमॅटिकल सोसायटी या जर्नलच्या उल्लेखांचे विश्लेषण आणि आशय विश्लेषण.* अप्रकाशित एम. फिल. लघुशोध प्रबंध, नाशिक: यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ
- मुरकुटे, सुधीर. (२००८). *योजना या नियतकालिकातील लेखांचे आशय विश्लेषण व निर्देश तयार करणे.* अप्रकाशित एम. फिल. लघुशोध प्रबंध, नाशिक: यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ.
- राऊत, दा. आणि कापडे, दि. (२०१३). योजना मराठी भाषतील मासिकाचे आशय विश्लेषण: एक अभ्यास (२००९-२०१०). ज्ञानगंगोत्री, ३(५), १-४.
- राशिवाडे, बाळू. (२०१२). *ऋग्वेद या नियतकालिकाचे आशय विश्लेषण हा प्रकल्प.* अप्रकाशित एम. लिब. प्रकल्प. नाशिक: यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ.
- रिसवडकर, म. रा. (२०१२). *संशोधन: व्याख्या आणि पध्दती.* नाशिक, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ.
- वाणी, विजया. (२००८). *संशोधक या नियतकालिकाचे आशय विश्लेषण.* अप्रकाशित एम. फिल. लघुशोध प्रबंध, नाशिक: यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ.

# प्रकरण तिसरे

# आशय विश्लेषण

## ३.१. प्रस्तावनाः-

मानव प्रतिकांपेक्षा भाषेच्या माध्यमातून आपले विचार अधिक प्रभावीपणे व्यक्त करतो. कारण मनुष्याच्या भाव-भावना, ज्ञान, मत, विचार, मूल्य यांना अभिव्यक्त करण्यास भाषा हे महत्वाचे साधन आहे. लिखित साहित्यामुळे मुद्रित माध्यमांचे महत्त्व मोठ्या प्रमाणात आहे. कारण भाषेद्वारे लोकांच्या भावना, मतं, विचार, ज्ञान यांची देवाण-घेवाण करणे सहज शक्य होते. हे ज्ञान वाढविण्यासाठी मानव प्रामुख्याने ग्रंथ आणि नियतकालिकांचा वापर करतो. अर्थात काळाच्या ओघात मनुष्याने वाचन साहित्याचे अनेक प्रकार विकसित केले आहे. आणि त्यामध्ये सातत्याने नवीन वाचनसाहित्य प्रकारांची भर पडत आहे.

ग्रंथालयशास्त्रामध्ये वाचन साहित्याच्या दोन पैलुंबाबत संशोधन केले जाते. एक म्हणजे वाचन साहित्याचे बाह्य स्वरुप, आणि दुसरे वाचन साहित्यातील आशय. वाचन साहित्याच्या बाह्य स्वरुपामध्ये ग्रंथांची बांधणी, आकार, वेष्टन इत्यादीचा समावेश होतो, तर अंतर्गत स्वरुपामध्ये आशयाचे स्वरुप, आशयाची अद्यायावतता, लेखक आणि विषय इत्यादींचा समावेश होतो. वाचनसाहित्याच्या बाह्य व अंतर्गत स्वरुपाचे विश्लेषण करण्यासाठी संशोधनाच्या प्रक्रियेत ज्या अनेक तंत्रांचे आयोजन करण्यात येते. त्यापैकी आशय विश्लेषण हे एक महत्वपूर्ण तंत्र आहे. **(कऱ्हाडे, २०११)**

ग्रंथालय आणि माहितीशास्त्र या विषयात देखील आशय विश्लेषणाचा सातत्याने वापर होतांना दिसून येतो. ग्रंथालयशास्त्रामध्ये विविध कामांमध्ये प्रत्येक पातळीवर आशय विश्लेषण या तंत्राचे आयोजन केले जाते. ग्रंथालयात वाचन साहित्याची निवड करतांना ग्रंथपाल वाचनसाहित्याच्या आशयाचे विश्लेषण करुनच वाचन साहित्याच्या खरेदीचा निर्णय घेतो. तसेच कपाटात ग्रंथ मांडणी करतांना उपभोक्त्यांना उपयुक्त असणारे ग्रंथ दर्शनी भागात ठेवले जातात ते देखील एक आशय विश्लेषणच असते. ग्रंथांची निवड करतांना ग्रंथपाल ग्रंथांच्या आशयाचे विश्लेषण करूनच ग्रंथखरेदीचा निर्णय घेत

असतो. थोडक्यात आशय विश्लेषण ह्या तंत्राचा ग्रंथालय आणि माहितीशास्त्राच्या अभ्यासाठी एक उपयुक्त तंत्र म्हणून उपयोग होतो. **(रिसवडकर, २००५)**

### ३.२. आशय विश्लेषणाचा विकासः-

सामाजिक संशोधनात आशय विश्लेषणाच्या विकासाला पत्रकारीतेपासून प्रेरणा मिळाली. १९२६ मध्ये मेल्कोम विल्ली यांनी वर्तमानपत्रांवर आधारीत आशय विश्लेषणाचा अभ्यास केला. ते अमेरिकेतील कोलंम्बिया विद्यापीठाचे विद्यार्थी होते. त्यांनी The Country Newspaper या शीर्षकांतर्गत अमेरिकेतील वर्तमानपत्राचे विश्लेषण केले. त्यानंतर १९३० मध्ये जे. एल. वुडलँड यांनी Foreign News in American Meaning Newspapers या अमेरीकेतील वर्तमानपत्रात विदेशी बातम्यांना किती स्थान दिले जाते, याचे विश्लेषण केले. १९३२ मध्ये एफ. फेरीस यांनी वर्तमानपत्रांच्या माध्यमातून गुन्हेगारीचे प्रमाण माहिती करुन घेणाचा प्रयत्न केले. हेरॉल्ड लॉसवेल यांनी १९३७ मध्ये मनोवैज्ञानिक मुलाखतीमध्ये माहितीदात्यांच्या प्रतिक्रियेत आपल्या प्रति, आपल्या विरोधी, दुसऱ्याच्या प्रति, तथा दुसऱ्या विरोधी या श्रेणीमध्ये विभाजीत केले. व त्यातून हे जाणून घेण्याचा प्रयत्न केला की, अशा प्रकारची प्रतिउत्तरे किती वेळा प्राप्त होऊ शकतात. हा सर्व अभ्यास आशय विश्लेषणाच्या अभ्यासाची सुरवात होती. त्यामुळे सामाजिक संशोधनातील एक तंत्र म्हणून आशय विश्लेषणास विशेष महत्व प्राप्त झाले.

१९५०-१९५९ या दशकात आशय विश्लेषण पत्रकारितेपर्यंतच मर्यादित न राहाता मानसशास्त्र, इतिहास, शिक्षण, समाजशास्त्र, तसेच साहित्य विश्लेषणातसुध्दा वापरले जावू लागले. १९६० नंतर आशय विश्लेषणामध्ये संगणकाचा केला जावू लागला. आशय विश्लेषणामध्ये संगणकाचा वापर सुरु झाल्यामुळे माहितीच्या विश्लेषणामध्ये अधिक सुसूत्रता येवू लागली, त्याच बरोबर मानवी हस्तक्षेप कमी झाल्यामुळे माहिती मधील तटस्थता, अचूकता आणि वैज्ञानिकता आली. **(कऱ्हाडे, २०११)**

## ३.३ आशय विश्लेषण पध्दती अर्थ व व्याख्या:-

आशय विश्लेषण ही एक उपयुक्त अशी संशोधन पध्दती आहे. सामाजिक संशोधनात आशय विश्लेषण हे उपयुक्त अभ्यासतंत्र आाहे. या तंत्राचा गुणात्मक तथ्यांचे सांख्यिकीय आणि वस्तुनिष्ठ तथ्यांत रूपांतर करण्यासाठी हे तंत्र वापरले जाते. या तंत्राचा उद्देश माहितीचे संप्रेषण साधनांचा (ग्रंथ, वर्तमानपत्रे, नियतकालिके व अन्य लिखित साहित्यांचे) संख्यात्मक आणि गुणात्मक विश्लेषण करणे हा आहे. थोडक्यात वाचनसाहित्याच्या माध्यमातून जी माहिती वाचकांपर्यत प्रसारित होते त्या माहितीचे संख्यात्मक आणि गुणात्मक अशा दोन्ही प्रकारचे विश्लेषण आशय विश्लेषणामध्ये केले जाते.

आशय विश्लेषण हे वाचन साहित्याच्या अभ्यासासाठी अतिशय उपयुक्त तंत्र आहे. आशय विश्लेषण या तंत्राच्या अभ्यासकांनी आपल्या अभ्यासातून पुढील प्रमाणे व्याख्या दिल्या आहेत. या व्याख्यांमध्ये आशय विश्लेषण तंत्राच्या पद्वती, वैज्ञानिक औचित्य आणि त्यांच्या प्रक्रियांचे वर्णन आढळुन येते.

**आशय विश्लेषणाच्या व्याख्या-**

वेगवगळ्या विचारवंतानी आशय विश्लेषणाच्या निरनिराळ्या व्याख्या केल्या आहे. त्यापैकी काही प्रमुख व्याख्या पुढीलप्रमाणे दिल्या आहे.

**कऱ्हाडे यांच्या ग्रंथात म्हटल्याप्रमाणे आणि बेरेलसन यांच्या मतानुसार** संज्ञापनातील व्यक्त किंवा प्रकट आशयाच्या वस्तुनिष्ट, पध्दतशीर आणि संख्यात्मक वर्णन आहे. नंतरच्या काळामध्ये अप्रकट आशयाचे विश्लेषण करण्याची प्रक्रियासुद्वा आशय विश्लेषणात समाविष्ट करण्यात आली. अप्रकट आशयाचे विश्लेषण हे गुणात्मक आशय विश्लेषण असते.

(Content analysis is a research technique for the objective, systematic and quantitative description of the manifest content of communication. The word communication here refers to available written material or print media. The word manifest means which is presented outwardly. - Bernard Berelson (**Berlson, 1959**)

**गुड आणि हॅट** यांच्या मते आशय विश्लेषण हे आशयाच्या गुणधर्माचे विश्लेषण आहे. आशयाच्या विषयानुसार विश्लेषण करावयाचे झाल्यास आशयाचे राजकीय, प्रचारात्मक, शुध्द

सामाजिक, तात्विक संशोधनपर किंवा मनोरंजक असे वर्गीकरण करता येईल. यालाच आशयाचे गुणधर्मानुसार विश्लेषण म्हणतात. (**बाहेती, २००८**)

**वेपल्स आणि बेरलसन** यांच्या मते क्रमबध्द आशय विश्लेषण पध्दती ही आशय विवरणाची अधिक तार्किक व्याख्या करण्याचा प्रयत्न करते, ज्यामुळे वाचक आणि श्रोत्यांना प्रदान करण्यात येणाऱ्या प्रेरणांचे स्वरुप तसेच सापेक्ष प्रभावाला वस्तूनिष्ठ स्वरुपात प्रकट केले जावू शकेल.

(Systematic content analysis attempts to define more causal description of the content, so as to show objectively the nature and relative strength of the stimuli applied to the reader or listener.- **Wepels and Berelson**)

**पॉलिन यंग** यांच्या मते मुलाखत, प्रश्नावली, अनुसूची आणि इतर लिखित किंवा मौखिक भाषाविषयक आणि अभिव्यक्तीद्वारे प्राप्त संशोधन तथ्यांच्या आशयाचे क्रमबध्द, वस्तुनिष्ठ आणि परिमाणात्मक वर्णन करण्यासाठी उपयोगात आणले जाणारे संशोधन तंत्र म्हणजे आशय विश्लेषण होय.

Content analysis is a research technique for the systematic, objective and quantitative description of the content of research data procured through interviews, questionnaires, schedules and other linguistic expressions, written or oral. (**Young, 1982**)

पॉलिन यंग यांनी स्वत: नमुद केल्या प्रमाणे त्यांची ही व्याख्या बर्नाड बेरेल्सन यांच्या व्याख्येचे संशोधित रूप आहे. भाषाविषयक अभिव्यक्तीद्वारे प्राप्त संशोधन तथ्यांच्या आशयाशी विश्लेषणाचा सबंध असतो. या बाबीवर यंग यांनी विशेष भर दिला आहे आणि या आशयाचे क्रमबध्द वस्तुनिष्ठ परिमाणात्मक वर्णन करण्याचा प्रयत्न आशय विश्लेषण या तंत्राद्वारे केला आहे. **(आगलावे, २०१०)**

**क्रिपेनडॉर्फ** यांच्या मतानुसार आशय विश्लेषण ही प्रलेखातील आशयाच्या विश्लेषणाद्वारे पुनरावृत्तीयोग्य आणि वैध निष्कर्ष काढण्याची संशोधन पध्दती आहे.

या पध्दतीमध्ये आशयाच्या विश्लेषणद्वारे संशोधन समस्येची उत्तरे शोधली जातात. आशय विश्लेषणाद्वारे काढलेले निष्कर्ष पुनरावृत्तीयोग्य असले पाहिजे असा क्रिफेनडॉर्फ यांचा निष्कर्ष आहे. **(कुंभार, २०१३)**

**आर. पी. वेबर** यांच्या मतानुसार आशय विश्लेषण ही वाचन साहित्याआधारे निष्कर्ष काढण्याची प्रक्रिया आहे. वैध निष्कर्ष म्हणजेच विश्वासार्ह, अचुक निष्कर्ष होय, तर्कशुध्द निष्कर्ष होय. (**Weber, 1990**)

वरील व्याख्यांवरून स्पष्ट होते की, आशय विश्लेषण हे प्रत्यक्ष संज्ञापनातील प्रत्यक्ष आशयाचे वस्तुनिष्ठ संख्यात्मक विश्लेषणाचे तंत्र आहे. या तंत्राद्वारे गुणात्मक तथ्यांचे सांख्यिकीय व वस्तुनिष्ठ तथ्यांत रूपांतर करता येते. तसेच आशय अथवा आंतरीक तथ्य यांचेही विश्लेषण केले जाते.

### ३.४ आशय विश्लेषणाची वैशिष्टये -

आशय विश्लेषणाच्या वरील व्याख्यांवरुन पुढीलप्रमाणे वैशिष्टे सांगता येतील.

१. वारंवारिता: संशोधक किंवा अभ्यासक एखाद्या वाचन साहित्याचा अभ्यास करीत असतांना त्याच्या निदर्शनास येते की, त्या वाचन साहित्यामध्ये एखादी संकल्पना किंवा संज्ञा अनेक वेळा वापरली आहे. ही संकल्पना किंवा संज्ञा किती वेळा वापरली गेली याची मोजणी करणे म्हणजे वारंवारिता मोजणे. उदाहरणार्थ ‘उध्दरण विश्लेषण’ या लेखामध्ये सह-उध्दरण ही संज्ञा किती वेळा नमूद केली आहे हे मोजणे म्हणजे वारंवारिता तपासणे.

२. विचारांची दिशा: ज्या वाचन साहित्याचे विश्लेषण करावयाचे आहे, त्या वाचन साहित्यात एका विशिष्ट विषयाबाबत सकारात्मक व नकारात्मक अशा दोन्ही प्रकारचे मत प्रदर्शन केलेले असू शकते. म्हणजेच एखाद्या घटकाच्या बाबतीत आशय विश्लेषण करीत असलेल्या वाचन साहित्यातील विचारांची दिशा वेगवेगळी असू शकते.

३. वस्तुनिष्ठता:- कोणत्याही विषयाचे आशय विश्लेषण करतांना त्याचे अशा प्रकारे विश्लेषण झाले पाहिजे की, त्या विषयाचे इतर विश्लेषणकर्त्यांनी केलेल्या विश्लेषणातून येणारे निष्कर्ष देखील इतर विश्लेषणकर्त्यांनी केलेल्या विश्लेषणाप्रमाणेच असावयास हवे.

४. तीव्रता:- विश्लेषण करीत असलेल्या वाचनसाहित्यातील आशयातून विशिष्ट विषयाबद्यलची भावना किती सकारात्मक आहे किंवा नकरात्मकता आहे हे किती तीव्रतेने व्यक्त होते आहे. हे माहिती

करुन घेण्याची व्यवस्था करणे आवश्यक असते. उदाहरणार्थ इंटरनेट वरील ज्ञानाच्या उपलब्धते मुळे लिखित ग्रंथाचे महत्व कमी होईल हे विधान नकारात्मकता दर्शविते तर इंटरनेट मुळे ग्रंथालयाकडे सेवा देण्यासाठी आणखी एक पर्याय निर्माण झाला हे विधान सौम्य होकार दर्शवीते.

५. सुसूत्रता किंवा क्रमबध्दता:- आशय विश्लेषणामध्ये सुसूत्रता म्हणजे आशयाच्या सर्व घटकांचा समावेश करून त्याचे पध्दतशीरपणे विश्लेषण केले पाहिजे, त्यामुळे समस्येशी संबंधित तथ्यांनाच संकलित केले जावून, माहितीच्या विश्लेषणामध्ये सुसूत्रता येवून पक्षपात होणार नाही.

६. आशयाचे आकारमान: आशय विश्लेषणामध्ये करीत असलेल्या वाचनसाहित्यामध्ये विशिष्ट विषयासाठी किती जागा दिलेली आहे याचे मोजमाप आशय विश्लेषणात केले जाते. यासाठी लेखांची संख्या, लेखकांची संख्या, शब्दांची संख्या मोजता येते. तसेच, वाचनसाहित्यातील मोठ्या घटकापासून लहानात लहान घटकापर्यत असलेल्या माहितीचे मोजमाप करता येते. **(कुंभार, २०१३)**

## ३.५ आशय विश्लेषणाचे उद्देश:-

कोणत्याही विषयाचा अभ्यास करतांना त्या विषयाचे उद्देश ठरविणे हे महत्वाचे आहे. श्री. बोधनकर आणि अलोणी यांनी आशय विश्लेषणाचे काही उद्देश सांगितले आहे ते पुढिल प्रमाणे. .

१. आशय संज्ञापनाच्या दिशेने वर्णन करणे.
२. विद्वत्तेचे विकसन कशा प्रकारे होते ते दर्शविणे.
३. आशय संज्ञाबाबत राष्ट्रां-राष्ट्रांमधील भिन्नत्व स्पष्ट करणे.
४. संशोधन माध्यमे आणि संशोधन पातळीची तुलना करणे.
५. अधिष्ठांच्या संबंधात संज्ञापन आशयाची तपासणी करणे.
६. संज्ञापन मापदंडाची रचना करणे.
७. तांत्रिक स्वरुपाच्या संशोधन कार्यास साहाय्य करणे.
८. शैली लक्षणांचा शोध घेणे.

## ३.६ आशय विश्लेषणाचे प्रकार (Different Types of Content Analysis)-

आशय विश्लेषणाचे प्रामुख्याने दोन प्रकार सांगता येतील.

### ३.६.१ संकल्पनात्मक आशय विश्लेषण (Conceptual Analysis)

संकल्पनात्मक विश्लेषण या पध्दतीमध्ये एका घटकाची किंवा निवड केली जाते. त्या विशिष्ट घटकाचे किवां संज्ञेचे परीक्षण (examination) केले जाते आणि ते घटक अस्तित्वात आहे किंवा नाही (quantifying and tallying) याचे विश्लेषण केले जाते. या पध्दतीमध्ये काही निवडक संज्ञा किंवा घटकाचे विविध विभागामध्ये वर्गीकरण केले जाते. हे वर्गीकरण काही अंशी काल्पनिक स्वरुपाचे असते. काल्पनिक संज्ञा ओळखण्यास सोप्या असल्या तरी त्या संज्ञेचे परिणाम पातळी ठरविणे आणि त्याची विश्वसनियता आणि वैधता तपासणे कठीण आणि गुंतागुतींची असते.

संशोधनाची सुरवात ही संशोधनाच्या प्रश्नापासून आणि नमुना निवडीपासून होते. निवडलेल्या घटकांची विशिष्ट श्रेणीमध्ये मांडणी (code) केली जाते. कोडींग प्रकियेमध्ये अनावश्यक संज्ञा कमी केल्या जातात. यामध्ये शब्द, वाक्य कमी करुन संशोधक विशिष्ट संज्ञेवर लक्ष केंद्रित करतो.

संकल्पनात्मक विश्लेषणाच्या पायऱ्या:-

संकल्पनात्मक विश्लेषणाच्या पायऱ्या पुढीलप्रमणे

१. विषयाची विश्लेषण पातळी ठरविणे

Decide the level of analysis.

२. विशिष्ट घटकातील किती संकल्पना कोड करावयाच्या आहे ते ठरविणे

Decide how many concepts to code for.

३. संकल्पनेचे अस्तित्व किंवा वारंवारता कोड करावयाची किंवा नाही ते ठरविणे

Decide whether to code for existence or frequency of a concept.

४. संकल्पना इतर संकल्पने पेक्षा कशी वेगळी आहे ते ठरविणे

Decide on how you will distinguish among concepts.

५. कोडींगसाठी नियम तयार करणे

Develop rules for coding your texts.

६. असंबंध माहिती बाबतचे धोरण ठरविणे

Decide what to do with "irrelevant" information.

७. माहिती कोड करणे

Code the texts.

८. परिणामांचे विश्लेषण करणे

Analyze your results.

### **३.६.२ संबंध विश्लेषण** (Relational Analysis)

संबंध विश्लेषणामध्ये संकल्पनात्मक विश्लेषणासारखेच संज्ञाची निवड केली जाते. संबंध विश्लेषणात संशोधक केवळ उपयोगात आणलेल्या शब्दांच्या प्रकारावर वेळ वाया घालवत नाही तर शब्दांचे वजन व गहनता यांचा परस्पर संबंध देखील विचारात घेतला जातो. या पध्दतीमध्ये विशिष्ट संज्ञेच्या सकारात्मक व नकारात्मक बाजुंचा विचार करुन त्या घटकाची अर्थपूर्ण मांडणी केली जाते. संबंध विश्लेषण पध्दतीमध्ये विशिष्ट संज्ञेचे किंवा घटकांचे विश्लेषणाबरोबर त्या विशिष्ट संज्ञेचे किंवा घटकांचे अर्थपूर्ण संबंधाचा शोध घेतला जातो.

संबंध विश्लेषणाच्या पायऱ्या

१. प्रश्नांची किंवा संकल्पनेची निवड करणे

Identify the question.

२. सॅम्पल घटकांची निवड करणे

Choose a sample or samples for analysis.

३. संबंध विश्लेषणाचे प्रकार ठरविणे

Determine the types of analysis.

४. अनावश्यक संज्ञा कमी करणे

Reduce the text to categories and code for words or patterns.

५. संज्ञामधील संबंध स्पष्ट करणे

Explore the relationship between concepts.

६. संज्ञामधील कोड ठरविणे

Code the relationship.

७. सांख्यिकीय स्वरुपात माहितीची मांडणी करणे

Perform the statistical analysis.

८. आलेखाव्दारे माहितीचे सादरीकरण करणे.

Map out the representation. (**www.rangahau.co)**

सॅन्डर्स आणि पिन्हे यांनी आशय विश्लेषणाचे पुढील प्रमाणे पाच प्रकार सांगितले आहे.

१. शब्दगणना विश्लेषण

२. अवधारणात्मक विश्लेषण

३. शब्दार्थ विश्लेषण

४. मूल्यांकनात्मक अभिकथन विश्लेषण

५. संदर्भात्मक विश्लेषण

आर. के. मर्टन (R. K. Mertan) आणि पॉल एफ, लेजरफिल्ड (Paul F. Lazarfeld) यांनी आशय विश्लेषणाचे पुढील प्रमाणे सहा प्रकार सांगितले आहे.

१. चिन्हगणना विश्लेषण

२. चिन्हांचे एकपक्षीय वर्गीकरण

३. भिन्न भाग विश्लेषण

४. विषय अथवा प्रसंग विश्लेषण

५. संरचनात्मक विश्लेषण

६. प्रचार विश्लेषण **(कऱ्हाडे, २०११)**

## ३.७ आशय विश्लेषणाचे एकक

आशय विश्लेषणास वस्तुनिष्ठ, क्रमबध्द आणि परिणामकारक बनविण्यासाठी विश्लेषणाचे एकक निवडणे आवश्यक असते. हा या तंत्राच्या प्रक्रियेचा एक अतिशय महत्त्वाचा भाग आहे. आशय विश्लेषणाचे एकक हे शब्द, वाक्य, परिच्छेद, प्रसंग, पात्र, स्थान, वेळेचे मापन इत्यादी अनेक प्रकारचे असू शकतात. यापैकी शब्द, वाक्य आणि परिच्छेद हे तीन एकक व्याकरण संबंधीचे एकक असून बाकीचे एकक अव्याकरण संबंधिचे आहेत. आशय विश्लेषणाचे एकक पुढीलप्रमाणे आहेत.

**१. शब्द (Words):** आशय विश्लेषणामध्ये प्रत्येक एकक महत्वपुर्ण असते. शब्द हे एकक देखील आशय विश्लेषणात अतिशय महत्वपूर्ण आहे. आशय विश्लेषणातील सर्वात लहान एकक म्हणजे शब्द होय. अध्ययन केल्या जाणाऱ्या विषयात, भाषणात, लेखात, संपादकीयमध्ये किंवा इतर लिखित किंवा मौखिक सामुग्रीमध्ये काही विशेष शब्द हे प्रमुख प्रतिक म्हणून किती वेळा वापरले आहे हे मोजले जाते आणि त्या आधारावर विषयाचे विश्लेषण करुन भाषण, लेख इत्यादींच्या संबंधात काही महत्त्वपूर्ण निष्कर्ष काढले जातात. लॉसवेल (Lasswell) यांनी World Attention Survey मध्ये आधुनिक राजकारणाच्या संबंधित स्वतंत्रता, स्वातंत्र्य, संवैधानिक सरकार, राष्ट्रीय समाजवाद इत्यादी शब्दांना प्रतिकांच्या रुपात निवडले होते. १९५६ मध्ये फ्रान्समध्ये निवडणूक प्रचाराच्या उद्देशाने दिलेल्या निवडणूक भाषणातील शब्दाच्या आधारावर विश्लेषण करण्यात आले होते.

**२. वाक्य आणि परिछेद:** कोणत्याही साहित्यात वाक्य किंवा परिच्छेद (Senence and Parigraph) यांना अतिशय महत्वाचे स्थान असते. वाक्य किंवा परिच्छेदाच्या माध्यमातून संशोधक किंवा अभ्यासक आपल्या विषयाचा अभ्यास करु शकतो. खऱ्या अर्थाने वाक्य किंवा परिच्छेद हा शब्दांचाच एक समूह असतो. ज्याव्दारे एक निश्चित विचार प्रतिमानास प्रस्तुत केले जाते. वाक्य किंवा परिच्छेदांच्या आधारावर लेखांचे किंवा भाषणांचे आशयाचे विश्लेषण केले जाते. ग्रंथालय आणि माहितीशास्त्रात देखील वाक्य किंवा परिच्छेदाच्या आधारावर आशयाचे विश्लेषण केले जाते.

**३. पात्रे (Roles):** कोणत्याही साहित्यकृतीमध्ये त्या साहित्यकृमधील पात्र हा घटक महत्वाचा असतो. नाटक, कादंबरी, कथा, सिनेमा, चित्रपट यामधील पात्रांना आशय विश्लेषाचे एकक मानले जाते. शेक्सपियर यांच्या नाटकातील पात्रे, सुप्रसिध्द हिंदू लेखक प्रेमचंद मुंन्शी यांच्या कथेतील किंवा इतर कोणत्याही साहित्यकृतीतील पात्रांची आशय विश्लेषणाचे एकक म्हणून निवड करता येते.

**४. भाग (Item):** आशय विश्लेषणामध्ये ग्रंथामधील एखादा भाग एकक म्हणून निवडण्यात येतो, आणि त्या भागाचे आशय विश्लेषणाचे एकक म्हणुन निवड केली जाते. ग्रंथालय आणि माहितीशास्त्रामध्ये आशय विश्लेषणासाठी नियतकालिकाच्या किंवा ग्रंथाच्या एका भागाची निवड करुन त्याचे आशय विश्लेषण केले जाते. तसेच साप्ताहिके, लेख, कथा, कादंबरी, संपादकीय, वृत्तपत्रातील बातमीचा काही भाग यांचा देखील एक विशिष्ट भाग एकक म्हणून निवडला जातो.

५.स्थान आणि काळाचे मापन (Measurement of Place and Time): ग्रंथालय आणि माहितीशास्त्रात स्थान आणि वेळ हे आशय विश्लेषणाचे एक महत्वपूर्ण एकक मानले जाते. ग्रंथामधील किंवा नियतकालिकातील विशिष्ट काळात किंवा विशिष्ट वेळेत प्रकाशित झालेल्या साहित्याचे विश्लेषण करणे उपयुक्त असते. **(घाटोळे, २०१०)**

## **३.८ आशय विश्लेषणाचे वर्ग** (Categoris of Content Analysis)

एककांची निवड केल्यामुळे आशय विश्लेषणासाठी आवश्यक तथ्ये प्राप्त होत नाही. या एककांचे काही निश्चित वर्गांमध्ये विभाजन करुन त्या निश्चित वर्गाचे निर्धारण करणे आवश्यक असते. या वर्गाअंतर्गत विषय सामुग्रीचे वर्गीकरण करुन नंतर त्यांचे विश्लेषण केले जाते. एककांचे वर्गीकरण खालीलप्रमाणे वर्गीकरण केले जाते.

१.विषयाचा आशय: आशय विश्लेषणासाठी वर्ग निश्चित करतांना विषयाचा आशय आणि त्याच्या स्वरुपातील फरकाच्या आधार यावर विषयाचे वर्गीकरण केले जाते.

२. स्तर भेद: आशय विश्लेषणात घटकांची निवड करतांना त्या घटकांचे स्तर ठरविले पाहीजे. आशय विश्लेषणात परस्पर विरोधी स्वरुपातील फरकाच्या आधारावर एककाचे वर्गीकरण केले जाते.

३. मूल्यभेद: आशय विश्लेषणामध्ये माहितीच्या मूल्यांमधील फरकाचे घटक अभ्यासासाठी विचारात घेतले जातात.

४. व्यक्तिमत्त्व भेद: आशय विश्लेषणाच्या वर्गामध्ये व्यक्तीमत्त्व भेद महत्त्वा घटक असतो. उदा. स्वार्थी आणि परार्थवादी व्यक्तिमत्व, अंतर्मुखी आणि बहिर्मुखी व्यक्तीमत्व इत्यादी.

५. सामुग्रीचा स्त्रोत: आशय विश्लेषणासाठी आवश्यक असणारी माहिती मिळविण्याचा स्त्रोत कोणता आहे, या आधारावर एककाचे वर्गीकरण केले जाते. उदा. मराठी साहित्य, हिंदी लेखकांचे साहित्य, इंग्रजी साहित्य, विविध नियतकालिके, ग्रंथ इत्यादी.

६. पात्र: आशय विश्लेषणात विषयातील मुख्य पात्र किंवा घटक, सहाय्यक पात्र यामधील घटक वर्ग आशय विश्लेषणासाठी महत्वाचे ठरतात.

७. कथनातील भेद: प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष कथन, सकारात्मक आणि नकारात्मक कथन इत्यादी आधारावर कथनामध्ये भेद केला जातो.

८. विरुध्द वर्ग: आध्यात्मिक आणि भौतिकवादी, लौकिक आणि पारलौकिक, सकारात्मक आणि नकारात्मक असे परस्पर विरुध्द वर्ग आशय विश्लेषणासाठी उपयुक्त असतात.

९. वर्गभेद: वर्गभेद मध्ये सामाजिक, आर्थिक, श्रमजीवी, विद्यार्थी, प्रशासकीय अधिकारी, खाजगी कर्मचारी इत्यादी घटकांचा विचार आशय विश्लेषणामध्ये केला जातो, जेणेकरुन त्यांना आवश्यक वाचन साहित्य उपलब्ध करुन देणे शक्य होते.

१०. कथेचे वर्गीकरण: आशय विश्लेषणासाठी विषयाचे वर्गीकरण प्रेमकथा, सत्यकथा, लोककथा, शिकारकथा, गुन्हेगारी कथा, रहस्यमय कथा अशा प्रकारे केले जाते.

११. विद्यालय आणि विद्यापीठाशी संबंधित शिक्षण पध्दतीत भेद: आशय विश्लेषणाच्या अभ्यासामध्ये शिक्षण, तत्वज्ञान, शिक्षण प्रशासन, पाठयक्रम शिक्षण, शिक्षणपध्दती,पाठ्योत्तर क्रिया, शिक्षणसंस्थांचे नियंत्रण इत्यादी घटकांचा देखील अभ्यास केला जातो. (**आगलावे, २००७**)

## ३.९ आशय विश्लेषणाच्या पायऱ्या-

आशय विश्लेषण हे एक तंत्र आहे. आशय विश्लेषण तंत्राची रुपरेषा तयार करण्यासंबंधीच्या विशिष्ट पायऱ्या आहेत, या पायऱ्यांनुसार आशय विश्लेषणाचे कार्य केले जाते. अनेक तज्ज्ञांनी आशय विश्लेषणाच्या विविध पायऱ्या सांगितल्या आहे पुढीलप्रमाणे आहेत.

१. **समस्येचे निर्धारणः** (Formulation of the Problem): आशय विश्लेषण पध्दतीमध्ये संशोधक सर्वप्रथम आपल्या समस्येचे निर्धारण करतो. जर समस्या वाचनसाहित्यातील आशयाशी संबंधीत असेल तर आशय विश्लेषण ही संशोधन पध्दती उपयुक्त ठरते. ज्या समस्येसंबंधिच्या सूचना अथवा माहिती संकलित करावयाची आहे, त्या समस्येचे निर्धारण करावे लागते. म्हणजेच आशय विश्लेषण तंत्रात सर्वप्रथम विषयाशी संबंधित तथ्यांची निवड करणे आवश्यक असते. उदाहरणार्थ, अभियांत्रिकी महाविद्यालयात ई-नियतकालिकाचा उपयोग होतो का? अभियांत्रीकी महाविद्यालयात ई-नियतकालिके किती प्रमाणात खरेदी केले जातात? ई-नियतकालिकाबाबत उपभोक्त्यांचे मते काय आहे? या सर्व बाबींचा विचार समस्या निर्धारणात केला जातो.

२. **पूर्वानुमान मांडणे**: एकदा संशोधन समस्या निश्चित झाल्यानंतर त्या संशोधन समस्येवर यापूर्वी काय-काय संशोधन झाले आहे, त्या समस्येबाबतचे पूर्व सिध्दांत यांचा अभ्यास करुन त्या समस्येसंबंधी पूर्वानुमान मांडले जाते. उदाहरणार्थ जर संशोधकाने अभ्यासासाठी अभियांत्रिकी महाविद्यालयात ई-नियतकालिकाचा उपयोग होतो का? हा विषय निवडला असेल तर संशोधक त्या विषयाचा अभ्यास करून त्याबाबतचे आपले मत मांडतो. जसे अभियांत्रिकी महाविद्यालयात ई-नियतकालिकाचा उपयोग होतो.

३. **माहिती साधनांची निवड करणेः** (Selection of Information Sources) ही आशय विश्लेषणाची महत्वाची पायरी आहे, ज्यातून संशोधकाचा अभ्यास विषयासंबंधी माहिती संकलित करत असतो. ग्रंथ, नियतकालिके, संशोधन अहवाल, ऑन लाईन डेटाबेस या साधनांमधून संशोधन विषयाच्या उद्देशानुसार योग्य माहिती साधनाची निवड केली जाते. उदाहरणार्थ जर संशोधकाने अभियांत्रिकी महाविद्यालयात ई-नियतकालिकाचा उपयोग हा विषय संशोधनासाठी निवडला असेल तर

त्या विषयाची माहिती किती व कोणत्या ग्रंथात मिळेल याबाबतची यादी तयार करावी लागेल तसेच त्या विषयासंबधिची नियतकालिके व  इंटरनेट वरील माहितीची निवड केली जाते.

४. **विश्लेषणाचे एकक ठरविणे:** उपयुक्त वाचन साहित्याची निवड केल्यानंतर कोणत्या वाचन साहित्याचे विश्लेषण करावयाचे आहे हे ठरविले जाते. एकक म्हणजे आशयातील महत्वपूर्ण घटक. नियतकालिकातील लेखांचे, ग्रंथाचे, प्रसगांचे विश्लेषण करावयाचे हे ठरविले पाहीजे. नियतकालिकातील लेख, ग्रंथ, ब्लॉग, प्रसंग, पात्र, वाक्य हे आशय विश्लेषणाचे एकके आहे.

५. **नमुना निवड:** आशय विश्लेषणाची निवड केल्यानंतर प्रथम अभ्यासासाठीचा लक्ष्यगट निश्चित करावा व लक्ष्यगटातून संशोधन विषयाशी संबंधित नमूना निवड करावी. जर संशोधकाने अभियांत्रीकी महाविद्यालयात ई-नियतकालिकाचा उपयोग हा विषय निवडला असेल तर ई-नियतकालिक म्हणजे काय? ई-नियतकालिकाचे घटक कोणते, कोणत्या ई-नियतकालिकाचा अभ्यास करावयाचा आहे हे निश्चित करुन, या निश्चित केलेल्या लक्ष्यगटातून योग्य तो नमूना आशय विश्लेषणासाठी निवडावा लागेल.

६. **चल आणि चिन्हे निश्चित करणे:** एकदा समस्येचे निर्धारण झाल्यानंतर त्या समस्येची व्याख्या तयार करून त्या चलाचे वर्गीकरण करण्यासाठी लिखित नियम तयार करून विषयाची दिशा निश्चित केली जाते. समजा ई-नियतकालिकाचे उपार्जन हा विषय निवडला असेल तर त्या विषयाबाबत सर्वांगिण अभ्यास करून चल आणि चिन्हे निश्चित केले जातात. आशय विश्लेषणासाठी संकलित केलेली माहिती विविध स्वरुपामध्ये असते. आशय विश्लेषणासाठी अशा माहितीचे अचूक मोजमाप करून वस्तूनिष्ठ व संख्यात्मक माहितीत रुपांतर केले जाते. जर ई-नियतकालिकाचे उपार्जन हा विषय निवडला असेल तर महाविद्यालयीन ग्रंथपालांचा सकारात्मक अथवा नकारात्मक दृष्टीकोन जाणून घेण्यासाठी योग्य चल, शब्द, चिन्हे, निश्चित केले जातात.

७. **प्रकट आशयाची नोदंणी:** वाचन साहित्यातील दृश्य स्वरूपात सहज दिसणारा आशय म्हणजे प्रकट आशयाची नोंदणी. विशिष्ट वाचन साहित्यामध्ये विशिष्ट संज्ञा किती वेळा वापरली हे सहजपणे मोजता येते. विशिष्ट विषयासाठी संशोधकाने निश्चित केलेल्या संज्ञे शिवाय इतरही समानार्थी संज्ञा वापरल्या जावू शकतात.

८. **अप्रकट आशयाची नोदंणीः** विशिष्ट लेखातील आशयामध्ये विशिष्ट संज्ञेचा अर्थ स्पष्टपणे व्यक्त केलेला नसेल तर त्या आशयाला अप्रकट आशय म्हणतात. अप्रकट आशयाची नोंदणीमध्ये आशयाचा शब्दशः अर्थ विचारात न घेता आशयातील वाक्यांमधून प्रतित होणारा अर्थ विचारात घेतला जातो. म्हणूनच या प्रकारच्या आशय विश्लेषणाला अर्थात्मक विश्लेषण असेही म्हणतात. अप्रकट आशयामध्ये संशोधक वाचन साहित्यातील पूर्ण लेखाचे किंवा परिच्छेदाचे वाचन करुन त्या लेखामध्ये किंवा परिच्छेदात कोणत्या पैलू बाबत आशय आहे हे नोंदवितो. प्रलेखातील प्रकट आशय वस्तुनिष्ठपणे नोंदविता येतो. मात्र अप्रकट आशय वस्तुनिष्ठपणे नोंदविणे कठीण असते. अप्रकट नोंदणी संशोधकाच्या

ज्ञानावर, त्याच्या संदर्भित आकलनावर, मानसिकतेवर अवलंबून असते, त्यामुळे या नोंदणीमध्ये व्यक्तीनिष्ठता येवू शकते.

९. **अहवाल लेखनः** आशयाचे विश्लेषणात्मक निर्वाचन केल्यानंतर संपूर्ण अध्ययनाच्या संदर्भात व्यवस्थित अहवाल तयार केला जातो. अहवालात सारणी, ग्राफ, चित्रे इत्यादींचा अवलंब केला जातो. अध्ययन कशा प्रकारे केले, अध्ययनाचे निष्कर्ष कोणते होते या विषयाची संपूर्ण माहिती अहवालात नमूद केली जाते. **(कुंभार, २०१३)**

## ३.१० आशय विश्लेषणाचे फायदे

आशय विश्लेषण ही एक सामाजिक संशोधन पध्दती आहे. या पध्दतीचा वापर विसाव्या शतकात सूरु झाला. संशोधनात आशय विश्लेषणाचा वापर दिवसेंदिवस वाढतच आहे. आशय विश्लेषणाचे फायदे किंवा उपयोग पुढील प्रमाणे सांगता येतील.

१. भूतकालीन सामाजिक विचार जाणून घेता येतातः आशय विश्लेषण पध्दतीमध्ये ग्रंथ, नियतकालिके, वर्तमानपत्रे तसेच इतर प्रातिनिधिक वाचन साहित्याचा उपयोग केला जातो. त्यामूळे भुतकालिन होऊन गेलेल्या तज्ज्ञांचे विचार वाचनसाहित्याद्वारे माहीत होतात. तसेच दूर ठिकाणच्या तज्ञांचे विचार वाचनसाहित्याद्वारेच जाणून घेता येतात. म्हणजेच स्थळ आणि काळाने आपल्यापासून दूर

असलेल्या तज्ज्ञांचे विचार वाचनसाहित्याद्वारे माहीत होतात. त्यांचे विचार, त्यांचा संदेश त्यांना प्रत्यक्ष न भेटता त्याचे ग्रंथ, लेख, दैनंदिणी, टिप्पणी इत्यादींद्वारे जाणून घेणे शक्य होते.

२. वस्तूनिष्ठ अध्ययन: आशय विश्लेषणासारखे प्रलेखातील आशयावर आधारित संशोधन हे एक प्रकारे अप्रत्यक्ष निरीक्षणच असते. तसेच ते असहभागी निरीक्षणही असते. कारण संदेशकर्ता तसेच संदेशातील पात्रेही संशोधकाच्या प्रत्यक्ष संपर्कात नसतात. या पध्दतीमध्ये संशोधकाच्या उपस्थितीचा अभ्यासावर कोणताही प्रभाव पडत नाही. संशोधक हा निष्पक्षपणे सर्व माहिती संकलित करू शकतो. तसेच संशोधक आशय विश्लेषणासाठी निवड करत असलेला घटक हा लिखित स्वरुपात असल्याने दुसरे संशोधक त्यांच्या निर्ष्काची पडताळणी करता येते.

३. दीर्घकालीन विश्लेषण शक्य: आशय विश्लेषण ही पध्दती लघुकालीन व दीर्घकालीन संशोधनसाठी उपयुक्त पध्दती आहे. प्रलेखाधारित संशोधनाची काल मर्यादा ही दीर्घकालीन असते. अर्थात, संशोधन उदिदष्टांनुसारच आशय विश्लेषण संशोधनाची व्याप्ती ठरविली जाते. तसेच एका सलग मोठया काळातील विविध टप्प्यातील विचार प्रवाहांची तुलना करणे ही शक्य होते. एकाच्या विषयाचे विविध कालखंडानुसार आशयाचा तुलनात्मक अभ्यास देखील आशय विश्लेषणाद्वारे करता येतो.

४. लोकमत जाणून घेण्यास मदत: आशय विश्लेषण तंत्राद्वारे लोकमत जाणून घेण्यास मदत होते. एका विशिष्ट काळामध्ये लोकांच्या मानसिक प्रवृत्तीचे किंवा व्यक्तीमत्त्वाच्या जडणघडणीचा अभ्यास करण्यासाठी आशय विश्लेषण पध्दती उपयुक्त ठरते. लेखक आपल्या लेखामध्ये आणि दैनंदिनीमध्ये स्वंयस्फूर्तीने तात्कालीन विचार व्यक्त करतात तसेच विविध वृत्तपत्राच्या संपादकाना लोकांनी पाठविलेल्या पत्रांच्या आशय विश्लेषणावरून लोकमताचा कल जाणून घेण्यास मदत होते.

५. व्यक्तीमत्त्व अध्ययनासाठी उपयुक्त: आशय विश्लेषण पध्दतीद्वारे एका व्यक्तीच्या तसेच समुहाच्या मनोवैज्ञानिक स्थितीचे तसेच त्यांच्या व्यक्तित्त्वाचे अध्ययन केले जाते. भाषणे, लेख, ग्रंथ यांचे आशय विश्लेषण करून त्या व्यक्तीच्या व्यक्तित्त्वामध्ये समाविष्ट विचार, मूल्य, आदर्श इत्यादीचे अध्ययन करणे शक्य होते.

६. कमी खर्चाची पध्दती: इतर संशोधन पध्दतीपेक्षा आशय विश्लेषणाच्या उपाययोजनास कमी खर्च, मर्यादित साधन सामग्रीची आवश्यक्ता असते. कारण यासाठी लागणारे प्रलेख बहुतांशकरुन एखादया ग्रंथालयात उपलब्ध असतात. अर्थात विषयाच्या स्वरुपानुसार काही उपयुक्त प्रलेख विखुरलेलेही असू शकतात. तरीही इतर संशोधन पध्दतीपेक्षा आशय विश्लेषणासाठी कमी खर्च येतो.

७. गुणवत्तापूर्ण वाचनसाहित्य शोधता येते: वाचनसाहित्याच्या गुणवत्तेमध्ये फार विविधता आढळते. आशय विश्लेषणाद्वारे गुणवत्तापूर्ण वाचनसाहित्याचा शोध घेता येतो.

## ३.११ आशय विश्लेषणाच्या मर्यादा-

इतर पध्दती प्रमाणेच आशय विश्लेषण तंत्राच्या काही मर्यादा देखील आहे, त्या पुढीलप्रमाणे आहेत.

१. आशय विश्लेषणाचा अभ्यास विषय हा गुणात्मक स्वरुपाचा असल्यामुळे त्याचे परिमाणात्मक परिणाम काढणे कठीण असते.

२. आशय विश्लेषण पध्दतीमध्ये संशोधक केवळ द्वितीयक माहितीच्या आधारावर अवलंबून असतो. ही द्वितीयक स्वरूपाची माहिती पक्षपाती असण्याची संभावना असते.

३. संज्ञापन साधनात खूप भिन्नता आहे. म्हणून एका अध्ययनाच्या आधारावर काढलेले निष्कर्ष समान विषयांना लागू करता येईल किंवा नाही हे सांगणे कठीण आहे.

४. संज्ञापन साधनाच्या आशयामध्ये शीघ्र गतीने परिवर्तन होत असते. म्हणून आज काढलेले निष्कर्ष काही काळानंतर निरर्थक ठरतात.

५. क्षेत्र-अध्ययन कार्याकरिता आशय विश्लेषण तंत्राचा उपयोग करता येत नाही. ही देखील या तंत्राची एक मर्यादा आहे. **(पाटील, २०१२)**

वरील मर्यादा या पध्दतीत असल्या तरी आज आशय विश्लेषण पध्दती ही सामाजिक संशोधनात महत्वाची ठरते.

### ३.१२ आशय विश्लेषणाची प्रक्रिया

सामाजिक संशोधनामध्ये आशय विश्लेषण हे माहितीची निवड, एककांची निवड, माहिती आणि तथ्यांचे विश्लेषण करण्याच्या दृष्टीने उपयुक्त आहे. अशा विश्लेषणाची प्रक्रिया ही माहितीचे वर्गीकरण, भौगोलिक वर्गीकरण, कालक्रमानुसार वर्गीकरण, गुणात्मक वर्गीकरण, संख्यात्मक वर्गीकरण, स्तंभीकरण व सारणीकरण, सांख्यिकीय विश्लेषण, प्रमाण, शेकडेवारी आणि कार्यकारण संबंध तपासण्याच्या दृष्टीने महत्त्वपुर्ण आहे. **(कायंदे-पाटील, २००५)**

### ३.१३ आशय विश्लेषणाचे ग्रंथालयात उपयोजन

ग्रंथालय आणि माहितीशास्त्र या विषयाच्या संदर्भात आशय विश्लेषणाचा विचार केल्यास या क्षेत्रातील प्रत्येक पातळीवर या तंत्राचे उपयोजन केले जाते.

ग्रंथनिवड करतांना ग्रंथपाल ग्रंथात दिलेल्या माहितीचे आशय विश्लेषण करुनच तो ग्रंथ उपभोक्त्यांना उपयुक्त आहे किंवा नाही हे ठरवितो, आणि ग्रंथखरेदीचा निर्णय घेतो. अनुक्रमणिका आणि प्रस्तावना लिहितांना ग्रंथकर्ता त्या लेखाचा किंवा ग्रंथाचा सारांश लिहितो म्हणजे ते एक प्रकारे आशय विश्लेषणच करत असतो. ग्रंथवर्गीकरण, तालिकिकरण, निर्देशन या प्रक्रिया आशय विश्लेषणाच्या आधारे ठरत असतात. वर्गीकरणाच्या बाबतीत आपण त्याला विषय विश्लेषण म्हणतो. जेव्हा विषय विश्लेषण एका ग्रंथाचे किंवा प्रलेखाच्या बाबतीत असते, तेव्हा ते आशय विश्लेषणच असते आणि याच विश्लेषणाची परिणीती वर्गांक ठरविण्यात होते. याचप्रमाणे निर्देशन व कोशतालिका या सर्व गोष्टींसाठी आशय विश्लेषणाचेच आयोजन केले जाते. अमेरिकन नॅशनल स्टण्डर्ड इन्स्टिटयुटने निर्देशाची जी व्याख्या दिलेली आहे. त्यातच आशय विश्लेषण सूचित होते. निर्देश व कोशतालिकामंधील विषयनोंदी या प्रलेख व ग्रंथाच्या आशय विश्लेषणाद्वारेच निश्चित केल्या जातात. **(रिसवडकर, २००१)**

संशोधकाचा संशोधन हाती घेण्याचा उददेश, त्याची सफलता, अवलंबिलेल्या संशोधन पध्दती व तंत्रे, निष्कर्ष, उपयुक्तता या गोष्टींचा शोध आशय विश्लेषणाच्या उपयोजनानेच करता येतो. थोडक्यात ग्रंथालयांमध्ये ग्रंथ निवड ते सारलेखन अशा सर्व पातळयांवर आशय विश्लेषण कार्यान्वित

असते. हे गुणात्मक स्वरुपाचे विश्लेषण असून बिब्लिओमेट्रीक्स हे संख्यात्मक स्वरुपाचे विश्लेषण आहे. ग्रंथालय आणि माहितीशास्त्रातील संशोधनात आशय विश्लेषणाचा अवलंब बिब्लिओमेट्रीक्सखेरीज इतरत्रही करण्यात आला आहे. हे संशोधन संख्येने जास्त नसले तरी गुणात्मक दृष्ट्या दर्जेदार आहे. अशा प्रकारे आशय विश्लेषणाच्या तंत्राचा उपयोग ग्रंथपाल त्यांच्या दैनदिन कामकाजात करीत असतात.

## ३.१४ विद्वत्त नियतकालिकांच्या संदर्भात आशय विश्लेषणाचे महत्वः-

नियतकालिकांच्या संदर्भात आशय विश्लेषण तंत्र अतिशय प्रभावीपणे काम करते. नियतकालिकातील मुद्रित स्वरुपातील तथ्यांचे विश्लेषण केले जाते. त्याकरिता विशिष्ट नियतकालिकाचे दर आठवडयाचे, महिन्याचे किंवा वर्षाचे अंक अवलोकन करुन त्यामध्ये असणाऱ्या राजकीय, क्रीडा, संगित शिक्षण, व्यवस्थापन कला, आर्थिक आरोग्य अशा श्रेणी तयार केल्या जातात. त्यातील कोण-कोणत्या सदरावर विशेष भर देण्यात आला, याचे विश्लेषण केले जाते आणि त्यावरुन ते नियतकालिक कोणत्या विषयांशी संबधित आहे या संदर्भातील निष्कर्ष काढले जातात. माहितीच्या आशयाचे विश्लेषण वर्तमान पत्रे, ग्रंथ, नियतकालिके या सोबतच आकाशवाणी, दूरचित्रे, यासारख्या महत्त्वपूर्ण क्षेत्रात प्रभावीपणे हाताळले जाते. कारण विविध क्षेत्रातील घडामोडींच्या संबंधित गुणात्मक तथ्य सामग्रीचे वैधानिक तथ्यांत रुपांतर करणे हा आशय विश्लेषण तंत्राचा मुख्य उद्देश असतो.

आशय विश्लेषण हे ग्रंथालयातील प्रत्येक विभाग व घटकावर सकारात्मक परिणाम साधणारे तंत्र आहे. ग्रंथालय आणि माहितीशास्त्राच्या क्षेत्रात आशय विश्लेषण तंत्र वापराने बौध्दिक स्वरुपाचे गुणात्मक तसेच संख्यात्मक परिणाम बघावयास मिळतात. नियतकालिकाच्या दृष्टीकोनातून अतिशय प्रभाविपणे माहितीची उपलब्धता संशोधकांना करुन देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य आशय विश्लेषण तंत्राद्वारे होत असल्याने ज्ञानगंगोत्री या नियतकालिकाचे आशय विश्लेषण केल्यानंतर ग्रंथालय आणि माहितीशास्त्राच्या क्षेत्राशी निगडीत अनेक पैलू जाणून घेता येतील. ग्रंथालय शास्त्रात संशोधनासाठी आशय विश्लेषण हे अतिशय उपयुक्त असे तंत्र आहे. गुणात्मक तथ्यांचे सांख्यिकीय आणि वस्तूनिष्ठ तथ्यांत रुपांतर करण्यासाठी हे तंत्र विचारात घेतले जाते. **(बाहेती आणि डगवार, २००८)**

## ३.१५ आशय विश्लेषणामधील नवीन प्रवाहः-

विसाव्या शतकाच्या सुरवातीपासून सामाजिक संशोधनात आशय विश्लेषण या तंत्राचा वापर सूरू झाला. काळानुरूप या तंत्रात अनेक बदल झालेले दिसून येतात. ते पुढीलप्रमाणे.

१. आशय विश्लेषणात संगणकाचा वापर केला जावू लागल्याने संशोधनातील वस्तुनिष्ठता आणि अचूकतेमध्ये वाढ झाली.

२. इतर संशोधन पध्दती प्रमाणेच सामाजिक संशोधनात आशय विश्लेषणाचा वापर मोठ्या प्रमाणात होवू लागला आहे.

३. ग्रंथालय शास्त्राप्रमाणेच इतर विद्याशाखामध्ये देखील आशय विश्लेषणाचा वापर संशोधनासाठी केला जावू लागला आहे.

४. विस्तृत स्वरूपातील घटकांच्या अभ्यासासाठी आशय विश्लेषण पध्दती उपयुक्त ठरते.

## सारांश

सामाजिक संशोधनात आशय विश्लेषण तंत्राच्या साहाय्याने वस्तुनिष्ठ तथ्यांचे  संकलन करुन त्या आधारे निष्कर्ष काढले जातात. समाजातील एकक किंवा घटक निवडल्यानंतर त्यांचे गुणात्मक वैशिष्टे लक्षात घेवून निष्कर्ष काढले जातात. म्हणून सामाजिक संशोधनात आशय विश्लेषण हे तंत्र अतिशय लोकप्रिय झाले आहे. आशय विश्लेषणाआधारे गुणवत्तापूर्ण वाचन साहित्य संग्रह विकसित करता येतो, वाचन सल्ला देणे शक्य होते. या बाबी विचारात घेता ग्रंथपालनामध्ये आशय विश्लेषणास खूपच वाव आहे असे म्हणता येईल.

आज आशय विश्लेषण हे तंत्र साहित्याच्या क्षेत्रात अभ्यासक, संशोधक, ग्रंथपाल, शिक्षक व विद्यार्थ्यांना अत्यंत उपयुक्त तंत्र म्हणुन स्विकृत असे शास्त्रीय पध्दतीवर आधारित म्हणुन प्रचलित आहे. आशय विश्लेषणाच्या सर्व मर्यादा व तोटे लक्षात घेवूनही आजही हे तंत्र एक प्रभावी साधन म्हणून त्याचे महत्व निर्विवाद आहे.

## संदर्भसूची


- पाटील, बा. वा. (२०१२). *संशोधन पध्दती.* जळगाव: प्रशांत पब्लिकेशन्स. पृ. ३७२-३८४
- आगलावे, प्रदीप. (२०१०). *सामाजिक संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्रे* नागपूर: साईनाथ प्रकाशन. पृ. ३७६-३८३.
- कायंदे- पाटील, गंगाधर. (२००५). *संशोधन पध्दती.* नाशिक: चैतन्य पब्लिकेशन.
- बाहेती, सत्यनारायण आणि डगवार शामकांत (२००८). University News या नियतकालिकाचे आशय- विश्लेषणात्मक अध्ययन' *ज्ञानगंगोत्री*, मार्च- एप्रिल - मे (८) ४, पृष्ठ ३६-५२.
- रिसवडकर, म. रा. (२०१२). *ग्रंथालय आणि माहितीशास्त्राची संशोधन पध्दती.* नाशिक. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ. पृ. ३०-३२
- कुंभार, राजेंद्र. (२०१३). *ग्रंथालय आणि माहितीशास्त्र संशोधन.* पुणे: युनिव्हर्सल प्रकाशन. पृ. १४९-१५५
- *Ibid,* p. 153
- कऱ्हाडे, बी. एम, (२०११). *शास्त्रीय संशोधन पध्दती.* नागपूर: पिपंळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स. पृ. ३७९-३९४.
- *Ibid*, p. 384
- घाटोळे, रा. ना. (२०१०). *समाजशास्त्रीय संशोधन: तत्त्वे व पध्दती.* नागपूर, श्री मंगेश प्रकाशन.
- Krippendorff, Klaus. (2013). *Content Analysis: An Introduction to its Methodology.* New Delhi: Sage Publication India Pvt. Ltd.
- Krippendorff, Klaus. and Back, M. (2009). *The Content Analysis Reader.* New Delhi: Sage Publication India Pvt. Ltd.
- Kothari, C. R., (2013). *Research Methodology: Methods and Techniques*. New Delhi: New Age International Publishers.

- Neuendorf, Kimberly. (2002) *The Content Analysis Guidebook.* New Delhi: Sage Publication India Pvt. Ltd.
- Schreier, Margrit. (2012). *Qualitative Content Analysis in Practice.* New Delhi: Sage Publication India Pvt. Ltd.
- Weber, Philip. (1990). *Basic Content Analysis* (2.Ed.). Newbury Park: Sage Publication India Pvt. Ltd.
- Berelson, B., (1952). *Content analysis in communication Research*. Illinois: The free press.
- www.rangahau.com

# प्रकरण चौथे

# मुक्त विद्यापीठ व ज्ञानगंगोत्री नियतकालिकाचा परिचय

## ४.१. प्रस्तावना:-

तंत्रज्ञानाच्या क्रांतिमुळे प्रगत देशाांत दूरस्थ शिक्षण पध्दतीचा प्रसार होऊ लागला. विद्यापीठे व महाविद्यालयात उपस्थित न राहता आपल्या गावी, घरी, कामाच्या ठिकाणी राहून उच्च शिक्षणाचा लाभ दूर शिक्षण पध्दतीने मिळु शकतो, याची जाणीव पाश्चिमात्य देशांना झाली. विद्युतकी व संगणक ह्यांच्या प्रगतीमुळे  उत्पादन, व्यवस्थापन, दळणवळण व मनोरंजन याबरोबर शैक्षणिक पध्दतीतही बदल घडून आले. परिणामी ज्ञान वाढले व त्याचे स्वरूप बदलले आणि ते आत्मसात करण्याच्या पध्दती देखील बदलल्या.

## ४.२. दूरशिक्षणाची संकल्पना

मुक्त विद्यापीठाची संकल्पना प्रथम १९६३ मध्ये मजुर पक्षाच्या कार्यकाळात पंतप्रधान हेरॉल्ड विल्सन यांनी इंगलडच्या पार्लमेंटमध्ये मांडली. ध्वनीलहरी विद्यापीठ (The University on the Air) असे या संकल्पनेचे त्यांनी नामकरण केले होते. हेरॉल्ड विल्सन यांनी मायकेल यंग याच्या दूरदर्शी विचाराने प्रेरित होऊन १९६५ मध्ये Minister of State for Education विभागाने उच्च शिक्षणासाठी मुक्त विद्यापीठाचा आराखडा तयार केला, त्यात त्यांनी उच्च शिक्षणाचे मानके (Standards) निश्चित केले.

उच्च शिक्षणाचा आराखडा तयार करण्यासाठी Sir Peter Venables यांच्या अध्यक्षतेखाली नियोजन समिती स्थापन केली. त्यानुसार १९६९ मध्ये यु.के. ओपन युनिव्हर्सिटीची लंडन शहरात स्थापना झाली. पहिली चार वर्षे शैक्षणिक कार्यक्रमाच्या विकसनासाठी लागली. त्यानंतर प्रत्यक्ष विद्यार्थ्यांना शिक्षणक्रमाचा लाभ मिळु लागला. या विद्यापीठाचे प्रथम कुलपती लॉर्ड फ्राऊथर यांनी आपल्या भाषणात म्हटले की, मुक्त विद्यापीठ हे सर्व अर्थाने मुक्त असते. त्यामध्ये अभ्यासक्रम, परीक्षा, नियम, तास, शिक्षक, विद्यार्थी सभा, सत्र कालावधी यावर कुणाचेही बंधन नसते. इंग्लंड पाठोपाठ अनेक देशांमध्ये मुक्त विद्यापीठे स्थापन झाली. आज कॅनडा, जपान, थायलंड, श्रीलंका.

पाकिस्तान, भारत, बांग्लादेश अशा ६० हून अधिक देशांत ३०० पेक्षा अधिक दूर शिक्षण संस्था आहे. **(http://www.aect.org)**

ह्या शिक्षणक्रमासाठी जे शिक्षणापासून वंचित आहेत, याबरोबरच ज्यांना-ज्यांना शिक्षण घ्यावेसे वाटते अशा सर्वांना शिक्षण घेण्याची संधी मुक्त विद्यापीठाने खुली केली. व्यक्तीला प्रगल्भ करणारे शिक्षण प्रत्येकाला प्राप्त व्हावे यासाठी औपचारिक शिक्षणातील विशिष्ट कालखंड, स्थळ, अभ्यासक्रम, नियमावली, वेळापत्रक इ. साचेबंदपणा आणि अध्ययनावर व शिक्षणावर पडणाऱ्या मर्यादांमुळे समाजातील विषमतेला चालना मिळाली. वरील मर्यादा १९६० च्या दशकात प्रकर्षाने लक्षात आल्या आणि अनेक ग्रंथातुन संपुर्ण जगभर अभिव्यक्त झाल्या. **(कळमसे, २०१५)**

भारतीय शिक्षण परंपरा ही गुरुकुलापासून ते आजच्या मुक्त विद्यापीठांपर्यत निरनिराळया अंगाने विकसित होत आली आहे. औपचारिक शिक्षण पध्दतीच्या मर्यादामुळे पत्राद्वारे शिक्षण, निरतंर शिक्षण, अनौपचारिक शिक्षण हया सर्वांगातील चांगल्या उपयुक्त तत्वांचा उपयोग करुन मुक्त व दूरशिक्षणाचा पाया घातला. या शिक्षणात आवश्यकतेनुसार अभ्यासक्रमामध्ये नवीन तंत्रज्ञानाचा वापर केला. तसेच समाजातील वंचीत घटकांना आवश्यकतेनुसार व्यावसायिक शिक्षण, शिक्षणातील लवचिकता, स्वंय-अध्ययन या घटकांचा सखोल अभ्यास करुन दूरशिक्षणात त्याचा खुबीने समावेश केला.

पारंपरीक शिक्षण पध्दतीमधील उणिवांचा अभ्यास करुन दूरशिक्षणाचा विचार सूरू झाला. वैयक्तिक, आर्थिक, किंवा इतर कारणांनी ज्यांना शिक्षण घेणे शक्य झाले नाही किंवा शिक्षण अर्धवट सोडावे लागले, औद्योगिक क्रांतीमुळे, नवीन नवीन ज्ञान आत्मसात करण्याच्या वृत्तीमुळे १९६०नंतर दूरशिक्षण पध्दतीला चालना मिळाली.या कालखंडात अनेक संशोधकांनी दूरशिक्षणाच्या विकासाच्या दृष्टीने संशोधन केले, त्यात मंडिसन येथील विन्स कौन्सेस विश्वविद्यालयातील शिक्षण विद्याशाखेतील प्राध्यापक चार्लस वेदमेयर, मायकल मुर, स्वीडनमधील हरमन्डस येथील पत्रव्यवहाराद्वारे शिक्षण देणाऱ्या संस्थेचे संचालक बोर्जे होमबर्ग, जर्मनीतील फर्न युनिव्हर्सिटीचे प्रथम कुलगुरू पीटर्स इ. तत्ववेत्यांनी आपल्या संशोधनातून दूरशिक्षणाची वेगवेगळी गृहीत तत्वे मांडली आहेत. ती पुढीलप्रमाणे:

**चार्लस वेदमेयरः**

The org of independent study हा वेदमेयर यांचा सिध्दांत मुळे तत्व म्हणून मांडण्यात आला. मुक्त विद्यापीठातून दिले जाणारे शिक्षण हे स्वयं-अध्ययन पध्दतीतूनच दिले जाते. म्हणजेच अध्ययनार्थीच्या शैक्षणिक गरजांनुसार येथे विविध शिक्षणक्रमांची निर्मिती केलेली असते. त्याने कोणत्या शिक्षणक्रमासाठी प्रवेश घ्यावा याचे प्रत्येकाला स्वातंत्र्य असते.

**बोर्जे होमबर्गः**

मार्गदर्शनपर शैक्षणिक सुसंवादाचा होमबर्ग यांनी सिध्दांत मांडला. त्यासाठी विद्यापीठांनी अध्ययनासाठी विविध साधने, साहित्यांची मोठ्या प्रमाणात निर्मिती केली. अध्ययनार्थीच्या सोयीनुसार परिसंवाद, चर्चासत्रे, संपर्कसत्रांचे आयोजन केले जावू लागले.

**ऑटो पीटर्सः**

ऑटो पीटर्स यांचा दूरशिक्षण ही औद्योगिक प्रक्रिया आहे हा सिध्दांत मांडला. दूरशिक्षण पध्दतीत स्वताचा अभ्यासक्रम स्वता विकसित केला जातो. अध्ययनसाहित्याची निर्मिती, वितरण केले जाते. स्वंयपूर्णता हाही निकष उद्योगांप्रमाणे मुक्तविद्यापीठांनी स्वीकारलेला आहे. त्यामुळे या विद्यापीठांची कार्यपध्दती ही उद्योग केंद्रासारखी वाटते.

**मायकेल मुरः**

अध्ययनार्थीची शैक्षणिक स्वायत्तता हा मायकेल मुर यांचा सिध्दांत देखील दूरशिक्षणात अतिशय उपयुक्त ठरला. अध्ययनार्थीला आवश्यक आणि उपयुक्त शिक्षण त्याच्या वेळेनुसार उपलब्ध झाले. **(www.open.ac.uk)**

## ४.३ दूरशिक्षणाची वैशिष्टेः

दूरशिक्षणाची कार्यपध्दती ही उद्योगासारखी असते. दुरशिक्षणात अध्ययनार्थी आणि अध्यापक / समंत्रक या दोघांमध्ये बऱ्याच अंशी भौगोलिक अंतर असते. दूरशिक्षणाचा मुळ पाया स्वयंअध्ययन हा आहे तर दूरशिक्षणप्रणाली ही एक अध्ययनार्थी केंद्रित प्रणाली आहे. मुक्त विद्यापीठाची वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे :

**१. स्वयंगतीनुसार शिक्षणः** मुक्त विद्यापीठाचे केंद्रस्थानी असलेले हे तत्व आहे. या विद्यापीठात प्रवेश घेणारा विद्यार्थी हा सज्ञान आणि स्व-खुशीने प्रवेश घेत असतो. त्याला शिक्षणाचे महत्व पटलेले असते असे मानले जाते. या विद्यापीठात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यासाठी शिक्षणक्रमाचा वेळ ठरवून दिलेला असतो. त्यामुळे हे विद्यार्थी ठराविक कालावधित अभ्यासकेंद्रावर जावून आपल्या शंकाचे निरसन करुन घेतात.

**२. स्वयं-अध्ययनावर भरः** दूरशिक्षणप्रणाली किंवा मुक्त विद्यापीठाचे हे महत्वाचे तत्व आहे. यामध्ये अध्ययनार्थी हा सज्ञान आणि सुज्ञान असल्याकारणाने स्व:ताचे हित लक्षात घेवून तो अभ्यासक्रमाची निवड करतो. त्यासाठी त्याला आवश्यक असणारी मदत विद्यापीठ करत असते.

**३. गरजांनुसार शिक्षणक्रमः** या विद्यापीठात प्रवेश घेणारे विद्यार्थी हे नोकरीत, व्यवसायात किवां कौटूंबिक जबाबदारी सांभाळून अध्ययन करीत असतात. ह्या विद्यार्थ्यांना आवश्यक असणारे व्यावसायिक शिक्षण, नवीन तंत्रज्ञानासंबंधित शिक्षण गरजेनुसार निवडण्याची मुभा या विद्यापीठामध्ये उपलब्ध असते.

**४. संप्रेषण व माहिती तंत्रविज्ञानाचा वापरः** या शिक्षण पध्दतीत माहिती व तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणात वापर केला जात आहे. अध्ययनार्थींच्या गरजा लक्षात घेवून त्यांना आवश्यक असणारी माहिती तंत्रज्ञानाच्या साह्याने उपलब्ध करून दिला जातो.

**५. उद्योग केंद्रासारखी कार्यपध्दतीः** मुक्त व दूरशिक्षणाची कार्यपध्दती उद्योगकेंद्रांप्रमाणे आहे. अध्ययनार्थीसाठी नवनवीन अभ्यासक्रम तयार करणे, अध्ययनार्थीकरिता वाचन साहित्याची निर्मिती केली जाते. स्वंयपूर्णता हाही निकष उद्योगांप्रमाणे मुक्तविद्यापीठांनी स्वीकारलेला आहे. त्यामुळे या विद्यापीठांची कार्यपध्दती ही उद्योग केंद्रासारखी वाटते.

**६. अनेकविध शैक्षणिक माध्यमांचा वापरः** मुक्तविद्यापीठाच्या विद्यार्थ्यांसाठी नियमित तासिका होत नाही. तसेच अध्ययन कर्त्यांना प्रत्येकवेळेस अभ्यासकेंद्रावर जाणे शक्य होत नाही, त्यामुळे त्यांना स्व:यअध्ययनासाठी मुद्रितसाहित्य, दृकश्राव्य साहित्य,संपर्कसत्रे, आकाशवाणी व दुरचित्रवाणी समत्रंण, वेबरेडीओ, इंटरनेट इत्यादी साधने उपलब्ध करुन दिले जातात. या अनेकविध गुणवैशिष्ट्यानां, परिस्थितीला अनुरुप अशा एक किंवा अनेक माध्यमांचा अध्ययनार्थी उपयोग करतो.

**७. लवचिकता:** मुक्तविद्यापीठाचे सर्वात महत्वाचे वैशिष्ट्ये म्हणजे लवचिकता होय. अगदी प्रवेशापासून ते परीक्षेपर्यत प्रत्येक बाबतीत निर्णय, निवडीची स्वायत्तता असल्याने मुक्त व दूरशिक्षण कार्यपध्दती ही लवचिक आहे. प्रत्यक ठिकाणी नियमांची काटेकोर बंधने ह्यात शिथिलता व विविध पर्यायांची उपलब्धता अध्ययनार्थीस असते. **(पाईकराव, २०१५)**

## ४.४. भारतातील दूरशिक्षणाचा इतिहास :

१९४९ साली डॉ. पंजाबराव देशामुख यांनी विदर्भात अमरावती येथे पहिले लोकविद्यापीठ (Mass Varsity) स्थापन केले. तांत्रिक व व्यवसायिक शिक्षण देणे ही भूमिका हे विद्यापीठ स्थापन करण्यामागे होती. मात्र त्याला पुढे चालना मिळाली नाही.

१९६१ मध्ये भारताच्या शिक्षण मंत्रालयाने पत्रव्यवहाराद्वारे संपूर्ण भारतात शिक्षण देण्याच्या दृष्टीने आराखडा तयार करण्यासाठी समिती नेमली दिल्ली विद्यापीठाने पायलट प्रोजक्ट म्हणून पत्रव्यवहाराद्वारे शिक्षण देण्याच्या दृष्टीने काम करावे असे सूचविण्यात आले. त्यानुसार १९६२ मध्ये दिल्ली विद्यापीठामध्ये पत्रव्यवहाराद्वारे शिक्षणाची सुरवात झाली. १९६४-१९६६ च्या शिक्षण आयोगाने पत्रव्यवहाराद्वारे शिक्षणामुळे उच्च शिक्षणाच्या विस्ताराचा अपूर्ण राहीलेल्यानां शिक्षण देण्याचा हाच एक मार्ग आहे असे सूचविले. पुढे आयोगाने असेही म्हटले की १९८६ पर्यंत एकूण प्रवेशाच्या एक तृतीयांश प्रवेश पत्रव्यवहारद्वारे व सांयकालीन शिक्षणाद्वारे होवू शकेल.

दिल्ली विद्यापीठानंतर १९६८ मध्ये युनिव्हर्सिटी ऑफ पतियालाने पत्रव्यवहाराद्वारे शिक्षणाची सुरवात केली. अशा रीतीने १९७० ते १९८० या काळात १९ विद्यापीठांनी पत्रव्यवहाराद्वारे शिक्षणाला सुरवात केली. १९८२ मध्ये डॉ. माधुरीबेन शहा यांच्या अध्यक्षतेखाली केंद्रिय मुक्त विद्यापीठाच्या कार्यासंबधी अभ्यास करण्यासाठी समिती नेमली. या समितीने कोणताही उशीर न करता मुक्त विद्यापीठाची स्थापना करण्याची सूचना केली. १९८३-१९८४ च्या दरम्यान मुक्त विद्यापीठाच्या कल्पनेचा पुनरूच्चार झाला. पंतप्रधान राजीव गांधी यांनी देशाला उद्देशून केलेल्या भाषणात याबाबत घोषणा केली. केद्रांतील दोन्ही सभागृहात १९८५ ला इंदिरा गांधी राष्ट्रिय मुक्त विद्यापीठाची स्थापना करण्याचा कायदा संमत झाला. इंदिरा गांधी नॅशनल ओपन युनिव्हर्सिटी या नावातच सूचित केल्याप्रमाणे ते विद्यापीठ ही देशातील सर्व मुक्त विद्यापीठांची शिखर संस्था आहे. इंदिरा गांधी राष्ट्रिय मुक्त विद्यापीठाची स्थापना होण्यापूर्वीच १९८२ मध्ये

प्रथम आंध्रप्रदेशात, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मुक्त विद्यापीठ स्थापन झाले. प्रोफेसर राम रेड्डी हे त्या विद्यापीठाचे प्रथम कुलगुरू होते. तसेच नालंदा, वर्धमान आणि १९८९ ला महाराष्ट्रात यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाची स्थापना झाली. **(लिंबाळे, २०००)**

## ४.५ भारतातील मुक्त विद्यापीठे:-

भारतात मुक्त विद्यापीठाद्वारे दूरशिक्षण पध्दती राबविली जाते. यामध्ये जे लोक पारंपरिक शिक्षण घेण्यापासून वंचित राहीले त्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा हेतू आहे. आणि तो बव्हंशी साध्य होतांना दिसतो आहे.

या शिक्षणपध्दतीद्वारे विविध व्यावसायिक शिक्षण देण्यावर भर दिलेला आढळून येतो. व्यावसायीक शिक्षणाबरोबरच पारंपारीक अभ्यासक्रम या विद्यापीठांद्वारे राबविले जातात.

भारतात एकूण १४ मुक्त विद्यापीठे असून एक राष्ट्रीय ती १३ राज्यस्तरीय मुक्तविद्यापीठांचा यांत समावेश होतो.

**सारणी क्रमांक ४.१**

**भारतातील मुक्त विद्यापीठांची यादी**

| S.No | Name of Open University with short forms | State | City | Year of Established |
|---|---|---|---|---|
| 1 | INDIRA GANDHI NATIONAL OPEN UNIVERSITY (IGNOU) | Delhi | New Delhi | १९८५ |
| 2 | DR. B.R. AMBEDKAR OPEN UNIVERSITY (BRAOU) | Andhra Pradesh | Hyderabad | १९८२ |
| 3 | VARDHMAN MAHAVEER OPEN UNIVERSITY (VMOU) | Kota | Rajasthan | १९८७ |
| 4 | NALANDA OPEN UNIVERSITY (NOU) | Bihar | Patna | १९८७ |
| 5 | YASHWANTRAO CHAVAN MAHARASHTRA OPEN UNIVERSITY (YCMOU) | Maharashtra | Nashik | १९८९ |
| 6 | MADHYA PRADESH BHOJ OPEN UNIVERSITY (MPBOU) | Madhya Pradesh | Bhopal | १९९१ |
| 7 | DR. BABASAHEB AMBEDKAR OPEN UNIVERSITY (BAOU) | Gujarat | Ahmedabad | १९९४ |

| S.No | Name of Open University with short forms | State | City | Year of Established |
|---|---|---|---|---|
| 8 | KARNATAKA STATE OPEN UNIVERSITY (KSOU) | Karnataka | Mysore | १९९६ |
| 9 | NETAJI SUBHAS OPEN UNIVERSITY (NSOU) | West Bengal | Kolkata | १९९७ |
| 10 | U.P. RAJARSHI TANDON OPEN UNIVERSITY (UPRTOU) | Uttar Pradesh | Allahabad | १९९८ |
| 11 | TAMIL NADU OPEN UNIVERSITY (TNOU) | Tamilnadu | Chennai | २००२ |
| 12 | PT. SUNDERLAL SHARMA OPEN UNIVERSITY (PSSOU) | Chhattisgarh | Bilaspur | २००५ |
| 13 | UTTARANCHAL OPEN UNIVERSITY (UOU) | Uttaranchal | Nainital | २००५ |
| 14 | K K HANDIQUE STATE UNIVERSITY (KKHSOU) | Assam | Guwahati | २००५ |

**(संदर्भ- युजीसी वेबसाईट वरून मिळालेल्या माहितीवरून www.ugc.ac.in)**

## ४.६ भारतातील मुक्त विद्यापीठांद्वारे राबविले जाणारे अभ्यासक्रमः-

भारतातील मुक्त विद्यापीठांद्वारे विविध विषयांतील अभ्यासक्रम राबविले जातात ते पुढील तक्त्यात दिले आहे. जसे (1) Law, (2) PhD, (3) Engineering, (4) Post Graduation, (5) Graduation, (6) MBA, (7) MCA, (8) Diploma, (9) Certificate, (10) Science, (11) B.ed and (12) Commerce

## सारणी क्रमांक ४.२

## भारतातील मुक्त विद्यापीठांद्वारे राबविले जाणारे अभ्यासक्रमः-

| S. N | Name of Open University | Graduation | Post Graduation | Diploma | PG Diploma | Certificate |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | INDIRA GANDHI NATIONAL OPEN UNIVERSITY | B.A, BPP, B.Com, B.Sc, BCA, B.ed, B.Li.Sc and BSW | M.A, M.Com, M.Sc, MCA, MBA, M.ed, M.Li.Sc and MSW | Aquaculture, Accounting, Engineering, Creative Writing, Dairy Technology, Education, Finance, Medical Science, Nursing, Management, Languages, Tourism and Agriculture Studies | Medical Science, Education, Networking, Chemistry, Translation, Book Publishing, Law, Management, Environment, Finance, Culture Studies, Information Technology, Journalism, Rural Development and Social Work | Counselling, Languages, Nursing, Business Skills, IT Skills, Power Distribution, Law, Media Arts, Management, Education, Entrepreneurship, Environmental Studies, Medical Science, Agricultural Science, Jewellery Designing, Repairing, NGO, Networking, Performing Arts, Rural Development, Shoe Making, Social Work, Teaching, Tourism Studies and Visual Arts |
| 2 | DR. B.R. AMBEDKAR OPEN UNIVERSITY | B.A, B.Com, B.Sc, B.Ed, B.Ed (SE), B.LI.Sc and BPR | M.A, M.Com, M.Sc, M.Ed, MBA and M.LI.Sc | Management and Social Sciences | Management, Finance, Environmental Studies, Mass Media in Telugu, Women's Studies, Health Care and Tourism | Health Science, Insurance, NGO Management, Community Development and Food & Nutrition |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 3 | VARDHMAN MAHAVEER OPEN UNIVERSITY | B.A, BBA, B.Com, BCA, BJMC, B.LI.Sc, B.Sc and B.Ed | M.A, M.Sc, M.Com, MJMC, M.LI.Sc and MBA | Accounting, Management, Computers, Tourism, Library Science, Health Education, Social Science and Environment | Management, Accounting, Computer Application, Environment, Law and Tourism | Health Science, Accounting, Languages, Gandhian Philosophy, Management, Computing, Tourism, and Social Sciences |
| 4 | NALANDA OPEN UNIVERSITY | B.A (Honours), B.Sc (Honours), B.Com, BBA, B.Li.Sc and BCA | M.A, M.Sc, MCA, M.Li.Sc and M.Com | Management | Management, Journalism and Yogic Studies | Computing, Networking, Library Science, Dental Science, Laboratory Technique, Physiotherapy, Radiography, Nursing, Optometry, Languages, Religious Studies, Child and Women Rights, Environment Studies, Agriculture Sciences, Health Sciences, Panchayati Raj and Interior Decoration |
| 5 | YASHWANTRAO CHAVAN MAHARASHTRA OPEN UNIVERSITY | B.A, B.Com, B.Sc, B.Arch, B.Tech, BCA, B.Lib. & I. Sc. and Other Bachelor courses (1) Fire and Health† Safety Environment Management, (2) Co-operative Management, (3) Fine Art, (4) Education (e-Edu) and (5) Design | M.A, M.Sc, M.Arch, MBA, MSW, M.ed, M.Com & M.Lib.I.Sc | Agriculture, Management, Computers, Mechanical & Electrical Vocational Trades, Fashion Design, Journalism, Engineering and Medical Sciences | Fire & Safety, Actuarial Science, Bio-Informatics and Health Care | Vocational, Information Technology, Accounting, Health Sciences, Computer Programming, Foreign Languages and Social Sciences |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 6 | MADHYA PRADESH BHOJ OPEN UNIVERSITY | BBA, B.Com, B.Sc, BCA, B.A, B.LI.Sc, BJMC, B.Ed-GEDE and B.Ed-SEDE | MBA, MIB, MBE, M.Com, MCA, M.Sc, M.A, MSW, LLM, M.LI.Sc, MJMC and M.Ed | Management, Air Ticketing, Computer Programming, Education, Health Education, Fashion Technology, Foreign Trade and Vedic Maths | Management, Tourism, Company Secretaryship, Computer Application, Bioinformatics, Chemoinformatics, Health Sciences, Physiotherapy, Remote Sensing and Yoga Therapy | Tourism, Computer Application, Fashion Technology, Human Rights, Rural Development, Environmental Studies, Communication Skills and Housekeeping Operations |
| 7 | DR. BABASAHEB AMBEDKAR OPEN UNIVERSITY | B.A, B.Com, B.Ed, B.Li.Sc, BCA, BBA and Bachelor in Animation | M.A, MCA and Special B.ed | Food Processing, Animation, Hotel Management, Creative writing, Management, Accounting, Insurance, Operation Research, Nursing and Foreign Languages | Hotel Management, Food Processing, Animation, Management, Finance, Banking, Foreign Trade, Information System and Aviation | Nutrition, Computing, Tourism, Teaching, Environment Studies, Communication Skills, Naturopathy, Human Rights, NGO and Nursing |
| 8 | KARNATAKA STATE OPEN UNIVERSITY | B.A, B.Com, B.Ed and B.Li.Sc | M.A, M.Com, M.Ed, M.B.A, M.Sc, LLM and M.Li.Sc | Kannada, Journalism, Statistics and Information Technology | English, Management, Education, Rural Development, Health Education, Journalism and Dietetics | Kannada, Environment, Panchayat Raj, Food Preservation, Nutrition and Agriculture |
| 9 | NETAJI SUBHAS OPEN UNIVERSITY | BPP, B.Li.Sc, Graduate (Physician Assistant), B.A (Honours), B.Com (Honours), B.Sc (Honours), B.Ed SEDE and BCA | M.A, M.Com, M.Sc, M.Li.Sc, MCA and Hospital Administration | Teachers' Training, Yoga, Entrepreneurship, Health Management, DMLT, Tourism, Nature Therapy and Child care | Management, Psychological Counselling, Hospital Management, Nursing, Sonography, Fashion Technology, Journalism, Advertising, Teaching and Taxation | Tailoring, Information Technology, English Communication, Human Rights, Social Work, Fishery, Agriculture and Women studies |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 10 | U.P. RAJARSHI TANDON OPEN UNIVERSITY | B.A, BCA, B.Com, BBA, BTM, B.Ed, B.Ed(SE), BSW and B.Sc | M.Li.Sc, MJ, MBA, MCA, M.A, MCS, M.Com and M.Sc | Health Science, Tourism, Rural Development, Fashion & Textile Designing, Photography, Home Arts, Sanskrit, Jyotirvigyan, Computers and Agriculture | Journalism, Management, Computer Application, Translation, Creative Writing, Environment, Counselling, Education and Hindi | Agriculture, Tourism, Health Science, Law, Management, Women's Empowerment, Yoga, Taxation, Fashion and Textile Designing, Computer Courses, Environmental Studies, Buddhism and Leather Technology |
| 11 | TAMIL NADU OPEN UNIVERSITY | B.A, B.Lit, B.Com, BBA, BCA, B.Sc and B.ed | MBA, M.A, M.Com, MCA and M.Sc | Management, Databases, Media Art, Food & Nutrition, Rural Development, Teaching, Environmental Studies and NGO | Computer Application, Information Technology, Management, Public Administration, Environment, Law, Spoken English and Psychological Counselling | Computers, Technician, Catering, Mechanic, Health Science, Beautician, Fashion Design, Education (Kindergarten), Reparing and Food Production |
| 12 | PT. SUNDERLAL SHARMA OPEN UNIVERSITY | BPP, B.A, B.Sc, B Com, BCA, B.Ed and B.Li.Sc | MA and M.Sc | Management | Computer Application | Computer Application, Yoga, Jyotish and Arurvedic Knowledge |
| 13 | UTTARANCHAL OPEN UNIVERSITY | B.A, BBA, B.Com, BCA, BHM, BTS and BS (Agriculture Management) | MA, M.Sc, Master of GeoInformatics, MBA, M.Com, MCA, Master of Hotel Management, LLM, MSW and MTM | Management, Agriculture, Banking, Computer Application, Accounting, Hotel Management, Health Science, Tourism and Yoga | Management, Music, Computer Application, Geoinformatics and Journalism | Management, Panchayati Raj, Agriculture, Ayurveda, Accounting, Computer Courses, GeoInformatics, Information Technology, Journalism, Yogic Science and Basic Workshop Techniques |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 14 | KK Handique State University | BPP, B.A, B.Com, BMC, BCA and BBA | M.A, MMC, MBA, MCA and MSW | Journalism, Tourism, Hotel Management, Creative Writing, Networking, Library Science and Sanskrit | Mass Communication, Management, Broadcast Journalism, Tourism and Computer Application | Maintenance, Repairing, Computers, Welding, Electrical Wiring and Animals Farming |

**(संदर्भ- www.indiaeduinfo.com)**

## ४.७ यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठः-

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ हे देशातील या क्षेत्रातील अतिशय मानाचे आणि महत्वाचे विद्यापीठ मानले जाते. दूरशिक्षण क्षेत्रातील (Open and Distance Learning) जगातील मोजक्या 'मेगा' विद्यापीठांत समावेश केला आहे.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाची स्थापना महाराष्ट्र शासनाच्या विधिमंडळ कायदा क्र.२०/१९८९ अन्वये १ जुलै १९८९ रोजी झाली व विद्यापीठ अनुदान मंडळाच्या कायदा कलम १२/ब अन्वये विद्यापीठास मान्यता मिळाली. भारतातले हे पाचवे मुक्त विद्यापीठ. संपुर्ण महाराष्ट्र हे या विद्यापीठांचे कार्यक्षेत्र आहे. २००३ साली शासनाने महाराष्ट्राबाहेर, देशात व जगात कोठेही शिक्षण गरजूंपर्यंत पोहचविण्याचा मार्ग खुला केला.

महाराष्ट्रात मुक्त विद्यापीठ स्थापनेच्या कार्याला डॉ. के. जी. देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीपासून सुरवात झाली. त्या समितीचा अहवाल १९८४ साली सादर केल्यानंतर, त्या विद्यापीठाचा प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी विशेष अधिकारी म्हणून डॉ. राम ताकवले यांची नेमणुक झाली.

१९८८ मध्ये शरद पवार मुख्यमंत्री असतांना शिक्षणमंत्री कमलकिशोर कदम यांनी विद्यापीठाचे बिल सादर करून यशस्वीरित्या पास करून घेतले. या वेळी विधीमंडळात तत्कालीन शिक्षणमंत्र्यांनी शासनाची आणि विद्यापीठाची उद्दिष्टे स्पष्टपणे मांडली. या विधेयकावर चर्चा करतांना अनेक लोकप्रतिनीधीनीं एकच भूमिका मांडली, ती म्हणजे 'बहूजन समाजाला, सर्व सामान्य माणसाला आणि समाजातील शिकू इच्छिणाऱ्या प्रत्येक घटकाला उच्च शिक्षणाची दुसरी

संधी मिळाली पाहिजे.' म. फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या विचारांशी सुसंगत अशी भूमिका आहे. एस. एम. जोशी यांनी या विद्यापीठाला यशवंतराव चव्हाण यांचे नाव देण्याची सूचना मांडली व शरद पवार यांच्या प्रेरणेने महाराष्ट्राचे लोकनेते यशवंतराव चव्हाण यांचे नाव या विद्यापीठाला दिले. या विद्यापीठाचे पहिले कुलगुरू म्हणून डॉ. राम ताकवले यांची नियुक्ती झाली. यशवंतराव चव्हाणाचे नाव विद्यापीठाशी निगडीत असल्याने हे विद्यापीठ समाजातील सर्वसामान्य जनतेपर्यत पोहचावे व तेही मराठीतून यासाठी सुरवातीपासून प्रयत्न केला गेला.

या विद्यापीठातून दिले जाणारे शिक्षण हे पारंपरिक शिक्षणाबरोबरच व्यावसायिक व कौशल्यधिष्ठित असावे यासाठी सुरवातीपासुन प्रयत्न केलेले आहेत. आयुष्यभरासाठी शिक्षण, काम करता करता शिक्षण, नोकरी व्यवसायाला आधारभूत ठरणारे कौशल्यावर आधारित शिक्षण या संकल्पना प्रत्यक्षात आणून समाजाच्या जडण-घडणीत हे विद्यापीठ सहभागी झाले आहे. **(लिंबाळे, २०००)**

**विद्यापीठाचे बोधवाक्य:-**

'ज्ञानगंगा घरोघरी' हे बोधवाक्य या विद्यापीठास अतिशय समर्पक असेच आहे. शिक्षणाची संधी जास्तीत जास्त लोकांपर्यत पोहचविण्याचे ब्रीद व्यक्त करणारे हे बोधवाक्य आहे. ज्ञानाची गंगा घरोघरी, सामान्य जनतेपर्यत नेण्याचे मुक्त विद्यापीठाचे ध्येय अवघ्या दोन शब्दांच्या या बोधवाक्यात प्रतिबिंबित झालेले आहे. या बोधवाक्यातूनच विद्यापीठाची विचारधारा स्पष्ट झालेली आहे.

### **४.८ यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाची उद्दिष्टेः-**

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाची उद्दिष्टे ही या विद्यापीठाच्या स्थापनेसाठीच्या कलम चारमध्ये नमुद केलेली आहे.

१. समाजातील बहुसंख्य लोकांना उच्च, व्यावसायिक व तांत्रिक शिक्षण उपलब्ध करून देणे.
२. वंचित गटांच्या, विशेषत: स्त्रियांच्या आणि ग्रामीण भागातील लोकांच्या शैक्षणिक गरजांकडे लक्ष पुरविणे.
३. व्यक्ती, संस्था आणि राज्य यांच्या विकासाच्या गरजांशी शिक्षणक्रमांची सांगड घालणे.
४. अध्यापनात दूर शिक्षण पध्दती आणि आधुनिक संज्ञापन तंत्रज्ञान वापरून अभिनव, लवचिक आणि मुक्त शिक्षण उपलब्ध करून देणे.
५. निरंतर, प्रौढ आणि विस्तार शिक्षण उपलब्ध करून देणे, प्रौढांना नव्या तंत्रज्ञानाशी जुळवून घेता यावे यासाठी विशेष प्रशिक्षण देण्यात यावे.
६. ज्ञानाच्या सर्व क्षेत्रांत विशेषत: शैक्षणिक, तंत्रज्ञान आणि दूरशिक्षण ह्या क्षेत्रांत पदव्युत्तर अभ्यासाच्या आणि संशोधनाच्या संधी उपलब्ध करून देणे.

वरील उद्दिष्टांना अनुसरून विद्यापीठाने आतापर्यंत वाटचाल केली असून ती यापुढेही चालू राहील.

### **४.९ यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाची वैशिष्ट्येः-**

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ हे अन्य पारंपरिक विद्यापीठांपेक्षा रचना व कार्यपध्दतीच्या बाबतीत वेगळे आहे.

१. या विद्यापीठातील बहूसंख्य शिक्षणक्रमांची माध्यम भाषा मराठी असून आवश्यकतेनुसार काही शिक्षणक्रम हे इंग्रजी माध्यमातून देखील उपलब्ध आहे.
२. अध्यापनात अद्यावत तंत्रज्ञानाचा व साधनांचा जास्तीत जास्त वापर केला जातो.
३. विद्यापीठात वाणिज्य व व्यवस्थापन, मानव्यविद्या व सामाजिक शास्त्रे या पारंपरिक विद्यापीठांबरोबरच कृषी, संगणक, तंत्रज्ञान इत्यादी व्यावसायिक शिक्षणक्रम उपलब्ध आहे.

४. विद्यापीठामार्फत विविध सामाजिक उपक्रम राबविले जातात. जसे विद्यापीठस्तरीय क्रीडा स्पर्धा आयोजित करणे, व्याख्यानमाला चालविणे, समाजातील नामांकित व्यक्तींना त्यांच्या गौरवार्थ पुरस्कार देणे इ.

५. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातर्फे 'संवाद पत्रिका' हे मासिक प्रसिध्द केले जाते. या मासिकाद्वारे विद्यार्थ्यांना शैक्षणिक मार्गदर्शन केले जाते.

६. समाजात चालू असलेल्या विकासाच्या आणि परिवर्तनाच्या प्रक्रियेला साह्यभूत होण्याच्या दृष्टीने विद्यापीठ स्थानिक, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील मान्यवर संस्थाशी सहकार्य-संबध प्रस्थापित करते. उदा. 'इस्त्रो' या संस्थेच्या सहकार्याने आभासी वर्गाचा प्रकल्प राबविला जात आहे. **(पाईकराव, २०१५)**

### ४.१० मुक्त विद्यापीठाची विभागीय केंद्रः-

मुक्त विद्यापीठाची महाराष्ट्र राज्यात एकूण आठ विभागीय केंद्रे आहे.

१. नाशिक
२. मुंबई
३. कोल्हापूर
४. औरंगाबाद
५. अमरावती
६. नांदेड
७. नागपूर
८. पुणे

ही विभागीय केंद्रे त्या त्या विभागातील अभ्यासकेंद्रे व मुख्यालय यांच्यातील दुवा म्हणून काम करतात. (www.ycmou.digitaluniversity.ac)

## ४.११ यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाद्वारे राबविले जाणारे विद्याशाखानिहाय शिक्षणक्रमः-

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात एकूण आठ विद्याशाखा आहेत. सर्वसाधारणपणे प्रत्येक विद्याशाखेतून प्रमाणपत्र, पदविका, पदवी आणि पदव्युत्तर शिक्षणक्रम विकसित केले जातात. त्याचबरोबर काही विद्याशाखामध्ये एम. फिल., पीएच्.डी कार्यक्रम राबविले जातात. विद्याशाखानिहाय शिक्षणक्रम पुढील प्रमाणे दिले आहे.

१. मानव्यविद्या व सामाजिक शास्त्रे विद्याशाखा

२. वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा

३. शिक्षणशास्त्र विद्याशाखा

४. विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा

५. संगणक शास्त्र विद्याशाखा

६. निरंतर शिक्षण विद्याशाखा

७. कृषी विद्याशाखा

८. आरोग्य विज्ञान विद्याशाखा

## ४.१२ मानव्यविद्या व सामाजिक शास्त्रे विद्याशाखा

मानव्यविद्या व सामाजिक शास्त्रे विद्याशाखेमध्ये शिकविले जाणारे विषय खालिलप्रमाणे.

१. पूर्वतयारी शिक्षणक्रम

२. बी.ए.

३. ग्रंथालय व माहितीशास्त्र पदवी

४. ग्रंथालय व माहितीशास्त्र निष्णात

५. वृत्तपत्रविद्या व जनसंज्ञापन पदविका

वरिलप्रमाणे अभ्यासक्रम मानव्यविद्या व सामाजिक शास्त्रे विद्याशाखेमध्ये शिकविले शिकविले जातात. काही काळापर्यंत ग्रंथालय व माहितीशास्त्र या विषयात एम. फिल. व पीएच.डी हे कार्यक्रम राबविले जात होते.

**ग्रंथालय व माहितीशास्त्र विभागः-**

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापिठाने काळाची पावले ओळखून ग्रंथालय व माहितीशास्त्रातील शैक्षणिक गरजांची पूर्ती करण्यासाठी १९९६ साली या विषयातील पदवी शिक्षणक्रम (B. Lib & I. Sc.) सुरू केला. मराठी माध्यमातून आणि तोही मुक्त शिक्षण पध्दतीद्वारे सुरू झालेला पहिलाच पदवी शिक्षणक्रम होय. त्यामुळे महाराष्ट्रातील सर्वच विभागातून या शिक्षणक्रमाला चांगला प्रतिसाद मिळाला. या शिक्षणक्रमाच्या प्रवेशासाठी मराठवाडा, विदर्भ, प. महाराष्ट्र, कोकण, मुंबई या सर्व विभागातून आलेला प्रतिसाद पाहून निधारित प्रवेश क्षमता ३० वरून ४० पर्यत वाढविण्यात आली. तसेच अभ्यासकेद्रांची संख्या देखील ३० पर्यत पोहचली. आतापर्यत या पदवीचा हजारो विद्यार्थ्यांनी लाभ घेवून या क्षेत्रात आत्मविश्वासाने कार्यरत आहे.

इ.स. २००० पासून विद्यापीठाने ग्रंथालयशास्त्रात करियर करणाऱ्या विद्यार्थी आणि वाचकांच्या मागणीनुसार ग्रंथालयशास्त्रातील पदव्युत्तर पातळीच्या ग्रंथालय व माहितीशास्त्र निष्णात (M. Lib & I. Sc.) हा अभ्यासक्रम सुरू केला. पदवी अभ्यासक्रमासारखाच पदव्युत्तर अभ्यासक्रमाला देखील भरघोस प्रतिसाद मिळाला. या अभ्यासक्रमासाठी २० विद्यार्थी क्षमता निश्तित केली होती. या अभ्यासक्रमासाठी महाराष्ट्रातून निवडक अभ्यासकेंद्र सुरू करण्याचे ठरविण्यात आले. ही सर्व अभ्यासकेंद्र गुणवत्तेच्या दृष्टिने उच्च दर्जाची राहातील व या केद्रांतील विद्यार्थ्यांना महाराष्ट्रातील नामवंत तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाचा लाभ मिळावा या जाणिवपूर्वक प्रयत्न केले.

या अभ्यासक्रमासाठी दर्जेदार पाठ्यपुस्तकांची निर्मिती करण्यासाठी महाराष्ट्रातील विविध भागातील नामवंत तज्ज्ञांकडून मार्गदर्शन घेतले. यासाठी विविध विद्यापीठांच्या अभ्यासक्रमांचे अवलोकन करुन, भविष्यकालीन गरजांची पूर्ती करणारा अभ्यासक्रम तयार केला. या अभ्यासक्रमात १८ मुद्रित पुस्तके, दोन कार्यपुस्तिका व प्रतिवर्षी 'ज्ञानगंगोत्री' या नियतकालीचे ४ अंक असे समृध्द आणि दर्जेदार वाचनसाहित्य विकसित करण्यात आले आहे.

सर्व अभ्यासकेद्रांवर प्रत्येक आठवड्याला त्या-त्या विषयातील तज्ज्ञांचे मार्गदर्शन आणि वर्षातून एकदा नामवंत तज्ज्ञांच्या विशेष मार्गदर्शनाचे अभ्यास शिबीर आयोजित केले जाते, हे या शिक्षणक्रमातील विशेष वैशिष्ट्य आहे. **(शिंदे, चौधरी आणि बियाणी, २०१३)**

## ४.१३. ज्ञानगंगोत्री नियतकालिकाचा परिचयः-

ग्रंथालय आणि माहितीशास्त्रातील घटना, घडामोडी आणि त्यावरील भाष्य या विषयाला वाहीलेले 'ज्ञानगंगोत्री' हे नियतकालीक मानव्यविद्या व सामाजिक शास्त्रे विद्याशाखेमार्फत प्रसिध्द केले जाते. बी.लिब. व एम. लिब. च्या विद्यार्थ्यांना ग्रंथालय व माहितीशास्त्राच्या घडामोडींचे अद्यावत ज्ञान देण्याचा उपक्रम या माध्यमातून केला जातो. एम.लिब. च्या विद्यार्थ्यांची या अकांतील मजकुरावर आधारित परीक्षाही घेतली जाते.

'ज्ञानगंगोत्री' या नियतकालीकाचा ग्रंथालय आणि माहितीशास्त्र पदव्युत्तर पदवी शिक्षणक्रमामधील (LIB-13) या अभ्यासक्रमात 'वर्तमान घटना, घडामोडी, भाष्य' हा तीन श्रेयाकांसाठी म्हणजेच १०० गुणांसाठी ठरविलेला आहे.

### ज्ञानगंगोत्री या नियतकालिकाची माहितीः-

ज्ञानगंगोत्री या नियतकालिकाची माहिती पुढीलप्रमाणे-

**संपादक**

डॉ. मधुकर शेवाळे

**संपादक मंडळ**

प्रा. प्रवीण घोडेस्वार

डॉ. राजेंद्र कुंभार

डॉ. मोहन खेरडे

डॉ. सुषमा पौडवाल

डॉ. धर्मराज वीर

**प्रकाशक-** डॉ. प्रकाश अतकरे, कुलसचिव,

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक. ४२२ २२२

**ISSN** २२३१ ६५०७

**पत्रव्यवहाराचा पत्ता-**

वर्गणी व व्यवस्थापन व संपादकीय साहित्य पाठविण्यासाठी-

डॉ. मधुकर शेवाळे, उप-ग्रंथपाल व प्रमुख,

ग्रंथालय आणि माहितीस्त्रोत केंद्र,

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक. ४२२ २२२

| | |
|---|---|
| **प्रकाशन कालावधी :** | त्रैमासिक |
| अंक क्रमांक | अंक प्रकाशनाचा कालावधी किंवा महीने |
| अंक १ ला- | जुन, जुलै, ऑगस्ट |
| अंक २ रा- | सप्टेंबर, ऑक्टोबर, नोव्हेंबर |
| अंक ३ रा- | डिसेंबर, जानेवारी, फेब्रुवारी |
| अंक ४ था- | मार्च, एप्रिल, मे |

| | | |
|---|---|---|
| **सुट्या अंकाची किंमत :** | संस्था रु. १००/- | व्यक्ती रू. ३०/- |
| **वार्षिक वर्गणी :** | संस्था रू. ४००/- | व्यक्ती रू. १२०/- |
| **धनाकर्ष डीडी. :** | वित्त अधिकारी, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, | |

ग्रंथालय आणि माहितीशास्त्र या विषयावर मराठी भाषेत स्वंतत्र असे नियतकालिक नसल्याने विद्यापीठाने ज्ञानगंगोत्री हे नियतकालिक सुरू करण्याचा निर्णय घेतला. या नियतकालिकाच्या पहिल्या अकांमध्येच कुलगुंरूनी आपल्या मनोगतामध्ये या नियतकालिकाचे उद्दिष्ट स्पष्ट केले आहे.

## ४.१४ ज्ञानगंगोत्री नियतकालिकाचे उद्दिष्ट्ये:-

ज्ञानगंगोत्री नियतकालिकाच्या पहिल्या अंकात कुलगुरूंनी त्यांच्या मनोगतामध्ये पुढील प्रमाणे उद्दिष्टे सांगितले आहे.

१. नवीन ज्ञानाचा, माहितीचा, शोधांचा वेध घेवून त्या विषयांवर तज्ज्ञांकडून उत्तम लेखन करून घेणे.

२. ग्रंथालय आणि माहितीशास्त्र या विषयात मराठी भाषेत नवीन आणि अद्यावत साहित्य निर्माण करणे.

**३.** ग्रंथपाल आणि ग्रंथालय व्यावसायिकांना लेखनासाठी हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून देणे. **(कुलगुरूंचे मनोगत, २०००)**

कोणत्याही शिक्षणक्रमामध्ये ठरविण्यात आलेल्या अभ्यासक्रमासाठी प्रथम वाचन साहित्य प्रसिध्द केले जाते, मात्र या विषयाचे वाचनसाहीत्य पुस्तकरुपाने उपलब्ध करून देण्याऐवजी वाचन साहित्याला पर्याय म्हणून ज्ञानगंगोत्री या त्रैमासिकाची कल्पना स्वीकारण्यात आली.

रूपारेल महाविद्यालयाचे ग्रंथपाल डॉ. प्रदीप कर्णीक यांच्याबरोबर झालेल्या अनौपचारिक चर्चेमधून असे निदर्शनात आले की, यापूर्वी १९९१ ते २००० या कालावधीत Recent Trends in Librarianship या शिक्षणक्रमातंर्गत मुंबई विद्यापीठात नियतकालीकांवर आधारित एक विषय घेतला जात होता. ह्या विषयामध्ये ग्रंथालयशास्त्रामध्ये त्या-त्या कालावधित येणारे नवीन ट्रेंन्ड, घटना घडामोडी या बाबतचे अभ्यासक्रम घेतला जात. ग्रंथालय संगणकिकरण, ग्रंथालय नेटवर्क, विविध सॉफ्टवेअर, LAN, WAN या सारख्या वर्तमान विषयावर आधारित हा शिक्षणक्रम राबविला जात, आणि तो यशस्वी देखील झाला होता. कालांतराने ती पध्दत बदलून शिक्षणक्रमावर आधारित अभ्यासक्रम सुरू करण्यात आला. मात्र यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातील ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विभागात गेल्या सोळा वर्षापासून त्रैमासिकावर आधारित अभ्यासक्रम यशस्वीरित्या सुरू आहे.

कोणत्याही विषयातील वर्तमान घटना व घडामोडींचे पडसाद हे ग्रंथापेक्षा नियतकालिकात जास्त उमटलेले दिसून येतात. ग्रंथालयशास्त्रही त्याला अपवाद नाही. ज्ञानगंगोत्री या नियतकालीकांमधून नविन घटना, घडामोडी, नविन विषयावरील अद्यावत लेख, संशोधनपर

माहिती हि प्रसिध्द होते, तसेच संकल्पनात्मक लेख, ग्रंथ परीक्षण, ग्रंथ परीचय, ग्रंथालयांशी संबंधित इंटरनेटवरील निवडक वेबसाईटची माहिती या नियतकालीकाद्वारे उपलब्ध करून दिली जाते.

सुरवातीच्या काळात ज्ञानगंगोत्री त्रैमासिकामध्ये संपादकीय, अजून ताजा वास जुन्याला, वेब, ग्रंथपरिचय, सार, परिक्रमा ह्या सदरांचा समावेश केलेला होता. कालांतराने आवश्यक्तेनुसार त्यात योग्य ते बदल होत गेले. काही जुने सदरे/आशय बंद होवून काही नवीन सदरांचा समावेश केला गेला.

या नियतकालिकाच्या संपादक, कार्यकारी संपादक, संपादक मंडळ या मध्येही वेळोवेळी बदल होत गेलेले आढळून येते.

**सारांशः-**

सदर प्रकरणामध्ये दूरशिक्षणाची संकल्पना विषद केली आहे. दूरशिक्षणाच्या बाबतीत वेदमेयर, बोर्जे होमबर्ग, ऑटो पीअर्स, मायकेल मुर या तंज्ज्ञांनी मांडलेले वेगवेगळे विचार व तत्वांची या घटकात माहिती दिली आहे. मुक्त विद्यापीठांच्या वैशिष्ट्याचा सविस्तर उहापोह केलेला आहे. भारतातील मुक्त विद्यापीठांच्या विकासाबाबत माहिती देवून भारतातील मुक्त विद्यापीठांची यादी आणि त्या विद्यापीठांमध्ये राबविल्या जाणाऱ्या अभ्यासक्रमाची माहिती दिलेली आहे. तसेच महाराष्ट्रातील यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचा इतिहास व वैशिष्ट्ये यांची माहिती या घटकात दिली आहे. सदर संशोधन विषयाच्या अनुषंगाने ज्ञानगंगोत्री या नियतकालिकाचा परिचय करून या नियतकालिकांची बिब्लियोग्राफ्रिकल डिटेल्स या प्रकरणामध्ये दिले आहे.

## संदर्भसूची


- शिंदे, आर. एन., चौधरी, एन. आर. आणि बियाणी, प्रमोद. (२०१३). *मुक्त विद्यापीठातील शिक्षण.* नाशिक: यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ.
- लिंबाळे, शरणकुमार. (प्रकाशक). (२०००). *ज्ञानगंगा घरोघरी.* नाशिक: यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ.
- *Ibid,* p. 324
- पाईकराव, विजयकुमार. (२०१५). *मुक्त व दूरशिक्षण तत्त्व आणि कार्यानंद.* नाशिक: यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ.
- *Ibid*, p. 11
- कळमसे, जी. एम., (प्रकाशक). (२०१५). *दूरशिक्षण प्रक्रियेत संयोजक/संमंत्रक यांचे कार्य व भूमिका.* नांदेड: विभागीय केंद्र, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ.
- संपादक, (२०००). कुलगुरुंचे मनोगत. *ज्ञानगंगोत्री,* १(१), जून २०००.
- www.ugc.ac.in
- www.open.ac.uk
- www.indiaeduinfo.com/openuniversity.htm
- http://www.aect.org
- www.ycmou.digitaluniversity.ac

# प्रकरण पाचवे

# माहितीचे संकलन, विश्लेषण आणि अर्थनिर्वचन

## ५.१. प्रस्तावना

संशोधनात माहिती संकलनानंतर तथ्य विश्लेषण ही महत्वाची प्रक्रिया आहे. या प्रक्रियेमध्ये संकलित तथ्यांचे वर्गीकरण माहितीच्या गुणवैशिष्ट्यानुसार केले जाते. संशोधनामध्ये तथ्यांचे परिक्षण करून त्याची क्रमबध्द, शास्त्रोक्त मांडणी केली जाते. त्यामुळे विश्लेषणानंतर निष्कर्ष काढणे सापे जाते.

संशोधनामध्ये विविध माहिती संकलनाच्या साधनांद्वारे माहिती संकलित केल्यानंतर त्या माहितीचे प्रक्रियन (Processing of Information) केले जाते. संशोधनासाठी संकलित केलेली माहिती अपरिपक्व स्वरूपाची असते. तिला विश्लेषणक्षम बनविण्याची प्रक्रिया म्हणजेच तथ्यांचे प्रक्रियन होय. या ठिकाणी माहितीचे योग्य विश्लेषण व निर्वचन करावे लागते. तथ्यांचे विश्लेषण करीत असतांना हे विश्लेषण अधिक शास्त्रीय म्हणजेच वस्तुनिष्ठ व सुव्यवस्थित होण्याची गरज असते. या विश्लेषण व निर्वचनाच्या प्रक्रियेच्या आधारावर सर्वसामान्य सिद्धांताचे प्रतिपादन करावे लागते. संशोधनाच्या एकूण प्रक्रियेमध्ये तथ्यांचे विश्लेषण व निर्वचन या दोन कार्यांना अतिशय महत्वाचे स्थान आहे. तथ्यांचे विश्लेषण आणि निर्वचन केल्याशिवाय सिध्दांताचे आणि नियमांचे प्रतिपादन करता येत नाही.

माहिती संकलनाच्या विविध साधनांद्वारे माहिती संकलित केली जाते. पण विविध प्रकारची माहिती / तथ्य संकलनाने संशोधन विषयाचे स्वरूप स्पष्ट होते असे नाही. तर त्या माहितीमध्ये व्यवस्था निर्माण करण्याची गरज असते. त्यातील परस्परसंबंध, संघटन व व्यवस्थीकरण जाणिवपूर्वक केल्याशिवाय संकलित माहितीचा अर्थबोध होत नाही. म्हणून केवळ तथ्यांची उपलब्धता म्हणजे शास्त्रीय संशोधनाचा शेवट नसतो. म्हणून संकलित माहितीचे समानता, भिन्नता, किंवा अन्य कोणत्या आधारावर वेगवेगळ्या श्रेणीत वर्गीकरण करून त्याचे सारणी किंवा स्तंभामध्ये मांडणी केली जाते. या सारणीमुळे तथ्यांचे गुणविशेष माहित पडतात. अशाप्रकारे तथ्यांचे शिस्तबध्द व्यवस्थापन केले जाते या प्रक्रियेलाच तथ्यांचे विश्लेषण असे म्हणतात.

सामाजिक संशोधनात तथ्यांचे विश्लेषण करून शास्त्रीय पध्दतीने विश्लेषण करणे हे कोणत्याही संशोधन कार्याचे अविभाज्य अंग आहे. पण आशय विश्लेषण हे संशोधकाचे अंतिम उद्दिष्ट नसते. ते संशोधनाचे साध्य नसून साधन असते. संशोधकाचे अंतिम उद्दिष्ट साध्य करण्यासाठी आशय विश्लेषण ही एक महत्वाची पायरी आहे. कारण त्याच्याच आधारे विश्लेषीत केलेल्या तथ्यांतून काही निष्कर्ष अथवा सिंध्दात मांडवयाचे असतात. त्या निष्कर्षाच्या व्यापक अर्थाचा शोध घ्यावा लागतो. हीच संशोधनाची निष्पत्ती असते. थोडक्यात संशोधनातून निष्पन्न झालेल्या निष्कर्षाच्या व्यापक अर्थाचा शोध घेणे म्हणजे तथ्यांतील निर्वचन होय. विश्लेषण आणि निर्वचन या संशोधन प्रक्रियेतील महत्त्वाच्या पायऱ्या आहेत. संकलित तथ्यांच्या संक्षिप्तीकरणाद्वारे संशोधन समस्येला उत्तरे शोधणे हे विश्लेषणाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. संशोधनाचे निष्कर्ष व्यापक अर्थाने शोधून काढणे म्हणजे निर्वचन होय.

## ५.२ माहितीचे संकलन, विश्लेषण व अर्थनिर्वचन

प्रस्तुत संशोधनासाठी ‘‘यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातर्फे प्रकाशित होणाऱ्या ज्ञानगंगोत्री या नियतकालिकाच्या सन २००० ते २०१२ या काळातील अंकांचे विश्लेषण’’ हा संशोधन विषय निवडला आहे. संशोधकाने संशोधनासाठी ज्ञानगंगोत्री या नियतकालिकाच्या सन जुन २००० ते मे २०१३ या तेरा वर्षातील ४६ अंकांमधील माहितीच्या आधारे आशयाचे विश्लेषण केले आहे, त्यासाठी ज्ञानगंगोत्री या नियतकालिकाच्या अंकाचा उपयोग केला आहे. तसेच संशोधकाने संपादक आणि संपादक मंडळ यांच्याकडुन मुलाखतीद्वारे माहिती घेवून त्याचाही आधार विश्लेषणसाठी घेतला आहे. विश्लेषणासाठी अर्थनिर्वचन व अनुमान या साधनांचा वापर केला आहे.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाद्वारे चालविल्या जाणाऱ्या ज्ञानगंगोत्री या नियतकालिकाचे जून २००० ते मे २०१३ या अंकांचे आशय विश्लेषण या प्रकरणात केले आहे. ज्ञानगंगोत्री हे ग्रंथालय व माहितीशास्त्राशी निगडित मराठी भाषेतील उपयुक्त आणि महत्वपुर्ण नियतकालिक आहे. या नियतकालिकाचे जून २००० ते मे २०१३ या तेरा वर्षांच्या कालखंडात

एकुण ४६ अंक प्रकाशित झाले. या अंकाचे विश्लेषण व्यापक असल्याने सोईसाठी पुढीलप्रमाणे विभाग करुन विश्लेषण केले आहे.

१. ज्ञानगंगोत्री या नियतकालिकासंबंधीची पार्श्वभूमी, उद्देश व महत्व यांचे विश्लेषण अभ्यास.

२. ज्ञानगंगोत्री या नियतकालिकातील अंकांमधील सर्वसामान्य माहितीचे विश्लेषण अभ्यास.

३. ज्ञानगंगोत्री या नियतकालिकातील विविध सदरांचे विश्लेषण.

४. ज्ञानगंगोत्री या नियतकालिकाचे पृष्ठनिहाय विश्लेषण.

५. ज्ञानगंगोत्री या नियतकालिकात लेख लिहीणाऱ्या लेखकांचे दायित्व विश्लेषण.

६. लेखकांचे पदनामनिहाय विश्लेषण.

७. लेखकांचे लिंगभेद निहाय विश्लेषण.

८. ज्ञानगंगोत्री या नियतकालिकातील लेखकांचे जिल्हानिहाय विश्लेषण.

९. ज्ञानगंगोत्री या नियतकालिकातील लेखांचे विषयवार आणि प्रकारानुसार विश्लेषण.

१०. ज्ञानगंगोत्री या नियतकालिकामध्ये देण्यात आलेल्या उल्लेखित प्रलेखांचे प्रकारानुसार आणि कालखंडानुसार संदर्भाचे विश्लेषण अभ्यास.

११. ज्ञानगंगोत्री या नियतकालिकातुन प्रसिध्द झालेल्या लेखांचे संकल्पनात्मक आणि संशोधनात्मक विश्लेषण.

१२. संपादक आणि संपादक मंडळाच्या मुलाखतीद्वारे प्राप्त झालेल्या माहितीचे विश्लेषण.

## ५. ३ ज्ञानगंगोत्री या नियतकालिकाची पार्श्वभूमी

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाची स्थापना १९८९ मध्ये झाली. या विद्यापीठात अनेक पदवी व पदव्युत्तर शिक्षणक्रमाचे अभ्यासक्रम सुरू झाले. या विविध अभ्यासक्रमांसाठी विद्यापीठाने विद्यार्थ्यांना संबंधित विषयांचे वाचन साहित्य उपलब्ध करुन दिले.

मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे या शाखेर्तंगत ग्रंथालय व माहितीशास्त्र या पदवी अभ्यासक्रमाची सुरवात १९९६ मध्ये झाली, तर ग्रंथालय व माहितीशास्त्र निष्णात (M. Lib & I. Sc.) हा पदव्युत्तर अभ्यासक्रम २००० मध्ये सुरू केला. पदव्युत्तर अभ्यासक्रमाचा शैक्षणिक दर्जा उच्च राखण्यासाठी विद्यापीठाने विविध उपाययोजना केल्या. याचाच एक भाग म्हणून या विषयाच्या पदव्युत्तर पदवी शिक्षणक्रमातील वर्तमान घटना व घडामोडी या अभ्यासक्रमासाठी वाचन साहित्याला पर्याय म्हणून "ज्ञानगंगोत्री" हे नियतकालिक सुरु केले. हे नियतकालिक त्रैमासीक स्वरूपात प्रकाशीत होते. या नियतकालीकाचा पहिला अंक जुन २००० मध्ये प्रकाशित करण्यात आला. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने आजतागायत संवाद, यशवंती व ज्ञानगंगोत्री हे नियतकालिक प्रकाशित केलेली आहे. त्यापैकी ज्ञानगंगोत्री हे नियतकालीक केवळ ग्रंथालय व माहितीशास्त्र या विषयाला वाहिलेले विद्यापीठाचे ते एकमेव नियतकालिक आहे. या नियतकालिकात ग्रंथालय व माहितीशास्त्राप्रमाणेच इतरही शाखांमधून मागणी आहे. हे नियतकालिक मराठीभाषेमध्ये असल्याने मराठी साहित्यातही मोलाची ज्ञानसाधना केली जात आहे.

ज्ञानगंगोत्री या नियतकालिकाचे संपादकांनी मुख्य तीन उद्देश निश्चित केले होते, मात्र या अभ्यासांती या नियतकालिकाद्वारे इतरही काही महत्वाचे उद्देश साध्य होत असल्याचे संशोधकाच्या लक्षात आले. ते पुढील प्रमाणे-

१. ग्रंथालय व माहितीशास्त्र या पदव्युत्तर पदवी शिक्षणक्रमासाठी वर्तमान घटना आणि घडामोडी अभ्यासक्रमासाठी आशय पुरविणे हा या नियतकालीकाचा मुख्य उद्देश आहे.

२. ग्रंथालय व माहितीशास्त्र या विषयावर मराठीत सर्वसमावेशक व शास्त्रीय स्वरुपाचे खास नियतकालीक नसल्याने हे नियतकालीक मराठीत ज्ञानवृध्दी करते.

३. या अभ्यासक्रमाच्या संदर्भात विद्यार्थ्यांना दर्जेदार व उपयुक्त साहित्य उपलब्ध करून देणे.

४. ग्रंथालय व माहितीशास्त्र या विषयावर वर्षभर घडणाऱ्या घडामोडींचा, शोधांचा व ज्ञानाचा वेध घेऊन विद्यार्थ्यांना उपयुक्त माहिती उपलब्ध करुन देणे.

५. ग्रंथालय शास्त्रातील नव-विचारांचे, नवनव्या संकल्पनांचे, विषयांचे अदान प्रदाण करणे.

६. ग्रंथालय शास्त्रातील समंत्रक, ग्रंथपाल, माहिती सेवेतील तज्ज्ञ, संगणक तज्ज्ञ आणि विद्यार्थ्यांना लेखनासाठी हक्कांचे व्यासपीठ निर्माण करुन देणे.

७. तज्ज्ञांकडुन ग्रंथालय शास्त्रातील नवीन संशोधन साहित्य, लेख तयार करुन घेणे.

८. ग्रंथालय शास्त्रातील विविध ग्रंथालयांची विद्यार्थ्यांना ओळख करुन देणे.

९. ग्रंथालय व माहितीशास्त्रात संशोधनाला प्रेरणा देणे.

१०. ग्रंथालय व्यवस्थापनाचा दर्जा सुधारण्यास उपयुक्त सूचना देणे.

११. ग्रंथालयशास्त्रातील दुर्मिळ ग्रंथाचा विद्यार्थ्यांना परीचय करुन देणे.

१२. या शास्त्रातील जुन्या व नव्या संशोधकांची व त्यांच्या संशोधनांची उपलब्धी करुन देणे.

१३. या विषयाच्या संदर्भात व अभ्यासक्रमाशी निगडीत विषयांवर विद्यार्थ्यांशी संवाद साधणे.

१४. ग्रंथालय व माहितीशास्त्रातील विविध उपयुक्त वेबसाईटचा मागोवा घेऊन त्यांची माहिती उपलब्ध करुन देणे.

१५. या विषयाशी संबंधित संगणकीकरणाची दर्जेदार माहिती उपलब्ध करुन देणे.

१६. नवीन लेखकांना ग्रंथालय शास्त्रावरील लेखनास व्यासपीठ उपलब्ध करुन देणे.

१७. ग्रंथालय व माहितीशास्त्रातील प्रकाशित झालेल्या लेखांचे सार उपलब्ध करुन देणे.

१८. ग्रंथ, ग्रंथालये, ग्रंथालय सेवा, माहिती सेवा अशा विषयांची विद्यार्थ्यांना माहिती उपलब्ध करुन देणे.

१९. अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यांना वाचनसाहित्य पुरविले जाते, त्या वाचनसाहित्यामध्ये येऊ न शकलेली माहिती किंवा त्या माहितीला पुरक ठरणारी माहिती उपलब्ध करुन देणे.

## ५.४ ज्ञानगंगोत्री या नियतकालिकाचे महत्व

ज्ञानगंगोत्री या नियतकालिकातून ग्रंथालयासंबंधी अनेकविध घडामोडी, योजना, नियोजन इत्यादी माहितीचे आदानप्रदान होत असते. ग्रंथालय व्यवस्थापनाच्या माहितीतुन ग्रंथालयाचा दर्जा सुधारण्यास मदत होत आहे. विद्यापीठाच्या ग्रंथालय व माहितीशास्त्राच्या विद्याशाखेस या विषयाचे आकलन वाढविण्यासाठी व वाचन साहित्याला पर्याय या नियतकालिकाने उपलब्ध करून दिला आहे. वाचकांच्या विषयासंबधीत पुरक ठरणारी माहितीचे विश्लेषण, प्रत्यक्ष ग्रंथालयात काम करतांना येणाऱ्या अडचणी, वर्तमान घडामोडीची माहिती मिळविण्यासाठी या नियतकालिकाचा उपयोग होतो. तसेच विशेष ग्रंथालये, औद्योगिक ग्रंथालये, दप्तरखाने, सार्वजनिक ग्रंथालये, यांची सविस्तर माहिती मिळते. ग्रंथालय व्यावसायिकांना तर हे नियतकालिक अतिशय उपयुक्त ठरते. ग्रंथालयात प्रत्यक्ष काम करतांना येणाऱ्या अडचणी मांडण्यासाठी व त्यावर उपाय व आपले मत मांडण्यासाठी हक्काचे व्यासपीठ म्हणून हे नियतकालिक काम करत आहे. विद्यार्थ्यानांदेखील अतिशय उपयुक्त आणि महत्वपूर्ण माहिती या नियतकालिकातुन प्राप्त होते. आपल्या क्षेत्रातील अद्यावत व विशेषत: माहिती तंत्रज्ञानाधारित माहितीची ओळख होते. या क्षेत्रात नवीन व तज्ज्ञ लेखकांना या निमित्ताने एक व्यासपीठ निर्माण झाले आहे. ग्रंथालय शास्त्रातील नव विचारांचे, नवनव्या विषयांचे आदान प्रदान या नियतकालिकामुळे होते. थोडक्यात ज्ञानगंगोत्री या नियतकालिकाद्वारे वाचकांच्या सर्वांगीण गरजा पूर्ण करण्याचा प्रयत्न केला जातो. ग्रंथालय व माहितीशास्त्र या विषयातील घटना, घडामोडी, व भाष्य या आधारावर हे नियतकालिक आपला दर्जा व महत्व सिध्द करते.

एकूणच ज्ञानगंगोत्री या नियतकालिकाचा लाभ ग्रंथपाल, संशोधक, विद्यार्थी, वाचक, माहितीशास्त्र तज्ज्ञ, लेखक व शिक्षणक्षेत्रातील अभ्यासकांना माहितीचा दर्जा उंचावण्यास मदत करते.

## ५.५ ज्ञानगंगोत्री नियतकालिकाचे आशय विश्लेषण

ज्ञानगंगोत्री या नियतकालिकातील सर्वसामान्य माहितीचे विश्लेषण पुढीलप्रमाणे केले आहे. यामध्ये नियतकालिकाचा प्रकाशन कालावधी, मुखपृष्ठ यांचा समावेश आहे.

### ज्ञानगंगोत्री नियतकालिक प्रकाशनाचा कालावधी

ज्ञानगंगोत्री या नियतकालिकाचा प्रकाशन कालावधी हा त्रैमासिक असून प्रत्येक वर्षात चार अंक प्रकाशित होतात. नियतकालीकाचा प्रकाशन कालावधी खालीलप्रमाणे निश्चित केला आहे.

**सारणी क्रं.५.१**

**ज्ञानगंगोत्री नियतकालिकाचा प्रकाशन कालावधी**

| अं. क्रं. | अंक क्रमांक | प्रकाशन कालावधी व महिना |
|---|---|---|
| १. | अंक १ ला | जुन - जुलै - ऑगस्ट |
| २. | अंक २ रा | सप्टेंबर - ऑक्टोबर - नोव्हेंबर |
| ३. | अंक ३ रा | डिसेंबर - जानेवारी - फेब्रुवारी |
| ४. | अंक ४ था | मार्च - एप्रिल - मे |

(स्रोत - ज्ञानगंगोत्री नियतकालिकाचे जून २००० ते मे २०१३ या कालावधीतील अंकांच्या विश्लेषणावरून)

सारणी क्रं. ५.१ वरून असे दिसून येते की, ज्ञानगंगोत्री हे नियतकालिक सुरू करण्याचा उद्देश हा यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठामधून एम. लिब. करत असलेल्या विद्यार्थ्यांना वाचन साहित्य उपलब्ध करून देणे हा आहे. त्यादृष्टीने नियतकालिकाचा त्रैमासिक स्वरूपात कालावधी निश्चित केला आहे.

## ज्ञानगंगोत्री नियतकालिकाचे मुखपृष्ठ

कोणत्याही नियतकालिकाचे मृखपृष्ठ हे महत्वाचे समजले जाते. या मुखपृष्ठावरुन वाचक त्या नियतकालिकाकडे आकृष्ट होतात. मुखपृष्ठाची रचना, रंग, सजावट, त्यावरील अक्षरे, मुखपृष्ठासाठी वापरला जाणारा कागद त्याची जाडी, बांधणी आकार यावरुन बऱ्याच गोष्टींचे आकलन होते.

ज्ञानगंगोत्री या नियतकालिकाच्या अंकांच्या मुखपृष्ठामध्ये रंग संगतीच्या बाबतीत विविधता आणलेली दिसून येते. प्रत्येक वर्षासाठी वेगळा रंग घेण्याचा प्रयत्न केला आहे. मुखपृष्ठासाठी गडद रंगाचा वापर केलेला दिसून येतो. उदा. पिवळा, जांभळा, हिरवा, तपकीरी इत्यादी.

## नियतकालिकाचा आकार

ज्ञानगंगोत्री या नियतकालिकाच्या सर्व अंकाचा आकार एकसारखाच आहे. सर्व १३ वर्षामधील ४६ अंकाचा आकार १३" × २१" असा आहे. या आकारामुळे अंक हाताळण्यास, सोबत बाळगण्यास, झेरॉक्स करण्यास, वाचण्यास सोपा वाटतो.

## मुखपृष्ठावरील मजकुर

ज्ञानगंगोत्री या नियतकालिकाच्या मुखपृष्ठावर मोजकाच परंतु आकर्षक मजकूर आहे. सर्वात वरील बाजुस ज्ञानगंगोत्री हे नाव ठळकपणे छापले आहे. त्याची अक्षरजुळवणी ही सहज वाचता येणारी व मोठ्या टाईपमध्ये आहे. त्याखाली दुहेरी ओळीच्या आत वर्ष, महिने, अंक क्रमांक लहान अक्षरात छापलेले आहे. त्याखाली मुखपृष्ठाच्या मध्यभागी दोन चौरस असून ते एकमेकांवर काही अंशाच्या फरकाने  आहेत. खालचा चौरस पांढरा असून तो उजवीकडे १५° अंशातून फिरलेला आहे. त्यावर फिक्कट गुलाबी रंगाचा दुसरा चौरस आहे. त्या चौरसात चार ओळींचा मजकूर पुढीलप्रमाणे आहे.

ग्रंथालय आणि माहितीशास्त्र

घटना

घडामोडी

भाष्य

वरील चौरसांच्या बरोबर खाली मध्यभागी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचा लोगो छापला आहे. या लोगोखाली ज्ञानगंगा घरोघरी हे ब्रीदवाक्यही छापले आहे.

शेवटच्या ओळीत विद्यापीठाचे नाव यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक असा मजकूर छापला आहे. हे मुखपृष्ठ एक ते चार वर्षासाठी एकसारखेच आहे.

एकूणच मुखपृष्ठ हे साधे, सोपे, रेखीव, सुटसुटीत व आकर्षक आहे.

पाचव्या वर्षापासून मुखपृष्ठाच्या रचनेत बदल केलेला आढळुन येतो. पाचव्या वर्षापासून मुखपृष्ठाच्या उजवीकडून अर्ध्या भागात आडवे छोटे तीन सफेत चौकोन तर बरोबर त्यांच्याखाली चार सफेत चौकोन दिले आहे. पहील्या ओळीच्या शेवटच्या चौकोनाखाली विद्यापीठाचा लोगो दिला असून त्याखाली छोट्या अक्षरात ज्ञानगंगा घरोघरी असे बोधवाक्य आहे. बोधवाक्याच्या खाली मोठ्या अक्षरात ज्ञानगंगोत्री असे लिहिले असून ज्ञानगंगोत्री नावाखाली छोट्या सफेत चौकोनात अंक क्रं, महिने आणि वर्ष नमूद केले आहे. वरील छोट्या सफेत चौकोनाच्या खाली विद्यापीठाचे नाव आणि पत्ता लहान अक्षरात दिला आहे, आणि मुखपृष्ठाच्या शेवटी पाच सफेत चौकोन दिलेले आहे.

ज्ञानगंगोत्री या नियतकालिकास वर्ष ११ वे, अंक चार पासून ISSN नंबर मिळाला असून तो मुखपृष्ठाच्या सर्वात वरिल भागात सफेत चौकोनात ठळकपणे दिला आहे. संपुर्ण मुखपृष्ठावर अस्पष्ट स्वरूपात विद्यापीठाचे बोधचिन्ह दिलेले आहे.

## मुखपृष्ठाची मागील बाजू

ज्ञानगंगोत्री या नियतकालिकाच्या पहिल्या अकांच्या मुखपृष्ठाच्या मागील बाजूस पहिल्या ओळीत ज्ञानगंगोत्री असा मजकूर छापला असून दूसऱ्या ओळीत ग्रंथालय आणि माहितीशास्त्र: घटना, घडामोडी, भाष्य असा मजकूर आहे. त्याखाली अणुक्रमणिका आहे. मात्र पहिल्यावर्षाच्या दूसऱ्या अंकापासून त्यात बदल केला आहे. त्यात सर्वात वरती बोधचिन्ह, त्याखाली बोधवाक्य आणि संपादक, संपादक मंडळातील सदस्याची नावे खालील क्रमाणे आहेत :

१. संपादक

२. कार्यकारी संपादक

३. संपादक मंडळातील सदस्य,

४. याखालील बाजूस कॉपीराईटचे चिन्ह दिलेले आहे.

५. निर्मिती, संगणकीय अक्षर जुळणी, मुद्रक व प्रकाशक यांची नावे व पत्ते दिली आहेत.

ज्ञानगंगोत्री या नियतकालिकाचे शेवटचे बाह्यपृष्ठ कोरे असून सफेद रंग वापरला आहे.

## मुखपृष्ठात बदल


वर्ष ५ वे पासुन ते १३ वे वर्षापर्यंत मुखपृष्ठात काही बदल केले आहे. ते पुढीलप्रमाणे.


१. मुखपृष्ठाचा रंग-गडद केला असून प्रत्येक वर्षी वेगवेगळा रंग वापरला आहे.


२. डिझाईन बदल-मुखपृष्ठाच्या रंग गडद असून अस्पष्ट Background ला विद्यापीठाचा अस्पष्ट लोगो संपूर्ण पानावर दिसतो.


३. पांढऱ्या रंगाचे चौरस तीन-तीनच्या ओळीने एकूण चार ओळीत आहे. या चौरसानी मुखपृष्ठाचा ६० टक्के भागावर आहेत. त्याखालोखाल विद्यापीठाचा लोगो काळ्या शाईत आहेत. ज्ञानगंगोत्री हे नाव ठळकपणे दिसते. त्याखाली पांढऱ्या आयतात महिने व वर्ष छापले आहे. त्याखाली विद्यापीठाचा पूर्ण पत्ता दिला आहे. शेवटी पुन्हा पाच पांढरे चौरस एका ओळीत छापले आहे. अशाप्रकारे मुखपृष्ठाची रचना केलेली आढळून येते.

# ज्ञानगंगोत्री नियतकालिकाचे मुखपृष्ठ



## कुलगुरुंचे मनोगत

ज्ञानगंगोत्री या नियतकालिकाच्या पहिल्या वर्षाच्या पहिल्या अंकामध्ये कुलगुरुंनी ज्ञानगंगोत्री या नियतकालिकाबाबत आपली भूमिका मांडली आहे. त्यांनी म्हटल्याप्रमाणे ग्रंथालय आणि माहितीशास्त्र या पदव्युत्तर पदवी या शिक्षणक्रमातील वर्तमान घटना आणि घडामोडी या अभ्यासक्रमासाठी (LIB-013) वाचनसाहित्याला पर्याय म्हणून हे नियतकालिक सुरु केले आहे. त्यांच्या मते ग्रंथालय आणि माहितीशास्त्र या विषयावर मराठी भाषेत गंभीर स्वरुपाचे खास नियतकालिक नसल्याने विद्यापीठाने या नियतकालिकाचा मार्ग निवडला आहे.

ज्ञानगंगोत्री या नियतकालिकाद्वारे नवीन ज्ञानाचा, माहितीचा, शोधांचा वेध घेवून त्या विषयांवर तज्ञांकडुन उत्तम लेखन करुन घेता येईल, त्याद्वारे मराठीत ग्रंथालयशास्त्रावरील नवे साहित्य निर्माण होईल, विद्यार्थ्यांना या माध्यमातून विशेष विषयांची माहिती देता येईल, विद्यार्थ्यांशी वर्षभर संवाद साधता येईल, समंत्रक, ग्रंथपाल, माहितीसेवेतील तज्ञ, संगणक तज्ञ आणि ग्रंथालयशास्त्रातील व्यावसायिक यांना एक व्यासपिठ निर्माण करून देण्याचा प्रयत्न याद्वारे केला आहे.

ज्ञानगंगोत्री या नियतकालिकाद्वारे ग्रंथालयशास्त्रातील नवविचारांचे, विषयांचे आदानप्रदान केल्याने हे क्षेत्र समृध्द होईल असा आशावाद त्यांनी व्यक्त केला होता. त्यादृष्टीने आजही ज्ञानगंगोत्री या नियतकालिकाची त्या दिशेने वाटचाल चालू असल्याचे निदर्शनास येते.

## संपादक मंडळाचे विश्लेषण

संपादक मंडळ हा नियतकालिकाचा आत्मा मानला जातो. कोणत्याही नियतकालिक प्रकाशनामध्ये संपादक मंडळाचे महत्वपुर्ण योगदान असते. त्यादृष्टीने संपादक मंडळाची माहिती घेतली आहे. नियतकालिकामधील माहितीचा दर्जा, माहितीची सत्यता तपासणे हे जबाबदारीचे काम संपादक मंडळाला करावे लागते. लेखांमधील लेखनचौर्य टाळणे, दर्जेदार लेख प्रकाशनासाठी निवडणे, प्रसंगी काही लेखांमध्ये बदल सूचविणे हे कार्य संपादक मंडळाला पार पाडावी लागतात. त्यासाठी संपादक मंडळही तेवढेच अनुभवी आणि विषयातील तज्ञ असावे लागते.

**सारणी क्रं. ५.२**


**संपादकाचे नाव आणि कार्यकाळ**

| अ. क्रं. | संपादकाचे नाव | वार्षिक कालावधी | एकूण वर्षे |
|---|---|---|---|
| १. | डॉ. शरद गणपुले | वर्ष १ ले ते ३ रे | ३ वर्षे |
| २. | डॉ. रमेश वरखेडे | वर्ष ४ थे ते १२ वे | ९ वर्षे |
| ३. | डॉ. मधुकर शेवाळे | वर्ष १३ वे | १ वर्ष |
| **एकुण** | | | **१३वर्षे** |

(स्त्रोत - ज्ञानगंगोत्री नियतकालिकाचे जून २००० ते मे २०१३ या कालावधितील अंकांच्या विश्लेषणावरून)

**आलेख क्रं. ५.१**

**संपादकाचे नाव आणि कार्यकाळ**




वरील सारणीवरून व आलेखावरून असे निदर्शनास येते की, जून २००० ते मे २०१३ या कालावधीत एकुण तीन संपादक या नियतकालिकास लाभले आहे. यामध्ये सर्वाधिक ९ वर्षे

डॉ. रमेश वरखेडे यांनी संपादक म्हणून काम पाहीले, तर डॉ. शरद गणपुले यांनी ३ वर्षे संपादक म्हणून काम पाहिले आहे. डॉ. मधुकर शेवाळे हे डिसेंबर २०११ पासून ज्ञानगंगोत्री या नियतकालिकाचे संपादक म्हणून काम पाहात आहे.

१. डॉ. शरद गणपुले- डॉ. शरद गणपुले हे मुंबई विद्यापीठाचे ग्रंथपाल म्हणुन निवृत्त झाले आहे. तत्पुर्वी आय.आय.टी. मुंबई या नामांकित संस्थेत ग्रंथपाल म्हणुन कार्य केले आहे. त्यांनी नॅशनल इन्स्टीट्युट ऑफ बॅक मॅनेजमेंट येथेही त्यांनी कार्य केले आहे. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या ग्रंथालयशास्त्र शिक्षणक्रमाचे ते १९९७ ते २००२ या कालावधीत शिक्षणक्रम संयोजक म्हणून त्यांनी काम केले आहे.

डॉ गणपुले हे ग्रंथालयशास्त्रातील अभ्यासक, आणि व्यासंगी व्यक्तिमत्व म्हणून सर्वदूर प्रसिध्द आहे. त्यांनी ग्रंथालयशास्त्रामध्ये अनेक ग्रंथांचे लेखन तसेच संपादन केले आहे.

२. डॉ. रमेश वरखेडे- यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या मानव्यविद्या व समाजशास्त्रे विद्याशाखेचे संचालक म्हणून कार्यरत होते. एकूण ९ वर्षे त्यांनी ज्ञानगंगोत्री या नियतकालिकाचे संपादक म्हणून यशस्वीरित्या काम पाहीले आहे. तसेच त्यांनी विविध विषयांवर वाचन व लेखन केलेले आहे. साहित्याचा दांडगा व्यासंग तसेच पीएच्. डी. च्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले आहे.

३. डॉ. मधुकर शेवाळे- यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात उपग्रंथपाल व प्रमुख, ग्रंथालय आणि माहितीस्त्रोत केंद्र येथे कार्यरत. ज्ञानगंगोत्री या नियतकालिकात कार्यकारी संपादक, व्यवस्थापक व संपादक मंडळ सदस्य म्हणूनही त्यांनी कार्य केले आहे. डिसेंबर २०११ पासून ते संपादक म्हणून काम पाहात आहे.

डॉ. मधुकर शेवाळे हे १९९६ पासून ग्रंथालयशास्त्रात समंत्रक म्हणून बी. लिब. व एम. लिब. च्या विद्यार्थ्यांना ज्ञानदान करत आहे. तसेच एम. फिल. व पीएच्. डी. च्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शक म्हणून काम करत आहे. डॉ. शेवाळे यांनी ग्रंथालय शास्त्रातील विविध विषयांवर विपूल लेखन केलेले आहे. डॉ. शेवाळे यांचा ग्रंथालय व माहितीशास्त्र शिक्षणक्रमाच्या विकसन कार्यात सुरवातीपासून आजतागायत महत्वपूर्ण सहभाग राहिला आहे. ज्ञानगंगोत्री या नियतकालिकासाठी अनुभवी, विषयतज्ञ आणि ग्रंथालय आणि माहितीशास्त्रातील नामांकित संपादक मंडळ लाभलेले आहे.

कोणत्याही नियतकालिकाचा दर्जा हा त्या क्षेत्रात कार्य करणाऱ्या व्यक्तींवर अवलंबून असतो. वरील सारणी व आलेखावरून असे दिसून येते की, ज्ञानगंगोत्री या नियतकानिकास डॉ. शरद गुणपुले, डॉ. रमेश वरखेडे व डॉ मधुकर शेवाळे यांचेसारखे अनुभव संपन्न व अभ्यासू व्यक्तिमत्त्व संपादक म्हणून लाभले आहे. म्हणजेच या नियतकालिकाच्या संपादनात ग्रंथालय व माहिती क्षेत्रात अविरत कार्य करणाऱ्या व अनुभवी व्यक्तींचा सहभाग असल्याने दर्जेदार आणि नियमितपणे प्रकाशित होत आहे.

**कार्यकारी संपादकाचे नाव व कार्यकाळ -**

कार्यकारी संपादक हा नियतकालिकाच्या संपादनात महत्त्वाची भूमिका पार पाडत असतो. या नियतकालिकास ग्रंथालय व्यवसायातील अभ्यासू आणि नामवंत कार्यकारी संपादक लाभले आहे.

**सारणी क्रं. ५.३**


**कार्यकारी संपादकाचे नाव आणि कार्यकाळ**

| **अ. क्रं.** | **कार्यकारी संपादकाचे नाव** | **वार्षिक कालावधी** | **एकूण वर्षे** |
|---|---|---|---|
| १. | प्रा. मोहन पाठक | १ ले ते ४ थे | ४ वर्षे |
| २. | प्रा. प्रदीप कर्णिक | ५ वे ते ६ वे | २ वर्षे |
| ३. | डॉ. राजेंद्र कुंभार | ७ वे ९ वे | ३ वर्षे |
| ४. | डॉ. मधुकर शेवाळे | १० वे ते १२ वे | ३ वर्षे |
| ५. | वर्ष १३ वे कार्यकारी संपादक नाही | वर्ष १३ वे | १ वर्ष |
| **एकूण** | | | **१३ वर्षे** |

(स्त्रोत- ज्ञानगंगोत्री नियतकालिकाचे जून २००० ते मे २०१३ या कालावधितील अंकांच्या विश्लेषणावरून)

### आलेख क्रं. ५.२

### कार्यकारी संपादकाचे नाव आणि कार्यकाळ




वरील सारणी व आलेखावरून असे निदर्शनास येते की, प्रा. मोहन पाठक यांनी सर्वाधिक ४ वर्षे कार्यकारी संपादक म्हणून काम पाहिले, तर डॉ. राजेंद्र कुंभार आणि डॉ. मधुकर शेवाळे यांनी प्रत्येकी ३ वर्षे कार्यकारी संपादक म्हणून काम पाहीले आहे. डॉ. प्रदीप कर्णिक यांनी २ वर्ष ज्ञानगंगोत्री या नियतकालिकाचे कार्यकारी संपादक म्हणून काम पाहीले. वर्ष १३ वे पासून कार्यकारी संपादक हे पद अस्तित्वात नाही. कार्यकारी संपादक हे पद नियतकालिकाच्या प्रकाशनात अतिशय महत्वाचे मानले जाते.

**कार्यकारी संपादकांचा थोडक्यात परिचय**

१. प्रा. मोहन पाठक- बांदोडकर विज्ञान महाविद्यालय, ठाणे येथे २८ वर्षे ग्रंथपाल व ग्रंथालय व माहितीशास्त्र विभाग प्रमुख म्हणून कार्यरत होते. व्ही.पी.एम. दिशा भारतीय शिक्षण या मासिकांचे अनेक वर्षे त्यांनी संपादन केले. त्यांनी मराठी व ग्रंथालय शास्त्राचे विविध विद्यापीठांत अध्यापन केले आहे.

२. डॉ. प्रदीप कर्णिक- १९८५ पासून मुंबईच्या रूपारेल महविद्यालयाचे ग्रंथपाल म्हणून कार्यरत आहे. आतापर्यंत ६ ग्रंथांचे लेखन तर ५ ग्रंथाचे संपादन केलेले आहे. चित्ररंग या साप्ताहीकाचे सह-संपादक म्हणूनही त्यांनी काम पाहीले आहे. मुंबई विद्यापीठाच्या ग्रंथालय व माहितीशास्त्र विषयातील अभ्यासक्रम रचनेत त्यांचे महत्वाचे योगदान राहीले आहे. ग्रंथालय व माहितीशास्त्रातील त्यांच्या योगदानाबद्दल विविध पुरस्कार प्राप्त झाले आहे.

३. डॉ. राजेंद्र कुंभार- डॉ. राजेंद्र कुंभार हे पुणे विद्यापीठाच्या जयकर ग्रंथालयाचे ग्रंथपाल व ग्रंथालय व माहितीशास्त्र विभागाचे विभागप्रमुख म्हणून कार्यरत आहेत. त्यापूर्वी त्यांनी नाशिकच्या एच. पी. टी. महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून काम केले आहे. गेल्या २५ वर्षापासून ते ग्रंथालय आणि माहितीशास्त्राच्या बी. लिब., एम. लिब. आणि एम. फिल. स्तरावर अध्यापन करीत आहे. तसेच पीएच्. डी. च्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शक म्हणून मार्गदर्शनही करीत आहे. त्यांनी इंग्रजी व मराठी भाषेतून ग्रंथपालनाच्या विविध विषयांवर पंधराहून अधिक विषयांवर ग्रंथ लिहिले आहे.

४. डॉ. मधुकर शेवाळे- डॉ. मधुकर शेवाळे यांचा परिचय वरील प्रमाणे.

वरील सारणी व आलेखावरून लक्षात येते की, ज्ञानगंगोत्री या नियतकालिकास ग्रंथालय व माहितीशास्त्रातील अभ्यासू व नामवंत व्यक्तींनी कार्यकारी संपादक म्हणून काम पाहीले आहे.

**व्यवस्थापक-**

नियतकालिक निर्मितीमध्ये व्यवस्थापक हा घटक अतिशय महत्वाचा असतो. वर्ष ५ वे ते वर्ष ९ वे पर्यत एकूण ५ वर्षे डॉ. मधुकर शेवाळे यांनी ज्ञानगंगोत्री या नियतकालिकाचे व्यवस्थापक म्हणून देखील काम पाहीले आहे. त्यानंतर या पदावर कोणीही कार्यरत नाही.

**संपादक मंडळ -**

ज्ञानगंगोत्री नियतकालिकाच्या संपादक मंडळाच्या सदस्यांमध्ये देखील ग्रंथालय शास्त्रातील नामांकित व अभ्यासू ग्रंथालय व्यवसायिकांचा समावेश असल्याचे निदर्शनास येते.

**सारणी क्रं. ५.४**


**संपादक मंडळातील सदस्यांचे विश्लेषण**

| **अ. क्रं.** | **कार्यकारी संपादकाचे नाव** | **वार्षिक कालावधी** | **एकूण वर्षे** |
|---|---|---|---|
| १. | डॉ. रमेश वरखेडे | १ ले ते ३ रे | ३ वर्षे |
| २. | प्रा. अ. भा. देशपांडे | १ ले ते ३रे | ३ वर्षे |
| ३. | डॉ. मधुकर शेवाळे | १ ले ते ९ वे | ९ वर्षे |
| ४. | डॉ. सु. प्र. सातारकर | १ ले ते ४ थे | ४ वर्षे |
| ५. | डॉ. एस. आर. बाहेती | १ ले ते ४ थे | ४ वर्षे |
| ६. | डॉ. प्रदीप कर्णिक | १ ले ते ४ थे<br>४ थे ते ९ वे | ७ वर्षे |
| ७. | प्रा. जी. बुवा | १ ले ते ४ थे | ४ वर्षे |
| ८. | डॉ. राजेंद्र कुंभार | १ ले ते ६ वे | ६ वर्षे |
| ९. | प्रा. प्रवीण घोडेस्वार | ४ थे ते १३ वे | १० वर्षे |
| १०. | प्रा. नागार्जून वांजरवाडकर | ५ वे ६ वे | २ वर्षे |
| ११. | डॉ. मोहन खेरडे | १० वे ते १३ वे | ४ वर्षे |
| १२. | डॉ. सुषमा पौडवाल | १० वे ते १३ वे | ४ वर्षे |
| १३. | डॉ. धर्मराज वीर | १० वे ते १३ वे | ४ वर्षे |

(स्त्रोत - ज्ञानगंगोत्री नियतकालिकाचे जून २००० ते मे २०१३ या कालावधितील अंकांच्या विश्लेषणावरून)

**आलेख क्रं. ५.३**

**संपादक मंडळातील सदस्यांचे विश्लेषण**




वरील सारणी व आलेखावरून निदर्शनास येते की, जून २००० ते मे २०१३ या कालावधीत एकूण १३ तज्ञांनी या नियतकालिकात संपादक मंडळाचे सदस्य म्हणून काम केले आहे. त्यात सर्वाधिक काळ प्रा. प्रवीण घोडेस्वार हे १० वर्षे सदस्य म्हणून कार्यरत आहे, तर डॉ. मधुकर शेवाळे यांनी ९ वर्षे काम पाहिले आहे. प्रा. प्रदीप कर्णिक व डॉ. राजेंद्र कुंभार यांनी अनुक्रमे ७ वर्षे व ६ वर्षे संपादक मंडळाचे सदस्य म्हणून काम केले आहे.

ज्ञानगंगोत्री नियतकालिकाच्या संपादक मंडळ सदस्यापैकी डॉ. रमेश वरखेडे यांनी पुढे संपादक म्हणून काम केले, तर डॉ. मधुकर शेवाळे यांनी पुढे कार्यकारी संपादक आणि संपादक म्हणून देखील काम पाहिले आहे. डॉ. प्रदीप कर्णिक आणि डॉ. राजेंद्र कुंभार यांनी नंतर कार्यकारी संपादक म्हणून काम पाहिले.

**ज्ञानगंगोत्री या नियतकालिकातील नियमित सदरे-**

ज्ञानगंगोत्री या नियतकालिकाच्या सुरवातीच्या कालावधीत वाचकांसाठी काही खास सदरे सुरु करण्यात आली होती, ती सदरे पुढीलप्रमाणे

अ. क्र. सदरांचे नांव

१. संपादकीय

२. अजून ताजा वास जुन्याला

३. वेब

४. ग्रंथपरिचय

५. सार

६. परिक्रमा

वरील सदरे ग्रंथालय व माहितीशास्त्राचा अभ्यास करणाऱ्यासाठी उपयुक्त व महत्वपूर्ण ठरली आहे. ग्रंथलयशास्त्रातील लेखांव्यतिरिक्त ग्रंथालयशास्त्रातील ग्रंथांचा परिचय, ग्रंथालय विषयक वेबसाईट, वेळोवेळी प्रकाशित होणाऱ्या लेखांचे सार अशी उपयुक्त माहिती या सदरांमधून वाचकांना दिली जाते. वरीलपैकी काही सदरे ही नियमितपणे प्रसिध्द झाली तर काही सदरे कालांतराने बंद झाली.

**संपादकीय सदर-**

कोणत्याही नियतकालिकातील संपादकीय म्हणजे त्या अंकांत असलेल्या माहितीचा किंवा लेखांचा सारांश असतो. संपादकीय माहितीवरुन त्या अंकात कोणत्या प्रकारचे लेख किंवा माहिती दिली आहे याचे आकलन होत असते. संपादकीय प्रस्तावना ही एक प्रकारचा सार आहे. प्रस्तावना विश्लेषण हा एक आशय विश्लेषणाचाच भाग मानला जातो.

ज्ञानगंगोत्री या नियतकालिकाची प्रस्तावनाही याला अपवाद नाही. या नियतकालिकांच्या अंकांतील संपादकीय हे संपादक अथवा संपादक मंडळातील सदस्यांकडून लिहिली गेली आहे. या नियतकालिकाच्या संपादकीय प्रस्तावनेवरुन त्या अंकांच्या विषयाचे आकलन आपणांस होते.

त्यामुळे ज्ञानगंगोत्री या नियतकालिकाच्या अंकाची संपादकीय प्रस्तावना महत्वाची समजली जाते. थोडक्यात नियतकालिकाची प्रस्तावना म्हणजे त्या नियतकालिकाचा आरसा असतो.

संपादकीय सदरात त्या-त्या अंकातील लेखांचा सार तर घेतलाच आहे, त्याचबरोबर ग्रंथालय व माहितीशास्त्रातील विद्यार्थ्यांना व ग्रंथालय व्यावसायिकांना उपयुक्त असे मार्गदर्शनही केले आहे.

**सारणी क्रं. ५.५**

**संपादकीय प्रस्तावनेचे अंकनिहाय वर्गीकरण**

| अ. क्र. | वर्ष / अंक क्रं. | संपादक | संपादकीयमध्ये चर्चिलेले विषय |
|---|---|---|---|
| १. | १/१ | डॉ. शरद गणपुले | ज्ञानगंगोत्री नियतकालिकाचे प्रयोजन व नियतकालिकातील सदरांबाबत माहिती |
| २. | १/ २ | डॉ. शरद गणपुले | ग्रंथालयशास्त्रातील नवे विचार प्रवाह |
| ३. | १/३ | डॉ. शरद गणपुले | माहिती हक्क आणि ग्रंथपाल |
| ४. | १/ ४ | डॉ. शरद गणपुले | ई-जर्नल्स आणि आशय विश्लेषण |
| ५. | २/१ | डॉ. शरद गणपुले | मागील अंकाचा आढावा |
| ६. | २/२ | डॉ. शरद गणपुले | माहिती तंत्रज्ञानाचा ग्रंथालयात वापर |
| ७. | २/३ | डॉ. शरद गणपुले | माहिती तंत्रज्ञान व डिजीटल ग्रंथालये |
| ८. | २/४ | डॉ. शरद गणपुले | ग्रंथालय सेंवामध्ये संगणकीकरणाचे व्यवस्थापन |
| ९. | ३/१ | डॉ. शरद गणपुले | प्रकल्प अहवाल |
| १०. | ३/२ | डॉ. शरद गणपुले | ग्रंथालयशास्त्रातील नवे विचार प्रवाह |
| ११. | ३/३ | डॉ. शरद गणपुले | ग्रंथालयशास्त्रातील नवे विचार प्रवाह |
| १२. | ३/४ | डॉ. शरद गणपुले | माहिती तंत्रज्ञानाचा ग्रंथालयात वापर |
| १३. | ४/१ | डॉ. रमेश वरखेडे | माहिती तंत्रज्ञानाचा ग्रंथालयात वापर |
| १४. | ४/२ | डॉ. रमेश वरखेडे | महाविद्यालयीन ग्रंथालये |
| १५. | ४/३ | डॉ. रमेश वरखेडे | प्रकल्प अहवाल |
| १६. | ४/४ | डॉ. रमेश वरखेडे | मागील अंकाचा आढावा |
| १७. | ५/१ | डॉ. रमेश वरखेडे | शंकर गणेश दाते जन्मशताब्दी विशेषांक |
| १८. | ५/२ | डॉ. रमेश वरखेडे | कोशवाङमयाची निर्मिती |
| १९. | ५/३ | डॉ. रमेश वरखेडे | माहिती तंत्रज्ञानाचा ग्रंथालयात वापर |
| २०. | ५/४ | डॉ. रमेश वरखेडे | वाचक मानसशास्त्र |
| २१. | ६/१ | डॉ. रमेश वरखेडे | इंग्रंजीतील ग्रंथालयशास्त्र |
| २२. | ६/२ | डॉ. रमेश वरखेडे | ग्रंथपालांचे वाचन |
| २३. | ६/३ | डॉ. रमेश वरखेडे | मराठी मुद्रणकला विशेषांक |
| २४. | ६/४ | डॉ. रमेश वरखेडे | माहिती तंत्रज्ञानाचा ग्रंथालयात वापर |
| २५. | ७/१ | डॉ. रमेश वरखेडे | माहिती तंत्रज्ञानाचा ग्रंथालयात वापर |
| २६. | ७/२ | डॉ. रमेश वरखेडे | माहिती तंत्रज्ञानाचा ग्रंथालयात वापर |
| २७. | ७/३ | डॉ. रमेश वरखेडे | ग्रंथांलयाच्या विकासामध्ये ग्रंथालयीन संस्थांचे योगदान |

| | | | |
|---|---|---|---|
| २८. | ७/४ | डॉ. रमेश वरखेडे | ई- रिसार्सेस |
| २९. | ८/१ | डॉ. रमेश वरखेडे | ग्रंथालयशास्त्रातील संशोधन |
| ३०. | ८/२ | डॉ. रमेश वरखेडे | ग्रंथालयीन माहितीसेवा व त्यांचे मुल्यमापन |
| ३१. | ८/३ | डॉ. रमेश वरखेडे | ग्रंथालयाची उपयोगीता वाढविण्यासाठी प्रयत्न |
| ३२. | ८/४ | डॉ. रमेश वरखेडे | माहिती तंत्रज्ञान वापराचे मुल्यमापन |
| ३३. | ९/१ | डॉ. रमेश वरखेडे | ग्रंथालयशास्त्रातील चर्चासत्रे व परिषदा |
| ३४. | ९/२-३ | डॉ. रमेश वरखेडे | माहिती तंत्रज्ञानाचा ग्रंथालयात वापर |
| ३५. | ९/४ | डॉ. रमेश वरखेडे | ग्रंथालयात राबविले जाणारे उपक्रम |
| ३६. | १०/१ | डॉ. रमेश वरखेडे | माहिती तंत्रज्ञानाचा ग्रंथालयात वापर |
| ३७. | १०/२-३ | डॉ. रमेश वरखेडे | ग्रंथालय व माहितीकेंद्रांचे कार्ये |
| ३८. | १०/४ | डॉ. रमेश वरखेडे | माहिती तंत्रज्ञानाचा ग्रंथालयात वापर |
| ३९. | ११/१ | डॉ. रमेश वरखेडे | माहिती तंत्रज्ञानाचा ग्रंथालयात वापर |
| ४०. | ११/२ | डॉ. रमेश वरखेडे | माहिती तंत्रज्ञान व ग्रंथालय व्यवस्थापन |
| ४१. | ११/३ | डॉ. रमेश वरखेडे | दूरस्थ शिक्षण प्रणालीत माहिती तंत्रज्ञानाचा वापर |
| ४२. | ११/४ | डॉ. रमेश वरखेडे | भारतातील ग्रंथपालन प्रशिक्षण |
| ४३. | १२/१-२ | डॉ. रमेश वरखेडे | भारतातील ग्रंथपालन प्रशिक्षण |
| ४४. | १२/३-४ | डॉ. मधुकर शेवाळे | विद्यापीठ अनुदान आयोग आणि उच्च शिक्षण |
| ४५. | १३/१-२ | डॉ. मधुकर शेवाळे | माहिती तंत्रज्ञान व वाचन साहित्याचे बदलते स्वरुप |
| ४६. | १३-३-४ | डॉ. मधुकर शेवाळे | ग्रंथालयशास्त्रातील नवे विचार प्रवाह |

(स्रोत - ज्ञानगंगोत्री नियतकालिकाचे जून २००० ते मे २०१३ या कालावधितील अंकांच्या विश्लेषणावरून)

या सारणीवरून असे निदर्शनास आले की, ग्रंथालय व माहिती तंत्रज्ञान या विषयांना अनुसरून संपादकीय आढावा घेण्यात आला असून त्यामध्ये डॉ. शरद गणपुले, डॉ. रमेश वरखेडे आणि डॉ. मधुकर शेवाळे या नामवंत संपादकाचे विचार प्रकट झालेले आहे. त्याचप्रमाणे संपादकीय प्रस्तावनेचे विषयवार विश्लेषण पुढील सारणीमध्ये व आलेखामध्ये दर्शविले आहे.

## सारणी क्रं. ५.६


## संपादकीय प्रस्तावनेचे विषयवार विश्लेषण

| अ. क्रं. | प्रस्तावनेचा विषय | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | माहिती तंत्रज्ञानाचे ग्रंथालयात उपयोजन | १८ | ३९.१३% |
| २. | ग्रंथालय व माहितीशास्त्रातील शिक्षण | ०८ | १७.३९% |
| ३. | ग्रंथालयशास्त्रातील बदलते विचार प्रवाह | ०४ | ८.७०% |
| ४. | ग्रंथालय व्यवस्थापन | ०४ | ८.७०% |
| ५. | ग्रंथालयशास्त्रातील संशोधन | ०३ | ६.५२% |
| ६. | मागील अंकाचा आढावा | ०२ | ४.३५% |
| ७. | महाविद्यालयीन व विद्यापीठीय ग्रंथालये | ०२ | ४.३५% |
| ८. | संदर्भसेवा | ०१ | २.१७% |
| ९. | बौध्दिक संपदा अधिकार | ०१ | २.१७% |
| १०. | मुद्रणकला तंत्रज्ञान | ०१ | २.१७% |
| ११. | ज्ञानगंगोत्री नियतकालिकाचे प्रयोजन व नियतकालिकातील सदरांबाबत माहिती | ०१ | २.१७% |
| १२. | व्यक्तिविशेष | ०१ | २.१७% |
| **एकूण** | | **४६** | **१००%** |

(स्रोत - ज्ञानगंगोत्री नियतकालिकाचे जून २००० ते मे २०१३ या कालावधितील अंकांच्या विश्लेषणावरून)

## आलेख क्रं. ५.४

## संपादकीय प्रस्तावनेचे विषयवार विश्लेषण




वरील सारणीवरून व आलेखावरून असे निदर्शनात येते की, माहिती तंत्रज्ञानाचा ग्रंथालयात उपयोजन या विषयावर सर्वाधिक १८ (३९.१३%) संपादकीय असून, ग्रंथपाल व माहितीशास्त्र शिक्षण या विषयावर ०८ (१७.३९%) संपादकीय आहे. तसेच ग्रंथालयशास्त्रातील नवे विचार प्रवाह, ग्रंथालय व्यवस्थापन या विषयावर ८.७०% तर गंथालयातील संशोधन या विषयावर ६.५२% संपादकीय आहे. मागील अंकाचा आढावा आणि महाविद्यालयीन व विद्यापीठीय ग्रंथालये या विषयांवर २ (४.३५%) संपादकीय आलेले आहे. संदर्भसेवा, बौध्दिक संपदा अधिकार, मुद्रणकला तंत्रज्ञान, ज्ञानगंगोत्री नियतकालिकाचे प्रयोजन व नियतकालिकातील सदरांबाबत माहिती, व्यक्तिविशेष या विषयावर प्रत्येकी १ (२.१७%) संपादकीय आलेले आहे.

सारणी क्रं. ५.६ वरून दिसून येते की, माहीती तंत्रज्ञानाचे ग्रंथालयात उपयोजन या विषयावर सर्वाधिक ३९.१३% संपादकीयमध्ये माहिती दिलेली आहे. ज्ञानगंगोत्री हे नियतकालिक ग्रंथालय व माहितीशास्त्र निष्णात या शिक्षणक्रमातील वर्तमान घटना, घडामोडी व भाष्य या अभ्यासक्रमासाठी वाचन साहित्याला पर्याय म्हणून सुरू केले आहे. ज्ञानगंगोत्री या नियतकालिकाच्या उद्दिष्टांना अनुसरूनच वर्तमान घटना, घडामोडी व भाष्य या विषयाला अनुसरून

संपादकीयमधील माहिती प्रकाशित करण्याचा संपादकाचा हेतू असून तो पूर्ण होताना यातून स्पष्टपणे दिसून येते.

**अजुन ताजा वास जून्याला:-**

अजून ताजा वास जुन्याला या सदराविषयी जाणून घेतले असता संपादकीय मध्ये म्हटल्याप्रमाणे अजून ताजा वास जुन्याला हे एक महत्वपूर्ण सदर या नियतकालिकात समाविष्ट करण्यात आले आहे. हे सदर २००० ते २००७ या कालावधीत प्रकाशित झाले आहे. या सदरामध्ये जून्या महत्वपूर्ण लेखांचे पुर्नमुद्रण करण्यात आले आहे. हे लेख जुने असले तरी त्यातील चर्चा, विषय काळाच्या ओघात अजूनही तंतोतंत लागू पडतील असेच आहे. सदराच्या नावाप्रमाणेच जुन्याला अजूनही ताजा वास आहे, म्हणजेच भूतकालीन लेखांना वर्तमानातही संदर्भ आहे. तसेच जूने लेख आजही वाचकांना उपयुक्त ठरले आहे.

**सारणी क्र. ५.७**

**अजून ताजा वास जुन्याला या सदरातील लेख**

| अ. क्र. | वर्ष / अंक क्र. | लेखाचे नाव | लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. | एकुण पृष्ठ |
|---|---|---|---|---|---|
| १. | १/१ | दुर्मिळ ग्रंथ कशास म्हणावे | प्रियोळकर, अ. का. | ४-१० | ७ |
| २. | १/२ | आपण पुस्तके का वाचतो? | कुलकर्णी,वा. ल. | ९१-९८ | ८ |
| ३. | १/३ | वाङ्मयसूची | केतकर, श्री. व्य. | १२८-१३० | ३ |
| ४. | १/४ | ग्रंथालय: माणसाचा वारसा | जोशी, श्री. बा. | ९४-१०४ | ११ |
| ५. | २/१ | महाराष्ट्र शब्दकोश | संपादक | ४५-५७ | १३ |
| ६. | २/२ | महाराष्ट्र शब्दकोश | संपादक | ७९-९१ | १३ |
| ७. | २/३ | महाराष्ट्र शब्दकोश प्रस्तावना - भाग ३ | संपादक | ६४-८३ | २० |
| ८. | ३/२ | महाराष्ट्र शब्दकोश प्रस्तावना - भाग ४ | संपादक | ६४-८८ | २५ |
| ९. | ३/३ | मराठी ग्रंथालय परीषद [बारावे अधिवेशन, नागपूर, दि. १२ व १३ फेब्रुवारी १९६१] अध्यक्षीय भाषण | गजेंद्रगडकर, प्र. बा. | ८७-९६ | १९ |
| १०. | ४/१ | महाराष्ट्रातील ग्रंथालय संघटना | महाजन, शां. ग. | ५०-७२ | २३ |
| ११. | ४/२ | मराठी ग्रंथसंग्रह | संपादक | ६४-७६ | १३ |
| १२. | ४/४ | वैदिक ग्रंथांचा परीचय | चित्राव, सिध्देश्वरशास्त्री | ७१-८८ | १८ |
| १३. | ५/१ | ग्रंथ- सुची- शास्त्र | दाते, शंकर गणेश | ४१-७० | ३० |
| १४. | ५/२ | डॉ. जोशी यांचे परीषदेतील भाषण | जोशी, पु. म. | ३३-३९ | ७ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १५. | ५/३ | देशभाषीय ग्रंथसंग्रहाची आवश्यकता | आगरकर, गोपाळ गणेश | ३३-४३ | ११ |
| १६. | ५/४ | ग्रंथालयासंबंधी लोकमान्यांचे विचार | कोल्हटकर, वा. पु. [ग्रंथालयविहारी] | ४३-४८ | ६ |
| १७. | ६/१ | ग्रंथसमुह हे खरे समाजसुख होय | राजवाडे, वि. का. | ६५-६८ | ४ |
| १८. | ६/२ | अहमदनगरचा अप्रसिध्द पण अद्वितीय कोशकार [हिंदुस्थानी मराठी कोश] | पोतदार, दत्तो वामन | ६४-६६ | ३ |
| १९. | ६/३ | प्रा. अ. का. प्रियोळकर आणि मुद्रणसंशोधन | नाईक, बापुराव | १३-४७ | ३५ |
| २०. | ६/४ | मराठी भाषेचा अभ्यास | मराठी शालापत्रक | ६५-७० | ६ |
| २१. | ७/१ | पुस्तकालयांनी हाती धरण्याजोगी काही कार्ये | ठकार, विष्णु रामचंद्र | ४४-४८ | ५ |
| २२. | ७/२ | ग्रंथालये व ग्रंथालयशास्त्र यासंबंधीचे महाराज सयाजीराव गायकवाड यांचे विचार | संपादक | ५७-५९ | ३ |

(स्त्रोत - ज्ञानगंगोत्री नियतकालिकाचे जून २००० ते मे २०१३ या कालावधीतील अंकांच्या विश्लेषणावरून)

वरील सारणीप्रमाणे अजून ताजा वास जुन्याला या सदराखाली एकूण २२ लेख प्रकाशित झाले आहे. या सदरातील सर्वच लेख माहितीपूर्ण आणि आजही उपयुक्त वाटतात. या सदरातुन महाराष्ट्रातील ग्रंथालय संघटना, मराठी ग्रंथसंग्रह, ग्रंथालयांसबंधी लोकमान्यांचे विचार, ग्रंथालयांसबंधी महाराज सयाजीराव गायकवाड यांचे विचार, डॉ. पु. म. जोशी यांचे परिषदेतील भाषण, गजेंद्रगडकर यांचे मराठी ग्रंथालय परिषदेतील अध्यक्षीय भाषण असे उपयुक्त लेख, भाषण, किंवा तज्ज्ञांचे विचार प्रसिध्द केलेले आहे. हे विचार किंवा लेख जरी जूने असले तरी ते आजही तंतोतंत खरे ठरतात.

या सदरातुन जुन्या लेखांचे नव्याने महत्व अधोरेखित केले आहे. ग्रंथालयशास्त्राच्या दृष्टीने हे लेख महत्वपूर्ण तर आहेच, याशिवाय ग्रंथालयशास्त्राचा दर्जा उंचावण्यास या लेखांची मदत होते. या जुन्या लेखांची, विचारांची एक पर्वणीच ज्ञानगंगोत्री या नियतकालिकाने वाचकांसाठी उपलब्ध करून दिली आहे. या लेखांतील विचार वर्तमानातही अतिशय उपयुक्त आणि महत्वपुर्ण ठरत आहे.

**वेब:-**

वेब हे एक महत्वाचे सदर या नियतकालिकात समाविष्ट होते. वाचक व विद्यार्थ्यांना ग्रंथालयशास्त्राशी निगडीत उपयुक्त वेबसाईटची ओळख करुन देणे, ज्यामुळे विद्यार्थ्यांच्या वाचन कक्षा रुंदावतील. ग्रंथ, ग्रंथालये, ग्रंथालय सेवा, माहितीसेवा, ग्रंथालय संघटना, विशेष ग्रंथालये यांची थोडक्यात पण अगदी पध्दतशीरपणे माहिती उपभोक्त्यांना उपलब्ध करून देणे हा या सदराचा मुख्य उद्देश होता.

वेब या सदरामध्ये एकूण १८ अकांमधून ८४ वेबसाईटबाबत थोडक्यात पण अत्यंत महत्वपूर्ण माहिती दिलेली आहे. यामध्ये ग्रंथालयविषयक वेबसाईटचे प्रमाण सर्वाधिक आहे, यात विविध देशांचे राष्ट्रीय ग्रंथालये, ग्रंथालय संघटना, ग्रंथालय व्यवसाय आणि नोकरीविषयक माहिती असलेल्या वेबसाईटचा समावेश आहे. तसेच विविध थिसॉरस, शब्दकोश, ज्ञानकोश, विज्ञान विषयक, कृषिविषयक, वेबसाईटचा परिचय या सदरात दिलेला आहे.

वेबसाईटची माहिती पुढीलप्रमाणे देण्यात येते.

१. वेबसाईटचा मुख्य विषय

२. वेबसाईटचा पत्ता

३. वेबसाईट विषयी थोडक्यात माहिती

**सारणी क्रं. ५.८**

**अंकनिहाय वेबसाईटचे विश्लेषण**

| वर्ष | अंक | वेबसाईटची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | १ | ८ | ९.५२% |
| | २ | ९ | १०.७४% |
| | ३ | २ | २.३८% |
| २ | १ | ३ | ३.५७% |
| | २ | ६ | ७.१४% |
| ३ | १ | ८ | ९.५२% |
| | २ | २१ | २५.००% |
| | ३ | १० | ११.९०% |
| ४ | २ | ५ | ५.९५% |
| | ३ | ४ | ४.७६% |
| ५ | १ | १ | १.१९% |
| | २ | १ | १.१९% |
| | ३ | १ | १.१९% |
| | ४ | १ | १.१९% |
| ६ | १ | १ | १.१९% |
| | २ | १ | १.१९% |
| | ३ | १ | १.१९% |
| | ४ | १ | १.१९% |
| **एकूण वेबसाईट** | | **८४** | **१००%** |

(स्त्रोत - ज्ञानगंगोत्री नियतकालिकाचे जून २००० ते मे २०१३ या कालावधितील अंकांच्या विश्लेषणावरून)

वरील सारणीवरून निदर्शनात येते की, वर्ष ३ अंक २ मध्ये सर्वाधिक २५% (२१) वेबसाईटचा परिचय करुन दिला आहे, तर त्याखालोखाल १९.९०% (१०) वेबसाईटचा परिचय वर्ष ३ अंक ३ मध्ये करुन दिलेला आहे. वर्ष ५ वे व वर्ष ६ वे मध्ये प्रत्येक अकांत १.१९% (१) वेबसाईटची माहिती दिलेली आहे.

हे सदर वर्ष ६ पर्यंत नियमित प्रकाशित झाले, त्यांनतर हे सदर बंद करण्यात आले. ज्ञानगंगोत्री या नियतकालिकातील वेब हे सदर ग्रंथालय व माहितीशास्त्रातील वाचकांसाठी उपयुक्त असे सदर आहे. ग्रंथालय व माहितीशास्त्र विषयातील विविध संस्था, संघटना, ग्रंथालये, ग्रंथालयीन सेवा यांची माहिती वेबसाईट या सदरातून मिळत असल्याने सदर पुन्हा सूरू केले जावे.

**ग्रंथपरिचयः-**

ग्रंथपरिचय हे या नियतकालिकातील उपयुक्त असे सदर आहे. या सदरामध्ये ग्रंथालय आणि माहितीशास्त्राशी संबंधित नवीन प्रकाशित झालेल्या पुस्तकांचा परिचय करुन दिलेला आहे. या सदराचा मुख्य हेतू म्हणजे वाचकांनी हे ग्रंथ मिळवून अभ्यासावी. ग्रंथालयशास्त्राशी संबंधित नव-नवीन ग्रंथ प्रकाशित होत असतात, प्रत्येक वेळेस हे ग्रंथ प्रत्यक्ष पाहाणे शक्य होत नाही. अशा वेळेस हे सदर ग्रंथपालन व्यावसायिकांना अतिशय उपपुक्त ठरते. ज्ञानगंगोत्री या नियतकालिकात मे २०१३ पर्यत एकूण ११८ नवीन ग्रंथाचा परिचय या सदरात करुन दिला आहे. हे सर्व ग्रंथ नवीन प्रकाशित झालेले होते.

या सदरात ओळख करून दिलेल्या पुस्तकांची पुढीलप्रमाणे माहिती करून देण्यात येते. लेखक, ग्रंथनाम, प्रकाशक आणि प्रकाशन वर्ष, आय.एस.बी.एन. नंबर, पुस्तकाची किमंत आणि पुस्तकाचा थोडक्यात परिचय दिलेला आहे.

## सारणी क्रं. ५.९


## ग्रंथपरिचय सदरातील ग्रंथाचे विषयवार वर्गीकरण

| अं. क्रं. | लेखविषय | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | माहिती तंत्रज्ञानाचे ग्रंथालयात उपयोजन | ३४ | २८.८१% |
| २. | गंथालय व्यवस्थापन | ३० | २५.४२% |
| ३. | संदर्भसाधने व माहितीसेवा | १७ | १४.४१% |
| ४. | ग्रंथालय व माहितीशास्त्र शिक्षण | ११ | ९.३२% |
| ५. | ग्रंथालय वर्गीकरण व तालिकीकरण | ०४ | ३.३९% |
| ६. | बौध्दिक संपदा अधिकार | ०४ | ३.३९% |
| ७. | ग्रंथसुचिय नियत्रंण | ०३ | २.५४% |
| ८. | सार्वजनिक ग्रंथालय | ०३ | २.५४% |
| ९. | ग्रंथालयाचे अर्थशास्त्र | ०२ | १.६९% |
| १०. | ग्रंथालय संशोधन | ०२ | १.६९% |
| ११. | व्यक्तिविशेष | ०१ | ०.८५% |
| १२. | ग्रंथालय कायदे | ०१ | ०.८५% |
| १३. | वाचन सवयींचा अभ्यास | ०१ | ०.८५% |
| १४. | इतर | ०५ | ४.२४% |
| **एकूण** | | **११८** | **१००%** |

(स्रोत - ज्ञानगंगोत्री नियतकालिकाचे जून २००० ते मे २०१३ या कालावधितील अंकांच्या विश्लेषणावरून)

**आलेख क्रं. ५.५**

**ग्रंथपरिचय सदरातील ग्रंथाचे विषयवार वर्गीकरण**




वरील सारणी व आलेखावरुन असे निदर्शनास येते की, ग्रंथपरिचय या सदरात सर्वाधिक माहिती तंत्रज्ञानाचे ग्रंथालयात उपयोजन या विषयावरील ग्रंथाचा परिचय करुन देण्यात आला आहे, त्याचे प्रमाण २८.८१% इतके आहे. त्यानंतर ग्रंथालय व्यवस्थापन २५.४२%, संदर्भसाधने व माहितीसेवा १४.४१% या विषयाच्या ग्रंथाचा परिचय या सदरात करून दिलेला आहे. ग्रंथालय व माहितीशास्त्र शिक्षण विषयावर आधारित ग्रंथाच्या परिचयाचे प्रमाण ९.३२% (११), ग्रंथालय

वर्गीकरण व तालिकीकरण आणि बौध्दिक संपदा अधिकार या विषयावर प्रत्येकी ३.३९% (४), तर व्यक्तिविशेष, ग्रंथालय कायदे, वाचन सवयींचा अभ्यास या विषयाच्या प्रत्येकी १ (०.८५%) ग्रंथाचा परिचय या सदरात दिलेला आहे. तर ग्रंथालयशास्त्राशी संबंधित नसलेल्या ५ इतर विषयांच्या ग्रंथाचा परिचय या सदरात दिलेला आहे. यामध्ये अद्यावत जनरल नॉलेज, श्री. ज्ञानेश्वरी: ओवी सुची, विष्णुपंत भागवत, सोन्याचे दिवस: बा. ग. ढवळे स्मृतीग्रंथ, ज्ञानगंगा घरोघरी या ग्रंथांचा समावेश आहे.

थोडक्यात ग्रंथपरिचय या सदरात २८.८१% (३४) माहिति तंत्रज्ञानाचे ग्रंथालयात उपयोजन या विषयावरिल ग्रंथाचे परिचय करून दिले आहे, तर ग्रंथालय व्यवस्थापन या विषयावरिल ग्रंथांच्या परिचयाचे प्रमाण २५.४२% इतके आहे. ग्रंथ परिचय या सदरात माहिती तंत्रज्ञानाचे ग्रंथालयात उपयोजन या विषयावर आधारीत ग्रंथाचा परिचय अधिक प्रमाणात आढळुन येतो. याबरोबरच संशोधनात्मक ग्रंथाचा जास्तीत जास्त परिचय या सदरात करून देण्यात यावा. त्यामुळे संशोधकांना संशोधनात्मक ग्रंथाबाबत माहिती प्राप्त करण्यास मदत होईल.

**सारणी क्रं. ५.१०**


**ग्रंथपरिचय सदरातील भाषेनिहाय ग्रंथाचे विश्लेषण**

| **अ. क्र.** | **भाषा** | **भाषेनिहाय संख्या** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|
| १. | मराठी | ३० | २५.४२% |
| २. | इंग्रंजी | ८८ | ७४.५८% |
| **एकूण** | | **११८** | **१००.००%** |

(स्त्रोत- ज्ञानगंगोत्री नियतकालिकाचे जून २००० ते मे २०१३ या कालावधितील अंकांच्या विश्लेषणावरून)

**आलेख क्रं. ५.६**

**ग्रंथपरिचय सदरातील भाषेनिहाय ग्रंथाचे विश्लेषण**




वरील सारणी व आलेखावरून निदर्शनास येते की, ११८ ग्रंथांच्या परिचयापैकी ३० (२५.४२%) मराठी भाषेतील ग्रंथाचा परिचय करून दिलेला आहे, तर इंग्रजी भाषेतील ८८ (७४.५७%) ग्रंथाचा परिचय या सदरात करून दिलेला आहे असे आढळून आले.

यावरून असे दिसते की, ग्रंथालय व माहितीशास्त्रातील ८८ (७४.५७%) इंग्रजी भाषेतील ग्रंथांचा परिचय या सदरात करून दिला आहे. नवीन ग्रंथ मराठी भाषेपेक्षा इंग्रजी भाषेत जास्त असून ते सहज उपलब्ध होतात. ग्रंथालय व माहितीशास्त्रातील मराठी भाषेतील ग्रंथसंपदा समृध्द करण्यासाठी जास्तीत जास्त ग्रंथ मराठी भाषेतून लिहिण्याची गरज आहे. त्यासाठी ग्रंथालयक्षेत्रातील व्यावसायिकांनी ग्रंथालयशास्त्रात जास्तीत जास्त मराठी भाषेत लेखन केले पाहीजे, ज्यामुळे ग्रंथालयशास्त्रात मराठी भाषेतील वाचन साहित्य अधिक समृध्द होईल.

**सारणी क्रं. ५.११**

**ग्रंथपरिचय या सदरात ग्रंथपरिचय करुन देणाऱ्या लेखकांचे विश्लेषण**


| अं. क्रं. | लेखकांचे नाव | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | संपादक | ६८ | ५७.६३% |
| २. | वेदवती हब्बु | ०९ | ७.६३% |
| ३. | मधुकर शेवाळे | ०९ | ७.६३% |
| ४. | प्रकाश बर्वे | ०६ | ५.०८% |
| ५. | प्रदीप कर्णिक | ०४ | ३.३९% |
| ६. | मोहन पाठक | ०३ | २.५४% |
| ७. | मोनिका थत्ते | ०२ | १.६९% |
| ८. | ज्योती जोशी | ०२ | १.६९% |
| ९. | आदीती आंबेरकर | ०२ | १.६९% |
| १०. | जगदीश कुलकर्णी | ०२ | १.६९% |
| ११. | राजेंद्र कुंभार | ०२ | १.६९% |
| १२. | अविनाश कोल्हे | ०१ | ०.८५% |
| १३. | सु. प्र. सातारकर | ०१ | ०.८५% |
| १४. | प्रज्ञा भोसेकर | ०१ | ०.८५% |

| | | | |
|---|---|---|---|
| १५. | संजय घुग्रेटकर | ०१ | ०.८५% |
| १६. | श्रीनिवास आठल्ये | ०१ | ०.८५% |
| १७. | दीपाली सोनटक्के | ०१ | ०.८५% |
| १८. | हेमंत शेट्ये | ०१ | ०.८५% |
| १९. | अशोक कोलंबीकर | ०१ | ०.८५% |
| २०. | विजय देवधर | ०१ | ०.८५% |
| **एकूण** | | **११८** | **१००%** |

(स्रोत - ज्ञानगंगोत्री नियतकालिकाचे जून २००० ते मे २०१३ या कालावधितील अंकांच्या विश्लेषणावरून)

## आलेख क्रं. ५.७

### ग्रंथपरिचय सदरात ग्रंथपरिचय करुन देणाऱ्या लेखकांचे प्रमाण




ग्रंथपरिचय या सदरात सर्वाधिक ५७.६३% (६८) ग्रंथांचा परिचय संपादक किंवा संपादक मंडळातील सदस्यांनी करुन दिला आहे, तर त्यानंतर वेदवती हब्बु आणि डॉ. मधुकर शेवाळे यांनी प्रत्येकी ७.६३% (९), प्रकाश बर्वे ५.०८% (६), प्रदीप कर्णिक ३.३९% (३) ग्रंथांचा परिचय करुन दिला आहे. ९ लेखकांनी प्रत्येकी ०.८५% (१) ग्रंथांचा परिचय करुन दिलेला आहे.

वरील सारणी व आलेखावरुन निदर्शनात येते की, ग्रंथालयक्षेत्रातील व्यावसायिकांनी जास्तीत जास्त ग्रंथाचा परिचय या सदरात करून दिल्यास मराठी भाषेत अभ्यास किंवा वाचन करणा-या उपभोक्त्यांना याचा उपयोग होईल. तसेच ग्रंथालयशास्त्रात मराठी भाषेतील वाचन साहित्य अधिक समृध्द होईल.

**सार:-**

ज्ञानगंगोत्री या नियतकालिकातील महत्वपूर्ण सदरांपैकी सार हे एक सदर होय. नवीन प्रसिध्द झालेल्या लेखांचे सार अथवा सारांश या सदरात दिला आहे. मुळ लेखाकडे वाचकांची दृष्टी वळवावी हा या सदराचा मुळ उद्देश. या सदरात बहुतांशी परदेशी नियतकालिकांमधीन लेखांचे सार दिलेले आहे. मराठी भाषेमध्ये लेखांचा सार देणारे हे एकमेव नियतकालिक आहे.

ज्ञानगंगोत्री या नियतकालीकाच्या पहिले चार वर्ष हे सदर सुरू होते. त्यात एकूण १४ अंकांमधून १०४ लेखांचे सार दिलेले आहे. पाचव्या वर्षापासून हे सदर बंद करण्यात आले. या सदरात लेखाचे नाव, लेखकाचे नाव, नियतकालिकाचे नाव, खंड क्रं., अंक क्रं., वर्ष आणि पृष्ठ क्रंमाक इत्यादी माहित दिलेली आहे.

**सारणी क्रं. ५.१२**

**सार सदरातील लेखांचे अंकनिहाय विश्लेषण**

| अ.क्रं | वर्ष | अंक क्रं. | लेखांची सार संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १. | १. | १ | १३ | १२.३९% |
| २. | | २ | ५ | ४.७६% |
| ३. | | ३ | ६ | ५.७१% |
| ४. | | ४ | ७ | ६.६७% |
| ५. | २ | १ | १० | ९.५२% |
| ६. | | २ | ८ | ७.६२% |
| ७. | | ३ | १७ | १६.१९% |
| ८. | ३ | १ | १० | ९.५२% |
| ९. | | २ | १२ | ११.४३% |
| १०. | | ३ | ४ | ३.८१% |
| ११. | ४ | १ | ३ | २.८६% |
| १२. | | २ | ४ | ३.८१% |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १३. | | ३ | ४ | ३.८१% |
| १४. | | ४ | २ | १.९०% |
| **एकूण** | | | **१०५** | **१००%** |

(स्रोत - ज्ञानगंगोत्री नियतकालिकाचे जून २००० ते मे २०१३ या कालावधितील अंकांच्या विश्लेषणावरून)

वरील सारणीवरुन असे लक्षात येते की, वर्ष २ अंक ३ मध्ये सर्वाधिक १७ (१६.१९%) लेखांचे सार दिलेले आहे. त्याखालोखाल वर्ष १ अंक १ मध्ये १३ (१२.३९%) लेखांचे सार दिलेले आहे, तर वर्ष ३ अंक २ मध्ये १२ (११.४३%) लेखांचे सार दिलेले आहे. वर्ष ४ अंक ४ मध्ये सर्वात कमी २ लेखांचे सार दिलेले आहे.

सार हे सदर ग्रंथालय व माहितीशास्त्रातील वाचकांसाठी अतिशय उपयुक्त सदर आहे. या सदरामध्ये इंग्रजी भाषेत प्रकाशित होणाऱ्या महत्वपूर्ण लेखांचे सार दिल्याने वाचकांच्या गरजा पूर्ण होण्यास काही प्रमाणात मदत होते. तसेच आवश्यक वाटल्यास मुळ लेख प्राप्त करणे सोपे होते. हे सदर वाचकांसाठी अतिशय उपयुक्त असल्याने पुन्हा सुरू करण्यात यावे.

**परिक्रमा:-**

ज्ञानगंगोत्री या नियतकालिकातील परिक्रमा हे आणखी एक उपयुक्त सदर. या सदरातुन ग्रंथालय आणि माहितीशास्त्रातील चालू घटना, घडामोडी, विविध चर्चासत्रे, परीसंवाद, ग्रंथप्रदर्शने, वस्तूप्रदर्शन, ग्रंथालयशास्त्राशी संबंधित पुरस्कार, पुस्तक प्रकाशने याबाबत वेळोवेळी होणाऱ्या कार्यक्रमांची माहिती दिली जात होती. हे सदर पहिले दोन वर्ष नियमित चालू होते, त्यानंतर हे सदर बंद करण्यात आले. हे सदर देखील अतिशय उपयुक्त आहे, मात्र यातील परिसंवाद, चर्चासत्रे, वस्तुप्रदर्शन, ग्रंथालयशास्त्राशी संबधीत पुरस्कार, पुस्तक प्रकाशने याबाबतची माहिती ते कार्यक्रम पार पडण्यापूर्वी प्रकाशित केले जावे.

**ज्ञानगंगोत्री नियतकालिकाच्या पृष्ठांचे वर्षनिहाय विश्लेषण-**

सदर नियतकालिकाची प्रत्येकवर्षी किती पृष्ठसंख्या होती हे जाणून घेण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी प्रत्यक्ष अंकाचे विश्लेषण करण्यात आले. त्यातून प्राप्त झालेली माहिती पुढीलप्रमाणे.

**सारणी क्रं. ५.१३**


**ज्ञानगंगोत्री नियतकालिकाच्या पृष्ठांचे वर्षनिहाय विश्लेषण**

| **अ. क्रं.** | **वर्ष** | **एकुण अंक** | **वर्षनिहाय पृष्ठसंख्या** |
|---|---|---|---|
| १. | पहिले | ४ | ४२३ |
| २. | दुसरे | ४ | ३२८ |
| ३. | तिसरे | ४ | ३५६ |
| ४. | चौथे | ४ | ३५२ |
| ५. | पाचवे | ४ | ४३८ |
| ६. | सहावे | ४ | ५१६ |
| ७. | सातवे | ४ | २७४ |
| ८. | आठवे | ४ | २७१ |
| ९. | नववे | ३ | १७८ |
| १०. | दहावे | ३ | १८८ |
| ११. | अकरावे | ४ | २१७ |
| १२. | बारावे | २ | १५८ |
| १३. | तेरावे | २ | १३२ |
| **एकूण** | | **४६** | **३८३१** |

(स्रोत - ज्ञानगंगोत्री नियतकालिकाचे जून २००० ते मे २०१३ या कालावधितील अंकांच्या विश्लेषणावरून)

**आलेख क्रं. ५.८**

**ज्ञानगंगोत्री नियतकालिकाच्या पृष्ठांचे वर्षनिहाय विश्लेषण**




सदर नियतकालिकाच्या अंकांच्या प्रत्यक्ष अवलोकनावरून निदर्शनास आले की, खंड सहावे मध्ये ५१६ पृष्ठांचा खंड प्रकाशित झाला आहे, तर त्या नंतर पाचवा खंड ४३८, पृष्ठांचा होता. ज्ञानगंगोत्री या नियतकालिकाच्या पहिल्या वर्षाच्या खंडाची पृष्ठसंख्या ४२३, तिसऱ्या खंडाची पृष्ठसंख्या ३५६ आणि चौथ्या खंडाची पृष्ठसंख्या ३५२ इतकी होती. सर्वात कमी पृष्ठसंख्या खंड तेरावे मध्ये १३२ इतकी होती.

वरील सारणी व आलेखावरून असे दिसून येते की, खंडांची पृष्ठसंख्या सरासरी २९४.६९ इतकी आहे. सर्वात जास्त पृष्ठसंख्या खंड सहावे मध्ये ५१६ इतकी आढळून आली. ज्ञानगंगोत्री या नियतकालिकाच्या उपभोक्त्यांच्या गरजांची मागणी पाहता खंडाची पृष्ठसंख्या वाढविण्यास वाव आहे.

**नियतकालिकाच्या अंकनिहाय पृष्ठांचे विश्लेषण**

पहिल्या अंकाच्या संपादकीय मध्ये म्हटल्याप्रमाणे या नियतकालिकाच्या अंकांची पृष्ठसंख्या सुमारे ८० इतकी असेल. मात्र या १३ वर्षात ज्ञानगंगोत्री या नियतकालिकाच्या अकांमधील पृष्ठ संख्या असमान दिसून येते.

**सारणी क्रं. ५.१४**

**ज्ञानगंगोत्री नियतकालिकाच्या पृष्ठांचे अंकनिहाये विश्लेषण**

| अ. क्रं. | वर्ष | अंक क्रमांक | अंकाचा कालावधी | अंकनिहाय पृष्ठ संख्या | वर्षनिहाय पृष्ठ संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १. | १. | १ | जुन- जुलै- ऑगस्ट- २००० | ८७ | ४२३ |
| २. | | २ | सप्टेंबर- ऑक्टोबर- नोव्हेंबर- २००० | १०० | |
| ३. | | ३ | डिसेंबर- २०००- जानेवारी- फेब्रुवारी २००१ | १३२ | |
| ४. | | ४ | मार्च- एप्रिल- मे २००१ | १०४ | |
| ५. | २. | १ | जुन- जुलै- ऑगस्ट- २००१ | ६४ | ३२८ |
| ६. | | २ | सप्टेंबर- ऑक्टोबर- नोव्हेंबर- २००१ | ९२ | |
| ७. | | ३ | डिसेंबर- २००१- जानेवारी- फेब्रुवारी- २००२ | ८४ | |
| ८. | | ४ | मार्च- एप्रिल- मे- २००२ | ८८ | |
| ९. | ३. | १ | जुन- जुलै- ऑगस्ट- २००२ | ११२ | ३५६ |
| १०. | | २ | सप्टेंबर- ऑक्टोबर- नोव्हेंबर- २००२ | ८८ | |
| ११. | | ३ | डिसेंबर- २००२ - जानेवारी- फेब्रुवारी- २००३ | ९६ | |
| १२. | | ४ | मार्च- एप्रिल- मे- २००३ | ६० | |
| १३. | ४ | १ | जुन- जुलै- ऑगस्ट- २००३ | ८० | ३५२ |
| १४. | | २ | सप्टेंबर- ऑक्टोबर- नोव्हेंबर- २००३ | ७६ | |
| १५. | | ३ | डिसेंबर- २००३ - जानेवारी- फेब्रुवारी- २००४ | ७६ | |
| १६. | | ४ | मार्च- एप्रिल- मे- २००४ | १२० | |
| १७. | ५ | १ | जुन- जुलै- ऑगस्ट- २००४ | १५८ | ४३८ |
| १८. | | २ | सप्टेंबर- ऑक्टोबर- नोव्हेंबर- २००४ | १२४ | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १९. | | ३ | डिसेंबर- २००४ - जानेवारी- फेब्रुवारी- २००५ | ७६ | |
| २०. | | ४ | मार्च- एप्रिल- मे- २००५ | ८० | |
| २१. | ६ | १ | जुन- जुलै- ऑगस्ट- २००५ | ८४ | ५१६ |
| २२. | | २ | सप्टेंबर- ऑक्टोबर- नोव्हेंबर- २००५ | ९२ | |
| २३. | | ३ | डिसेंबर- २००५ - जानेवारी- फेब्रुवारी- २००६ | २०८ | |
| २४. | | ४ | मार्च- एप्रिल- मे- २००६ | १३२ | |
| २५. | ७ | १ | जुन- जुलै- ऑगस्ट- २००६ | ८६ | २७४ |
| २६. | | २ | सप्टेंबर- ऑक्टोबर- नोव्हेंबर- २००६ | ६० | |
| २७. | | ३ | डिसेंबर- २००६ - जानेवारी- फेब्रुवारी- २००७ | ६० | |
| २८. | | ४ | मार्च- एप्रिल- मे- २००७ | ६८ | |
| २९. | ८ | १ | जुन- जुलै- ऑगस्ट- २००७ | ६८ | २७१ |
| ३०. | | २ | सप्टेंबर- ऑक्टोबर- नोव्हेंबर- २००७ | ८० | |
| ३१. | | ३ | डिसेंबर- २००७ - जानेवारी- फेब्रुवारी- २००८ | ७१ | |
| ३२. | | ४ | मार्च- एप्रिल- मे- २००८ | ५२ | |
| ३३. | ९ | १ | जुन- जुलै- ऑगस्ट- २००८ | ६३ | १७८ |
| ३४.<br>३५. | | २+३ | सप्टेंबर- २००८ ते फेब्रुवारी २००९<br>अंक २ आणि ३ एकत्रित प्रकाशित झालेला आहे | ७५ | |
| ३६. | | ४ | मार्च- एप्रिल- मे- २००९ | ४० | |
| ३७. | १० | १ | जुन- जुलै- ऑगस्ट- २००९ | ८० | १८८ |
| ३८.<br>३९. | | २+३ | सप्टेंबर- २००९ ते फेब्रुवारी २०१०<br>अंक २ आणि ३ एकत्रित प्रकाशित झालेला आहे | ६८ | |
| ४०. | | ४ | मार्च- एप्रिल- मे- २०१० | ४० | |
| ४१. | ११ | १ | जुन- जुलै- ऑगस्ट- २०१० | ७८ | २१७ |
| ४२. | | २ | सप्टेंबर- ऑक्टोबर- नोव्हेंबर- २०१० | ५० | |
| ४३. | | ३ | डिसेंबर- २०१० - जानेवारी- फेब्रुवारी- २०११ | ४२ | |
| ४४. | | ४ | मार्च- एप्रिल- मे- २०११ | ४७ | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४५. | १२ | १+२ | जुन ते नोव्हेंबर- २०११ अंक १ आणि २ एकत्रित प्रकाशित झालेला आहे | ८२ | १५८ |
| ४६. | | | | | |
| ४७. | | ३+४ | डिसेंबर- २०११ ते मे- २०१२ अंक ३ आणि ४ एकत्रित प्रकाशित झालेला आहे | ७६ | |
| ४८. | | | | | |
| ४९. | १३ | १+२ | जुन ते नोव्हेंबर- २०१२ अंक १ आणि २ एकत्रित प्रकाशित झालेला आहे | ७५ | १३२ |
| ५०. | | | | | |
| ५१. | | ३+४ | डिसेंबर- २०१२ ते मे- २०१३ अंक ३ आणि ४ एकत्रित प्रकाशित झालेला आहे | ५७ | |
| ५२. | | | | | |
| | एकुण ४६ अंक | | सरासरी पृष्ठ २९४.६९ | ८३.२८ | ३८३१ |

(स्रोत - ज्ञानगंगोत्री नियतकालिकाचे जून २००० ते मे २०१३ या कालावधितील अंकांच्या विश्लेषणावरून)

वरील सारणीवरून लक्षात येते की, सर्वात कमी पृष्ठ संख्या ही वर्ष नववे अंक चार आणि वर्ष दहावे अंक चारमध्ये प्रत्येकी ४० पृष्ठे आहेत. तर सर्वाधीक पृष्ठ संख्या वर्ष ६ वे अंक ३ मध्ये २०८ इतकी आहेत. म्हणजेच ज्ञानगंगोत्री नियतकालिकातील अंकाची सरासरी पृष्ठसंख्या ८३.२८ इतकी आहे. तेरावर्षात एकूण ५२ अंक प्रकाशीत होणे अपेक्षित होते, मात्र ४६ अंक प्रकाशित झाले. तर अकांची सरासरी पृष्ठसंख्या ८३.२८ इतकी आढळून आली.

संपादकीयमध्ये म्हटल्याप्रमाणे ज्ञानगंगोत्री नियतकालिकामध्ये सरासरी ८० पृष्ठसंख्या पाळली आहे. नियतकालिक म्हटले की नियमित प्रकाशीत होणे अपेक्षीत असते, परंतू काही वेळेस लेखकांकडून येणाऱ्या लेखांची संख्या कमी असते, किंवा संपादनातील अडचणीमुळे अंक नियमित प्रकाशीत होवू शकले नाही. अंक वेळेत प्रकाशित होण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करणे आवश्यक आहे.

**ज्ञानगंगोत्री नियतकालिकातील अकांचे संख्यानिहाय पृष्ठांचे विश्लेषणः-**

ज्ञानगंगोत्री या नियतकालिकातील अंकाचे पृष्ठनिहाय विश्लेषण जाणून घेतले असता ते पुढील प्रमाणे दिसून येते.

**सारणी क्रं. ५.१५**


**ज्ञानगंगोत्री नियतकालिकातील अकांचे संख्यानिहाय पृष्ठांचे विश्लेषण ज्ञानगंगोत्री**

| अ. नं. | पृष्ठसंख्या | अंकाची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | ५० पेक्षा कमी पृष्ठसंख्या असलेले अंक | ५ | १०.८७% |
| २. | ५१ ते १०० पृष्ठसंख्या असलेले अंक | ३३ | ७१.७५% |
| ३. | १०१ ते १५० पृष्ठसंख्या असलेले अंक | ६ | १३.०४% |
| ४. | १५१ ते २०० पृष्ठसंख्या असलेले अंक | १ | २.१७% |
| ५. | २०१ पेक्षा पृष्ठसंख्या असलेले अंक | १ | २.१७% |
| एकूण | | ४६ | १००% |

(स्रोत - ज्ञानगंगोत्री नियतकालिकाचे जून २००० ते मे २०१३ या कालावधितील अंकांच्या विश्लेषणावरून)

**आलेख क्रं. ५.९**

**ज्ञानगंगोत्री नियतकालिकांचे पृष्ठसंख्या विश्लेषण**



वरील सारणी व आलेखावरुन असे लक्षात येते की, ५१ ते १०० पृष्ठसंख्या असलेल्या अंकांची संख्या ३३(७१.७५%) इतकी आहे, १०१ ते १५० पृष्ठसंख्या असलेल्या अंकांची संख्या ६(१३.०४%), ५० पेक्षा कमी पृष्ठसंख्या असलेल्या अकांचे प्रमाण ५(१०.८७%) इतके आहे, तर १५१ ते २०० आणि २०१ पेक्षा अधिक पृष्ठसंख्या असलेल्या अंकांचे प्रमाण प्रत्येकी १(२.१७%) इतके आहे.

सारणी क्रं. ५.१४ मधे दर्शविल्याप्रमाणे ज्ञानगंगोत्री या नियतकालिकात सर्व अंकामधील पृष्ठ संख्या असमान दिसून येते. तर ५१ ते १०० पृष्ठसंख्या असलेल्या अंकाची संख्या सर्वाधिक ७१.७५% इतकी आहे. ज्ञानगंगोत्री या अंकामधील पृष्ठसंख्या वाढविल्यास जास्तीत जास्त माहिती नियतकालिकाद्वारे वाचकांपर्यत पोहचविता येईल. अंकाचे पृष्ठसंख्या वाढविण्यास वाव आहे.

**सारणी क्रं. ५.१६**


**लेखांचे पृष्ठनिहाय विश्लेषण (Length of the Articles)**

| अं. क्रं. | पृष्ठ संख्या | लेखांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | ०१-०५ | ७८ | २६.५३% |
| २. | ०६-१० | १४५ | ४९.३३% |
| ३. | ११-१५ | ३६ | १२.२४% |
| ४. | १६-२० | २२ | ७.४८% |
| ५. | २१-२५ | ६ | २.०४% |
| ६. | २६ व त्यापेक्षा अधिक | ७ | २.३८% |
| **एकूण** | | **२९४** | **१००.००%** |

(स्रोत - ज्ञानगंगोत्री नियतकालिकाचे जून २००० ते मे २०१३ या कालावधितील अंकांच्या विश्लेषणावरून)

**आलेख क्रं. ५.१०**

**लेखांचे पृष्ठनिहाय विश्लेषण (Length of the Articles)**




वरील सारणी व आलेखावरून निदर्शनास येते की, २९४ पैकी १४५ (४९.३३%) लेखांची पृष्ठसंख्या ही ६-१० इतकी आहे, तर ७८ (२६.५३%) लेखाची पृष्ठसंख्या ही १-५ इतकी आहे. ३६ (१२.२४%) लेखांची पृष्ठसंख्या ११-१५, २२ (७.४८%) लेखाची पृष्ठसंख्या ही १६-२०, ६ (२.०४%) लेखांची पृष्ठसंख्या ही २१-२५, तर ७ (२.३८%) लेखांची पृष्ठसंख्या ही २६ व त्यापेक्षा अधिक आहे.

४९.३३% लेखांची पृष्ठसंख्या ६-१० पृष्ठ इतकी आहे. यावरून सिध्द होते की ज्ञानगंगोत्री नियतकालिकातील लेख हे वाचकांना परीपूर्ण व विस्तृत स्वरूपात माहिती देतात. त्यासाठी आवश्यक पृष्ठसंख्येचा गरजेनुसार वापर केलेला दिसून येतो.

**नियतकालिक प्रकाशनाचा कालावधी-**

ज्ञानगंगोत्री या नियतकालिकाचा प्रकाशन कालावधी हा त्रैमासिक असून प्रत्येक वर्षात चार अंक प्रकाशित होतात त्याचा कालावधी खालीलप्रमाणे दिला आहे.

| अंक क्रमांक | अंक प्रकाशनाचा कालावधी किंवा महीने |
|---|---|
| अंक १ ला- | जुन, जुलै, ऑगस्ट |
| अंक २ रा- | सप्टेंबर, ऑक्टोबर, नोव्हेंबर |
| अंक ३ रा- | डिसेंबर, जानेवारी, फेब्रुवारी |
| अंक ४ था- | मार्च, एप्रिल, मे |

एकूण ६ वेळा ज्ञानगंगोत्री या नियतकालिकाचे दोन अंक एकत्रीत प्रकाशित झाले आहे त्याचे विश्लेषण पुढील प्रमाणे :

**सारणी क्रं. ५.१७**

**एकत्रित प्रकाशित झालेले अंक**

| अ. क्रं. | वर्ष | अंक क्रमांक | अंकाचा कालावधी |
|---|---|---|---|
| १. | ९ | २+३ | सप्टेंबर- २००८ ते फेब्रुवारी २००९<br>अंक २ आणि ३ एकत्रित प्रकाशित झालेला आहे |
| २. | १० | २+३ | सप्टेंबर- २००९ ते फेब्रुवारी २०१०<br>अंक २ आणि ३ एकत्रित प्रकाशित झालेला आहे |
| ३. | १२ | १+२ | जुन ते नोव्हेंबर- २०११<br>अंक १ आणि २ एकत्रित प्रकाशित झालेला आहे |
| ४. | १२ | ३+४ | डिसेंबर- २०११ ते मे- २०१२<br>अंक ३ आणि ४ एकत्रित प्रकाशित झालेला आहे |
| ५. | १३ | १+२ | जुन ते नोव्हेंबर- २०१२<br>अंक १ आणि २ एकत्रित प्रकाशित झालेला आहे |
| ६. | १३ | ३+४ | डिसेंबर- २०१२ ते मे- २०१३<br>अंक ३ आणि ४ एकत्रित प्रकाशित झालेला आहे |

(स्रोत - ज्ञानगंगोत्री नियतकालिकाचे जून २००० ते मे २०१३ या कालावधितील अंकांच्या विश्लेषणावरून)

वरील सारणीवरून निदर्शनास येते की, जुन २००० ते मे २०१३ या कालावधीत एकूण १३ वर्षात ५२ अंक प्रकाशित होणे अपेक्षीत होते, मात्र या कालावधीत ४६ अंक प्रकाशित झाले आहे. त्यापैकी ४० अंक स्वतंत्रपणे प्रसिध्द झाले तर ६ अंक जोडीने प्रसिध्द झाले.

ज्ञानगंगोत्री हे नियतकालिक ग्रंथालय व माहितीशास्त्र या विषयाचा मराठी भाषेतून अभ्यास करणाऱ्या उपभोक्त्यांना अतिशय उपयुक्त असे वाचनसाहित्य आहे. त्यामुळे ज्ञानगंगोत्री हे नियतकालिक नियतमितपणे प्रकाशित होणे गरजेचे आहे.

**ज्ञानगंगोत्री या नियतकालिकातील लेखकांच्या माहितीचे विश्लेषण:**

ज्ञानगंगोत्री या नियतकालिकामध्ये नामवंत ग्रंथालयशास्त्रातील नामवंत लेखकांनी लेखन केलेले आहे. या विश्लेषणाचा मुख्य हेतू ज्ञानगंगोत्री या नियतकालिकात लेखकांनी लिहीलेल्या लेखांचे प्रमाण जाणून घेणे होता.

**सारणी क्रं. ५.१८**


**लेखकांचे उत्तरदायित्व दर्शविणारा तक्ता (Authorship Pattern)**

| **अ. क्रं.** | **लेखकांची संख्या** | **संख्या** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|
| १. | एक लेखक | २५७ | ८७.४२% |
| २. | दोन लेखक | ३५ | ११.९०% |
| ३. | तीन लेखक | ०१ | ०.३४% |
| ४. | चार किंवा त्यापेक्षा अधिक | ०१ | ०.३४% |
| **एकूण** | | **२९४** | **१००%** |

(स्रोत - ज्ञानगंगोत्री नियतकालिकाचे जून २००० ते मे २०१३ या कालावधितील अंकांच्या विश्लेषणावरून)

**आलेख क्रं. ५.११**

**लेखकांचे उत्तरदायित्व दर्शविणारा आलेख**




वरील सारणी व आलेखावरून लक्षात येते की, एका लेखकाने लेख लिहिण्याचे प्रमाण सर्वाधिक ८७.४२% (२५७) इतके आहे, तर दोन लेखकांनी लेख लिहिण्याचे प्रमाण ११.९०% (३५) आहे. तीन आणि चार लेखकांनी प्रत्येकी ०.३४% (०१) लेख लिहिला आहे.

ज्ञानगंगोत्री या नियतकालिकात २५७ (८७.४२%) लेख हे एका लेखकाने लिहिले आहे. क्लिष्ट, संकल्पनात्मक आणि संशोधनात्मक लेख लिहितांनी एका पेक्षा अधिक लेखकांनी मिळून लेख लिहिल्यास उत्तम लेख वाचकांना मिळू शकतात.

## सारणी क्रं. ५.१९

## लेखकांनी लिहिलेल्या लेखांच्या उतरत्या क्रमवारीनुसार विश्लेषण

**(Author Rank List)**

| अं. क्रं. | लेखकाचे नाव | लेख संख्या | सह- लेखक २ | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १. | देवधर, विजय | १८ | | ६.१६% |
| २. | कुंभार, राजेंद्र | १४ | | ४.७६% |
| ३. | कर्णिक, प्रदीप | १२ | ०१ | ४.०८% |
| ४. | रामदासी, नागनाथ रा. | १२ | ०१ | ४.०८% |
| ५. | संपादक | १२ | | ४.०८% |
| ६. | सातारकर, सु. प्र. | ०८ | ०१ | २.७२% |
| ७. | बुवा, जी. ए. | ०८ | | २.७२% |
| ८. | हब्बु , वेदवती | ०८ | | २.७२% |
| ९. | बाहेती, एस. आर. | ०७ | ०२ | २.३८% |
| १०. | बोडके, प्रकाश | ०७ | | २.३८% |
| ११. | शेवाळे, मधुकर | ०६ | | २.०४% |
| १२. | पौडवाल, सुषमा | ०५ | | १.७०% |
| १३. | फडके, द. ना | ०५ | ०१ | १.७०% |
| १४. | सावे, वसंत | ०५ | | १.७०% |
| १५. | जोशी, आशुतोश गोपाळ | ०४ | | १.३६% |
| १६. | खोत, नमिता | ०४ | ०१ | १.३६% |
| १७. | भागवत, मधुवन्ती | ०४ | | १.३६% |
| १८. | पाठक, मोहन | ०४ | | १.३६% |
| १९. | रिसवडकर, म. रा. | ०४ | | १.३६% |
| २०. | चितळे, चित्रलेखा | ०४ | | १.३६% |
| २१. | घोलप, विश्वभंर विश्वनाथ | ०४ | | १.३६% |
| २२. | मठकर, जयानंद | ०३ | | १.०२% |
| २३. | पोतदार, श्री. पां | ०३ | | १.०२% |
| २४. | पवार, परितोष | ०३ | | १.०२% |
| २५. | राजहंस, विजया | ०३ | | १.०२% |
| २६. | गराटे, अर्चना | ०३ | | १.०२% |
| २७. | गराटे, सचिन | ०३ | | १.०२% |
| २८. | बारसे, नारायण | ०३ | | १.०२% |
| २९. | खेरडे, मोहन | ०३ | | १.०२% |
| ३०. | धर्मापुरीकर, रणजीत | ०२ | | ०.६८% |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३१. | कुलकर्णी , जगदिश | ०२ | | ०.६८% |
| ३२. | कांबळे, एन. बी. | ०२ | | ०.६८% |
| ३३. | इनामदार, एस. ए. एन | ०२ | ०१ | ०.६८% |
| ३४. | जोशी, प्रियवंदा | ०२ | | ०.६८% |
| ३५. | भगत, रविंद्र | ०२ | | ०.६८% |
| ३६. | मोघे, जयंत | ०२ | | ०.६८% |
| ३७. | पाटील, एस. के. | ०२ | | ०.६८% |
| ३८. | प्रभूखानोलकर,राखी | ०२ | ०१ | ०.६८% |
| ३९. | राजोबा, उमा | ०२ | | ०.६८% |
| ४०. | दळवी, महेश | ०२ | | ०.६८% |
| ४१. | वीर, धर्मराज | ०२ | | ०.६८% |
| ४२. | गणपुले श. रा. | ०२ | | ०.६८% |
| ४३. | गायकवाड, डी. टी. | ०२ | | ०.६८% |
| ४४. | सोनवणे, कल्पना | ०२ | | ०.६८% |
| ४५. | गोखले, प्रतिभा | ०२ | | ०.६८% |
| ४६. | खंदारे प्रमोद | ०२ | | ०.६८% |
| ४७. | चव्हाण, दि. श्री. | ०२ | | ०.६८% |
| ४८. | घुमरे, शिवकुमार | ०२ | | ०.६८% |
| ४९. | डोंगरे, सतीश | ०१ | | ०.३४% |
| ५०. | अहिरे, अशोक आर. | ०१ | | ०.३४% |
| ५१. | नाईक, अरुण | ०१ | | ०.३४% |
| ५२. | कुरूप, एम. आर. | ०१ | | ०.३४% |
| ५३. | करमरकर, प्रकाश ग. | ०१ | ०१ | ०.३४% |
| ५४. | कुलकर्णी, शोभा | ०१ | | ०.३४% |
| ५५. | कुलकर्णी, सु. अ. | ०१ | | ०.३४% |
| ५६. | कडगंची, सुनिता | ०१ | | ०.३४% |
| ५७. | कदम, यु. आर. | ०१ | | ०.३४% |
| ५८. | कदम, रुपाली | ०१ | | ०.३४% |
| ५९. | कर्णिक, सुनिल | ०१ | | ०.३४% |
| ६०. | कांबळे, संतोष | ०१ | | ०.३४% |
| ६१. | कोल्हे, अविनाश | ०१ | ०१ | ०.३४% |
| ६२. | जाधव, एम. एस. | ०१ | ०१ | ०.३४% |
| ६३. | जोशी, भारती | ०१ | | ०.३४% |
| ६४. | जोशी, र. कृ. | ०१ | | ०.३४% |
| ६५. | जोशी, मिनल मुकुंद | ०१ | | ०.३४% |
| ६६. | जोशी, स्नेहल सुनिल | ०१ | | ०.३४% |
| ६७. | भोंजाळ, चंद्रकांत | ०१ | | ०.३४% |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६८. | मनोहर, म. न. | ०१ | | ०.३४% |
| ६९. | मोरे, एस. बी. | ०१ | | ०.३४% |
| ७०. | मोरे, संतोष संभाजीराव | ०१ | | ०.३४% |
| ७१. | मुतालिक, वर्षा | ०१ | | ०.३४% |
| ७२. | मुंढे, बी. टी. | ०१ | | ०.३४% |
| ७३. | महाजन, शां. ग. | ०१ | | ०.३४% |
| ७४. | चिकटे, राजेंद्र | ०१ | ०२ | ०.३४% |
| ७५. | पाटील, एस. बी. | ०१ | | ०.३४% |
| ७६. | पाटील, व्ही. एम. | ०१ | | ०.३४% |
| ७७. | पानगे, बी. एम. | ०१ | | ०.३४% |
| ७८. | पंडित, अजय | ०१ | | ०.३४% |
| ७९. | पारेख, हर्षा | ०१ | | ०.३४% |
| ८०. | प्रधान, प्रविण वि. | ०१ | | ०.३४% |
| ८१. | पाईकराव, विजयकुमार | ०१ | | ०.३४% |
| ८२. | पुजारी, अर्चना - संकलक | ०१ | | ०.३४% |
| ८३. | पवार, रामेश्वर | ०१ | | ०.३४% |
| ८४. | फरांदे, चंद्रकांत | ०१ | | ०.३४% |
| ८५. | दाते, धनश्री अ. | ०१ | | ०.३४% |
| ८६. | धिरडे, प्रभाकर गोविंद | ०१ | | ०.३४% |
| ८७. | रामदासी, मंजुषा नागनाथ | ०१ | ०१ | ०.३४% |
| ८८. | रिसबूड, गणेश नीलकंठ | ०१ | | ०.३४% |
| ८९. | विचारे, दत्तात्रय तुकाराम | ०१ | | ०.३४% |
| ९०. | हिर्लेकर, प्र. ग. | ०१ | | ०.३४% |
| ९१. | चिकाटे, अनिल | ०१ | | ०.३४% |
| ९२. | देशमुख, के. बी. | ०१ | | ०.३४% |
| ९३. | देशमुख, रेवती प्र. | ०१ | | ०.३४% |
| ९४. | देशपांडे, श्रीराम | ०१ | | ०.३४% |
| ९५. | रेहपाडे, रिना रामराव | ०१ | | ०.३४% |
| ९६. | लाडसावंगीकर, प्र. कृ. | ०१ | | ०.३४% |
| ९७. | लोंढे, धनश्री | ०१ | | ०.३४% |
| ९८. | वायदंडे, हिंदुराव | ०१ | ०१ | ०.३४% |
| ९९. | वराडे, माधव देवबा | ०१ | | ०.३४% |
| १००. | वरखेडे, रमेश | ०१ | | ०.३४% |
| १०१. | शुक्ल, भरतकुमार र. | ०१ | | ०.३४% |
| १०२. | शेकोकार, रमेश | ०१ | | ०.३४% |
| १०३. | बर्वे, प्रकाश | ०१ | ०१ | ०.३४% |
| १०४. | हजारे, कृष्णा बाबु | ०१ | | ०.३४% |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १०५. | सन्नासे, बी. ए. | ०१ | | ०.३४% |
| १०६. | गणपुले, सुनिता | ०१ | | ०.३४% |
| १०७. | गंधे, अच्युत चारुदत्त | ०१ | | ०.३४% |
| १०८. | बापते, विशाल द. | ०१ | | ०.३४% |
| १०९. | सावंत, सुहास | ०१ | | ०.३४% |
| ११०. | बोरकर, वृषाली व्ही. | ०१ | | ०.३४% |
| १११. | गोगटे, शरद | ०१ | | ०.३४% |
| ११२. | बोखारे, नरेंद्र | ०१ | | ०.३४% |
| ११३. | गोखले, मुग्धा | ०१ | | ०.३४% |
| ११४. | संगवाई, मधुकर पा. | ०१ | | ०.३४% |
| ११५. | साखरे, राजेंद्र | ०१ | | ०.३४% |
| ११६. | साळगांवकर, जयराज | ०१ | | ०.३४% |
| ११७. | सुतार, रमेश | ०१ | | ०.३४% |
| ११८. | सुतवणी, मोहिनीराज | ०१ | | ०.३४% |
| ११९. | हावरे, विनय पी. | ०१ | | ०.३४% |
| १२०. | खरे सुनिता | ०१ | | ०.३४% |
| १२१. | खरे, मेघा | ०१ | | ०.३४% |
| १२२. | चुनेकर, सु. रा. | ०१ | | ०.३४% |
| १२३. | टाकसाळे, चेतन | ०१ | | ०.३४% |
| १२४. | घारे, दीपक | ०१ | | ०.३४% |
| १२५. | घुमरे, राम शहाजीराव | ०१ | | ०.३४% |
| १२६. | बसोले, मेधा | | ०१ | |
| १२७. | मोरे,विठ्ठल एन. | | ०१ | |
| १२८. | देवकरे, एस. आर. | | ०१ | |
| १२९. | खाजा सिद्दिकी | | ०१ | |
| १३०. | कंठाळे, सुरेश | | ०२ | |
| १३१. | शेडगे, अपर्णा सुनील | | ०१ | |
| १३२. | सकनुरे, बी. जी. | | ०१ | |
| १३३. | पराडकर, अश्विनी पराग | | ०१ | |
| १३४. | ओतारी, तृप्ती अ. | | ०१ | |
| १३५. | आढाव, महेंद्र | | ०१ | |
| १३६. | जोशी, मंदार | | ०१ | |
| १३७. | पाटील, प्रदिप तुळशीराम | | ०२ | |
| १३८. | बारड, प्र. ही. | | ०१ | |
| १३९. | सोनोने, अ. श. | | ०१ | |
| १४०. | खत्री, मेघराज बा. | | ०१ | |
| १४१. | चोबे, मोनिष एन. | | ०१ | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १४२. | लंकेश्वर, भारती एम. | | ०१ | |
| १४३. | डगवार, शामकांत | | ०१ | |
| १४४. | महाले, संजीवनी राजेश | | ०१ | |
| १४५. | वायंगणकर, सायली | | ०१ | |
| १४६. | बर्वे, राहूल दत्तात्रय | | ०१ | |
| **एकुण** | | | **२९४** | **१००%** |

(स्त्रोत - ज्ञानगंगोत्री नियतकालिकाचे जून २००० ते मे २०१३ या कालावधितील अंकांच्या विश्लेषणावरून)

वरील सारणीवरून निदर्शनास येते की, विजय देवधर यांनी सर्वाधिक १८ (६.१८%) लेख लिहिले आहे, तर डॉ. राजेंद्र कुंभार यांनी १४ म्हणजेच (४.७६%) लेख लिहिले आहे. त्याखालोखाल डॉ. प्रदीप कर्णिक यांनी १२ (४.०८%) लेख लिहिलेले आढळुन आले. सु. प्र. सातारकर, जी. ए. बुवा आणि वेदवती हब्बु यांनी प्रत्येकी ८ (२.७२%) लेख लिहीले आहे. डॉ. एस. आर बाहेती आणि डॉ. प्रकाश बोडके यांनी प्रत्येकी ७ (२.३८%) लेख लिहिले आहे. तर ७७ लेखकांनी प्रत्येकी १ (०.३४%) लेख लिहिले आहे.

**संपादक व लेखकांनी लिहिलेल्या लेखांचे प्रमाण:-**

ज्ञानगंगोत्री या नियतकालिकात संपादक मंडळ व लेखक या दोहोंचाही लेख लिहिण्यात महत्वपूर्ण वाटा आहे. सपांदकीय मध्ये संपादकांनी दुर्लक्षित किंवा महत्वपूर्ण विषयांवर लेखन केलेले दिसून येते. तसेच लेखंकांनी काही महत्वपूर्ण विषयावर लेख देखील लिहीलेले आहे.

या नियताकालिकामध्ये वर्ष २ रे मध्ये अंक ४ हा विशेषांक म्हणुन प्रकाशित झालेला आहे. या विशेषांकासाठी ग्रंथालय व ग्रंथालय सेवा यांच्या संगणकीकरणाचे व्यवस्थापन या विषयाला अनुसरून लेखांचे प्रयोजन केले होते. या विशेषांकात एकूण दहा लेख लिहिले होते. या विशेषांकासाठी संपादक मंडळाबरोबरच डॉ. श. रा. गणपुले, डॉ. द. ना. फडके, डॉ. हिंदुराव वायदंडे व प्रा. प्रदीप कर्णिक यांनी विशेष सहाय्य केले होते.

### सारणी क्रं. ५.२०


### संपादक व लेखकांनी लिहिलेल्या लेखांचे प्रमाण

| अ. क्रं. | लिहिलेले लेख | लेखांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | संपादक मंडळाने लिहिलेले लेख | १२ | ४.०८% |
| २. | लेखकांनी लिहिलेले लेख | २८२ | ९५.९२% |
| **एकूण** | | **२९४** | **१००%** |

(स्रोत - ज्ञानगंगोत्री नियतकालिकाचे जून २००० ते मे २०१३ या कालावधितील अंकांच्या विश्लेषणावरून)

### आलेख क्रं. ५.१२

### संपादक व लेखकांनी लिहिलेल्या लेखांचे प्रमाण




वरील तक्त्यावरुन दिसून येते की, लेखकांनी लिहिलेल्या लेखांचे प्रमाण २८२ (९५.९२%) इतके आहे, तर संपादक मंडळाने लिहिलेल्या लेखांचे प्रमाण १२ (४.०८%) इतके आहे.

**लेखक लिंगभेदानूसार विश्लेषण:-**

ज्ञानगंगोत्री या नियतकालिकासाठी स्त्री लेखक आणि पुरुष लेखकांनी लेख लिहिलेले आहे. या विश्लेषणाचा हेतू ज्ञानगंगोत्री या नियतकालिकात पुरुष लेखकांनी किती लेख लिहिले आहे, आणि स्त्री लेखकांनी किती लेख लिहिले याचे प्रमाण तपासणे हा आहे. या लेखकांचे लिंगभेदानूसार विश्लेषण पुढील तक्त्यावरुन लक्षात येते.

**सारणी क्रं. ५.२१**


**लेखकांचे लिंगभेदानूसार विश्लेषण**

| अं. क्रं. | लिंगभेद | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | पुरुष | १०५ | ७१.९२% |
| २. | स्त्री | ४१ | २८.०८% |
| **एकूण** | | **१४६** | **१००%** |

(स्रोत - ज्ञानगंगोत्री नियतकालिकाचे जून २००० ते मे २०१३ या कालावधितील अंकांच्या विश्लेषणावरून)

**आलेख क्रं. ५.१३**

**लेखकांचे लिंगभेदानूसार विश्लेषण**



वरील सारणी व आलेखावरून असे निदर्शनास येते की, १४६ लेखकांपैकी १०५ लेखक हे पुरूष असून त्यांचे प्रमाण ७१.९२% इतके आहे, तर स्त्री लेखकांचे प्रमाण ४१ (२८.०८%) इतके आढळून आले.

वरील विश्लेषणावरून लक्षात येते की, ७१.९२% लेख हे पुरूष लेखकांनी लिहिलेले आहे, तर २८.०८% लेख हे स्त्रीयांनी लिहिलेले आहे. यामध्ये स्त्री लेखकांना जास्तीत जास्त लेख लिहिण्यासाठी प्रोत्साहन देवून त्यांना लेखनासाठी प्रवृत्त केले पाहीजे.

**लेखकांचे पदनामनिहाय विश्लेषणः-**

ज्ञानगंगोत्री हे नियतकालिक ग्रंथालय व माहितीशास्त्राशी निगडीत आहे. या नियतकालिकातील ग्रंथपाल, प्राध्यापक यांनी किती लेख लिहिले हे तपासण्यासाठी लेखकांचे पदनिहाय विश्लेषण केले आहे.

**सारणी क्रं. ५.२२**

**लेखकांचे पदनामनिहाय विश्लेषण**


| अं. क्रं. | लेखकाचे पद | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | ग्रंथपाल | ६७ | ४५.९४% |
| २. | प्राध्यापक | १३ | ८.९०% |
| ३. | ग्रंथालय सहायक | ११ | ७.५३% |
| ४. | सहायक ग्रंथपाल | ०९ | ६.१६% |
| ५. | एम. लिब. विद्यार्थी | ०८ | ५.४८% |
| ६. | मुद्रणशास्त्र / प्रकाशक | ०६ | ४.११% |
| ७. | उप-ग्रंथपाल | ०३ | २.०५% |
| ८. | माहिती अधिकारी / माहिती शास्त्रज्ञ | ०३ | २.०५% |
| ९. | प्राचार्य | ०२ | १.३७% |
| १०. | उपसंचालक | ०१ | ०.६८% |

| | | | |
|---|---|---|---|
| ११. | सूचिकार | ०१ | ०.६८% |
| १२. | डॉक्युमेंटेशन मॅनेजर | ०१ | ०.६८% |
| १३. | कन्सलटंट | ०१ | ०.६८% |
| १४. | माहिती तंत्रज्ञान विद्यार्थी | ०१ | ०.६८% |
| १५. | माहीत नाही | १९ | १३.०१% |
| **एकूण** | | **१४६** | **१००%** |

(स्रोत - ज्ञानगंगोत्री नियतकालिकाचे जून २००० ते मे २०१३ या कालावधितील अंकांच्या विश्लेषणावरून)

## आलेख क्रं. ५.१४

## लेखकांचे पदनामनिहाय विश्लेषण



वरील सारणी व आलेखावरून असे दिसुन येते की ६७ (४५.९४%) लेखक हे विद्यापीठ किंवा महाविद्यालयीन ग्रंथपाल आहेत, तर १३ (८.९०%) लेखक हे प्राध्यापक आहे. त्यात ग्रंथालय व माहितीशास्त्र या विषयाबरोबरच इतर विषयातील प्राध्यापकांचा देखील समावेश आहे. तर इतर लेखकांमध्ये सहायक ग्रंथपाल ९ (६.१६%), ग्रंथालय सहायक ११ (७.५३%) तर एम. लिब. च्या विद्यार्थ्याचे प्रमाण ८ (५.४८%) इतके आहे. पद माहित नसलेल्या लेखकांचे प्रमाण १९ (१३.०१%) इतके आहे. उल्लेखनिय बाब म्हणजे या नियताकालिकात ग्रंथालय व्यावसायिकाबरोबरच इतर क्षेत्रातील मान्यवरांनी देखील लेख लिहिलेले आहे. जसे प्राचार्य, डॉक्युमेटेंशन मॅनेजर, कन्सलटंट, माहिती शास्त्रज्ञ, प्रकाशक, सूचिकार व विविध विषयांचे प्राध्यापक आणि विद्यार्थी.

ज्ञानगंगोत्री या नियतकालिकात ४५.९४% लेख हे विद्यापीठ किंवा महाविद्यालयीन ग्रंथपालांनी लिहिलेले आहे. तर ८.९०% लेख हे प्राध्यापकांनी लिहिलेले आहे. प्राध्यापकांनी जास्तीत जास्त लेख लिहीले पाहिजे जेणेकरून त्यांच्या ज्ञानाचा उपयोग ज्ञानगंगोत्री नियतकालिकाच्या उपभोक्त्यांसाठी होईल. हे नियतकालिक ग्रंथालयशास्त्राव्यतीरीक्त इतर वाचकांनाही उपयुक्त ठरले आहे. १४६ पैकी १९ (१३.०१%) लेखकांचे पद माहित नाही. त्यामध्ये अपर्णा शेडगे, संतोष मोरे, व्ही. एम. पाटील, के. बी. देशमुख, वर्षा मुतालिक यांचा समावेश होता. (पद माहित नसलेल्या लेखकांची यादी परिशिष्टमध्ये जोडली आहे.)

**ज्ञानगंगोत्री या नियतकालिकात लेख लिहिणाऱ्या लेखकांचे जिल्हानिहाय विश्लेषण:-**

ज्ञानगंगोत्री या नियतकालिकात जिल्हानिहाय लेखकांचे प्रमाण जाणून घेण्याचा प्रयत्न या विश्लेषणातुन केला आहे

## सारणी क्रं. ५.२३


### लेखकांचे जिल्हानिहाय विश्लेषण

| अं. क्रं. | ठिकाण (जिल्हा) | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | मुंबई | ३१ | २१.२३% |
| २. | पुणे | १९ | १३.०१% |
| ३. | नाशिक | १६ | १०.९६% |
| ४. | ठाणे | ०९ | ६.१६% |
| ५. | अकोला | ०८ | ५.४८% |
| ६. | नांदेड | ०७ | ४.७९% |
| ७. | सांगली | ०६ | ४.११% |
| ८. | सावंतवाडी | ०६ | ४.११% |
| ९. | अमरावती | ०४ | २.७४% |
| १०. | कोल्हापूर | ०३ | २.०५% |
| ११. | जळगांव | ०२ | १.३७% |
| १२. | परभणी | ०२ | १.३७% |
| १३. | शेगांव | ०२ | १.३७% |
| १४. | औरंगाबाद | ०१ | ०.६८% |
| १५. | अहमदनगर | ०१ | ०.६८% |
| १६. | धुळे | ०१ | ०.६८% |
| १७. | नागपूर | ०१ | ०.६८% |
| १८. | जालना | ०१ | ०.६८% |
| १९. | भंडारा | ०१ | ०.६८% |
| २०. | लातुर | ०१ | ०.६८% |
| २१. | बदलापूर | ०१ | ०.६८% |
| २२. | माहित नाही | २३ | १५.८१% |
| **एकूण** | | **१४६** | **१००%** |

(स्रोत - ज्ञानगंगोत्री नियतकालिकाचे जून २००० ते मे २०१३ या कालावधीतील अंकांच्या विश्लेषणावरून)

**आलेख क्रं. ५.१५**

**लेखकांचे जिल्हानिहाय विश्लेषण दर्शविणारा आलेख**




वरील सारणी व आलेखावरून निदर्शनास येते की, सर्वाधिक ३१ (२१.२३%) लेखक हे मुंबई मधील असून, त्याखालोखाल पुणे १९ (१३.१%), नाशिक १६ (१०.९६%), ठाणे ९ (६.१६%), अकोला जिल्ह्यातील ८ (५.४८%), लेखक आहे, तर माहित नसलेल्या लेखकांच्या जिल्ह्याचे प्रमाण २३ (१५.८१%) इतके आहे.

ज्ञानगंगोत्री या नियतकालिकात मुंबई २१.२३%, पुणे १३.०१%, नाशिक १०.९६% आणि, ठाणे ६.१६% या चार जिल्ह्यामधून ५१.३६% लेखकांनी लेखन केले आहे. म्हणजेच या चारही शहरी क्षेत्रातील लेखकांचे लेख लिहिण्याचे प्रमाण अधिक दिसून येते. महाराष्ट्रातील

सर्वच जिल्ह्यांमधून जास्तीत जास्त लेख मिळविण्याचे प्रयत्न झाले पाहीजे. २३ (१५.८१%) लेखकांनी त्यांच्या गावाचा किंवा जिल्ह्याचा उल्लेख केलेला नाही.

## प्रकाशित लेखांचे वर्षनिहाय विश्लेषण

ज्ञानगंगोत्री या नियतकालिकात वर्षनिहाय प्रकाशित झालेल्या लेखांचे प्रमाण तपासणे, हा उद्देश या विश्लेषणामागे होता.

**सारणी क्रं. ५.२४**


**प्रकाशित लेखांचे वर्षनिहाय विश्लेषण**

| वर्ष | अंकनिहाय प्रकाशित झालेले लेख | टक्केवारी |
|---|---|---|
| १ ले | ३१ | १०.५४% |
| २ रे | २७ | ९.१८% |
| ३ रे | १७ | ५.७८% |
| ४ थे | २० | ६.८०% |
| ५ वे | २७ | ९.१८% |
| ६ वे | ४२ | १४.३२% |
| ७ वे | २३ | ७.८२% |
| ८ वे | २४ | ८.१६% |
| ९ वे | १८ | ६.१२% |
| १० वे | १६ | ५.४४% |
| ११ वे | १९ | ६.४६% |
| १२ वे | १५ | ५.१०% |
| १३ वे | १५ | ५.१०% |
| **एकूण** | **२९४** | **१००%** |

(स्त्रोत- ज्ञानगंगोत्री नियतकालिकाचे जून २००० ते मे २०१३ या कालावधितील अंकांच्या विश्लेषणावरून)

**आलेख क्रं. ५.१६**

**प्रकाशित लेखांचे वर्षनिहाय विश्लेषण**




वरील सारणी व आलेखावरून निदर्शनास येते की, वर्ष ६ मध्ये सर्वाधिक ४२ (१४.३२%), लेख प्रकाशित झाले, तर वर्ष १ मध्ये ३१ (१३.०१%), लेख प्रकाशित झाले. वर्ष २ आणि वर्ष ५ मध्ये प्रत्येकी २७ (९.१८%) लेख प्रकाशित झाले तर त्याखालोखाल वर्ष ८ मध्ये २४ (८.१६%), आणि वर्ष ७ मध्ये २३ (७.२८%) लेख प्रकाशित झाले. वर्ष १२ आणि वर्ष १३ मध्ये सर्वात कमी १५ (५.१०%) लेख प्रकाशित झाले आहे.

वर्ष ६ मध्ये सर्वाधिक १४.३२% लेख प्रकाशित झाले तर वर्ष १२ आणि १३ मध्ये सर्वात कमी ५.१०% लेख प्रकाशित झाले. म्हणजेच एका वर्षात सरासरी २२.६१% लेख प्रकाशित झाले आहे. ज्ञानगंगोत्री हे ग्रंथालय व माहितीशास्त्र या विषयातील उपयुक्त नियतकालिक असल्याने यामधील लेखांची सरासरी वाढविण्यासाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे.

**अंकनिहाय लेखांचे विश्लेषण:-**

प्रत्येक अकांमध्ये किती लेख प्रकाशित झाले हे तपासण्याच्या हेतूने अकंनिहाय लेखांचे विश्लेषण केले आहे.

**सारणी क्रं. ५.२५**

**अंकनिहाय लेखांचे विश्लेषण**

| अं. क्रं. | खंड | अंक | प्रकाशित लेखांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १. | १ | १ | ७ | २.३८% |
| २. | | २ | ९ | ३.०६% |
| ३. | | ३ | १२ | ४.०८% |
| ४. | | ४ | ३ | १.०२% |
| ५. | २ | १ | ४ | १.३६% |
| ६. | | २ | ६ | २.०४% |
| ७. | | ३ | ७ | २.३८% |
| ८. | | ४ | १० | ३.४०% |
| ९. | ३ | १ | ४ | १.३६% |
| १०. | | २ | ४ | १.३६% |
| ११. | | ३ | ५ | १.७०% |
| १२. | | ४ | ४ | १.३६% |
| १३. | ४ | १ | ४ | १.३६% |
| १४. | | २ | ६ | २.०४% |
| १५. | | ३ | ५ | १.७०% |
| १६. | | ४ | ५ | १.७०% |
| १७. | ५ | १ | ६ | २.०४% |
| १८. | | २ | ७ | २.३८% |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १९. | | ३ | ५ | १.७०% |
| २०. | | ४ | ९ | ३.०६% |
| २१. | ६ | १ | ८ | २.७२% |
| २२. | | २ | ८ | २.७२% |
| २३. | | ३ | १५ | ५.१०% |
| २४. | | ४ | ११ | ३.७४% |
| २५. | ७ | १ | ५ | १.७०% |
| २६. | | २ | ५ | १.७०% |
| २७. | | ३ | ७ | २.३८% |
| २८. | | ४ | ६ | २.०४% |
| २९. | ८ | १ | ३ | १.०२% |
| ३०. | | २ | ९ | ३.०६% |
| ३१. | | ३ | ७ | २.३८% |
| ३२. | | ४ | ५ | १.७०% |
| ३३. | ९ | १ | ४ | १.३६% |
| ३४. | | २-३ | १० | ३.४०% |
| ३५. | | ४ | ४ | १.३६% |
| ३६. | १० | १ | ४ | १.३६% |
| ३७. | | २-३ | ८ | २.७२% |
| ३८. | | ४ | ४ | १.३६% |
| ३९. | ११ | १ | ५ | १.७०% |
| ४०. | | २ | ६ | २.०४% |
| ४१. | | ३ | ४ | १.३६% |
| ४२. | | ४ | ४ | १.३६% |
| ४३. | १२ | १-२ | ९ | ३.०६% |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४४. | | ३-४ | ६ | २.०४% |
| ४५. | १३ | १-२ | ९ | ३.०६% |
| ४६. | | ३-४ | ६ | २.०८% |
| | | | **२९४** | **१००.००%** |

(स्रोत - ज्ञानगंगोत्री नियतकालिकाचे जून २००० ते मे २०१३ या कालावधितील अंकांच्या विश्लेषणावरून)

वरील सारणीवरुन लक्षात येते की, वर्ष ६ अंक ३ मध्ये सर्वाधिक १५ (५.१०%) लेख प्रकाशित झाले, तर वर्ष १ अंक ३ मध्ये १२ (४.०८%), वर्ष ६ अंक ४ मध्ये ११ (३.७४%) लेख प्रकाशित झाले आहे. सर्वात कमी ३ (१.०२%) लेख हे वर्ष १ अंक ४ आणि वर्ष ८ अंक १ मध्ये प्रकाशित झाले आहे. अंकनिहाय लेख प्रकाशित होण्याचे प्रमाण ६.३९% इतके आढळून आले.

वर्ष ६ अंक ३ मध्ये सर्वाधिक १५ (५.१०%) लेख प्रकाशित झाले, तर वर्ष ८ अंक १ मध्ये सर्वात कमी ३ (१.०२%) लेख प्रकाशित झाले. वरिल विश्लेषणावरून लक्षात येते की ज्ञानगंगोत्री या नियतकालिकात वर्षनिहाय आणि अंकनिहाय लेख वाढविण्याची आवश्यकता आहे. ज्ञानगंगोत्री हे ग्रंथालय व माहितीशास्त्रातील मराठी भाषेतील उपयुक्त नियतकालिक असल्याने त्यामध्ये सातत्याने उपयुक्त, वर्तमान घटना, घडोमोडी व संशोधनात्मक लेखांची संख्या वाढविणे आवश्यक आहे.

**ज्ञानगंगोत्री नियतकालिकातील लेखांचे विषयवार विश्लेषण**

विषयवार लेखांचे प्रमाण जाणून घेण्याचा प्रयत्न या सारणी मधून केला आहे. त्यामध्ये आलेल्या माहितीचे विश्लेषण पुढील सारणीत केले आहे.

## सारणी क्रं. ५.२६


## ज्ञानगंगोत्री नियतकालिकातील लेखांचे विषयवार विश्लेषण

| अ.क्रं. | लेखाचा मुख्य विषय | लेखांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | माहिती तंत्रज्ञानाचे ग्रंथालयात उपयोजन | ७६ | २५.८५% |
| २. | ग्रंथालय व्यवस्थापन | ५७ | १९.३९% |
| ३. | ग्रंथालय व माहितीशास्त्र शिक्षण | २३ | ७.८२% |
| ४. | ग्रंथालयातील संशोधन | २० | ६.८०% |
| ५. | ग्रंथसुचीय नियत्रंण | १४ | ४.७६% |
| ६. | विद्यापीठीय व महाविद्यालयीन ग्रंथालये | १० | ३.४०% |
| ७. | ग्रंथालय चळवळ | १० | ३.४०% |
| ८. | ग्रंथमुद्रण तंत्रज्ञान | ०९ | ३.०६% |
| ९. | वाचनसाहीत्य संग्रंहाचा विकास | ०९ | ३.०६% |
| १०. | वाचन सवयींचा अभ्यास | ०८ | २.७२% |
| ११. | व्यक्तिविशेष | ०८ | २.७२% |
| १२. | सार्वजनिक ग्रंथालय | ०६ | २.०४% |
| १३. | विशेष ग्रंथालय | ०६ | २.०४% |
| १४. | ग्रंथालयाचे अर्थशास्त्र | ०६ | २.०४% |
| १५. | संदर्भसेवा | ०५ | १.७०% |
| १६. | बौध्दिक संपदा अधिकार | ०५ | १.७०% |
| १७. | माहिती साक्षरता | ०५ | १.७०% |
| १८. | ग्रंथालयीन तालिकीकरण आणि वर्गीकरण | ०४ | १.३६% |
| १९. | ग्रंथालय कायदे | ०४ | १.३६% |
| २०. | इतर | ०९ | ३.०८% |
| **एकूण** | | **२९४** | **१००%** |

(स्त्रोत - ज्ञानगंगोत्री नियतकालिकाचे जून २००० ते मे २०१३ या कालावधितील अंकांच्या विश्लेषणावरून)

## आलेख क्रं. ५.१७

## ज्ञानगंगोत्री नियतकालिकातील लेखांचे विषयवार विश्लेषण




वरील सारणी व आलेखावरून निदर्शनास येते की, ज्ञानगंगोत्री या नियतकालिकात सर्वाधिक लेख माहिती तंत्रज्ञानाचे ग्रंथालयात उपयोजन या विषयावर प्रकाशित झाले आहे. त्याचे प्रमाण २५.८५% इतके आहे, तर ग्रंथालय व्यवस्थापन या विषयावर १९.३९% लेख प्रकाशित झाले आहे. ग्रंथालय व माहितीशास्त्र शिक्षण या विषयावर ७.८२%, गंथालय संशोधन ६.८०%, ग्रंथसूचिय नियंत्रण ४.४६%, विद्यापीठीय व महाविद्यालयीन ग्रंथालये आणि ग्रंथालय चळवळ या विषयावर प्रत्येकी ३.४०% लेख प्रकाशित झाले आहे. तर सर्वात कमी लेख गंथालयीन तालिकीकरण व ग्रंथालयीन वर्गीकरण आणि ग्रंथालय कायदे या विषयावर प्रत्येकी ४ (१.३६%) लेख प्रकाशित झाले आहे. ज्ञानगंगोत्री या नियतकालिकात ९ लेख हे

ग्रंथालयशास्त्राशी संबंधित नाही. त्याचे प्रमाण ३.०८% इतके आहे. इतर विषयामध्ये दिनविशेष: मंत्र आणि तंत्र, प्रभावीत करणारे ग्रंथ, अर्गोनॉमिक्सचा वापर, सहयोगी उपक्रम, संज्ञा- संकल्पना परिचय, राष्ट्रिय विज्ञान संप्रेषण आणि सूचना संसाधन परीषद, १९ व्या २० व्या शतकातील मराठी ग्रंथांचा संक्षिप्त इतिहास, स्मरणिका संपादन: कला व शास्त्र, प्रिंटर्स: इतिहास, प्रकार आणि घ्यावयाची काळजी या विषयांचा समावेश आहे.

थोडक्यात ज्ञानगंगोत्री या नियतकालिकाच्या उद्दिष्टांप्रमाणे वर्तमान घटना, घडामोडी या विषयांवर लेख आढळून येतात. या नियतकालिकामध्ये जास्तीत जास्त लेख माहिती तंत्रज्ञानाचे ग्रंथालयात उपयोजन (२५.८५%) व त्या-त्या वेळेस चर्चेत असलेल्या विषयांवर आधारित लेख प्रकाशित झालेले आढळून येते.

**लेखांच्या प्रकारानुसार विश्लेषण:-**

ज्ञानगंगोत्री या नियतकालिकात आलेल्या लेखांचे स्वरूप जाणून घेण्याच्या उद्देशाने हे विश्लेषण केले आहे.

**सारणी क्रं. ५.२७**


**लेखांचे प्रकारानुसार विश्लेषण**

| अ. क्रं. | लेखांचा प्रकार | लेखांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | संकल्पनात्मक लेख | १०९ | ३७.०७% |
| २. | संशोधनात्मक लेख | २० | ६.८०% |
| ३. | प्रचलित विषयासंबंधी लेख | १५६ | ५३.०६% |
| ४. | इतर | ०९ | ३.०६% |
| **एकूण** | | **२९४** | **१००%** |

(स्त्रोत - ज्ञानगंगोत्री नियतकालिकाचे जून २००० ते मे २०१३ या कालावधितील अंकांच्या विश्लेषणावरून)

**आलेख क्रं. ५.१८**

**लेखांचे प्रकारानुसार विश्लेषण दर्शविणारा आलेख**




वरील सारणी व आलेखावरून असे निदर्शनास येते की, सर्वाधिक १५६ (५३.०६%) लेख हे प्रचलित विषयासंबंधीत असून १०९ (३७.०७%) लेख संकल्पनात्मक स्वरूपाचे आहे. संशोधनात्मक लेखांचे प्रमाण २० (६.८०%) इतके आहे. तर इतर विषयांचे प्रमाण ३.०६% इतके असून इतर विषयामध्ये दिनविशेष : मंत्र आणि तंत्र, प्रभावीत करणारे ग्रंथ, अर्गोनॉमिक्सचा वापर, सहयोगी उपक्रम, संज्ञा - संकल्पना परिचय, राष्ट्रिय विज्ञान संप्रेषण आणि सूचना संसाधन परीषद, १९ व्या २० व्या शतकातील मराठी ग्रंथांचा संक्षिप्त इतिहास, स्मरणिका संपादन: कला व शास्त्र, प्रिंटर्स: इतिहास, प्रकार आणि घ्यावयाची काळजी या विषयांचा समावेश आहे.

५३.०६% लेख हे प्रचलित विषयासंबंधीत असून ज्ञानगंगोत्री या नियतकालिकाद्वारे वर्तमान घटना, घडामोडी बाबत वाचकांना माहिती पुरविण्याचा जो उद्देश होता तो सफल होतांना दिसून येतो. संकल्पनात्मक लेखाद्वारे ग्रंथालय व माहितीशास्त्र या विषयातील मुळ विषयांना (Core

Subject) देखिल महत्व दिलेले दिसून येते. तसेच संशोधनात्मक लेखांचे प्रमाण या नियतकालिकामध्ये कमी प्रमाणात दिसून येते, ते वाढविण्यासाठी Ph.D झालेल्या व करत असलेल्या संशोधकांना लेख लिहिण्यासाठी आव्हान केले पाहीजे.

**उल्लेखित प्रलेखांचे प्रकारानुसार विश्लेषणः-**

वाचनसाहित्याचे विविध प्रकार असतात. ज्ञानगंगोत्री या नियतकालिकातील अंकामध्ये लेख लिहितांना कोणत्या प्रकारच्या वाचनसाहित्याचा / प्रलेखांचा वापर किती प्रमाणात झाला हे शोधण्यासाठी एकूण उल्लेखांचे प्रकारानुसार वर्गवारी केली ती पुढील तक्त्यात दर्शविली आहे.

**सारणी क्रं. ५.२८**


**उल्लेखित प्रलेखांचे प्रकारानुसार विश्लेषण**

| अं. क्रं. | प्रलेख प्रकार | उल्लेख संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | मराठी ग्रंथ | १३६ | १६.११% |
| २. | मराठी नियतकालिके | १८ | २.१३% |
| ३. | इंग्रजी ग्रंथ | ३१३ | ३७.०९% |
| ४. | इंग्रजी नियतकालिके | १२६ | १४.९३% |
| ५. | सेमीनार | १६ | १.९०% |
| ६. | कॉन्फरन्स | १२ | १.४२% |
| ७. | वेबसाईट | १७३ | २०.५०% |
| ८. | इतर | ५० | ५.९२% |
| **एकूण** | | **८४४** | **१००%** |

(स्त्रोत - ज्ञानगंगोत्री नियतकालिकाचे जून २००० ते मे २०१३ या कालावधितील अंकांच्या विश्लेषणावरून)

## आलेख क्रं. ५.१९

## उल्लेखित प्रलेखांचे प्रकारानुसार विश्लेषण




वरील सारणी व आलेखावरून निदर्शनास येते कि, सर्वाधिक उल्लेख हे इंग्रजी ग्रंथाचे आलेले असून त्याचे प्रमाण ३१३ (३७.०९%) आहे, तर वेबसाईटचे प्रमाण १७३ (२०.५०%) इतके आहे. १३६ (१६.११%) उल्लेख हे मराठी ग्रंथाचे असून १२६ उल्लेख इंग्रजी नियतकालिकांचे आहे. त्याखालोखाल मराठी नियतकालिके (२.१३%), सेमीनार (१.९०%), कॉन्फरन्स (१.४२%) तर साहित्याचे प्रमाण (५.९२%) इतके आहे. ५० प्रलेख प्रकारांचे माहिती पुर्ण दिलेली नसल्यामुळे त्या प्रलेखांचा प्रकार समजू शकला नाही.

३७.०९% उल्लेख हे इंग्रजी ग्रंथाचे आहे म्हणजेच आजही ग्रंथालयशास्त्राच्या अभ्यासात इंग्रजी भाषेतील साहित्य जास्त प्रमाणात उपलब्ध असल्याने इंग्रजी प्रलेखांचा अधिक प्रमाणात वापर होताना दिसून येतो. तसेच मराठी भाषेतील ग्रंथाचा संदर्भाचा उल्लेख जास्तीत जास्त साहित्यामध्ये होण्यासाठी दर्जेदार व गुणवत्तापूर्ण मराठी वाचन साहित्य उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

**उल्लेखांचे कालपरत्वे विश्लेषण:-**

उल्लेखांचे उध्दरणात दिलेल्या काळ म्हणजेच पुस्तक किंवा प्रकाशनाचा कालावधी महत्वाचा आहे. त्याचे विश्लेषण प्रलेखाच्या प्रकाशन कालावधिनुसार केले आहे. काळाची वर्गवारी करतांना १९६० पूर्वीचा कालखंड, १९६० ते १९८०, १९८१ ते २००० व २००१ ते त्यापुढील अशी विभागणी केलेली आहे, तीचे प्रमाण पुढिल सारणीत दर्शविल्याप्रमाणे.

**सारणी क्रं. ५.२९**


**उध्दरणाचे कालपरत्वे विश्लेषण**

| **अं. क्रं.** | **कालावधी** | **एकूण उध्दरणे** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|
| १. | १९६० च्या पूर्वीचे | ३७ | ४.३८% |
| २. | १९६१ ते १९८० | १०३ | १२.२०% |
| ३. | १९८१ ते २००० | २५२ | २९.८६% |
| ४. | २००१ ते २०१३ पर्यंत | ३२१ | ३८.०४% |
| ५. | माहीत नाही | १३१ | १५.५२% |
| **एकूण** | | **८४४** | **१००%** |

(स्त्रोत - ज्ञानगंगोत्री नियतकालिकाचे जून २००० ते मे २०१३ या कालावधितील अंकांच्या विश्लेषणावरून)

**आलेख क्रं. ५.२०**

**उध्दरणाचे कालपरत्वे विश्लेषण**




वरील सारणी व आलेखावरून असे आढळुन आले की, २००१ ते २०१३ या कालावधितील सर्वाधिक ३२१ (३८.०४%) प्रलेखांचा उध्दरणांसाठी वापर केलेला आहे. तर त्याखालोखाल १९८१ ते २००० या काळातील २५२ (२९.८६%) उध्दरणे आढळुन आली. १९६१ ते १९८० या कालावधित १०३ (१२.२०%), १९६० पूर्वीच्या प्रलेखांचा सर्वात कमी ३७ (४.३८%) उध्दरणांचा वापर केलेला आढळुन आला. कालावधी माहिती नसलेल्या प्रलेखांचे प्रमाण १५.५२% इतके दिसून येते. यामध्ये उल्लेखित संदर्भसाहित्याची पुर्ण माहिती दिलेली नाही. माहित नसलेल्या संदर्भ साधनांमध्ये वेबसाईट चे प्रमाण अधिक दिसून येते.

३८.०४% उध्दरणे हे २००१ ते २०१३ या कालावधितील आहे म्हणजेच लेखक लेख लिहितांना नवीन आणि लवकर उपलब्ध होणाऱ्या वाचन साहित्याचा अधिक वापर करतांना दिसून येते.

**विशेषाकांची माहिती:-**

ज्ञानगंगोत्री या नियतकालीकाचे २००० ते २०१३ या कालावधीत एकूण ४६ अंक प्रकाशित झाले आहे. या १३ वर्षाच्या कालावधीत ज्ञानगंगोत्री या नियतकालिकामध्ये एकूण ३ अंक विशेषांक म्हणून प्रकाशित झाले आहे. ते पुढीलप्रमाणे

**सारणी क्रं. ५.३०**

**ज्ञानगंगोत्री या नियतकालिकात प्रकाशित झालेले विशेषांक**

| अं. क्र. | वर्ष | अंक | विशेषांकाचा विषय |
|---|---|---|---|
| १. | २ | ४ | ग्रंथालय व ग्रंथालय सेवा यांच्या संगणकीकरणाचे व्यवस्थापन विशेषांक |
| २. | ५ | १ | मराठी ग्रंथसूचिकार शंकर गणेश दाते जन्मशताब्दी विशेषांक |
| ३. | ६ | ३ | मराठी ग्रंथमुद्रणकला द्विशताब्दी विशेषांक |

(स्रोत - ज्ञानगंगोत्री नियतकालिकाचे जून २००० ते मे २०१३ या कालावधितील अंकांच्या विश्लेषणावरून)

## १) ग्रंथालय व ग्रंथालय सेवा यांच्या संगणकीकरणाचे व्यवस्थापन विशेषांक

वर्ष २ अंक ४ मध्ये ग्रंथालय व ग्रंथालय सेवा यांच्या संगणकीकरणाचे व्यवस्थापन या शिर्षकाखाली विशेषांकाचे प्रकाशन करण्यात आले. या विशेषांकासाठी डॉ. श. रा. गणपुले, डॉ. द. ना. फडके, डॉ. प्रदीप कर्णिक व डॉ. हिंदुराव वायदंडे यांनी संपादन व साहाय्य केले आहे. हा विशेषांक ८८ पृष्ठांचा असून प्रस्तुत विशेषांकाचे लेखन संपादक व साहाय्यक यांनी केले आहे. या विशेषांकामध्ये सोल (SOUL- Software for University Library) ग्रंथालय संगणकीकरण प्रणाली बाबत विस्तृत माहिती दिली आहे. सोल ही संगणकीय प्रणाली INFLIBNET या संस्थेने तयार केली आहे. सोल संगणक प्रणाली वापरतांना येणाऱ्या अडचणीचे तज्ञांकरवी निराकरण केले होते. त्याचबरोबर प्रशिक्षण काळात ग्रंथालयाच्या संगणकीकरणाच्या व्यवस्थापनासंबंधित खुली चर्चा आयोजित करण्यात आली होती. त्या चर्चेतून उपस्थित केलेल्या मुद्यांवर प्रस्तुत विशेषांक आधारित आहे.

ग्रंथालय व ग्रंथालय सेवा यांच्या संगणकीकरणाचे व्यवस्थापन या विशेषांकांत पुढील घटकांवर विस्तृत चर्चा केलेली आहे.

**सारणी क्रं. ५.३१**

**ग्रंथालय व ग्रंथालय सेवा यांच्या संगणकीकरणाचे व्यवस्थापन या विशेषांकांतील लेख**

| **अं.क्रं.** | **लेखाचे नाव** | **लेखक** |
|---|---|---|
| १. | सोल प्रणालीचे असाधारण महत्व | संपादक |
| २. | सोल प्रणाली परिचय | संपादक |
| ३. | सोल वापरासंबंधित यंत्रणा, सोयी आणि सुविधा | संपादक |
| ४. | ग्रंथालय व्यवस्थापनाचे संगणकीकरणपुर्व सुसूत्रीकरण | संपादक |
| ५. | माहितीसाठ्यांची निर्मिती | संपादक |
| ६. | संगणकीकृत ग्रंथालयसेवांचे व्यवस्थापन | संपादक |
| ७. | आर्थिक तरतुदी | संपादक |
| ८. | मनुष्यबळ तरतूद | संपादक |
| ९. | इतर संबंधित बाबी | संपादक |
| १०. | ग्रंथालय संघटनांचे स्थान | संपादक |

(स्त्रोत - ज्ञानगंगोत्री नियतकालिकाचे जून २००० ते मे २०१३ या कालावधितील अंकांच्या विश्लेषणावरून)

## २) मराठी ग्रंथसूचिकार शंकर गणेश दाते जन्मशताब्दी विशेषांक

वर्ष ५ अंक १ मध्ये मराठी ग्रंथसूचिकार शंकर गणेश दाते जन्मशताब्दी विशेषांक या शीर्षकाखाली हा विशेषांक प्रकाशित करण्यात आला. या विशेषांकात शंकर गणेश दाते यांचा जीवनपट, त्यांचे कार्य, दाते यांची साहित्यसूची याबाबतची माहिती या विशेषांकात दिलेली आहे. सूचिकार्यावरील दाते यांची निष्ठा आणि कार्य अतुलनीय असेच आहे. हा विशेषांक एकूण १५८ पृष्ठांचा होता. या विशेषांकात विविध लेखकांनी संकलन केलेले व लिहिलेले असे एकूण ८ लेख आहे. ते पुढीलप्रमाणे

**सारणी क्रं. ५.३२**

**मराठी ग्रंथसूचिकार शंकर गणेश दाते जन्मशताब्दी विशेषांकांतील लेख**

| अं.क्रं. | लेखाचे नाव | लेखक |
|---|---|---|
| १. | शंकर गणेश दाते यांचा जीवनपट | पुजारी, अर्चना - संकलक |
| २. | शंकर गणेश दाते: व्यक्ती आणि कार्य | कर्णिक, प्रदीप |
| ३. | मराठी ग्रंथसुची: मूल्यमापन | डोंगरे, सतीश |
| ४. | ग्रंथ- सूची- शास्त्र (अजून ताजा वास जुन्याला) | शंकर गणेश दाते |
| ५. | मराठी ग्रंथसूची खंड-३ आणि मराठी नियतकालिकांची सूची खंड- ४ (ग्रंथपरिचय) | मोहन पाठक |
| ६. | अपु-या शोधाला अजुनही साहाय्य हवे आहे | संपादक |
| ७. | शंकर गणेश दाते यांची साहीत्यसुची | गराटे, सचिन |
| ८. | शंकर गणेश दाते यांची दशांश वर्गीकरणाची सारणी [भाग १] | कर्णिक, प्रदीप - संकलक |

(स्रोत - ज्ञानगंगोत्री नियतकालिकाचे जून २००० ते मे २०१३ या कालावधितील अंकांच्या विश्लेषणावरून)

**३) मराठी ग्रंथमुद्रणकला द्विशताब्दी विशेषांक**

वर्ष ६ अंक ३ मध्ये मराठी ग्रंथमुद्रणकला द्विशताब्दी विशेषांक या शिर्षकाखाली हा विशेषांक प्रकाशित झाला आहे. १८०५ साली टाईप वापरून तयार केलेले पहिले मराठी पुस्तक जन्माला आले. या घटनेला २०० वर्ष पूर्ण झाल्या कारणाने मराठी ग्रंथमुद्रणाची परंपरा या घटनेपासून सुरू झाली आणि ती विकास पावत आज संगणकीय मुद्रणकलेपर्यंत येवून ठेपली आहे. मुद्रण कलेतील या क्रांतिमुळे ज्ञान सर्वांना खुले झाले आहे. मुद्रणामुळे नियतकालिके आणि वर्तमानपत्रे आली आणि जगातील घटना घडामोडी सर्वांना त्वरीत समजू लागल्या. सारे जग संगणकीय क्रांतिमुळे माहितीच्या महाजालात सापडले आहे.

हा विशेषांक २०८ पृष्ठांचा असून या विशेषांकात विविध लेखकांनी लिहीलेले १७ लेख प्रसिध्द केले आहे. ते पुढिल प्रमाणे

## सारणी क्रं. ५.३३

## मराठी ग्रंथमुद्रणकला द्विशताब्दी विशेषांकांतील लेख

| अं.क्रं. | लेखाचे नाव | लेखक |
|---|---|---|
| १. | मराठी ग्रंथमुद्रणाच्या स्थित्यंतराचे निवडक टप्पे | शेवाळे, मधुकर - संकलक |
| २. | विल्यम कॅरी : पहिला मराठी ग्रंथमुद्रणकर्ता आणि समाजसुधारकही | कोल्हे, अविनाश |
| ३. | प्रा. अ. का. प्रियोळकर आणि ग्रंथमुद्रणशोध (अजून ताजा वास जून्याला) | बापूराव नाईक |
| ४. | मराठीतील आद्यमुद्रितांची ग्रंथसुची: स्थिती आणि संरक्षण | कर्णिक, प्रदीप |
| ५. | अक्षरकला: गुटेनबर्ग ते गुगल | साळगांवकर, जयराज |
| ६. | आधुनिक मुद्रणकलेचा भाष्यकार: मार्शल मॅकल्युहॅन | शेकोकार, रमेश |
| ७. | आधुनिक मुद्रणतंत्र: फायदे आणि तोटे | नाईक, अरुण |
| ८. | प्रोजेक्ट गुटेनबर्ग | मोहन पाठक |
| ९. | मराठी ग्रंथप्रकाशनाची दोनशे वर्षे | गोगटे, शरद |
| १०. | मराठी ग्रंथव्यवहाराची शोकांतिका | कर्णिक, सुनिल |
| ११. | प्रकाशित साहित्य व डिलिव्हरी ऑफ बुक्स कायदा [१९५४] | पौडवाल, सुषमा |
| १२. | मराठी ग्रंथमुद्रणातील सौंदर्यस्थळे | घारे, दीपक |
| १३. | ग्रंथबांधणी, ग्रंथालये आणि जॉन मॅथ्यू | गणपुले श. रा |
| १४. | छापील व हस्तलिखीत कागदाचे संरक्षण | करमरकर, प्रकाश |
| १५. | मुद्रणविषयक परिभाषीक संज्ञा- संकल्पना | कुंभार, राजेंद्र |
| १६. | मुद्रण आणि संगणक क्षेत्रातील मुद्राक्षरकार व मुद्राक्षरकलाकार या दोन अज्ञात व्यक्तिंची पुनरओळख | जोशी, र. कृ. |
| १७. | मुद्रणविषयक निवडक साहित्य- सूची | गराटे, सचिन -संकलक |

(स्त्रोत - ज्ञानगंगोत्री नियतकालिकाचे जून २००० ते मे २०१३ या कालावधितील अंकांच्या विश्लेषणावरून)

तीनही विशेषांक अतिशय उपयुक्त आणि दर्जेदार आहे. या विशेषांकातून उपभोक्त्यांसाठी उपयुक्त व परिपूर्ण लेख उपलब्ध करून दिलेले आहे.

वरील विश्लेषणावरून निदर्शनास येते की, विविध विषयांवर प्रकाशित झालेले विशेषांक अभ्यासपूर्ण व दर्जेदार स्वरूपाचे आहे. असेच अजूनही नवीन संकल्पनावर आधारित विशेषांक प्रकाशित करून विद्यार्थ्यांना त्या - त्या विषयांचे सखोल ज्ञान देण्यास वाव आहे, तसेच ग्रंथालयशास्त्रात त्याद्वारे दर्जेदार साहित्य निर्मिती होण्यास मदत होईल.

**नियतकालिकाची वैशिष्ट्ये:-**

**१. लेखक परिचय:-**

एकूण ४६ अंकापैकी ३२ अंकामधून ज्ञानगंगोत्री या नियतकालिकातून लेखन करणाऱ्या लेखकांचा परिचय करून दिलेला आहे. लेखक परिचयामध्ये लेखकाचे नाव, कार्यरत असलेली संस्था, पद, अनुभव व पत्ता दिलेला आहे.

लेखकांचा परिचय अंकात दिल्याने त्या लेखाविषयीची विश्वसार्हता वाढते, तसेच आवश्यक्तेनुसार त्यांच्याशी संवाद साधता येतो.

**२. लेखकांस सूचना:-**

एकूण ४६ अंकापैकी ७ अंकामध्ये लेख लिहिण्याबाबत लेखकांना सूचना देण्यात आलेल्या आहे. त्यामध्ये कागदाचा आकार, कागदावरील ओळी, संदर्भसूची, लेख स्वीकृती, अस्वीकृती बाबतचे नियम, लेखासोबत लेखकाची कोणती माहिती असावी याबाबतची माहिती दिलेली आहे.

**३. प्रकल्प यादी**:-

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या ग्रंथालय व माहितीशास्त्र निष्णात शिक्षणक्रमांतर्गत संशोधन प्रकल्प हा अत्यावश्यक अभ्यासक्रम आहे. विद्यापीठाच्या सर्वं केंद्रावरील विद्यार्थ्यांनी प्रकल्पासाठी निवडलेल्या विषयांची यादी केंद्रनिहाय या विभागामध्ये दिलेली आहे. यामध्ये २००१ ते २०१० या कालावधितील प्रकाल्पांच्या यादींचा समावेश आहे.

या प्रकल्प यादीचा उपयोग ग्रंथालयशास्त्र विषयांतील संशोधकांना त्यांच्या विषयासंबंधी माहिती समजण्यास होईल, तसेच पुढील वर्षी प्रकल्प निवड करणाऱ्या संशोधकांना विषय निवडतांना प्रकल्पयादीची मदत होईल.

**४. प्रकल्पांची विषयवार सूची व लेखकसूचीः-**

२००१ ते २०१० या कालावधितील प्रकल्पयादी बरोबरच त्या प्रकल्पांची विषयवार सूची व लेखकसूची दिलेली आहे.

या सूचीमुळे संशोधकांना व उपभोक्त्यांना उपयुक्त विषयांची माहिती मिळणे सहज सोपे होते, जेणेकरून उपभोक्त्यांना कमीत- कमी वेळात आवश्यक माहिती उपलब्ध करून देणे शक्य होईल.

**५. इतर वैशिष्ट्येः-**

ज्ञानगंगोत्री या नियतकालिकात काही अंकामध्ये वेळावेळी येणाऱ्या विशेष माहितीचा समावेशा केलेला आढळून येतो.

उदा. १. वर्ष दोन अंक चार हा ग्रंथालय व ग्रंथालय सेवा यांच्या संगणकीकरणाचे व्यवस्थापन हा विशेषांक प्रकाशित केला होता. या विशेषांकामध्ये लेखांबरोबरच जागोजागी सोल म्हणजे काय?, सोल वापरण्याचे फायदे, सोलसाठी हार्डवेअर कसे असायला हवे?, खालील प्रकारचे अनुभव तुम्हाला नवे आहेत का? अशा प्रकारची उपयुक्त माहिती थोडक्यात दिलेली आहे.

२. वर्ष ५ अंक १ हा मराठी ग्रंथसूचिकार शंकर गणेश दाते जन्मशताब्दी विशेषांक प्रकाशित झाला आहे. या अंकामध्ये ग्रंथसूचीच्या महत्त्वाविषयीचे काही अभिप्राय या शीर्षकाखाली ६ अभिप्राय दिलेले आहे.

३. वर्ष ५ अंक २ मध्ये दृष्टिकोन या शीर्षकाखाली जून्या काळातील विविध विषयांवरील दृष्टीकोन दिलेले आहे. यामध्ये गोविंद जोशी यांची रोजनिशी, दिग्दर्शन मासिकातील नमुनेदार मजकूर, विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्या निबंध मालेतील मजकूर, लोकहीतवादी यांची शतपत्रे यातील विविध दृष्टीकोनाबाबतचे मजकूर थोडक्यात दिलेले आहे.

४. वर्ष ५ अंक ३ मध्ये मुद्रणपूर्व मराठी ग्रंथनिर्मिती: एक साक्षात वर्णन या शीर्षकाखाली प्रसिध्द व्याकरणकार दादोबा तर्खडकर यांची बालपणीची आठवण दोन भागात दिलेले आहे, मराठी ग्रंथवाचन: एक पध्दती हे बाबा पद्मनजी यांच्या आत्मचरित्रातील आठवणी सांगीतलेल्या आहे. तसेच ग्रंथवाचन: एक विशेष उपदेश हा विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्या इतिहास या निबंधातून घेतलेला मजकुर ग्रंथालय व्यावसायीकांना उपयुक्त असा ठेवा आहे.

५. वर्ष ५ अंक ४ मध्ये ग्रंथवाचनाचे व्यसन या शीर्षकाखाली प्रसिध्द चरित्रचंद्र या आत्मचरीत्रामधील ल. रा. पांगारकर यांच्या काही ओळी ५ भागांमध्ये दिलेल्या आहे.

६. वर्ष ६ अंक १ मध्ये उद्याचं अदभुत जग या शिर्षकाखाली अच्युत गोडबोले यांच्या संगणक युग या पुस्तकातुन भविष्यातील कल्पनांच्या बाबतीत ४ भागांमध्ये माहिती दिलेली आहे. यामध्ये उद्याचं अदभुत जग सेन्सर्स, उद्याचं अदभुत जग: पेपरलेस ऑफिस या विषयावर माहिती दिलेली आहे.

७. वर्ष ६ अंक २ मध्ये ग्रंथपारखी नजर या शिर्षकाखाली ८ भाग दिलेले आहे. त्यात अक्षरनिष्ठांची मादियाळी या अरूण टिकेकर यांच्या ग्रंथामधील महत्वपूर्ण माहितीचा उल्लेख केलेला आहे.

तसेच काही अकांमध्ये पत्र व्यवहार या शिर्षकाखाली वाचकांनी पाठविलेले ४ पत्र प्रसिध्द केलेले आहे. यामध्ये वाचकांच्या लेखाबाबतच्या आलेल्या प्रतिक्रिया दिलेल्या आहे.

## ५.६ संपादक व संपादक मंडळाच्या मुलाखतीमधुन आलेल्या माहितीचे संकलन विश्लेषण आणि अर्थनिर्वचन

सदर संशोधनासाठी संशोधकाने ज्ञानगंगोत्री या नियतकालिकाच्या संपादक व संपादक मंडळाच्या मुलाखतीचे नियोजन केले होते. त्यासाठी संशोधकाने संरचित प्रश्नावली तयार करून त्याआधारे मुलाखत घेतली. ज्ञानगंगोत्री नियतकालिकाचे संपादक डॉ. मधुकर शेवाळे, संपादक मंडळाचे सदस्य प्रा. प्रवीण घोडेस्वार, डॉ. राजेंद्र कुंभार, डॉ. मोहन खेरडे आणि डॉ. धर्मराज वीर या सदस्यांकडून प्रत्यक्ष व फोनद्वारे संपर्क साधून मुलाखतीचे आयोजन केले होते. या मुलाखती मधून प्राप्त माहितीच्या आधारे माहितीचे विश्लेषण आणि अर्थनिर्वचन केले आहे.

नियतकालिकाचे वर्गणीदार व वाचकांकडून मिळणाऱ्या प्रतिसाद व सूचनांबाबत संपादकांकडून माहिति घेण्याचा प्रयत्न केला.

यामध्ये या नियतकालिकाचे संपादक डॉ. मधुकर शेवाळे यांच्या मुलाखतीमधून असे निदर्शनास आले की, या नियतकालिकाचे वर्गणीदार प्रामुख्याने यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातून एम. लिब. करणारे विद्यार्थी व मराठी माध्यमातून वाचन करणारे ग्रंथालय व्यावसायिक यांचा समावेश आहे. एम. लिब. च्या विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमामध्ये 'ज्ञानगंगोत्री' या नियतकालिकावर आधारित (LIB-13) 'वर्तमान घटना, घडामोडी व भाष्य' हा तीन श्रेयाकांसाठी म्हणजेच १०० गुणांसाठी विषय समाविष्ट केलेला आहे. त्यामुळे विद्यार्थी व वाचकांकडून या नियतकालिकाबाबत सकारात्मक प्रतिसाद दिला जातो. तसेच विद्यार्थी व वाचकांकडून आलेल्या सूचनांचा गांभिर्याने विचार करून योग्य सूचनांची अमंलबजावणी केली जाते.

संपादकांकडून नियतकालिकाचे वर्गणीदार व वाचक संख्या वाढविण्यासाठी होणाऱ्या प्रयत्नांची माहिती जाणून घेण्याच्या उद्देशाने माहिती घेतली.

डॉ. शेवाळे यांनी सांगितल्याप्रमाणे ज्ञानगंगोत्री या नियतकालिकाच्या सर्व अंकामध्ये वर्गणीचे फॉर्म पाठविले जातात, पत्र व्यवहाराचा पत्ता आणि फोन नंबर दिला जातो. ज्यामुळे नियतकालिक खरेदीसाठी माहिती सहज उपलब्ध होते. यापुढे जास्तीत जास्त ग्रंथालयांना जानेवारी ते मार्च महिन्यात वर्गणी अर्ज पाठविणे, शैक्षणिक ग्रंथालये, सार्वजनिक ग्रंथालये, विशेष ग्रंथालयांना

ई-मेल, पत्र पाठवून ज्ञानगंगोत्री नियतकालिकाचे महत्व पटवून देणे, U-Tube, WhatsApp, Blogs, Chat Groop तयार करून, त्याद्वारे नियतकालिकाचे वर्गणीदार व वाचक संख्या वाढविण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

ज्ञानगंगोत्री नियतकालिकात लेख लिहीणाऱ्या लेखकांसाठी कसे प्रोत्साहन दिले जाते व त्यासाठी काय उपक्रम राबविता याबाबत माहिती घेण्याचा प्रयत्न केला होता.

यामध्ये डॉ. कुंभार यांनी सांगितल्याप्रमाणे लेख कसे लिहावे याबाबत काही कार्यशाळेचे आयोजन पाहीजे. तसेच कोणत्या विषयांवर लेख लिहिले पाहीजे याबाबत आधीच्या अंकात माहिती दिली गेल्यास ग्रंथालय व्यावसायिकांना त्यादृष्टीने लेख लिहीणे शक्य होईल. लेखांची संख्या वाढविण्यापेक्षा दर्जेदार लेख लिहीण्यास प्रोत्साहन देणे, महाराष्ट्रातील ग्रंथालय व माहितीशास्त्रातील विषयतज्ञ, प्राध्यापक, संशोधक, अनुभवी ग्रंथपाल यांना जास्तीत जास्त लेख लिहिण्याचे आवाहन केले जाते. डॉ. खेरडे यांच्या मते वैयक्तिक पातळीवर ग्रंथपालांना त्याबाबत अनुभवी लेखकांनी मार्गदर्शन केले जाते, महाराष्ट्रातील उत्कृष्ट ग्रंथालयाबाबत, तेथे दिल्या जाणाऱ्या सेवा, राबविल्या जात असलेल्या नावीन्यपूर्ण योजना याबाबतची नियतकालिकात माहिती देण्यात येते, ग्रंथालयशास्त्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या नामवंताब-ल सविस्तर माहिती तसेच आवश्यकतेनुसार विशेषांक प्रकाशित केले जातात. डॉ. वीर यांनी सांगितल्याप्रमाणे ग्रंथालय व्यावसायिकांनी जास्तीत जास्त वाचन करून लेखन कला आत्मसात केली पाहीजे. तसेच एम. लिब. स्तरावर झालेल्या प्रकल्पाची फक्त यादी देण्याऐवजी प्रकल्पांबाबत लेख स्वरूपात चर्चा करावी, त्यात काही सूचना किंवा सकारात्मक बदल करावेत, शालेय ग्रंथालय ते संशोधन ग्रंथालयापर्यंतच्या सर्वच पातळ्यांवरील ग्रंथालयांना उपयुक्त ठरतील, प्रत्यक्ष कामात उपयोग होईल अशा विषयावर चर्चा घडायला केली जावी. ग्रंथालयशास्त्रातील देश पातळीवरील, राज्य पातळीवरील तसेच स्थानिक पातळीवरील समस्यावर चर्चा होणे आवश्यक आहे, ग्रंथालयशास्त्रातील जाणकाराकडून नियतकालिकांवर Review मागविणे, मुलाखती घेणे, प्रश्नवली भरुन घेणे व त्यांच्या सूचनांनुसार आवश्यक ते बदल करावे, ग्रंथालय व माहितीशास्त्रात उत्कृष्ट योगदान देणाऱ्या व्यक्ती, नामवंत प्राध्यापक, संशोधक यांच्या मुलाखतींचे सदर सुरु करणे, त्यासाठी एम.लिब., एम.फिल. च्या

विदयार्थ्यांना विषय देऊन मुलाखती घेण्याचे आवाहान करणे. तर डॉ. शेवाळे यांच्या मते ज्ञानगंगोत्री या नियतकालिकातून वाचकांना आवाहन करून त्यांच्याकडून नवीन विषयावर लेख मागविले जातात. काही वेळेस विशेष विषयांसाठी त्या त्या विषय तज्ञांशी वैयक्तिक पातळीवर संपर्क साधून लेख मागविण्यासाठी प्रयत्न केले जातात.

ज्ञानगंगोत्री या नियतकालिकाच्या रचनेत व रंगसंगतीत कोणते बदल करावे असे वाटते हे जाणून घेण्याचा प्रयत्न केला होता.

याबाबत डॉ. खेरडे यांच्यामते नियतकालिकाचा आकर साधारणपणे A-4 आकाराचा असावा असे मत व्यक्त केले आहे. डॉ. वीर आणि डॉ. कुंभार यांनी देखील नियतकालिकाच्या आकाराबाबत हीच भूमिका मांडली. मात्र हा निर्णय पुर्णपणे विद्यापीठाचे व्यवस्थापन घेते असेही त्यांनी निदर्शनास आणून दिले. डॉ. शेवाळे, डॉ. कुंभार, डॉ. वीर, प्रा. घोडेस्वार यांनी रंगसंगती बाबत गरजेनुसार बदल करावेत असे सूचविले आहे, ज्ञानगंगोत्री या नियतकालिकात गरजेनुसार आकृती, आलेख, स्तंभ यांचा वापर करावा, तसेच गरजेनुसार छपाई रंगीत असावी त्याबाबत व्यवस्थापन मंडळात चर्चा केली जाईल असे म्हटले आहे.

नियतकालिकातील काही आशयामध्ये / सदरांमध्ये बदलाबाबत संपादक व संपादक मंडाळाची मते जाणुन घेण्याच्या हेतूने माहिती घेतली.

यामध्ये डॉ. कुंभार यांनी सूचविल्याप्रमाणे पुढील अकांत जे विषय समाविष्ट करावयाचे आहे, त्याबाबत आधीच्या अंकामध्ये स्वंतत्र सदरामध्ये त्याची माहिती दिली जावी, त्यासाठी स्वंतत्र सदर सुरू करावे. लेखकांसाठी कोणतेही सदर सुरु केल्यानंतर ते सातत्याने सुरू राहीले पाहिजे, किमान पूर्ण खंडामध्ये सदर प्रकाशित झाले पाहिजे. असेही डॉ. कुंभार यांनी सूचविले. डॉ. शेवाळे यांच्यामते ग्रंथालय व माहिती शास्त्रातील जगभरातील नामवंत, विचारवंत व्यक्तीची माहिती देणारे सदर ज्ञानगंगोत्री मध्ये सुरू करण्यात यावे, ग्रंथालयशास्त्रातील वाचकासांठी नेट-सेट च्या अभ्यासक्रमावर आधारित लेखमाला प्रकाशित करावी, प्रत्येक अंकात नेट/सेट च्या जून्या प्रश्नपत्रीका उत्तरासहीत छापाव्यात, नेट/सेट परीक्षेवर आधारित प्रश्नसंच (वस्तुनिष्ठ प्रश्नोत्तरे) यांचा समावेश असावा. ग्रंथालयशास्त्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या नामवंताबद्दल सविस्तर

माहिती प्रकाशित करावे, NAAC, NBA यांच्या दृष्टीकोनातुन ग्रंथालयांना करावे लागणारे अपेक्षित बदल, त्यातील श्रेयांक / गुणपध्दती याबाबत तज्ञांकडून लेख लिहून ते प्रकाशित करावे, इतर भाषेतील दर्जेदार लेखांचा मराठी भाषेत अनुवाद करुन लेख प्रसिध्द करावे असे म्हटले आहे. डॉ. खेरडे यांनी सूचविल्याप्रमाणे ग्रंथालयशास्त्रामध्ये ज्या नव-नवीन घडामोडी घडतात त्याबाबत सदर सुरू करण्याबाबत सूचना केली आहे.

माहिती तंत्रज्ञानाच्या युगात नियतकालिक प्रकाशित करतांना येणाऱ्या अडचणी जाणून घेण्याच्या दृष्टीने माहीती घेण्याचा प्रयत्न केला.

माहिती तंत्रज्ञानाच्या युगामध्ये नियतकालिकाच्या प्रकाशन, व्यवस्थापन व वितरण व्यवस्थेमध्ये अमुलाग्र बदल झालेले आढळून येतात. डॉ कुभार यांच्यामते ज्ञानगंगोत्री नियतकालिक प्रकाशनासाठी स्वंतत्र वेबसाईट उपलब्ध केली पाहिजे, ज्यामध्ये लेख ऑनलाईन पाठविणे, लेख लेख ऑनलाईन प्रकाशित करणे, Acceptance पाठविणे, Review घेणे ही कार्य तंत्रज्ञानाच्या साह्याने केल्यास लेखकांचा वेळ आणि पैसा यांची बचत होईल. लेखात काही सुधारणा असल्यास त्या चटकन करून लेख प्रकाशित करता येतील, त्यामुळे नियतकालिकाचे अंक वेळेत प्रकाशित होण्यास मदत होईल. डॉ खेरडे यांनी सांगितल्याप्रमाणे नियतकालिकाच्या व्यवस्थापन आणि वितरण व्यवस्थेमध्ये माहिती तंत्रज्ञानाचा वापर प्रभावीपणे करता येईल, त्यामुळे उपभोक्त्यांनी अंक वेळेत प्राप्त होतील.  यामध्ये डॉ. शेवाळे यांनी म्हटल्याप्रमाणे आर्थिकबाबींचे निर्णय घेण्याचे अधिकार विद्यापीठ प्रशासनाकडे असतात. मात्र इतर अडचणींमध्ये वेळेवर लेख मिळत नाही, आलेल्या लेखांमध्ये दर्जाचा अभाव दिसून येतो, आलेल्या लेखांमध्ये सारखेपणा असतो असे म्हटले आहे. तर डॉ. कुंभार आणि डॉ. खेरडे यांच्यामते लेखांमधील विषयांची विविधता जाणवत नाही, सर्वागिंण विषयांची कमतरता जाणवते, संकल्पनात्मक लेखांची संख्या अधिक असते, त्याऐवजी संशोधनात्मक लेखांची संख्यात्मक व गुणात्मक वाढ झाली पाहीजे. डॉ. वीर यांच्या मते लेखांमध्ये अवघड शब्दांचा वापर टाळला पाहीजे, लेखातील विषयांची माहिती विश्लेषणात्मक आणि परिपूर्ण असावी, संशोधनात्मक लेख, प्रकल्प लिहितांना येणाऱ्या अडचणी, वाचनसाहित्याचा शोध घेतांना येणाऱ्या अडचणी याविषयी विस्तृत मार्गदर्शनपर लेख स्वरूपात माहिती दयावी. लेख वेळेत न आल्याने नियतकालिक वेळेवर प्रकाशित करता येत नाही.

ज्ञानगंगोत्री नियतकालिक दर्जेदार करण्यासाठी असलेल्या भविष्यकालीन योजना जाणून घेण्याचा प्रयत्न संशोधकाने केला

यामध्ये डॉ. शेवाळे यांनी म्हटल्याप्रमाणे नियतकालिकात लेखांची संख्या वाढविणे, नियतकालिकाच्या अंक प्रकाशनामध्ये सातत्य राखण्यासाठी प्रयत्न केले जातील, लेखांची गुणवत्ता वाढवून संशोधनात्मक लेखांची संख्या वाढविण्यासाठी भविष्यात प्रयत्न केले जातील. ज्ञानगंगोत्री नियतकालिकासाठी स्वंतत्र वेबसाईट तयार करून ती उपभोक्त्यांपर्यत पोहचविण्याचे आवाहान संपादक मंडळापुढे असल्याचेही डॉ. शेवाळे यांनी म्हटले आहे.

ज्ञानगंगोत्री या नियतकालिकाची गुणवत्ता वाढविण्यासाठी संपादक व संपादक मंडळाची मते जाणून घेण्याचा प्रयत्न संशोधकाने केला.

डॉ. शेवाळे यांनी यासाठी वैशिष्टपूर्ण सदरांचा यामध्ये समावेश करून त्यामध्ये सातत्य राखण्यासाठी प्रयत्न करणे, नियतकालिकातील लेखांची संख्यात्मक आणि गुणात्मक वाढ करणे, नव-नवीन विषयांवर लेखन प्रसिध्द करण्यासाठी प्रयत्न केले जातील असे म्हटले आहे. तर डॉ. कुंभार यांनी म्हटल्याप्रमाणे संख्यात्मक लेख वाढविण्याऐवजी गुणात्मक लेखांची संख्या वाढविली पाहिजे, वर्तमान घटना, घडामोडीची व्याप्ती (aspects of current trends) निश्चित करून त्यात समाविष्ट विषयांची यादी नियतकालिकात प्रसिध्द करावी जेणे करून लेखकांना कोणत्या विषयावर लेखन करावयाचे आहे याबद्दल कल्पना येईल, कोणत्या विषयावर लेख लिहायचे आहे त्या विषयाची यादी ज्ञानगंगोत्रीमधून वेळो-वेळी प्रसिध्द करणे, नियतकालिकात संशोधनात्मक लेखांची संख्या वाढविण्यासाठी  प्रयत्न केले पाहीजे, त्यासाठी विद्यापीठ स्तरावर सेमिनार, वर्कशॉप, चर्चासत्रांचे आयोजन करून संशोधनात्मक लेख लिहिण्याबाबत वेळोवेळी मार्गदर्शन केले पाहिजे. संपादक मंडळाची वर्षभरात किमान दोन सभा घेवून नियतकालिकाबाबत रूपरेषा ठरविणे. नियतकालिकात peer review लेख प्रकाशित केले पाहिजे. प्रत्येक अंकात जास्तीत जास्त संशोधनात्मक लेख देण्याचा प्रयत्न केला पाहिजे. तर डॉ. खेरडे आणि डॉ वीर यांच्या मतानुसार इंग्रजी लेखांचे मराठीत अनुवाद करून वाचकांना उपलब्ध करू दिल्याने त्यांच्या गरजांची पुर्तता करता येईल, नियतकालिकाच्या प्रकाशनात सातत्य राखले पाहिजे, लेखांचा आशय दर्जेदार होण्यासाठी प्रयत्न केले पाहिजे. प्रा. घोडेस्वार यांच्या मते ज्ञानगंगोत्री या नियतकालिकाची स्वंतत्र

वेबसाईट तयार करावी, लेखांचा आराखडा कसा असावा याबाबत लेखकांना मार्गदर्शन केले पाहिजे, जास्तीत जास्त माहिती विषयक लेख प्रकाशित करावे, इंग्रजी भाषेतील नियमित वापरातील शब्द जसेच्या तसे लेखात घ्यावे, विनाकारण त्याचे भाषांतर करू नये.

**सारांश**

सदर संशोधनामध्ये संशोधकाने यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाद्वारे चालविले जाणाऱ्या ज्ञानगंगोत्री या नियतकालिकाच्या जून २००० ते मे २०१३ या कालावधीतील ४६ अंकांचे प्रत्यक्ष अवलोकन करून आशय विश्लेषण केले आहे. तसेच मुलाखत व निरीक्षण यांच्या आधारे केलेल्या माहितीचे संकलन आणि विश्लेषण सारणी व आलेखांच्या साहाय्याने दर्शविले आहे. संकलित माहितीचे संख्यात्मक व गुणात्मक विश्लेषण करून त्याखाली शास्त्रीय पध्दतीने अर्थनिर्वचन केले आहे. त्याचबरोबर संशोधकाने संपादक आणि संपादक मंडळ यांच्याकडुन औपचारीक मुलाखतीद्वारे माहिती संकलित करून तिचे विश्लेषण केले आहे. तसेच प्राप्त विश्लेषणावरून अर्थनिर्वचन केले आहे.

सदर माहितीच्या आधारे प्रकरण सहामध्ये निष्कर्ष आणि शिफारशी केल्या आहे.

# प्रकरण सहावे

# निष्कर्ष आणि शिफारशी

## ६.१. प्रस्तावना

"यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या ज्ञानगंगोत्री या नियतकालिकाच्या सन २००० ते २०१२ या काळातील अंकांचे विश्लेषण" हा विषय संशोधकाने संशोधनसाठी निवडला होता. ज्ञानगंगोत्री हे नियतकालिक ग्रंथालय व माहितीशास्त्राशी निगडित महत्वपूर्ण व उपयुक्त नियतकालिक आहे. ज्ञानगंगोत्री या नियतकालिकाच्या आशयाचे विश्लेषण पृथ्थकरण, अर्थनिर्वचन, अनुमान, प्रश्नावली व मुलाखत या साधनांद्वारे केले आहे. या नियतकालिकासंबंधीची पार्श्वभूमी, उद्देश, महत्व, सर्वसामान्य माहिती, विविध सदरे, संदर्भ, लेख, लेखक व वाचकांच्या प्रतिसादाचे विश्लेषण केले आहे. तसेच ज्ञानगंगोत्री या नियतकालिकाचे संपादक व संपादक मंडळ यांच्या मुलाखतीचे आयोजन करून त्याद्वारे माहिती संकलित केली. या विश्लेषणातून संशोधनासाठीचे गृहीतकांची पडताळणी करण्यात आली. प्रस्तुत प्रकरणात सर्व माहितीचे पध्दतशीर व अभ्यासपूर्ण विश्लेषण करून संशोधनाचे निष्कर्ष व शिफारशी मांडण्यात आल्या आहे.

## ६.२ संशोधनाचे निष्कर्ष:-

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या ज्ञानगंगोत्री या नियतकालिकाच्या सन २००० ते २०१२ या काळातील अंकांचे विश्लेषण या प्रस्तुत संशोधनाचे निष्कर्ष संशोधन अभ्यासानुसार पुढील प्रमाणे मांडण्यात आले आहे. हे निष्कर्ष ज्ञानगंगोत्री या नियतकालिकाच्या विश्लेषणावरून व उपभोक्त्यांच्या प्रतिसादावरून मांडण्यात आले आहे.

**ज्ञानगंगोत्री नियतकालिकाच्या आशय विश्लेषणामधून प्राप्त झालेले निष्कर्ष**

- ज्ञानगंगोत्री नियतकालिकाचा प्रकाशन कालावधी हा त्रैमासिक असून प्रत्येक वर्षात चार अंक प्रकाशित होणे अपेक्षित आहे. अंक प्रकाशनाचा प्रस्तावित कालावधी पुढील प्रमाणे आहे. अंक १ ला- जुन, जुलै, ऑगस्ट, अंक २ रा- सप्टेंबर, ऑक्टोबर, नोव्हेंबर, अंक ३ रा- डिसेंबर, जानेवारी, फेब्रुवारी, अंक ४ था- मार्च, एप्रिल, मे. मात्र जुन २००० ते मे २०१३ या १३ वर्षाच्या कालावधीत एकूण ४६ अंक प्रकाशित झाले आहे.
- यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विदयापीठातून एम. लिब. अभ्यासक्रम शिकत असलेल्या विद्यार्थ्यांना वाचन व सदंर्भ साहित्य उपलब्ध करुन देण्यासाठी हे नियतकालिक सुरू केले आहे. ग्रंथालय व माहितीशास्त्र या पदव्युत्तर पदवी शिक्षणक्रमासाठी वर्तमान घटना व घडामोडी संबधी माहिती देणे व अभ्यासक्रमाचे आशय पुरविणे हा या नियतकालिकाचा मूख्य उ-ेश आहे.
- ज्ञानगंगोत्री नियतकालिकास डॉ. शरद गणपुले (३ वर्षे), डॉ. रमेश वरखेडे (९ वर्षे), व डॉ मधुकर शेवाळे यांचेसारखे ग्रंथालय व महितीशास्त्रातील अनुभव सपंन्न आणि अभ्यासू व्यक्तिमत्व संपादक म्हणून लाभले आहे. तसेच प्रा. मोहन पाठक, डॉ. राजेंद्र कुंभार व डॉ. प्रदीप कर्णिक या ग्रंथालय व माहितीशास्त्रातील तज्ज्ञ, अभ्यासू आणि नामवंत व्यक्तींनी कार्यकारी संपादक म्हणून काम केले आहे.
- डॉ मधुकर शेवाळे यांनी सन २००५ ते २००९ या कालावधीत ज्ञानगंगोत्री नियतकालिकाचे व्यवस्थापक म्हणून यशस्वीरित्या काम पाहीले आहे.
- जून २००० ते मे २०१३ या कालावधीत ज्ञानगंगोत्री नियतकालिकाचे एकूण १३ तज्ज्ञ व्यक्तींनी संपादक मंडळाचे सदस्य म्हणून काम पाहिले. त्यात सर्वाधिक प्रा. प्रवीण घोडेस्वार हे १० वर्षे, डॉ. मधुकर शेवाळे ९ वर्षे, डॉ. प्रदीप कर्णिक ७ वर्षे व राजेंद्र कुंभार हे ६ वर्षे यांनी संपादक मंडळाचे सदस्य म्हणून काम पाहिले आहे.

- ज्ञानगंगोत्री नियतकालिकात संपादकीय, अजून ताजा वास जून्याला, वेब, सार, परिक्रमा व ग्रंथपरिचय या सारख्या महत्वपूर्ण सदरांचा समावेश होता. कालांतराने ग्रंथपरिचय व सपांदकीय सदर वगळता इतर सदरे टप्याटप्याने बंद झाली.
- जून २००० ते मे २०१३ या कालावधीत एकूण ४६ संपादकीय लेखांपैकी माहिती तंत्रज्ञानाचा ग्रंथालयात वापर या विषयासंबधी ३९.१३% इतके प्रमाण होते. एकूण १२ विषयासंबधी चर्चा संपादकीय मध्ये केली होती, माहिती तंत्रज्ञानाचे ग्रंथालयात उपयोजन, ग्रंथालय व माहितीशास्त्र शिक्षण १७.३९%, ग्रंथालयशास्त्रातील बदलते नवे प्रवाह ८.७०%, ग्रंथालय व्यवस्थापन या विषयासंबधी संपादकीय आहेत. या नियतकालिकाच्या उ‌ि‌ष्टांना अनुसरुनच वर्तमान घटना, घडामोडी, भाष्य या विषयाची माहिती प्रकाशित करण्याचा सपांदकाचा हेतू असून तो पूर्ण झाल्याचे यातून स्पष्ट होते.
- अजून ताजा वास जून्याला या सदराखाली एकून २२ लेख प्रकाशित झाले. या सदरातून ग्रंथालय संघटना, मराठी ग्रंथसंग्रह, ग्रंथालयासंबंधी सयाजीराव गायकवाड याचे विचार, डॉ. पु. म. शिंदे, प्रा. गजेद्रंगडकर याचे भाषणे यासंबधी जूने परंतू महत्वपूर्ण लेख देण्यात आले. हे विचार किंवा लेख जरी जूने असले तरी ते आजही तंतोतंत खरे ठरतील असे आहे.
- वेब या सदर एकूण अंकामध्ये प्रकाशीत झाले आहे. या १८ अंकामधून एकून ८४ वेबसाईटची माहिती दिलेली आहे. वर्ष ३ अंक २ मध्ये सर्वाधिक २५% (२१) वेबसाईटचा परिचय करुन दिला आहे, तर त्याखालोखाल १९.९०% (१०) वेबसाईटचा परिचय वर्ष ३ अंक ३ मध्ये करुन दिलेला आहे.
- ग्रंथपरिचय या सदरातून नवीन प्रकाशित झालेल्या ११८ ग्रंथाचा परिचय देण्यात आला. यामध्ये माहिती तंत्रज्ञानाचे ग्रंथालयात उपयोजन या विषयावर २८.८१% ग्रंथाचा परिचय करून दिलेला आहे. तर ग्रंथालय व्यवस्थापन या विषयावरील ग्रंथांच्या परीचयाचे प्रमाण २५.४२% इतके आहे. तसेच ग्रंथपरीचय या सदरात मराठी व इग्रंजी भाषेतील ग्रंथाचा परिचय

करुन देण्यात दिले आहे. या सदरात ७४.५८% ग्रंथपरिचय हे इग्रंजी भाषेतील ग्रंथाचे तर २५.४२% ग्रंथपरिचय हे मराठी भाषेतील ग्रथांचे होते.

- ग्रंथपरिचय या सदरात सर्वाधिक ५७.६३% ग्रंथाचा परिचय सपांदक मडंळाने करून दिला आहे. त्याखालोखाल डॉ. वेदवत्ती हब्बू व डॉ. मधुकर शेवाळे यांनी प्रत्येकी ७.६३%, प्रकाश बर्वे ५.०८%, प्रदीप कर्णिक ३.३५% तर इतर ९ लेखकांनी प्रत्येकी १ ग्रथांचा परिचय करुन दिला आहे.
- परिक्रमा या सदरात ग्रंथांलय व माहिशास्त्रातील चालू घडामोडी चर्चासत्रे, परिसंवाद, ग्रंथप्रदर्शने, पुरस्कार, पुस्तक परिचय याबाबत वेळोवेळी होणाऱ्या कार्यक्रमाची माहिती देण्यात आली. एकूण १६ अंकामधून हे सदर प्रकाशित झाल्याचे आढळून आले.
- ज्ञानगंगोत्री नियतकालिकाच्या अंकाची पृष्ठ संख्या सरासरी ८० पाने असावी असा प्रयत्न होता. जून २००० ते मे २०१३ या कालावधीत ४६ अंकात एकूण ३८३१ पृष्ठे वापरली गेली. पृष्ठांच्या वर्षनिहाय विश्लेषणामध्ये वर्ष ६ वे मध्ये सर्वाधिक ५१६ पृष्ठे होती, तर वर्ष ५ वे मध्ये ४३८ पृष्ठे होती. तसेच पृष्ठांच्या अंकनिहाय विश्लेषणामध्ये वर्ष ६ अंक ३ मध्ये सर्वाधिक २०८ पृष्ठे होते, तर वर्ष ९ अंक ४ आणि वर्ष १० अंक ४ मध्ये सर्वात कमी ४० पृष्ठसंख्या आढळून आली.
- ज्ञानगंगोत्री नियतकालिकात जून २००० ते मे २०१३ या कालावधीत एकूण २९४ लेख प्रकाशित झाले. यापैकी ४९.३३% लेखांची पृष्ठसंख्या ६ ते १० पृष्ठे होती. तर २६.५३% लेखांची पृष्ठसंख्या १-५ पृष्ठे इतकी होती. म्हणजेच या नियतकालिकातून वाचकांना परिपूर्ण व विस्तृत स्वरुपात लेख अभ्यासण्यासाठी मिळतात. लेखांसाठी आवश्यक पृष्ठसंख्येंचा गरजेनुसार वापर केलेला दिसून येतो.
- ज्ञानगंगोत्री नियतकालिकाचे जून २००० ते मे २०१३ या १३ वर्षात एकूण ५२ अंक प्रकाशित होणे अपेक्षित होते. मात्र ४६ अंक प्रकाशित झाले. ४० अंक स्वतंत्रपणे प्रसिध्द झाले तर ६ अंक जोडीने प्रकाशित झाले.

- ज्ञानगंगोत्री नियतकालिकात एकूण १४६ लेखकांचे लेख प्रसिध्द झालेले आहे. यामध्ये ८७.४२% म्हणजेच २५७ लेख हे एका लेखकाने लिहिलेले आहे. तर ११.९०% लेख हे दोन लेखकांनी मिळून लिहिले आहे.
- लेखकांनी लिहीलेल्या लेखांचा अभ्यास केला असता असे दिसून येते की, विजय देवधर यांनी सर्वाधिक १८ (६.१६%) लेख लिहिले आहे, त्याखालोखाल डॉ. राजेंद्र कुंभार यांनी १४ (४.७६%) लेख लिहिले आहे. एकूण ७७ लेखकांनी प्रत्येकी १ लेख लिहिल्याचे दिसून आले.
- ज्ञानगंगोत्री नियतकालिकात एकूण २९४ लेख प्रकाशित झाले आहे. २९४ लेखांपैकी २८२(९५.९२%) लेख हे लेखकांनी लिहिलेले असून १२ (४.०८%) लेख संपादक मंडळाच्या सदस्यांनी लिहिलेले दिसून आले.
- ज्ञानगंगोत्री नियतकालिकातील लेखकांचे लिंगभेदनिहाय विश्लेषणामध्ये असे आढळून आले की, पुरूष लेखकांचे प्रमाण १०५ (७१.९२%) इतके तर स्त्री लेखकांचे प्रमाण ४१ (२८.०८%) इतके आढळून आले.
- ज्ञानगंगोत्री नियतकालिकासाठी लेख लिहिणाऱ्या लेखकांपैकी सर्वाधिक ४५.९४% लेखक हे विद्यापीठ किंवा महाविद्यालयीन ग्रंथपाल आहेत. तर ८.९०% लेखक प्राध्यापक आहे. लेख लिहिणाऱ्यामध्ये मुद्रणशास्त्र व्यावसायिक, माहिती अधिकारी, प्राचार्य, आय.टी विद्यार्थी, माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील लेखकांचाही समावेश आहे.
- लेखकांच्या जिल्हानिहाय विश्लेषणातून असे निदर्शनास आले की, मुंबईमधील लेख लिहिण्याऱ्या लेखकांचे प्रमाण सर्वाधिक २१.२३% दिसून आले. तर पुणे जिल्हयातील लेखकांचे लेख लिहिण्याचे प्रमाण १३% आढळून आले.
- जून २००० ते मे २०१३ या १३ वर्षाच्या कालावधीत २९४ लेख प्रकाशित झाले. म्हणजेच प्रतिवषी सरासरी २२.६१% लेख प्रकाशित झाले आहे. सर्वाधिक १४.३२% लेख वर्ष ६ मध्ये प्रकाशित झाले, तर १३ व्या वर्षी सर्वात कमी ५.१०% लेख प्रकाशित झाले.

- जून २००० ते मे २०१३ या कालावधीत एकूण ४६ अंक प्रसिध्द झाले. त्यामध्ये वर्षे ६अंक ३ मध्ये सर्वाधिक ५.१४% लेख प्रकाशित झाले, तर वर्ष ८ अंक १ मध्ये सर्वात कमी ३लेख प्रकाशित झालेले आढळुन आले.
- ज्ञानगंगोत्री नियतकालिकातील लेखांच्या विषयवार विश्लेषणातून निदर्शनात आले की, सर्वाधिक ७६ (२५.८५%) लेख हे माहिती तंत्रज्ञानाचे ग्रंथालयात उपयोजन या विषयावर तर १९.३९% लेख हे ग्रंथालय व्यवस्थापन या विषयावर प्रकाशित झाले. ग्रंथालय व माहितीशास्त्र शिक्षण या विषयावर ७.८२%, ग्रंथालयातील संशोधन ६.८०% लेख प्रकाशित झाले असल्याचे दिसून आले.
- लेखांच्या प्रकारानुसार विश्लेषणामधून निदर्शनास आले की, सर्वाधिक १५६ (५३.०६%) लेख प्रचलित विषयासंबंधीत तर ३७.०७% लेख संकल्पनात्मक विषयांवर आढळून आले. संशोधनात्मक लेखांचे प्रमाण सर्वात कमी ६.८०% इतके दिसून आले.
- सदर संशोधनातून असे निदर्शनास आले की, ज्ञानगंगोत्री नियतकालिकात एकूण ८४४ लेखांच्या संदर्भांचा उल्लेख झालेला आहे. त्यात सर्वाधिक ३७.०९% उल्लेख हे इंग्रजी ग्रंथाचे आहे. तर मराठी ग्रंथाच्या संदर्भांच्या उल्लेखांचे प्रमाण १६.११% इतके आढळुन आले. मराठी उल्लेखांचे प्रमाण इंग्रजी उल्लेखांपेक्षा कमी असल्याचे दिसून येते.
- कालनुरूप उल्लेख उध्दरणांच्या (संदर्भावरून) अभ्यासावरून दिसून येते की २००१ ते २०१३ या कालावधीत सर्वाधिक ३२१ (३८.४%) प्रलेखांचा वापर केला आहे, तर १९६० पुर्वीच्या प्रलेखांचा सर्वात कमी म्हणजेच ३७(४.३८%) उध्दरणांचा वापर केलला आढळुन आला.
- या नियतकालिकामध्ये एकूण ४६ अंकापैकी एकूण ३ अंक हे विशेषांक म्हणून प्रकाशित झाले आहे.

**संपादक मंडळाच्या मुलाखतीमधून प्राप्त झालेले निष्कर्ष**

- ज्ञानगंगोत्री नियतकालिकाबाबत सुचनांना संपादक मंडळाकडून वेळोवेळी सकारात्मक प्रतिसाद मिळतो. तसेच वाचकांकडून आलेल्या सूचनांचा गांभिर्याने विचार करून योग्य सूचनांची अमंलबजावणी तात्काळ केली जाते.
- ज्ञानगंगोत्री नियतकालिकाच्या वर्गणीदार वाढीसाठी जाणिवपूर्वक प्रयत्न केले जातात. त्यासाठी नियतकालिकातुन वर्गणीचे फॉर्म, पत्रव्यवहाराचा पत्ता व आवश्यक माहिती पाठविली जाते.
- ज्ञानगंगोत्री नियतकालिकात लेख लिहिण्यासाठी ग्रंथालय व्यावसायिकांना विविध स्तरावर प्रोत्साहन दिले जाते. त्यासाठी अनुभवी व्यावसायिकांना फोन करणे, नवीन विषयावर लेखन करण्यास सुचविले जाते. महाराष्ट्रातील उत्कृष्ट ग्रंथालयाबाबत, तेथे दिल्या जाणाऱ्या सेवा, राबविल्या जात असलेल्या  नावीन्यपूर्ण योजना याबाबतची नियतकालिकात माहिती देण्यात येते, ग्रंथालयशास्त्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या नामवंताब-ल सविस्तर माहिती तसेच आवश्यकतेनुसार विशेषांक प्रकाशित केले जातात.
- या नियतकालिकासाठी लेख पाठवणाऱ्या लेखकांची संख्या कमी असते, लेखात सारखेपणा असतो, विविध विषयावर लेख उपलब्ध होत नसल्याने काही वेळेस अंक  वेळेत प्रकाशित करण्यास अडचणी येतात. आर्थिकबाबींचे निर्णय घेण्याचे अधिकार विद्यापीठ प्रशासनाकडे असतात. प्रकाशनासाठी आलेल्या लेखांमध्ये दर्जाचा अभाव दिसून येतो, आलेल्या लेखांमध्ये सारखेपणा असतो, लेखांमधील विषयांची विविधता जाणवत नाही, सर्वांगिंण विषयांची कमतरता जाणवते, संकल्पनात्मक लेखांची संख्या अधिक असते.
- ज्ञानगंगोत्री हे नियतकालिक ग्रंथालय व माहितीशास्त्रात उपयुक्त ज्ञानाची भर टाकत आहे.ज्ञानगंगोत्री नियतकालिकातून वर्तमान घटना, घडामोडी बाबतची माहिती, संशोधनात्मक लेखांची संख्यात्मक व गुणात्मक लेखांचा समावेश केलेला असल्याने या नियतकालिकाची उपयुक्ता वाढली आहे.
- ज्ञानगंगोत्री नियतकालिकातील सार, वेब, परिक्रमा या सारखी महत्वपूर्ण आणि उपयुक्त सदरे बंद झाली आहे.

## ६.३ उष्टिांची पूर्तता

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधन करतांना संशोधकाने काही उ‍ि‍ष्टे निश्चित केली होती. ही संशोधनाची उद्दिष्टे साध्य करतांना आशय विश्लेषण, मुलाखत या साधनाचा आणि निरीक्षण या तंत्राचा वापर करून सदर संशोधकाने संशोधन कार्य केलेले आहे. संकलित केलेल्या माहितीचे पध्दतशीरपणे सारणीकरण, आलेखांद्वारे मांडणी आणि विश्लेषण केले आहे. या संशोधनातून निष्कर्ष काढले आहे व त्यानूसार शिफारशी केल्या आहे. या संशोधनामधून संशोधनासाठी निश्चित केलेली उद्दिष्टे कशी साध्य झाली, त्याची पुर्तता कशी झाली हे खालीलप्रमाणे निदर्शनास येते.

**उ‍ि‍ष्ट क्रं. १:- ज्ञानगंगोत्री या नियतकालिकातून प्रसिध्द होणाऱ्या ग्रंथालय आणि माहितीशास्त्रातील वर्तमान घडामोडी (Current Subject) संदर्भात कितपत आशय वितरित होतो याचे विश्लेषण करणे.**

प्रस्तुत संशोधन कार्यात ग्रंथालय व माहितीशास्त्रातील वर्तमान घडामोडी संदर्भात वितरित होणाऱ्या आशयाचे विश्लेषण केले आहे. ज्ञानगंगोत्री या नियतकालिकात सर्वाधिक लेख माहिती तंत्रज्ञानाचे ग्रंथालयात उपयोजन या विषयावर प्रकाशित झाले आहे. त्याचे प्रमाण २५.८५% इतके आहे, तर ग्रंथालय व्यवस्थापन या विषयावर १९.३९% लेख प्रकाशित झाले आहे. ग्रंथालय व माहितीशास्त्र शिक्षण या विषयावर ७.८२%, गंथालय संशोधन ६.८०%, तर सर्वात कमी लेख ग्रंथालयीन तालिकीकरण व ग्रंथालयीन वर्गीकरण आणि ग्रंथालय कायदे या विषयावर प्रत्येकी ४ (१.३६%) लेख प्रकाशित झाले आहे. ज्ञानगंगोत्री या नियतकालिकात ९ लेख हे ग्रंथालयशास्त्राशी संबंधित नाही. त्याचे प्रमाण ३.०८% इतके आहे. इतर विषयामध्ये दिनविशेष: मंत्र आणि तंत्र, प्रभावीत करणारे ग्रंथ, अर्गोनॉमिक्सचा वापर, सहयोगी उपक्रम, संज्ञा- संकल्पना परिचय, राष्ट्रिय विज्ञान संप्रेषण आणि सूचना संसाधन परीषद, १९ व्या २० व्या शतकातील मराठी ग्रंथांचा संक्षिप्त इतिहास, स्मरणिका संपादन: कला व शास्त्र, प्रिंटर्स: इतिहास, प्रकार आणि घ्यावयाची काळजी या विषयांचा समावेश आहे.

थोडक्यात ज्ञानगंगोत्री या नियतकालिकाच्या उष्टिांप्रमाणे वर्तमान घटना, घडामोडी या विषयांवर लेख आढळून येतात. या नियतकालिकामध्ये जास्तीत जास्त लेख माहिती तंत्रज्ञानाचे

ग्रंथालयात उपयोजन (२५.८५%) व त्या-त्या वेळेस चर्चेत असलेल्या विषयांवर आधारित लेख प्रकाशित झालेले आढळून येते. माहिती संकलनावरून वस्तुनिष्ठपणे निष्कर्ष काढून त्यापुढे शिफारशी दिल्या आहेत. यामुळे संशोधनासाठी निश्चित केलेल्या उष्टिांची परिपुर्ती झाली आहे.

**उिष्ट क्रं. २:- ज्ञानगंगोत्री या नियतकालिकातून प्रकाशित झालेल्या लेखांचे संकल्पनात्मक (Conceptual Study based) आणि संशोधनात्मक (Research Study based) विश्लेषण करणे.**

सदर उष्टिाच्या अनुषंगाने संशोधकाने लेखांचे प्रकारानुसार विश्लेषण केले. यामध्ये संकल्पनात्मक लेख, संशोधनात्मक लेख, प्रचलित विषयासंबंधी लेख असे वर्गीकरण करून त्यांचे ज्ञानगंगोत्री नियतकालिकात प्रकाशित होण्याचे प्रमाण पडताळून पाहीले आहे. सर्वाधिक १५६ (५३.०६%) लेख हे प्रचलित विषयासंबंधीत असून १०९ (३७.०७%) लेख संकल्पनात्मक स्वरूपाचे आहे. संशोधनात्मक लेखांचे प्रमाण २० (६.८०%) इतके आहे.

५३.०६% लेख हे प्रचलित विषयासंबंधीत असून ज्ञानगंगोत्री या नियतकालिकाद्वारे वर्तमान घटना, घडामोडी बाबत वाचकांना माहिती पुरविण्याचा जो उेश होता तो सफल होतांना दिसून येतो. संकल्पनात्मक लेखाद्वारे ग्रंथालय व माहितीशास्त्र या विषयातील मुळ विषयांना (Core Subject) देखिल महत्व दिलेले दिसून येते. तसेच संशोधनात्मक लेखांचे प्रमाण या नियतकालिकामध्ये कमी प्रमाणात दिसून येते, ते वाढविण्यासाठी Ph.D झालेल्या व करत असलेल्या संशोधकांना लेख लिहिण्यासाठी आव्हान केले पाहीजे. या विश्लेषणाच्या आधारे संशोधकाने निष्कर्ष व शिफारशी मांडल्या आहे. यामुळे या उष्टिांची पूर्तता झाली आहे.

**उिष्ट क्रं. ३:- ज्ञानगंगोत्री या नियतकालिकामध्ये देण्यात आलेल्या संदर्भांचा (Citations) विश्लेषणात्मक अभ्यास करणे.**

प्रस्तुत उष्टिाच्या अनुषंगाने संशोधकाने उध्दरणाचे कालपरत्वे व प्रलेख प्रकारानुसार विश्लेषण केले आहे. यामध्ये कोणत्या कालावाधीत किती संदर्भ वापरले गेले याची पडताळणी केली. तसेच संदर्भ प्रकारानुसार कोणते संदर्भ साधने वापरली या संदर्भांचे प्रमाण अभ्यासून त्याची पडताळणी केली व त्याचे शास्त्रीय पध्दतीने त्याचे योगदान सिध्द केले आहे.

प्रलेख प्रकारानुसार सर्वाधिक उल्लेख हे इंग्रजी ग्रंथाचे आलेले असून त्याचे प्रमाण ३१३ (३७.०९%) आहे, तर वेबसाईटचे प्रमाण १७३ (२०.५०%) इतके आहे. १३६ (१६.११%) उल्लेख हे मराठी ग्रंथाचे असून १२६ उल्लेख इंग्रजी नियतकालिकांचे आहे. त्याखालोखाल मराठी नियतकालिके (२.१३%), सेमीनार (१.९०%), कॉन्फरन्स (१.४२%) तर साहित्याचे प्रमाण (५.९२%) इतके आहे. ३७.०९% उल्लेख हे इंग्रजी ग्रंथाचे आहे म्हणजेच आजही ग्रंथालयशास्त्राच्या अभ्यासात इंग्रजी भाषेतील साहित्य जास्त प्रमाणात उपलब्ध असल्याने इंग्रजी प्रलेखांचा अधिक प्रमाणात वापर होताना दिसून येतो.

उध्दरणाचे कालपरत्वे विश्लेषणानूसार २००१ ते २०१३ या कालावधीतील सर्वाधिक ३२१ (३८.०४%) प्रलेखांचा उध्दरणांसाठी वापर केलेला आहे. तर त्याखालोखाल १९८१ ते २००० या काळातील २५२ (२९.८६%) उध्दरणे आढळुन आली. १९६१ ते १९८० या कालावधीत १०३ (१२.२०%), १९६० पूर्वीच्या प्रलेखांचा सर्वात कमी ३७ (४.३८%) उध्दरणांचा वापर केलेला आढळुन आला. यामुळे सदर उष्टिाची परिपुर्तता झाली आहे.

**उ-ि्ष्ट क्रं. ४:- माहिती व तंत्रज्ञानाच्या युगामध्ये ज्ञानगंगोत्री या नियतकालिकापुढील आव्हानांचा अभ्यास करणे.**

माहिती तंत्रज्ञानाच्या युगामध्ये ज्ञानगंगोत्री नियतकालिकापुढे असलेल्या आव्हांनाचा शोध सदर संशोधनात घेण्यात आला आहे. ज्ञानगंगोत्री नियतकालिकासाठी स्वंतत्र वेबसाईट चालू करणे, जास्तीत जास्त प्रमाणात सामाजिक प्रसारमाध्यमांचा **(social media)** वापर करून ज्ञानगंगोत्री नियतकालिकांचा वापर कसा वाढवता येईल या बाबींची पडताळणी करून त्यावर उपायही सुचविले आहे. सध्या माहिती तंत्रज्ञानाच्या वापरामुळे ऑनलाईन लेख प्रकाशित करणे, वर्गणीदार संख्या वाढविणे यासारखी आव्हाने ज्ञानगंगोत्री नियतकालिकापुढे आहे, या आव्हानांचा अभ्यास करून त्यावर ठोस उपाययोजना सुचविल्या आहे. या उष्टिाची पुर्तता झाली आहे.

**उद्दिष्ट क्रं. ५:- ज्ञानगंगोत्री हे नियतकालिक अधिक उपयुक्त आणि दर्जेदार होण्यासाठी निष्कर्षांच्या आधारे शिफारशी सूचविणे.**

ज्ञानगंगोत्री हे नियतकालिक ग्रंथालय व माहितीशास्त्रातील उपयुक्त व दर्जेदार नियतकालिक आहे. या नियतकालिकाच्या आशय विश्लेषणामधून ग्रंथालय चळवळीमध्ये ज्ञानगंगोत्री नियतकालिकाचे विशेष महत्व अधोरेखित झाले आहे.

डॉ. कुंभार यांनी सूचविल्याप्रमाणे पुढील अकांत जे विषय समाविष्ट करावयाचे आहे, त्याबाबत आधीच्या अंकामध्ये स्वंतत्र सदरामध्ये त्याची माहिती दिली जावी, त्यासाठी स्वंतत्र सदर सुरू करावे. लेखकांसाठी कोणतेही सदर सुरु केल्यानंतर ते सातत्याने सुरू राहीले पाहिजे, किमान पूर्ण खंडामध्ये सदर प्रकाशित झाले पाहिजे. असेही डॉ. कुंभार यांनी सूचविले. डॉ. शेवाळे यांच्यामते ग्रंथालय व माहिती शास्त्रातील जगभरातील नामवंत, विचारवंत व्यक्तीची माहिती देणारे सदर ज्ञानगंगोत्री मध्ये सुरू करण्यात यावे, ग्रंथालयशास्त्रातील वाचकासांठी नेट-सेट च्या अभ्यासक्रमावर आधारित लेखमाला प्रकाशित करावी, प्रत्येक अंकात नेट/सेट च्या जून्या प्रश्नपत्रीका उत्तरासहीत छापाव्यात, नेट/सेट परीक्षेवर आधारित प्रश्नसंच (वस्तुनिष्ठ प्रश्नोत्तरे) यांचा समावेश असावा. ग्रंथालयशास्त्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या नामवंताबल सविस्तर माहिती प्रकाशित करावे, NAAC, NBA यांच्या दृष्टीकोनातुन ग्रंथालयांना करावे लागणारे अपेक्षित बदल, त्यातील श्रेयांक / गुणपध्दती याबाबत तज्ञांकडून लेख लिहून ते प्रकाशित करावे, इतर भाषेतील दर्जेदार लेखांचा मराठी भाषेत अनुवाद करुन लेख प्रसिध्द करावे असे म्हटले आहे. यासारख्या अनेक महत्वपूर्ण सूचना केलेल्या आहे. तसेच या नियतकालिकाची गुणात्मक व संख्यात्मक वाढ होण्यासाठी अजून कोण-कोणत्या सुधारणा करता येतील याची पडताळणी संशोधनात करण्यात आली असून त्यावर उपायही सुचविले आहे. यामुळे या उद्दिष्टाची पूर्तता झाली आहे असे आढळून आले आहे.

## ६.४ गृहीतक पडताळणी

प्रस्तुत संशोधन अभ्यासासाठी मांडण्यात आलेल्या गृहीतकांची पडताळणी खाली दिली आहे.

**गृहीतक- १.** ज्ञानगंगोत्री या नियतकालिकामध्ये प्रचलित विषयांबधी (Current Trends) नियमितपणे लेख प्रसिध्द होतात.

वरील गृहितक तथ्यांच्या आधारे तपासले व ते सत्य असल्याचे आढळुन आले.

जून २००० ते मे २०१३ या १३ वर्षाच्या कालावधीत यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या ज्ञानगंगोत्री या नियतकालिकात प्रचलित विषयासंबधी नियमितपणे लेख प्रकाशित झाल्याचे दिसून आले. या नियतकालिकात प्रकाशित झालेल्या लेखांच्या स्वरुपाचे विश्लेषण खालील तक्त्यात दिले आहे.

**सारणी क्रं. ६.१**

**लेखांचे प्रकारानुसार विश्लेषण**

| अं. क्रं. | लेखांचा प्रकार | लेखांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | संकल्पनात्मक लेख | १०९ | ३७.०७% |
| २. | संशोधनात्मक लेख | २० | ६.८०% |
| ३. | प्रचलित विषयासंबंधी लेख | १५६ | ५३.०६% |
| ४. | इतर | ०९ | ३.०६% |
| **एकूण** | | **२९४** | **१००%** |

वरील सारणीवरुन असे दिसून येते की, सर्वाधिक १५६(५३.०६%) लेख हे प्रचलित विषयासबंधी म्हणजेच वर्तमान घटना, घडामोडाशीं संबंधित आहेत. संकल्पनात्मक लेखांचे प्रमाण ३७.०७% इतके आहे. तर संशोधनात्मक लेखांचे प्रमाण ६.८०% तर आहेत. म्हणजेच या नियतकालिकातील ५३.०६% लेख हे प्रचलित विषयासबंधी प्रकाशित झालेले आहेत. एकूण प्रकाशित लेखांपैकी निम्म्याहून अधिक लेख हे प्रचलित विषयांसबधी आहेत. या प्रचलित विषयात माहिति तंत्रज्ञानाचे ग्रंथालयात उपयोजन, त्या-त्या कालावधीत चालु असलेल्या वर्तमान घटना व घडामोडी ग्रंथालय, ग्रंथालय व्यवस्थापन, माहितीशास्त्र, यासंबधी आहेत.

वरील विवेचनावरुन हे सिध्द होते की, ज्ञानगंगोत्री या नियतकालिकात प्रचलित विषयासंबंधी नियमितपणे लेख प्रकाशित होतात. वरील गृहीतक तपासले व ते सत्य असल्याचे सिध्द झाले.

**गृहीतक- २.** ज्ञानगंगोत्री नियतकालिकामध्ये पुरूष लेखकांनी लिहीलेल्या लेखांचे प्रमाण अधिक आहे

वरिल गृहीतक तथ्यांच्या आधारे तपासले व ते सत्य असल्याचे आढळुन आले.

ज्ञानगंगोत्री या नियतकालिकासाठी स्त्री लेखिका आणि पुरुष लेखकांनी लेख लिहिलेले आहे. या गृहीतकाद्वारे ज्ञानगंगोत्री या नियतकालिकात स्त्री लेखिकांनी आणि पुरुष लेखकांनी लिहीलेल्या लेखांचे प्रमाण जाणून घेण्याचा हेतू होता. या नियतकालिकात लिहीलेल्या लेखांचे लिंगभेदनिहाय विश्लेषण खालील तक्त्यात दिले आहे.

**सारणी क्रं. ६.२**

**लेखकांचे लिंगभेदानूसार विश्लेषण**

| अं. क्रं. | लिंगभेद | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | पुरुष लेखक | १०५ | ७१.९२% |
| २. | स्त्री लेखिका | ४१ | २८.०८% |
| **एकूण** | | **१४६** | **१००%** |

वरील सारणीवरून असे निदर्शनास आले की, १४६ लेखकांपैकी १०५ पुरूष लेखक असून त्यांचे प्रमाण ७१.९२% इतके आहे, तर स्त्री लेखकांचे प्रमाण ४१ (२८.०८%) इतके आढळून आले.

वरील विश्लेषणावरून लक्षात येते की, ७१.९२% लेख हे पुरूष लेखकांनी लिहिलेले आहे, तर २८.०८% लेख हे स्त्रीयांनी लिहिलेले आहे.

वरील विश्लेषणावरुन हे सिध्द होते की, ज्ञानगंगोत्री या नियतकालिकात स्त्री लेखिकांपेक्षा पुरूष लेखकांनी अधिक लेख लिहीले आहे. वरील गृहीतक तपासले व ते सत्य असल्याचे सिध्द झाले.

## ६.५. शिफारशी-

**सदर संशोधनांती संशोधकाने काही शिफारशी केल्या आहे. त्या पुढीलप्रमाणे -**

- ज्ञानगंगोत्री हे नियतकालिक त्रैमासिक स्वरूपात प्रकाशित होते, त्याऐवजी हे नियतकालिक मासिक स्वरुपात प्रकाशित व्हावे. जेणेकरुन विद्यार्थ्यांना नियमितपणे संदर्भसाहित्य व नवीन घडामोडींची अधिक उपयुक्त माहिती प्राप्त होईल.
- नियतकालिकामध्ये सुरुवातीच्या काळात प्रसिध्द होणारी अजून ताजा वास जुन्याला, वेब, सार, परिक्रमा ही सदरे नियमित प्रकाशित होत. या सदरांमधुन या नियतकालिकाच्या उपभोक्त्यांना उपयुक्त आणि महत्वपूर्ण माहिती मिळत असल्याने ही सदरे पुन्हा सुरु करावीत. कोणतेही नवीन सदर सुरू केल्यानंतर ते सातत्याने सुरू राहीले पाहीजे, किमान एक खंड पूर्ण होईपर्यंत ते सदर प्रकाशित झाले पाहीजे.
- ग्रंथालय व माहितीशास्त्रात मराठी भाषेतील ग्रंथसंपदा समृध्द करण्यासाठी जास्तीत जास्त ग्रंथ मराठी भाषेतून लिहिण्याची गरज आहे. त्यासाठी ग्रंथालयशास्त्रातील व्यावसायिकांनी ग्रंथालयशास्त्रात जास्तीत जास्त मराठी भाषेत लेखन केले पाहिजे. त्यासाठी या नियतकालिकातून प्रोत्साहन दिले जावे.
- संपादक मंडळाने ग्रंथालय शास्त्रातील महत्वपूर्ण परंतु दुर्लक्षित विषयांवर लेखन साहित्य निर्मिती केली पाहीजे, त्यासाठी ग्रंथालयशास्त्रातील त्या- त्या क्षेत्रातील अनुभवी आणि तज्ज्ञ व्यक्तींना आवाहान करून त्यांचेकडून दर्जेदार साहित्य लेखन करून घ्यावे.
- ज्ञानगंगोत्री नियतकालिकात स्त्री लेखीकांचे प्रमाण २८.०८% इतके आहे. त्यामुळे ग्रंथालयशास्त्रातील महिला व्यावसायिकांना लेख लिहिण्यास प्रोत्साहन देवून त्यांना जास्तीत जास्त लेख लिहीण्यासाठी प्रवृत्त करावे.
- सदर नियतकालिकात ६७ (४५.९४%) लेखक हे विद्यापीठ किंवा महाविद्यालयीन ग्रंथपाल आहेत, तर १३ (८.९०%) लेखक हे प्राध्यापक आहे. ग्रंथालयशास्त्रातील सर्व क्षेत्रातील

व्यावसायिकांना लेख लिहिण्यासाठी आवाहन केले पाहीजे. जसे, प्राध्यापक, औद्योगिक ग्रंथालयातील व्यावसायिक, माहिती अधिकारी, माहिती तंत्रज्ञ, ग्रंथ प्रकाशक, सूचीकार, विधिमंडळ ग्रंथालयातील व्यावसायिक इत्यादी. त्यासाठी पाठपुरावा केला पाहीजे. त्यामुळे विविध क्षेत्रातील ग्रंथालयांचे अनुभव, कार्य, अडचणी यांची माहिती उपभोक्त्यांना उपलब्ध होईल.

- ज्ञानगंगोत्री या नियतकालिकात मुंबई २१.२३%, पुणे १३.०१%, नाशिक १०.९६% आणि, ठाणे ६.१६% या चार जिल्ह्यामधून (५१.३६%) लेख येण्याचे प्रमाण अधिक आहे. महाराष्ट्रातील इतर जिल्ह्यातील ग्रंथालय व्यावसायिकांकडून लेख मिळविण्याचे जाणीवपूर्वक प्रयत्न केले पाहीजे.
- ज्ञानगंगोत्री नियतकालिकात वर्षनिहाय लेख प्रकाशित होण्याचे प्रमाण २२.६१% तर अंकनिहाय लेख प्रकाशित होण्याचे प्रमाण ६.३९% इतके आढळून आले. ज्ञानगंगोत्री हे मराठी भाषेतील उपयुक्त व महत्वपूर्ण नियतकालिक असल्याने यामधील दर्जेदार व गुणात्मक लेखांची संख्या वाढविली पाहीजे.
- ज्ञानगंगोत्री हे नियतकालिक वर्तमान घटना, घडामोडी, भाष्य या विषयाला वाहिलेले असल्याने त्यामध्ये माहिती तंत्रज्ञानाबाबतच्या घडामोडी, त्या- त्या काळानुसार नावीन्यपूर्ण संकल्पना याबाबतची विस्तृत माहिती प्रकाशित करावी.
- या नियतकालिकात संशोधनात्मक लेखांचे प्रमाण मात्र २० (६.८०%) इतके आहे. ज्ञानगंगोत्री हे मराठी भाषेतील उपयुक्त आणि दर्जेदार नियतकालिक असल्याने त्यात जास्तीत जास्त संशोधनात्मक लेख प्रकाशित करावे. त्यासाठी ग्रंथालय व माहितीशास्त्रातून पीएच. डी. अथवा एम. फील झालेल्या संशोधकांना त्यांच्या संशोधनाविषयी लेख लिहिण्याचे आवाहान करावे.

- यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातून किंवा इतर विद्यापीठांतून एम.लिब. केलेल्या विद्यार्थ्यांच्या प्रकल्पामधून निवडक, दर्जेदार व संशोधनात्मक प्रकल्पांची माहिती लेख स्वरूपात प्रकाशित करण्यासाठी त्यांना प्रोत्साहान द्यावे.
- प्रत्येक लेखामध्ये योग्य ते संदर्भ, उध्दरणे दिले जावे, तसेच त्यासाठी प्रमाणित Style Manuals चा उपयोग करावा.
- ज्ञानगंगोत्री नियतकालिकेचे वर्गणीदार सभासदांची संख्या अतिशय कमी दिसून आली. ज्ञानगंगोत्री हे मराठी भाषेतील दर्जेदार नियतकालिक आहे. ते जास्तीत जास्त उपभोक्त्यांपर्यत पोहचविण्यासाठी योग्य विपणण व जाहिरात तंत्राचा वापर करावा. विद्यापीठांची ग्रंथालये, अभ्यास केंद्रे. महाविद्यालयांचे गंथालये, विशेष ग्रंथालये, ग्रंथालय शास्त्रातील प्राध्यापक व विद्यार्थ्यांना वर्गणीदार करण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करावेत. त्यासाठी U-Tube, WhatsApp, Blogs, Chat Groop यासारख्या अद्यायावत साधनांचा वापर करून, त्याद्वारे नियतकालिकाचे महत्त्व पटवून द्यावे. त्यामुळे नियतकालिकाची वर्गणीदार संख्या वाढण्यास मदत होईल.
- ज्ञानगंगोत्री नियतकालिकातील लेखांचा दर्जा उत्तम आहेच, मात्र लेखांमध्ये सखोल व परीपूर्ण माहिती उपभोक्त्यांना दिल्यास लेखांचा पर्यायाने नियतकालिकाचा दर्जा अजून वाढण्यास मदत होईल.
- लेखांचे सादरीकरण करतांना आवश्यकतेनुसार रंगीत छपाई, लेखांमध्ये तक्ते, आलेख, आकृत्या यांचा समावेश करावा. तसेच लेखांची मांडणी करतांना लेखाची प्रस्तावना, मुख्य संज्ञा, व्याख्या, उद्दिष्टे, मुळविषय प्रवेश, त्याचे उपयोजन आणि समारोप असा पध्दतशीर क्रम असावा. त्यासाठी नियतकालिकात वेळोवेळी माहिती प्रसिध्द करावी
- ग्रंथालय व्यावसायिकांनी लेख लिहीतांनी प्रत्यक्ष काम करतांना येणारे अनुभव, अडचणी, त्यावरील उपाय याबाबत अधिक लेख लिहावे.

- ज्ञानगंगोत्री नियतकालिकात लेखन करतांनी उपभोक्त्यांच्या गरजांचा कल लक्षात घेवून त्यांना आवश्यक असणाऱ्या विषयांवर लेखन केले पाहीजे.
- प्रचलित विषयासबंधी सर्वांगिण माहिती देणारा एक विशेषांक वर्षातून किमान एकदा प्रकाशीत करावा. यात एकाच विषयासंबंधी परिपुर्ण माहिती द्यावी.
- उपभोक्त्यांकडून वेळोवेळी नियतकालिकाबाबत, अंकाबाबत, लेखांबाबत मत मागवावे. तसेच त्यांच्याकडून आलेल्या योग्य सूचनांची दखल घ्यावी.
- लेख कसे असावे, संशोधनात्मक लेख कसे लिहावे याबाबत महाविद्यालय स्तरावर, विद्यापीठ स्तरावर वेळोवेळी कार्यशाळांचे आयोजन करून लेखांची गुणात्मक प्रमाणात वाढ करता येईल.
- वर्तमान घटना, घडामोडींची व्याप्ती (Aspects of current trends) निश्चित करून त्यात समाविष्ट विषयांची यादी नियतकालिकात प्रसिध्द करावी, जेणे करून कोणत्या विषयावर लेखन करावयाचे आहे याबाबत लेखकांना कल्पना मिळेल.
- नियतकालिकाचा अंक A4 साईज आकारात प्रकाशित करावा. जेणे करुण उपभोक्त्यांना अंक वाचण्यास, हाताळण्यास सोपा होईल.
- लेखकांना लेख लिहिण्यासाठी मार्गदर्शक सूचना नियतकालिकातून द्याव्यात. त्यात शब्द मर्यादा, लेखांचा विषय, संदर्भ देण्याच्या पध्दती याबाबतीत सूचना द्याव्यात. तसेच नवीन लेखकांना लेखनासाठी प्रवृत्त करावेत.
- लेखकांनी कोणत्या विषयावर लेखन करावे यासाठीची पूर्व सूचना किमान ३-४ महीने आधीच्या अंकामधून प्रसिध्द करावी. जेणेकरून विशिष्ट विषयांशी संबधीत दर्जेदार लेखांची संख्या वाढण्यास मदत होईल.
- संपादक मंडळाच्या वर्षातून किमान दोन बैठका नियमित व्हाव्यात. त्यामध्ये नियतकालिकाच्या विषय आणि गुणवत्ता वाढीबाबत चर्चा व्हावी असे अपेक्षीत आहे.

- ग्रंथालयशास्त्रात पीएच. डी. झालेल्या संशोधकांचा परिचय, मुलाखत या नियतकालिकात करून द्यावी. त्यांच्या प्रबंधाचा थोडक्यात सारांश नियतकालिकात प्रसिध्द करावा. त्यासाठी स्वंतत्र असे नवीन सदर सुरू करावेत.
- ग्रंथालयशास्त्रातील व्यवसाय तज्ञांकडून ज्ञानगंगोत्री नियतकालिकातील लेखांवर Review मागविणे, लेखकांच्या मुलाखती घेणे, उपभोक्त्यांकडून प्रश्नवली भरुन घेणे व त्यांच्या सूचनांनुसार नियतकालिकात आवश्यक ते बदल करावे.
- ग्रंथालय व माहितीशास्त्रात उत्कृष्ट योगदान देणाऱ्या व्यक्ती, नामवंत प्राध्यापक, संशोधक यांच्या मुलाखतींचे सदर सुरु करणे, त्यासाठी एम.लिब., एम.फिल. च्या विदयार्थ्यांना विषय देवून मुलाखती घेण्यास सांगणे.
- ग्रंथनिर्मितीतील इतर घटकांतील तज्ज्ञांकडून त्यांच्या अनुभवावर आधारीत लेखांचा समावेश करावा. उदा. प्रकाशक, मुद्रक, बांधणीकार, विक्रेता इत्यादी.

## ६.६ भविष्यवेध -

सदर संशोधकाने यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या ज्ञानगंगोत्री नियतकालिकाच्या अंकांचे विश्लेषण या अनुषगांने संशोधन केले आहे. या पुढील काळात ग्रंथालय व माहितीशास्त्र या विषयातील महत्वपूर्ण नियतकालिकांवर संशोधन व्हावे असे संशोधकास वाटते. म्हणुन पुढील विषय यापुढील संशोधनाकरीता सदर संशोधकाने सूचविले आहे.

१. ज्ञानगंगोत्री नियतकालिकाचे बिब्लियोमेट्रीक्स अध्ययन

२. ज्ञानगंगोत्री नियतकालिकातील उध्दरण विश्लेषण

३. आशय विश्लेषण हा ग्रंथालयाच्या दृष्टिने महत्वपूर्ण भाग असल्याने ग्रंथालय शास्त्रातील महत्वपूर्ण नियतकालिकांचे प्रकाशन वर्षापासूनचा अभ्यास होणे आवश्यक आहे.

## समारोप-

सदर संशोधनामध्ये संबधीत प्रकरणाची प्रस्तावना थोडक्यात विशद केली आहे. संशोधनामधून प्राप्त झालेले निष्कर्ष मांडले आहेत. निष्कर्षांमध्ये ज्ञानगंगोत्री नियतकालिकाच्या आशय विश्लेषणामधून प्राप्त झालेले निष्कर्ष आणि संपादक मंडळाच्या मुलाखतीमधून प्राप्त झालेले निष्कर्ष सदर प्रकरणात दिले आहे. संशोधनाच्या सूरवातीला जी संशोधनासंबंधी उद्दिष्टे व गृहीतके मांडली होती, त्यांची पडताळणी येथे केलेली आहे. सदर संशोधनामधून जे निष्कर्षं प्राप्त झाले, त्या निष्कर्षांच्या आधारे संशोधकाने शिफारशी येथे केल्या आहेत.

सदर संशोधन कार्यासाठी आधार म्हणून घेतलेल्या संदर्भाची माहिती संदर्भ सूची मध्ये दिली आहे. संपादक व संपादक मंडळाकडून माहिती घेण्यासाठी तयार केलेली अनुसूची परिशिष्टमध्ये दिली आहे. सदर संशोधकाने यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या ज्ञानगंगोत्री या नियतकालिकाच्या सन २००० ते २०१२ या काळातील अंकांचे विश्लेषण या विषयास संशोधनातून वस्तुनिष्ठपणे न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे. त्यासाठी मार्गदर्शकांचे मौलिक सहकार्य मिळाले आहे. संशोधन कार्याबाबत संशोधक समाधानी आहे.

# संदर्भसूची


१. आगलावे, प्रदीप. (२०१०). *सामाजिक संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्रे.* नागपूर, साईनाथ प्रकाशन.

२. आभाळे, जनाबाई. (२०१२). *साहित्यिक रंगनाथ पठारे यांच्या वाङमयाचे आशय विश्लेषण.* अप्रकाशित एम. लिब. प्रकल्प. नाशिक: यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ.

३. अंबादे, अरूणा. (२००८). *इन्फ्लिबनेटद्वारे आयोजित केलेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेमधील लेखांचे आशय विश्लेषण.* अप्रकाशित एम. फिल. लघुशोध प्रबंध, नाशिक: यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ.

४. कऱ्हाडे, बी. एम. (२०११). *शास्त्रीय संशोधन पध्दती.* नागपूर, पिंपळापूरे ॲण्ड कं. पब्लिशर्स.

५. कळमसे, जी. एम., (प्रकाशक). (२०१५). *दूरशिक्षण प्रक्रियेत संयोजक/समंत्रक यांचे कार्य व भूमिका.* नांदेड: विभागीय केंद्र, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ.

६. कायंदे- पाटील, गंगाधर. (२००५). *संशोधन पध्दती.* नाशिक: चैतन्य पब्लिकेशन.

७. काळे, अंजली. (२००८). *समाज प्रबोधन पत्रिका या नियतकालीकातील लेखांचा आशय विश्लेषणात्मक अभ्यास (१९९८-२००७).* अप्रकाशित एम. फिल. लघुशोध प्रबंध, नाशिक: यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ.

८. कुंभार, राजेंद्र. (२०१३). *ग्रंथालय आणि माहितीशास्त्र संशोधन.* पुणे, युनिव्हर्सल प्रकाशन.

९. गोणे, इंदू. (२००६). *माहिती महामार्ग विविधा नियतकालिकातील लेखांचे आशय विश्लेषण.* अप्रकाशित एम. लिब. प्रकल्प. नाशिक: यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ.

१०. घाटोळे, रा. ना. (२०१०). *समाजशास्त्रीय संशोधन: तत्त्वे व पध्दती.* नागपूर, श्री मंगेश प्रकाशन.

११. चौगुले, प्रकाश. (२००८). *ऑल इंडिया रिपोर्टर जानेवारी १९९७ ते डिसेंबर २००६: आशय विश्लेषण.* अप्रकाशित एम. फिल. लघुशोध प्रबंध, नाशिक: नाशिक: यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ.

१२. चंद्रात्रे, गिरीष. (२०११). *ॲनल्स ऑफ लायब्ररी अँण्ड इन्फर्मेशन स्टडीज या नियतकालिकाचे आशय विश्लेषण.* अप्रकाशित एम. फिल. लघुशोध प्रबंध, नाशिक: यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ.

१३. जाधव, दत्तात्रेय. (२०११). *शिक्षण संक्रमण या मासिकाचा आशय विश्लेषणात्मक अभ्यास.* अप्रकाशित एम. लिब. प्रकल्प. नाशिक: यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ.

१४. जोशी, स्नेहल आणि खोत, नमिता. (२०११). साहित्यसूची: आशय विश्लेषण. *ज्ञानगंगोत्री,* १२(१-२), ४५-५३.

१५. तापकीर, मुकुंद, आणि साबळे, आर. जे. (२००३). *संशोधन पध्दती व प्रकल्प अहवाल.* पुणे, निराली प्रकाशन.

१६. थेटे, संतोष. (२०१०). *साधना या नियतकालिकाचे आशय विश्लेषण.* अप्रकाशित एम. लिब. प्रकल्प. नाशिक: यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ.

१७. दळवी, विघ्नेश. (२०१२). *भारतातील ग्रंथालय आणि माहितीशास्त्रावरील मुक्त स्त्रोत नियतकालिकांचा अभ्यास व ॲनल्स ऑफ लायब्ररी आणि इन्फर्मेशन स्टडीज या नियतकालिकाचे आशय विश्लेषण.* अप्रकाशित एम. लिब. प्रकल्प. नाशिक: यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ.

१८. देशपांडे, लीना. (२०१५). *सर्वेक्षण: एक संशोधन पध्दती.* नाशिक, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ. पृ. ५

१९. परब, संपदा. (२०१२). *आरती या नियतकालिकाचे आशय विश्लेषण.* अप्रकाशित एम. लिब. प्रकल्प. नाशिक: यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ.

२०. पवार, विद्यूलता (२००८) यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विदयापीठातर्गंत उस्मानाबाद अभ्यासकेंद्रावरील ग्रंथालय आणि माहितीशास्त्र पदव्युत्तर शिक्षणक्रमासाठी सादर झालेल्या प्रकल्पांचे उध्दरण विश्लेषण अप्रकाशित एम. फिल. लघुशोध प्रबंध, नाशिक: यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ.

२१. पाईकराव, विजयकुमार. (२०१५). *मुक्त व दूरशिक्षण तत्त्व आणि कार्यानंद.* नाशिक: यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ.

२२. पाटील, पुनम. (२००९) *जीवन शिक्षण नियतकालिकाचे आशय विश्लेषणात्मक अध्ययन.* अप्रकाशित एम. लिब. प्रकल्प. नाशिक: यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ.

२३. पाटील, वा. भा. (२०१२). *संशोधन पध्दती.* जळगांव, प्रशांत पब्लिकेशन्स.

२४. पाटील, सीमा. (२०१०). *युनिव्हर्सिटी न्यूज या नियतकालिकाचे आशय विश्लेषण.* अप्रकाशित एम. लिब. प्रकल्प. नाशिक: यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ. प्रकाशन.

२५. पावरा, एकलव्य. (२०११). *आंदोलन- शास्वत विकासासाठी या नियतकालिकाचे आशय विश्लेषण.* अप्रकाशित एम. लिब. प्रकल्प. नाशिक: यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ.

२६. पोरे, मेघा. (२०१२). *लोकराज्य नियतकालिकाचा आशय विश्लेषणात्मक अभ्यास.* अप्रकाशित एम. लिब. प्रकल्प. नाशिक: यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ.

२७. बनप, मैथिली. (२०११). *बळीराजा नियतकालिकाचा आशय विश्लेषणात्मक अभ्यास.* अप्रकाशित एम. लिब. प्रकल्प. नाशिक: यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ.

२८. बापते, विशाल. (२०१६). डेसिडॉक जर्नल ऑफ लायब्ररी ॲण्ड इन्फॉरमेशन टेक्नॉलॉजी या नियतकालिकाच्या सन २०१० ते २०१५ या कालावधीत पसिध्द झालेल्या संशोधनपर लेखांचे आशय विश्लेषण. *ज्ञानगंगोत्री, १६*(३-४), ३-१८.

२९. बाहेती, सत्यनारायण आणि डगवार शामकांत (२००८). University News या नियतकालिकाचे आशय- विश्लेषणात्मक अध्ययन’ *ज्ञानगंगोत्री*, मार्च- एप्रिल - मे (८) ४, पृष्ठ ३६-५२.

३०. बोबडे, माधवी. (२००८) *यांनी इफ्ला जर्नल: आशय विश्लेषण (२००२ ते २००७)* अप्रकाशित एम. लिब. प्रकल्प. नाशिक: यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ.

३१. बोधनकर, सुधीर., अलोणी, विवेक., आणि कुळकर्णी, मृणाल. (२०११). *सामाजिक संशोधन पध्दती.* नागपुर, साईनाथ प्रकाशन.

३२. भामरे, वैशाली. (२००९). *भारतीय इतिहास आणि संस्कृती या नियतकालिकाचे आशय विश्लेषण.* अप्रकाशित एम. लिब. प्रकल्प. नाशिक: यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ.

३३. भाले, योगेश. (२००९). *बुलेटिन ऑफ दि मराठवाडा मॅथेमॅटिकल सोसायटी या जर्नलच्या उल्लेखांचे विश्लेषण आणि आशय विश्लेषण.* अप्रकाशित एम. फिल. लघुशोध प्रबंध, नाशिक: यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ

३४. मुरकुटे, सुधीर. (२००८). *योजना या नियतकालिकातील लेखांचे आशय विश्लेषण व निर्देश तयार करणे.* अप्रकाशित एम. फिल. लघुशोध प्रबंध, नाशिक: यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ.

३५. राऊत, दामोधर आणि कापडे, दिपक. (२०१३). योजना मराठी भाषेतील मासिकांचे आशय विश्लेषण: एक अभ्यास (कालावधी जानेवारी २००९-डिसेंबर २०१० ). *गोल्डन रिसर्च थॉटस्* ३(५), १-४. Retrieved June 15, 2014, from www.aygrt.isrj.net

३६. राशिवाडे, बाळू. (२०१२). *ऋग्वेद या नियतकालिकाचे आशय विश्लेषण हा प्रकल्प.* अप्रकाशित एम. लिब. प्रकल्प. नाशिक: यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ.

३७. रिसवडकर, म. रा. (२०१२). *संशोधन: व्याख्या आणि पध्दती.* (एम.लिब. शिक्षणक्रमातील अभ्यासपुस्तके, LIB 012 ग्रंथालय आणि माहितीशास्त्राची संशोधन पध्दती) नाशिक, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ.

३८. रिसवडकर, म.रा. (२००५). *माहिती संकलन विश्लेषण आणि सादरीकरण* (एम.लिब. शिक्षणक्रमातील अभ्यासपुस्तके, LIB 012 ग्रंथालय आणि माहितीशास्त्राची संशोधन पध्दती) नाशिक: यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ.

३९. लिंबाळे, शरणकुमार. (प्रकाशक). (२०००). *ज्ञानगंगा घरोघरी.* नाशिक: यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ.

४०. वाणी, विजया. (२००८). *संशोधक या नियतकालिकाचे आशय विश्लेषण.* अप्रकाशित एम. फिल. लघुशोध प्रबंध, नाशिक: यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ.

४१. शिंदे, आर. एन., चौधरी, एन. आर. आणि बियाणी, प्रमोद. (२०१३). *मुक्त विद्यापीठातील शिक्षण.* नाशिक: यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ.

४२. Awojob, E. and Adeokun O. (2012). Content Analysis of Agricultural Issues Reported in. *Library Philosophy and Practice (e-journal)* , 1-6. doi:http://digitalcommons.unl.edu/cgi/viewcontent.cgi?article=1965&context=libphilprac

४३. Berelson, B., (1952). *Content analysis in communication Research*. Illinois: The free press.

४४. Best, J. W. (1963). *Research in Education.* New Delhi: Printice Hall of India. Retrieved January 3, 2015, from http://www.bestugcnetguide.in

४५. Blancher, A. T. Buboltz, W., and Soper, Barlow. (2010). Content Analysis of the Journal of Counseling and Development Volumes 74 to 84. *Journal of Counseling & Development, 88*(2), 139-145. doi:http://connection.ebscohost.com/c/articles/49868450/content-analysis-journal-counseling-development-volumes-74-84

४६. Bogardus, E. S. (1936). Intoduction to Social Research. P. 45

४७. Cardenas, C. M. (2013). Libraries and Information Services and the Content Analysis Method in Scientific Literature Produced in the Areas of Librarianship and Information Sciences in Mexico. *QQML*, 6-15. Retrieved December 6,

2013,from http://www.qqml.net/papers/September_2013_Issue/239
QQML_Journal_ 2013 _MirelesCardenas_3_305_312.pdf

४८. Cherian, Annamma. (1986). *A Content Analysis of the Selected Health and Hygiene, Nutrition and Family Planning Programmes of Pij Television and its impact on acquisition of knowledge by Rural People of the Selected Villages of Kheda District*. Unpublished Ph. D. Thesis. Baroda: The Maharaja Sayajirao University of Baroda.

४९. Chu, H. (2006). Curricula of LIS Programs in the USA: A Content Analysis. In D. S. C. Khoo (Ed.), *Proceedings of the Asia-Pacific Conference on Library & Information Education and Practice* (pp. 328-336). Singapore: School of Communication & Information, Nanyang Technological University. doi:http://citeseerx.ist.psu.edu/viewdoc/download?doi=10.1.1.89.1470&rep=rep1&type=pdf

५०. Chu, H. (2015). Research methods in library and information science: A content analysis. *Library & Information Science Research, 37*(1), 36-41. doi:10.1016/j.lisr.2014.09.003

५१. Devis, K. (2012). Content Analysis of Research Articles in Information Systems (LIS) Journals. *Library and Information Research, 36*(112), 16-28. Retrieved May 8, 2013, from http://www.lirgjournal.org.uk/lir/ojs/index.php/lir/article/viewFile/495/54

५२. Dhopte S. (2004). *Content Analysis of Dissertation of the Amravati University (1993-2003).* Unpublished Ph. D.Thesis, Amravati: Sant Gadge Baba Amravati University. Retrieved February 14, 2014, from http://sgbau.ac.in/SGB%20Amt%20Uni%20Website/libraryscience.html

५३. Feeney, M. (2005). Who Uses International Newspapers? A Content Analysis of Dissertations and Theses.1-9. Retrieved from http://www.ifla.org/files/assets/newspapers/SLC/2014_ifla_slc_feeney_who_uses_international_newspapers_.pdf

५४. Fiskin, R. and Nas S. (2013). A Content Analysis of the "International Journal on Marine Navigation and Safety of Sea Transportation" from 2007 to 2012.

*International Journal on Marine Navigation and Safety of Sea Transportation, 7*(1), 145-149. doi:DOI: 10.12716/1001.07.01.19

५५. Fteimi, N. (2015). Main Research Topics in Knowledge Management: A Content Analysis of ECKM Publications. *The Electronic Journal of Knowledge Management, 14*(1), 5-17. Retrieved April 25, 2015, from www.ejkm.com/issue/download.html?idArticle=751

५६. Gala, Bhakti. (2013). *Library and Information Science Blogs: A Content Analysis.* Unpublished Ph. D. Thesis. Baroda: The Maharaja Sayajirao University. Retrieved December 16, 2015, from www.shodhganga. inflibenet.ac.in /handle/10603/38109

५७. Goode, W. J. and Hatt, Paul. (1981) *Methods in social research*. New Delhi, Mc Graw- Hill Internation Book Company. P. 8.

५८. Haneefa, M. (2010). Content Analysis of Online English Newspapers in india. *DESIDOC Journal of Library & Information Technology, 30*(4), 17-24. doi:http://publications.drdo.gov.in/ojs/index.php/djlit/article/view/292/252

५९. Howol, Vanita. (2012). *Content Analysis of ILA Bulletin and IASLIC Bulletin 2005-2007*: A Comparative Study. M. Phil Dissertation. Nashik: Yashwantrao Chavan Maharashtra Open University.

६०. Hsieh, Hsiu. F. and Shannon, S. E. (2005). Three Approches to Qualitative Content Analysis. *QUALITATIVE HEALTH RESEARCH, 15*(9), 1277-1288. doi:http://www.iisgcp.org/pdf/glssn/Supplemental_Reading_on_Coding_2.pdf

६१. Jimenez, R. (2012). Social Representations and Transitional Justice: A Qualitative Content Analysis of the Colombian Press. *International Journal of Interdisciplinary Social Sciences, 6*(6), 135-146. doi:http://iji.cgpublisher.com/product/pub.88/prod.1485

६२. Joshi, Pradip. (2008). *Content Analysis of E-Journal 'Journal of Postgraduate Medicine' during 1997-2007*. Unpublished M. Phil Dissertation. Nashik: Yashwantrao Chavan Maharashtra Open University.

६३. Kale, Shubhangi. (2007). *Citation Analysis of Ph. D. Thesis in Social Sciences Submitted to Sant Gadge Baba University, Amravati.* Unpublished M. Phil Dissertation. Nashik: Yashwantrao Chavan Maharashtra Open University.

६४. Kannappanavar, B. U. and Jayaprakash. (2011). Content Analysis of Engineering College Library Websites. *Library Philosophy and Practice - Electronic Journal* , 1-8. doi:http://digitalcommons.unl.edu/libphilprac/673/

६५. Kerilinger, F. N., (1964). *Foundations of Behevioural Research.* New York: Richard and Winton. P. 430

६६. Kirankumar, G., Kumbar, M. and Somashekara. (2012). Content Analysis of Indian Institutes of Technology Library Websites. *University of Mysore* (pp. 484-492). Mysore: University of Mysore. doi:URI:http://eprints.uni-mysore.ac.in/id/eprint/15620

६७. Kondracki, N. L., Wellman, N. and Amundson, D. (2002). Content Analysis: Review of Methods and Their Applications in Nutrition Education. *Journal of Nutrition Education and Behavior, 34(*4), 224-230. Retrieved June 8, 2013, from http://www.sciencedirect.com/science/article/pii/S1499404606600973

६८. Kothari, C. R. (2013). *Research Methodology: Methods and Techniques.* New Delhi: New Age International Publishers.

६९. Krippendorff, Klaus. (2013). *Content Analysis: An Introduction to its Methodology.* New Delhi: Sage Publication India Pvt. Ltd.

७०. Krippendorff, Klaus. and Back, M. (2009). *The Content Analysis Reader.* New Delhi: Sage Publication India Pvt. Ltd.

७१. Kumar, Ranjit. (2011). *Research Methodology: a step- by- step guide for begineners.* New Delhi: Sage Publications.

७२. Latkar, Ravindra. (2009). *Content Analysis of Indian Journal of Infoamation Library and Society*. Unpublished M. Phil Dissertation. Nashik: Yashwantrao Chavan Maharashtra Open University.

७३. Lokhande, R. (2015). Open Access LIS Jouranl "The Electronic Journal of Knowledge Management" (2005-2009): A Content Analysis. *Khandesh Librarya Association, 5*(Special Issue), 17-21. Retrieved November 15, 2015

७४. Lokhande, R. S. (2013). Content Analysis of Open Access LIS Journal "ALIS" (2002-2011). *e-prints in Library and Information Science*, 6-20. doi:http://eprints.rclis.org/18283

७५. Lundberg, George, (1951). Social Research. New York: Longmans, Green & com. P. 183

७६. Mahmood, M. M. (2009). LIS Research in Pakistan: An Analysis of Pakistan Library and. *Library Philosophy and Practice*, 1-10. doi:http://eprints.rclis.org/13803

७७. Moser, C. A. (n.d.). *www.prezi.com*. Retrieved June 2014, from www.prezi.com: www.prezi.com

